ISSN No 2347-7075
Impact Factor- 8.141
Volume-6 Issue-15(A)

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur (M.S), India

Young Researcher Association

International Journal of Advance And Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor– 8.141
Vol.6 Issue-15(A) Jan-Feb-2025

# International journal of advance and applied research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*
**Bi-Monthly**

***Volume-6*** ***Issue-15(A)***

**Published by:**
Young Researcher Association, Kolhapur, Maharashtra, India
***Website:*** *https://ijaar.co.in*

**Submit Your Research Paper on Email**

**Regular Issue:** 2013ijaar@gmail.com **Special Issue:** ijaar2022@gmail.com

For Publication Call On - **8888454089**

**Chief Editor**
P. R. Talekar
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur(M.S), India
***Email:*** *editor@ijaar.co.in* ***Mob-*** *8624946865*

## Editorial & Advisory Board

**Dr. S. D. Shinde** **Dr. M. B. Potdar** **Dr. P. K. Pandey**
**Dr. L. R. Rathod** **Mr. V. P. Dhulap** **Dr. A. G. Koppad**
**Dr. S. B. Abhang** **Dr. S. P. Mali** **Dr. G. B. Kalyanshetti**
**Dr. M. H. Lohgaonkar** **Dr. R. D. Bodare** **Dr. D. T. Bornare**

***The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.***

**© All rights reserved with the Editors**

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –8.141
Vol. 6 Issue-15(A) Jan-Feb 2025

CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | सरदेशपांडे हुरडा पार्टी पर्यटनाची नवी वाट<br>**प्रा. डॉ. शशिकांत शिवप्पा तोळमारे** | 1- 4 |
| 2 | मराठवाडा : कृषी सिंचन विकास एक अवलोकन<br>**सुलक्षणा विठ्ठल भोसले, डॉ. एस.जी.बिराजदार** | 5-8 |
| 3 | कोकणातील कृषी पर्यटन केंद्रांचा अभ्यास<br>**डॉ. बारवकर पी. आर.** | 9-12 |
| 4 | कृषी पर्यटन व विकास - एक अभ्यास<br>**श्रीकांत भिमराव चंदनशिवे,डॉ. एन. एस. मगर** | 13-15 |
| 5 | पंढरपूर येथील श्री संत गजानन महाराजांचा मठ एक धार्मिक पर्यटन स्थळ: एक भौगोलिक अभ्यास<br>**सोमनाथ नागनाथ लोंढे ,प्रो. डॉ. बी.बी. राऊत** | 16-22 |
| 6 | अलिबाग तालुक्यातील सागरी मत्सव्यवसायावर पर्यटनाचा होणारा परिणाम : एक चिकीत्सक अभ्यास<br>**श्रीमती तृप्ती प्रभाकर पाटील ,डॉ. सतीश गुलाबराव जाधव** | 23-29 |
| 7 | पर्यटन नियोजन एक भौगोलिक अभ्यास<br>**डॉ.गौतम नागनाथ येडे** | 30-33 |
| 8 | नंदूरबार जिल्हयाच्या प्राकृतिक स्थितीचा अभ्यास<br>**प्रा.डॉ.बालाजी आव्हाड,प्रा.डॉ.एस.जी. बिराजदार** | 34-37 |
| 9 | ग्रामीण आणि शहरी विकासात पर्यटनाची भूमिका आणि आव्हाने<br>**डॉ. अतिश सारंगधर तिडके** | 38-43 |
| 10 | जालना जिल्ह्यातील पर्यटन स्थळे आणि रोजगार संधी यांचा भौगोलिक अभ्यास<br>**प्रा. डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर** | 44-50 |
| 11 | देवगिरीचा किल्याचा पर्यटनाच्या दृष्टिकोनातून भौगोलिक अभ्यास<br>**Dr. Shaista Yakub Shaikh** | 51-54 |
| 12 | खुल्दाबादच्या परिसरातील प्राचीन तलाव व जल व्यवस्थापनाचा भौगोलिक अभ्यास<br>**Smt. Sangita Subhash Bharati** | 55-57 |
| 13 | भौगोलिक माहिती प्रणालीच्या सहाय्याने दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे स्थान निश्चिती व सुनियोजनाचा अभ्यास<br>**कु. अस्मिता खट्टे,प्रा. डॉ. शिवाजी शंकर मस्के** | 58-61 |
| 14 | हत्तरसंग कुडल: एक ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन स्थळ<br>**कु. सुनिता कोळी , डॉ. शिवाजी शंकर मस्के** | 62-64 |
| 15 | धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील नळदुर्ग किल्ला: एका ऐतिहासिक पर्यटन स्थळाचा भौगोलिक अभ्यास<br>**श्री सुधाकर कांबळे ,डॉ. अंकुश शंकर शिंदे** | 65-69 |
| 16 | उस्मानाबाद जिल्यातील उमरगा तालुक्यातील कोळसूर गावाजवळील अचलबेट देवस्थान या धार्मिक पर्यटन स्थळाचा एक भौगोलिक अभ्यास<br>**श्रीमती सुमित्राबाई राठोड, डॉ. अंकुश शंकर शिंदे** | 70-74 |
| 17 | सोलापूर जिल्ह्यातील निवडक धार्मिक पर्यटन स्थळांचा अभ्यास<br>**Dr. Rajesh Bhimrao Gavakare** | 75-77 |
| 18 | पृथ्वीवरील जैविक विविधता आणि पर्यावरनातील बदल एक भोगोलीक अभ्यास<br>**प्रा, डॉ.राठोड सूर्यकांत लालचांद** | 78-83 |

| | | |
|---|---|---|
| 19 | अक्कलकोट नगरीतील श्री स्वामी समर्थ –राजेराय मठ या धार्मिक पर्यटनस्थळाचा एक भौगोलिक अभ्यास<br>**श्री धूळोबा बाळू वाघमोडे,डॉ. अंकुश शंकर शिंदे** | 84-87 |
| 20 | लातूर जिल्ह्यातील पाळीव प्राण्यांचे विश्लेषण :- एक पर्यावरणीय अभ्यास<br>**डॉ.एन.एस.गौंड,डॉ.बी.टी.पाटील** | 88-90 |
| 21 | धाराशिव जिल्ह्यातील दुर्लक्षित पर्यटन स्थळांचा अभ्यास<br>**Prof. Dr. Gaikwad S. M.** | 91-93 |
| 22 | तुळजापूर: एक धार्मिक पर्यटन स्थळ<br>**कु. वैष्णवी खानापुरे ,प्रा. डॉ. शिवाजी मस्के** | 94-98 |
| 23 | सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील नरखेड येथील श्री.सिध्देश्वर मंदिराचा दुर्लक्षित धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून अभ्यास<br>**श्री महेंद्र कसबे,डॉ. अंकुश शंकर शिंदे** | 99-103 |
| 24 | जागतिकीकरणाचा भारतीय कृषीवर झालेला परिणाम<br>**डॉ. गायकवाड डी.एस** | 104-107 |
| 25 | पुणे जिल्हातील किल्ले पर्यटनाचे योगदान व महत्व<br>**सौ. स्नेहल विजय अब्रोल,डॉ. सतीश गुलाबराव जाधव** | 108-111 |
| 26 | पर्यटन व्यवसायाची ग्रामीण विकासातील भूमिका<br>**श्री शेषणारायण किसन देशमुख** | 112-115 |
| 27 | चाकूर येथील सत्यसाई पर्यटनस्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास<br>**प्रा.डॉ.आप्पाराव अण्णाराव काळगापुरे, दयानंद शिवाजीराव धावणे, डॉ.बी.एन. नागलगावे** | 116-119 |
| 28 | मराठवाड्यातील दुर्लक्षित ऐतिहासिक पर्यटन उद्योगाचा विकास एक अभ्यास<br>**सहा. प्रा. रमेश बापूराव जोगदंड** | 120-122 |
| 29 | पर्यटन काळाची गरज एक भौगोलिक अवलोकन<br>**प्रा डॉ जनार्धन केशवराव वाघमारे** | 123-126 |
| 30 | | |
| 31 | | |
| 32 | | |
| 33 | | |
| 34 | | |
| 35 | | |
| 36 | | |
| 37 | | |
| 38 | | |
| 39 | | |
| 40 | | |
| 41 | | |
| 42 | | |
| 43 | | |
| 44 | | |
| 45 | | |
| 46 | | |
| 47 | | |

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# सरदेशपांडे हुरडा पार्टी पर्यटनाची नवी वाट

**प्रा. डॉ. शशिकांत शिवप्पा तोळमारे**
श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय वसमत जिल्हा हिंगोली
**Corresponding Author: प्रा. डॉ. शशिकांत शिवप्पा तोळमारे**

**सारांश :**

पर्यटन म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे होय. विशेषतः मनोरंजन विश्रांती ज्ञान माहिती मिळवणे. सांस्कृतिकदेवाण-घेवाण नवीन अनुभव मिळवण्यासाठी जो प्रवास केला जातो त्याला पर्यटन म्हणतात, यामध्ये कधी निसर्गाला जाणून घेण्यासाठी, कधी इतिहास जाणून घेण्यासाठी, कधी नवीन संस्कृती व सभ्यता जाणून घेण्यासाठी, कधी सहाशी प्रवासाचा अनुभव घेण्यासाठी, कधी धर्म व अध्यात्माची माहिती जाणून घेण्यासाठी, कधी आरोग्य संवर्धनासाठी व्यक्ती व व्यक्तींचा समूह एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करतो याला पर्यटन म्हणतात. एका बाजूला संपूर्ण जग प्रसारमाध्यमांमुळे अगदी जवळ आले आहे. लोक पर्यटनासाठी देश विदेशात नव्हे तर परग्रहावर जाण्याची स्वप्न पाहत आहेत. अशावेळी प्रत्येकाचा ओढा हा नागरी जीवनाकडे, नागरी भागाकडे आहे. विशेषतः नागरी जीवनाच्या आकर्षणापोटी खेडी ओस पडत चालली आहेत. लोक सर्वांगीण प्रतिकूलतेमुळे खेड्यात राहायला तयार नाहीत. खेड्यात यायला तयार नाहीत. खेडे ओस पडून शेती देशोधडीला लागण्याची भीती निर्माण झाली आहे. बहुतेक कष्टकरी खेड्याचा त्याग करून शहरात रोजगाराच्या संधी शोधत फिरत आहेत. सरकारच्या वेगडी योजनेमुळे लोकांना अन्नधान्य, मोफत प्रवास, मोफत आरोग्य, मोफत वीज मिळत आहे, म्हणून शेतात काम करायला रोजगारी मिळत नाही. शेती कामासाठी मनुष्यबळ कमी पडत आहे. या पार्श्वभूमीवर शेती करणे अत्यंत कठीण झाले आहे. दुसऱ्या बाजूला निसर्गाचा लहरीपणा, शेतमालाचे अस्थिर भाव, शेतमालाच्या घसरलेल्या किमती, खतांचे वाढलेले भाव, रोजगाराचे वाढलेली भाव, या पार्श्वभूमीवर शेती करणे अत्यंत कठीण होऊन बसले आहे.

या सर्व नकारात्मक पार्श्वभूमीवर शेती कायम तोट्यात जात असताना परभणी शहरातील एक उच्च शिक्षित शेतकरी उठतो व वडीलोपार्जित शेती करण्यासाठी पुढे येतो. शेती कायम तोट्यात जाते हे लक्षात आल्यानंतर शेतीत नवनवीन प्रयोगाला सुरुवात करतो. सुरुवातीला नर्सरी सुरू करतो. ती उत्तम चालते पण नर्सरी चा व्यवसाय एका विशिष्ट काळापर्यंतच मर्यादित असल्यामुळे तो वेगळा व्यवसाय करण्याचा विचार करतो, त्यातून त्याला हुरडा पार्टीची कल्पना सुचते. प्रायोगिक तत्त्वावर सन 2016 मध्ये तो परभणी पासून जवळच असलेल्या आपल्या शेतात हुरडा पार्टी सुरू करतो. लोकांना रुचकर हुरडा व अनेक गावरान मेव्याची मेजवानी देतो. पाहता पाहता त्याच्या हुरडा पार्टीला उदंड प्रतिसाद मिळतो, त्यानंतर तो अत्यंत कल्पकतेने पुढील नियोजन करून हुरडा पार्टीचे स्वरूप व्यापक बनवतो. स्वतःची जवळपास 15 एकर शेती व भटाईने घेतलेली पंचवीस एकर शेती अशा एकंदर 40 एकर शेतीवर हा हुरडा पार्टीचा प्लांट उभा टाकलेला आहे. म्हणून या हुरडा पार्टीच्या रम्य परिसरात पाहता पाहता खवय्यांची गर्दी वाढत जाते व सरदेशपांडे यांची हुरडा पार्टी केवळ मराठवाड्यामध्ये नव्हे, केवळ महाराष्ट्रात नव्हे, केवळ देशात नव्हे तर साता समुद्रापार जाऊन पोहोचते. ब्राझील फ्रान्स कॅनडाचे लोक हुरडा पार्टीला येतात, त्यानंतर सरदेशपांडे हुरडा पार्टी हा एक ब्रँड म्हणून नावारूपाला येतो. उत्तम नियोजन, खास व्यवस्थापन, कल्पकता, ज्ञान माहिती मनोरंजन, कृषी संस्कृतीचे दर्शन व खाण्यापिण्याची चंगळ म्हणून शेकडो नव्हे हजारो लोक वर्षाकाठी सरदेशपांडे यांच्या हुरडा पार्टीकडे येतात, त्यातून त्यांना दोन पैसे मिळतात सोबत असंख्य लोकांना रोजगार देण्यात ते यशस्वी होतात. त्यातून आर्थिक भरभराट होते. सरदेशपांडे यांची हुरडा पार्टी एक स्वतंत्र ब्रँड म्हणून पंचक्रोशीत नव्हे राज्य व देशात नावावर रूपाला येते.

**बिजसंज्ञा:** सरदेशपांडे हुरडा पार्टी पर्यटकांची नवी वाट

**प्रस्तावना :**

पर्यटनाचा इतिहास हा मानवी इतिहासा एवढाच प्राचीन आहे. अगदी जीवनाच्या आरंभापासून मानव एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करत होता. प्रवास करत होता. पण यामागे उदरनिर्वाह ही प्रेरणा होती, म्हणून याला पर्यटन म्हणता येणार नाही. पण मानवी जीवनात सुख समृद्धी स्थैर्य आल्यानंतर मानवाची अन्नाची गरज भागल्यानंतर भौतिक गरजा पूर्ण झाल्यानंतर मानव

मनोरंजनासाठी, ज्ञानप्राप्तीसाठी, माहिती मिळवण्यासाठी, मनशांतीसाठी, आरोग्य संवर्धनासाठी, सह हेतूक प्रवास करू लागला त्यातूनच पर्यटनाचा उदय झाला. प्राचीन काळी ग्रीस, मिश्र, भारत, चीन रोमन, प्रवासी, यात्रेकरू व संशोधकांनी व्यापक पर्यटन केल्याचे पुरावे पाहायला मिळतात. म्हणून प्राचीन काळात धार्मिक पर्यटन, अध्यात्मिक पर्यटन, नैसर्गिक पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन होत होते. भारतातील पर्यटनाची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. गंगा, वाराणसी, पाटलीपुत्र, प्रयागराज ही धार्मिक व आध्यात्मिक केंद्रे पर्यटनासाठी प्रसिद्ध होती. ब्रिटिश कालखंडामध्ये समुद्रकिनारे उंच पर्वतीय थंड हवेची ठिकाणे, सागरी बीच पर्यटकांची केंद्रं म्हणून उदयाला आली. ऐतिहासिक किल्ल्यांचे पर्यटन हा कुतूहलाचा विषय म्हणून लोकांनी समोर आणला. या पर्यटन व्यवसायामुळे वैयक्तिक विकास, सामाजिक विकास, सांस्कृतिक विकास, आर्थिक विकास, विचाराची देवाणघेवा, नवीनतेचा शोध, परकीय चलन प्राप्ती, लोकांच्या गरजांची पूर्तता असे अनेक फायदे झाले. पर्यटनामुळे स्थानिक लोकांच्या कलागुणांचा प्रसार झाला. आर्थिक उत्पन्नाचे मार्ग विकसित झाले. राज्य व राष्ट्राच्या तिजोरीत परकीय चलन मिळाले. या पार्श्वभूमीवर सरदेशपांडे यांनी विकसित केलेली हुरडा पार्टी ही पर्यटनाची नवीन वाट लोकांना प्रचंड आवडली. म्हणून वर्षाकाठी हजारो लोक त्यांच्या हुरडा पार्टीला भेट देतात. खाद्यपदार्थाचा आस्वाद घेतात. शेती संस्कृती व ग्राम जीवनाचा आनंद लुटतात. मनसोक्त रानमेवा खातात, हिंडतात, बागडतात, हुंदडतात मस्त मजा करतात. म्हणून लोक सरदेशपांडे यांच्या हुरडा पार्टीला पुन्हा पुन्हा येतात. जणू काही ते असंच सुचवतात सारे तीर्थ एक बार सरदेशपांडे हुरडा पार्टी वारंवार अगदी माफक पैशात म्हणजे केवळ 700 रुपयांमध्ये प्रचंड आनंद देणारी, मनोरंजन करणारी, धमाल मस्ती करायला संधी देणारी, सरदेशपांडे हुरडा पार्टी पर्यटनाची एक नवीन वाट म्हणून नावारूपाला येत आहे. एका कल्पक शेतकऱ्याने स्वतःच्या उन्नती बरोबरच असंख्य लोकांच्या रोजगाराच्या संधी विकसित केल्या आहेत ही अत्यंत कौतुकाची बाब आहे. लोकांचा आनंद, लोकांची तृप्ती, लोकांचे मनोरंजन, हेच आमचे साध्य या हेतूने सरदेशपांडे व त्यांची टीम राब राब राबते, म्हणून शेकडो हजारो लोकांना ग्रामजीवनाचा ग्राम संस्कृतीचा आस्वाद घेता येतो. ज्ञान माहिती मनोरंजनाचा खाद्यपदार्थाचा लाभ मिळतो. लोकांनी दिलेली तृप्तीचे ढेकर ऐकून तेही धन्य होतात. सरदेशपांडे यांच्या सेवेला समर्पणाला समन्वयाला संवेदनशीलतेला मनःपूर्वक सलाम दिल्या वाचून मनाला आराम मिळत नाही हेच खरं.

**अभ्यास क्षेत्र :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी अभ्यासक्षेत्र म्हणून परभणी जिल्ह्यातील परभणी शहरलगत असलेल्या सरदेशपांडे हुरडा पार्टी या फार्म हाऊसची निवड करण्यात आलेली आहे. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी परभणी हा एक महत्त्वाचा जिल्हा आहे, ज्याचा विस्तार 18° 15' उत्तर ते 19° 50' उत्तर अक्षवृत्त ते 76° 13' पूर्व ते 77° 12' पूर्व रेखांश असा आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ 6282.8 चौरस किलोमीटर आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1) शहरातील लोकांना शेतीची व शेतीविषयक कार्याची ओळख करून देणे.
2) शहरातील लोकांची ग्रामीण खाद्य संस्कृतीशी व कृषी संस्कृतीशी जवळीकता निर्माण करणे.
3) शहरातील लोकांना ग्रामीण कला हस्तकला निसर्ग व कष्टाची ओळख करून देणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यासाठी प्राथमिक माहिती स्त्रोताचा व द्वितीयक साधनसामग्रीचा आधार घेण्यात आला. प्रत्यक्ष सरदेशपांडे हुरडा पार्टी या ठिकाणी जाऊन तेथील अनेक पर्यटक कामगार व मालकाची प्रत्यक्ष भेट घेऊन माहितीचे संकलन केलं गेले. त्याआधारे शोधनिबंध तयार करण्यात आला.

**विषय विवेचन :**

मराठवाड्यातील दुष्काळी भागात शेती करणे अत्यंत कठीण होत असताना, असंख्य लोक शेती विकून प्लॉटिंग करून इतर उद्योगधंद्याकडे वळले असताना, एक ध्येयवेडा उच्चशिक्षित तरुण शेतकरी पुढे येतो व स्वतःच्या कल्पना नियोजन व मेहनतीने सरदेशपांडे हुरडा पार्टी हा इव्हेंट उभा करतो. सर्व प्रकारच्या सेवा सुविधा पुरवतो. लोकांना अत्यंत कमी पैशांमध्ये प्रचंड सेवा सुविधा पुरवितो. परिणामी पर्यटकांना आपल्याकडे खेचून घेण्याची जादू तो करतो. अत्यंत माफक पैशात विपुल खाद्यपदार्थ, गेम, मनोरंजनाची मेजवानी, रेनडान्स, घोडागाडी, बैलगाडी, उंच उंच झोके, फॅमिली गेम, जादूचे प्रयोग, गाण्याचा शो, विश्रांतीसाठी रूम, पोहण्याची मज्जा, वाजत गाजत प्रवेश. पिझ्झा, पाणीपुरी, पुरणपोळी, रानमेवा, उपदेशात्मक प्रबोधन, कार्यक्रमातून तो लोकांना खेळवून ठेवतो. शेवटी लोकांचा आनंद, उत्साह, प्रसन्नता हेच आपले ध्येय मानून अहोरात्र लोकसेवेत राब राब राबतो. म्हणून त्याला आर्थिक लाभ तर होतोच. सोबत एक मनशांती, अध्यात्मिक समाधान व समाजाच्या आपण कामी आल्याची भावना जागी होते. आपण अनेकांना रोजगार दिल्याचं समाधान त्याच्या चेहऱ्यावर उमटते. हे सर्व केवळ एका दिवसात कसे शक्य होते हे पाहण्यासाठी सरदेशपांडे हुरडा पार्टीचा दिनक्रम आपण समजून घेऊया.

**ऑनलाइन किंवा ऑफलाइन बुकिंग :**

सर देशपांडे हुरडा पार्टीला येण्यासाठी लोक ऑनलाइन बुकिंग करतात तर काही लोक ऑफलाईन बुकिंग

करतात. त्यामुळे सरदेशपांडे यांना नियोजन करणे सुलभ होते.

**स्वागत समारंभ :**

अगदी सकाळी 10:30 ते 11:00 वाजेपर्यंत सर्वच पर्यटक सरदेशपांडे हुरडा पार्टीच्या गेटवर जमतात तेव्हा अगदी वाजत गाजत राजस्थानी पेहरावात नटलेले तरुण-तरुणी पर्यटकांचे स्वागत करतात, त्यांना बँड पथकाच्या निनादात मुख्य हॉलकडे घेऊन जातात. मुख्य हॉल अर्थात नाथ हॉल कडे गेल्यानंतर सोबत आलेल्या लोकांना बॅगा ठेवण्यासाठी तिथे विविध रॅक उपलब्ध करण्यात आलेले आहेत. शिवाय लहान लहान झोपड्या बनवल्या आहेत. आपल्या सोयीने आपले सामान लोक ठेवून फ्रेश होतात व नाश्ता करण्यासाठी नाश्ता हॉलमध्ये जमतात.

**नाश्त्याचा वैविध्यपूर्ण मेनू :**

नाश्त्यासाठी गुळाची जिलेबी दही धपाटे, थालीपीठ, मटकी, मटकी पोहे, कांदा पोहे, दहा ते बारा प्रकारची फळे, पोहे असा वैविध्यपूर्ण मेनू उपलब्ध असतो. प्रत्येकाच्या आवडीनुसार तो मेनू पाहिजे तेवढा खाता येतो.

**मुख्य हॉलमध्ये विविध गेम :**

नाष्ट्यानंतर सर्वजण मुख्य हॉलमध्ये जमतात तिथे देशी स्वरूपाचे वैयक्तिक व सामूहिक खेळ खेळण्यासाठी उपलब्ध असतात. परिसरात अनेक मोठमोठी झाडे आहेत. त्या झाडाला उंच उंच झोके बांधलेले आहेत. त्या झाडांच्या झोक्याचा आनंद लुटता येतो. शिवाय टांगे आहेत. त्या टांग्यामध्ये बसून सफर करता येते. बैलगाडी आहे. बैलगाडी मध्ये बसून फिरता येते. घोडे उपलब्ध आहेत. घोडेस्वारी करता येते. खिलार बैलांच्या गाडीमध्ये मनसोक्त फिरता येते. मोठ्या लाल कंधारी बैलाची जोडी ही त्या ठिकाणी पाहायला मिळते. वाटेत जाबं, बोर, ऊस रस, गूळ अनेक प्रकारचा रानमेवा खाणाऱ्यासाठी उपलब्ध असतो. याशिवाय लहान मुलांना न्यूडल्स पिझ्झा पाणीपुरी याचाही आस्वाद घेता येतो. तुरीच्या शेंगा, भुईमुगाच्या शेंगा, वाटाण्याच्या शेंगा, बोर खायला मिळतात. मळणी यंत्र ट्रॅक्टर आठोळा झोपडी इत्यादी पाहता येते. त्या ठिकाणी अनेक सुविधा उपलब्ध आहेत.

**दुपारच्या जेवणाचा व्यापक मेनू :**

दुपारच्या जेवणासाठी ज्वारीची भाकरी, बाजरीची भाकरी, दही ताक वांग्याचे भरीत, बेसन, शेवग्याच्या शेंगा, वरण, भात, भाजी चपाती, डाळ भात सर्व काही चुलीवर शिजवलेले रुचकर अन्न मिळते. हॉलच्या अवतीभवती जागोजागी बाजा टाकलेल्या आहेत. लहान मुलांची खेळणी परिसरामध्ये आहे.

**सेल्फी पॉईंट :**

तसं पाहिल तर अख्खा मळाच अत्यंत सुंदर आहे, देखणा आहे. पण जागोजागी स्वतंत्र असे सेल्फी पॉईंट बनवण्यात आले आहेत. तिथे अत्यंत उत्साहाने आबालवृद्ध वारंवार सेल्फी काढताना आढळतात.

**हुरडा पार्टी :**

मुख्य आकर्षण म्हणजे अत्यंत दर्जेदार असा ज्वारीचा हुरडा येथे खायला दिला जातो. प्रत्यक्ष कणीस भाजून व कढईमध्ये हुरडा भाजून जमेल तसा प्रत्येकाला दिला जातो. हुरडा हा भरपेट खाण्यासाठी दिला जातो. यासोबतच शेंगदाणा चटणी, खोबऱ्याची चटणी, गाजराची चटणी, मीठ दही, ताक जे जे हवं तेथे खवयाला दिले जाते.










**सायंकाळचा फेरफटका :**

दुपारच्या जेवणानंतर व विश्रांतीनंतर लोक पुन्हा नव्या जोमाने फेरफटका मारायला निघतात. शेतात चिरेबंदी वाडा आहे. फुलांची व फळांची झाड आहेत. खायला ऊस आहे. प्यायला रस आहे. चहा घेण्यासाठी चहा आहे. फॅमिली गेम साठी स्वतंत्र हॉल आहे. सुंदर गायनाचा कार्यक्रम होतो. सुंदर अँकरिंग केले जाते मोज मस्ती धमाल येथे पाहायला मिळते.

**रात्रीचे जेवण :**

अगदी सकाळी 10:30 पासून ते दिवसभर धमाल मस्ती मजा केल्यानंतर सर्व फार्म हाऊस फिरल्यानंतर हुरड्याचा आस्वाद घेतल्यानंतर अनेक खेळ खेळल्यानंतर गाणे जादूचे प्रयोग मनोरंजनाचा कार्यक्रम, झोके सर्व झाल्यानंतर रात्री प्रत्येकाला आपापल्या घरला जायची वेद लागतात. तेव्हा या थकलेल्या भागलेल्या जीवाला पुन्हा वाटेत जेवायला थांबावे लागू नये म्हणून सरदेशपांडे रात्रीच्या जेवणाची सर्वोत्तम व्यवस्था करतात. अगदी पुरणपोळी, तूप, दाळ खिचडी, वरण तूप, वरण-भात असा भरगच्च सुंदर मेनू रात्री असतो. महत्त्वाचे म्हणजे हे सर्व जेवण चुलीवर बनवलेले असते. अंगतपंग जेवायची मजाच वेगळी असते. जेवणानंतर पानाचा विडा दिला जातो. सर्वजण सेंडऑफसाठी परत निघताना निरोपाच्या हॉलमध्ये येतात. अनेक जण आपापल्या भावभावना संवेदना प्रतिक्रियेच्या रूपाने व्यक्त करतात व पुन्हा सरदेशपांडे यांच्या हुरडा पार्टीला येण्याचा मनोदय व्यक्त करतात. अगदी जड अंतकरणाने निरोप घेतात. कारण एवढ्या अल्प दरामध्ये संपूर्ण दिवसभर खाद्य, ज्ञान, माहिती, मनोरंजन, गावरान मेवा, गावरान जेवण, लोकांच्या घाटी भेटी, खेळ चर्चा रेनडान्स मनसोक्त हुंदडल्यानंतर त्यांच्या मनातील भाव चेहऱ्यावर रेंगाळतात. त्यांच्या आनंदात सरदेशपांडे न्हाहून निघतात. पुन्हा उद्याच्या तयारीसाठी ते नव्या जोमाने कामाला लागतात, त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते कृतार्थपणे म्हणाले असंख्य लोकांच्या चेहऱ्यावरील हास्य आणि तृप्तीचा ढेकर ऐकल्यानंतर निखळ निवळ आनंद हीच आमच्यासाठी प्रेरणा आहे. कधीकाळी नोकरी शोधणारा मी आज अनेकांना आनंद तृप्ती आणि रोजगार देतो यापेक्षा वेगळे पुण्य नकोय मला..!!

**निष्कर्ष :**

1) केवळ परंपरागत पद्धतीने केलेली शेती तोट्यात चालते.
2) शेतकऱ्यांनी शेतीला जोड धंद्याची जोड दिली तर शेती उत्तम उत्पन्न देते.
3) शेतकरी कल्पक असेल भांडवल असेल तर शेती व्यापारी दृष्टीने करता येते.
4) नवीन तंत्रज्ञान व प्रयोगशील पद्धतीने शेती नफ्यात येऊ शकते.

**संदर्भ ग्रंथ :**

1) परभणी जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन.
फेसबुक इंस्टाग्राम व्हाट्सअप व लोकांच्या प्रतिक्रियेच्या माध्यमातून मिळालेली माहिती.

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No.15(A)** **Jan-Feb 2025**

# मराठवाडा : कृषी सिंचन विकास एक अवलोकन

**सुलक्षणा विठ्ठल भोसले[1], डॉ. एस.जी.बिराजदार[2]**
[1]भूशास्त्र संकुल,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा,नांदेड
[2]भूगोल विभाग प्रमुख, शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर, जिल्हा नांदेड
**Corresponding Author: सुलक्षणा विठ्ठल भोसले**
**Email:** rsingle75@gmail.com

**प्रस्तावना :**

शेती ही महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. जमिनीचा सर्वात जास्त वापर महाराष्ट्रात विविध पिकांच्या लागवडीसाठी केला जात असला तरी, हे राज्य अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण नाही. राज्याला इतर राज्यातून व परदेशातून अन्नधान्याची आयात करावी लागते. भारताच्या एकूण भूभागापैकी ९.४ टक्के भूभाग महाराष्ट्राने व्यापला आहे महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाच्या अहवालानुसार राज्याच्या ३,०८ लक्ष चौरस कि.मी. भूभागापैकी २२५ लक्ष हेक्टर क्षेत्र लागवड योग्य आहे. परंतु सर्व स्त्रोतातून अंतिमत: १२६ लक्ष हेक्टर इतके सिंचन क्षमता निर्माण होऊ शकेल असा निष्कर्ष नोंदविण्यात आला आहे. परंतु प्रत्यक्षात ७४.५५९ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करता येऊ शकली. मराठवाड्याच्या दृष्टिकोनातून विचार केला असता मराठवाड्यातील एकूण ६४.६० लक्ष हेक्टर भूभागापैकी १३ लक्ष ९८ हजार हेक्टर भूभागावर अंतिम सिंचन क्षमता निर्माण करता येऊ शकते. ही लागवडी योग्य क्षेत्राच्या २९ टक्के आहे.

**संशोधनाचा उद्देश :**

१..) मराठवाड्यातील जलसिंचनाचा अभ्यास करणे.

२.) जलसिंचनाचा शेती क्षेत्रावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके :**

मराठवाड्यात गोदावरी नदीवर उभारलेल्या जायकवाडी प्रकल्पात निर्माण झालेल्या पाणी तुटीच्या परिणामाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेतला असून त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट, शासकीय अहवाल इत्यादीचा वापर केलेला आहे.

**संशोधन विषयाचे क्षेत्र :**

मराठवाडा महाराष्ट्राचा सिंचन क्षेत्रात अतिशय मागासलेला भाग आहे. हा भाग निजामी राजवटीत असल्याकारणाने येथे विकास प्रक्रियेला उशिरा सुरुवात झाली १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो.या प्रादेशिक विभागात एकूण आठ जिल्हे व ७६ तालुके आहेत.

**पर्जन्याची स्थिती :**

राज्याच्या इतर प्रादेशिक विभागाच्या मानाने मराठवाड्यातील सरासरी पर्जन्य स्थिती अत्यंत कमी म्हणजे साधारणत: ५०० ते ६०० मि.मि.दरम्यान आहे. नैसर्गिकदृष्ट्या विचार केला असता पाऊस हा अनिश्चित स्वरूपाचा आहे. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात पावसाचे प्रमाण हे विभिन्न स्वरूपात आढळते. नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस ८७५ मि.मि. ते ९00 मि.मि. सरासरी पाऊस पडतो. तर सर्वात कमी पाऊस लातूर जिल्ह्यामध्ये ४५५ मि.मी. ते ७५५ मि.मि.पाऊस पडतो.

**मराठवाड्यातील उपलब्ध पाणी :**

मराठवाड्यात नैसर्गिकदृष्ट्या ३०९ अब्ज घनफूट पाणी उपलब्ध आहे. यापैकी अंदाजे ९६ टक्के पाणी गोदावरी खोऱ्यातून,३ टक्के पाणी कृष्णा खोऱ्यातून आणि १.५० टक्के पाणी तापी खोऱ्यातून मिळते.मराठवाड्याच्या एकूण ६४.८० लक्ष हेक्टर क्षेत्रापैकी ५७.६२ लक्ष हेक्टर म्हणजे ८९ टक्के क्षेत्र गोदावरी खोऱ्याने १० टक्के क्षेत्र कृष्णा खोऱ्याने १ टक्का क्षेत्र तापी खोऱ्याने व्यापले आहे.

**जायकवाडी प्रकल्प:**

मराठवाड्याचा कृषी विकास लक्षात घेऊन गोदावरी नदी खोऱ्यात अनेक प्रकल्पाची निर्मिती करण्यात

आली त्यापैकी जायकवाडी हा एक बहुउद्देशीय प्रकल्प आहे. या प्रकल्पाची निर्मितीचा कालावधी( १९६५ - १९७६ ) आहे. प्रकल्प अंतर्गत मराठवाड्यातील सिंचन क्षेत्र २.४० लाख हेक्टर विकसित करण्याचे उद्देश आहे.प्रकल्पाची लांबी ६० किलोमीटर असून रुंदी १० किलोमीटर आहे. उंची ४१.३ मीटर आहे. प्रकल्पाची साठवण क्षमता १०२ अब्ज घनफूट इतकी आहे तर उपयुक्त पाणीसाठा ७७ अब्ज घनफूट इतका आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून डावा व उजवा कालवा काढून मराठवाड्यातील १,०६६ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले.

**जायकवाडी प्रकल्प आणि पाण्याची तुट :**

जायकवाडी प्रकल्पाच्या वरच्या भागात अनुज्ञपणे मर्यादेपेक्षा अनेक लहान-मोठी धरणे बांधली गेल्यामुळे या धरणाचे निर्धारित केलेले ८१ अब्ज घनफुट पाणी मिळताना दिसत नाही.

**जायकवाडी प्रकल्प आणि कालवा सिंचन** :

मराठवाड्याचा कृषी सिंचन विकास गृहीत धरून प्रकल्पावर आधारित कालवा सिंचन पद्धती विकसित केली. प्रस्तुत कालवा सिंचन पद्धतीचे वैशिष्ट्ये खालील तक्त्यात दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक १.१

| अनुक्रमांक | प्रकल्प कालवा | पैठण डावा कालवा भाग १ | पैठण डावा कालवा भाग १ | माजलगाव उजवा कालवा |
|---|---|---|---|---|
| १. | कालव्याची लांबी | २०८ कि.मी. | १३२ कि.मी. | १६५ कि.मी. |
| २. | सिंचन क्षेत्र (पिकवार ) | १४१६४० हेक्टर | १४१६४० हेक्टर | ४१६८० हेक्टर |
| ३. | महत्तम क्षमता | १००.८० घमीदसे | ६३.७१० | ८३.६० घमीदसे |
| ४, | कालव्याच्या उगमाची उंची | १४.१० | ९.१४ मीटर | १०.४० मीटर |
| ५ | कालव्याच्या उगमाची खोली | ४.१० मीटर | ३.८७ मीटर | ४.०२ मीटर |
| ६. | तळाचे उतार प्रमाण | १.६६६६ | १.८७५० | १.७०० |

स्रोत : संशोधकांनी संकलित केलेली माहिती.

**गोदावरी खोरे आणि प्रादेशिक पाणी वाटप**:

राज्याला प्राप्त झालेल्या गोदावरी नदी खोऱ्यातील १०८९ अब्ज घनफूट पाण्याचे वाटप प्रादेशिक विभागानुसार तक्ता क्रमांक १.२ दर्शविलेले आहे .

तक्ता क्रमांक १.२गोदावरी खोरे आणि प्रादेशिक पाणी वाटप

| भौगोलिक विभाग | भौगोलिक क्षेत्र ल.हे. | टक्केवारी | ला. क्षेत्र ल.हे. | टक्केवारी | पाण्याचा प्रत्यक्ष मिळालेला वाटा अब्ज घनफूट | टक्के | लागवडी योग्य दिलेला पाणी वाटा अब्ज घनफूट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठवाडा | ५७ | ३८ | ५१ | ४६ | २७४ | २५ | ५०० |
| विदर्भ | ७६ | ५० | ४७ | ४२ | ६७४ | ६२ | ४५८ |
| उर्वरित महाराष्ट्र | १९ | १२ | १४ | १२ | १४१ | १३ | १३१ |
| एकूण | १५२ | १०० | ११२ | १०० | १०८९ | १०० | १०८९ |

स्त्रोत:या.रा.जाधव, गोदावरी खोरे आणि मराठवाड्याचा पाणी प्रश्न, मराठवाडा विकास प्रकाशन,औरंगाबाद, सप्टेंबर २०१९, पृष्ठ ४०.

उपरोक्त तक्त्याचा विचार केला असता गोदावरी खोऱ्याने व्यापलेल्या ८९ टक्के मराठवाडा भूभागासाठी ५०० अब्ज घनफूट पाण्याचा वाटा मिळाला. परंतु प्रत्यक्षात २७४ अब्ज घनफूट पाणी वापरण्याची मुभा असल्याकारणाने मराठवाड्याचा सिंचन विकासात अडथळा

आला आहे. तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे राज्यातील इतर प्रादेशिक भूभागाला पाण्याचा वाटा अधिकचा देण्यात आलेला दिसतो.

**जायकवाडी प्रकल्प आणि पाण्याची तुट** :

मराठवाड्याचं कृषी सिंचन क्षेत्र विकास गृहीत धरून जायकवाडी प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली परंतु प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणात पाण्याचे प्रादेशिक वाद निर्माण झाल्यामुळे जायकवाडीच्या दिशेने येणाऱ्या पाण्यात तूट निर्माण झालेली दिसते. ही तुट तक्ता क्रमांक १.३ दर्शवलेली आहे.

तक्ता क्रमांक १.३

जायकवाडीच्या पाण्याची तुट

| अनुक्रमांक | वर्ष | जायकवाडीच्या हक्काचे पाणी अब्ज घनफूट | जायकवाडीला मिळालेले पाणी अब्ज घनफूट | झालेली तूट अब्ज घनफूट |
|---|---|---|---|---|
| १ | २०१५ | ८१ | ०७ | ७४ |
| २ | २०१६ | ८१ | ०६ | ७५ |
| ३ | २०१७ | ८१ | ४० | ४१ |
| ४. | २०१८ | ८१ | ११ | ७० |
| ५ | २०१९ | ८१ | ४३ | ३८ |
| ६. | २०२० | ८१ | ५२ | २९ |
| ७ | २०२१ | ८१ | ४५ | ३६ |
| ८ | २०२२ | ८१ | २४ | ५७ |
| ९ | २०२३ | ८१ | ०७ | ७४ |

स्रोत : गोदावरी विकास महामंडळ अहवाल, छत्रपती संभाजीनगर, पृष्ठ १५.

उपरोक्त तक्त्याचा अभ्यास केला असता २०१५ ते २०२३ पर्यंत जायकवाडीच्या वरच्या भागातून जायकवाडीच्या दिशेने येणाऱ्या पाण्यात प्रचंड प्रमाणात तुट दिसून आलेली आहे. ही तूट मराठवाड्याच्या सिंचन क्षेत्रावर परिणाम करणारी बाब ठरली आहे.

**जायकवाडी प्रकल्प आणि कृषी सिंचन विकास**:

जायकवाडी प्रकल्पाच्या अंतर्गत मराठवाड्यातील जिल्हानिहाय भौगोलिक एकूण भौगोलिक क्षेत्र लाभक्षेत्र लाभक्षेत्र आणि प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र खालील तक्ता क्रमांक १.४ मध्ये दर्शविलेला आहे.

**जायकवाडीचे कार्यक्षेत्र आणि मराठवाड्यातील जिल्हे**

| मराठवाड्यातील जिल्हे | भौगोलिक क्षे. चौ. के.मी.हेक्टर | एकूण लाभक्षेत्र लक्ष हेक्टर | प्रत्यक्ष लागवडीखालील लाभ. क्ष क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. छत्रपती संभाजीनगर | १०.१० | ९,३७० | ७.९४ |
| २. जालना | ७.७५ | ३६,३०० | ६.१३ |
| ३. परभणी | ११.०५ | १५,५४९० | ८.०९ |
| ४. बीड | ११.१० | ७२०० | ७.९९ |
| एकूण | ३९.९० | १९ ९,९६० | ३०.१५ |

स्रोत : प्रा.डॉ. राजेंद्र इंगळे, जायकवाडी प्रकल्प एक दृष्टिक्षेप, जलसंवाद, मुद्रांक अपसेट पुणे.पृष्ठ १८.

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जायकवाडी प्रकल्प अंतर्गत मराठवाड्यातील ३९. ९० लक्ष चौ. कि.मी. भौगोलिक लाभ क्षेत्रापैकी फक्त मराठवाड्यात ३०.१५ लक्ष हेक्टर जमीन सिंचनाखाली दिसते. यापैकी ९.७५ लक्ष हेक्टर जमिनीचे क्षेत्र सिंचनापासून वंचित असल्याचे दिसते. याचा अर्थ जायकवाडी प्रकल्पाच्या अंतर्गत येणार सिंचन क्षेत्र आणि प्रत्यक्षातील सिंचन क्षेत्र यामध्ये फरक दिसतो.

**निष्कर्ष** : प्रस्तुत संशोधनातून खालील निष्कर्ष स्पष्ट करता येतात.

1. मराठवाड्यात पर्जन्याची सरासरी राज्यातील इतर विभागाच्या तुलनेने कमी म्हणजे ५०० ते ६०० मि.मी. इतके आहे. त्याचबरोबर पावसाचे प्रमाण

अनिश्चित स्वरूपाचे दिसते. हा भाग आवश्यक प्रवणक्षेत्रात मोडत असल्याकारणाने बहुतांशी भाग कोरडा असतो.

2. मराठवाड्यातील बहुतांश भाग गोदावरी नदी व तिच्या उपनद्या खोऱ्यात विभागला आहे मराठवाड्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ८९ टक्के या विभागात समाविष्ट आहे. मराठवाडा विभागाला गोदावरी खोऱ्यातून पाण्याचा न्याय वाटा मिळत नाही.
3. ३ ) जायकवाडी प्रकल्पाच्या अंतर्गत डाव्या आणि उजव्या कालव्याच्या माध्यमातून प्रकल्पाच्या उद्दिष्टामध्ये निश्चित केलेले सिंचन क्षमता आणि प्रत्यक्षात सिंचन क्षेत्र यात मोठी तफावत दिसते.
4. गोदावरी खोऱ्यातील महाराष्ट्राला प्राप्त असलेल्या १०८९ अब्ज घनफूट पाण्याचे वितरण व समान दिसते.मराठवाड्यासाठी एकूण ५७ लक्ष हेक्टर भूभागापैकी (३८ टक्के ),५१ लक्ष लाभ लाभक्षेत्र ( ४६ टक्के) भूभागाला २७४ अब्ज घनफूट पाणी वापरण्याची मुभा. प्रत्यक्षात मराठवाड्याला मिळालेला पाण्याचा वाटा ५०० अब्ज घनफूट इतका आहे. मराठवाड्याच्या हक्काचं २४३ अब्ज घनफुट पाण्याच्या बंधनामुळे मारावाडयाचा सिंचनाचा प्रश्न आहे. उर्वरित महाराष्ट्र व विदर्भाला एकूण लाभ क्षेत्राच्या तुलनेत पाण्याचा अधिक वाटा देण्यात आलेला दिसतो.
5. जायकवाडी प्रकल्पाच्या वरच्या भागातून सन.२०१५ ते २०२३ पर्यंतच्या कालावधीचा विचार केला असता प्रत्येक वर्षी पाण्यात तुट निर्माण झालेली दिसते. त्याचा विपरित परिणाम सिंचन क्षेत्रावर झाला.

**उपाय:**

1. मराठवाड्यात पर्जन्यवृष्टी वाढण्यासाठी वनक्षेत्र वाढवण्याची गरज आहे.
2. गोदावरी नदी खोऱ्यातील भौगोलिक क्षेत्राच्या प्रमाणात पाण्याचा न्याय वाटा दिला गेला
3. पाहिजे.
4. जायकवाडी प्रकल्प अंतर्गत उद्दिष्टात निश्चित केलेली सिंचन क्षमता आणि प्रत्यक्ष सिंचन क्षमता लक्षात घेऊन सिंचन वाढवण्याच्या दृष्टीने शासकीय पातळीवर उपक्रम राबवले पाहिजे.
5. जायकवाडी प्रकल्पातील पाण्याचे तूट लक्षात घेता तुट भरून काढण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याची गरज आहे.
6. जलव्यवस्थापन, जलसंरक्षण आणि जलपुरवठा या संदर्भातील योग्य नियोजन करून सिंचन विकासाला चालना दिली पाहिजे.

**समारोप:**

मराठवाडा हा भूभाग कृषी सिंचन क्षेत्रात महागातलेला आहे. मराठवाड्यात जायकवाडी हा एकमेव प्रकल्प असून त्यावर आधारलेल्या सिंचन विकासाला जायकवाडी प्रकल्पात निर्माण झालेल्या तुटीमुळे सिंचन क्षेत्र धोक्यात आले आहे पीठ भरून काढण्याच्या दृष्टीने योग्य नियोजन करणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची :**


1. के. सिद्धार्थ, एस मुखर्जी, (२०२३) जिओग्राफी थ्रू मॅप्स इंडिया, के सागरपब्लिकेशन,पुणे.
2. डॉ. दत्ता देशकर ( संपादक ), ( जून २०१३ ), जलसंवाद, उज्वल पेपर प्रिंटर्स, धुळे
3. प्रदीप पुरंदरे, (२०१७ ), पाण्याशप्पथ, लोकवाङ:यगृह, मुंबई
4. राजेंद्र इंगळे (२०१९), मराठवाड्याचा पाणी प्रश्न आणि महाराष्ट्रातील राजकारण, वप्रकाशित शोध प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
5. या.र. जाधव ( २०१३ ), मराठवाडा पाणी सिंचन आणि विकास, मराठवाडा जनता विकास परिषद,औरंगाबाद

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# कोकणातील कृषी पर्यटन केंद्रांचा अभ्यास

**डॉ. बारवकर पी. आर.**
श्री माधवराव पाटील महाविद्यालय, मुरूम जि. धाराशिव
**Corresponding Author: डॉ. बारवकर पी. आर.**

**सारांश:**

कृषी पर्यटन हा एक महत्वपूर्ण कृषी पूरक व्यवसाय म्हणून उदयास आला आहे. कृषी पर्यटनासाठी विविध घटकांची आवश्यकता असते. उत्तम व दर्जेदार कृषी पर्यटन केंद्र सुरु करणे प्रत्येक कृषी पर्यटन केंद्राचा मालक व कर्मचारी यांच्या कौशल्यावर अवलंबून आहे. कृषी पर्यटन केंद्रातील व्यक्तिंची सौन्दर्यदृष्टी त्यांच्या मनातील कृषी उत्पन्न केंद्र उभारणीस उपयुक्त ठरत आहे.

कृषी पर्यटन केंद्रासाठी योग्य जागेची निवड महत्वपूर्ण असून कृषी पर्यटकांना विविध सेवा सुविधा मुबलक प्रमाणात मिळणे आवश्यक आहे. नैसर्गिक सौंदर्य, रस्ते, वीज, पाणीपुरवठा, बांधकाम, विविध मनोरंजनात्मक उपक्रम, निवास, सुरक्षा, दर्जेदार भोजन व्यवस्था इत्यादी घटक कृषी पर्यटनासाठी पोषक ठरतात. सर्व सुविधायुक्त अद्यावत स्वरूपाचे कृषी पर्यटन केंद्र सुरु केल्यास भरपूर नफा मिळविता येतो. शहरी भागातील कृषी पर्यटकांना ग्रामीण जीवनाचे दर्शन कृषी पर्यटन केंद्रातुन मिळते. शहरी व ग्रामिण जीवनमान यांना जोडणारा दुवा म्हणजे कृषी पर्यटन केंद्र ठरत आहे.

**बीज संज्ञा :** कृषी पर्यटन, कृषी पर्यटक.

**प्रस्तावना:**

प्रस्तुत शोध निबंधात कोकणातील कृषी पर्यटन केंद्रांचा अभ्यास करण्यात आला. आज शहरातील नोकरदार मंडळींकडे मौजेखातर खर्च करण्यासाठी बराच पैसा आहे. शहरातील प्रदूषण, घड्याळाच्या तालावर करावा लागणार नाच, टीव्ही, कॉम्पुटर अशा निर्जीव-यांत्रिक वस्तुतून मिळणाऱ्या करमणुकीतला कंटाळा आणि गर्दी गोंगाट, कामाचा टॅन यातून वेळ आणि संधी मिळते तेव्हा मनात असलेली निसर्गाची ओढ अधिकच बळावते. बेताच्या खर्चात कुटुंबासह सुरक्षित ठिकाणी जवळपास सहलीसाठी जाण्याची सोय फारशी उपलब्ध होत नाही. संधी हेरून लहानमोठ्या शहरांच्या आसपासचे 'निसर्गाचे अस्तित्व जपणारे ग्रामीण भाग कृषी पर्यटन संकल्पनेची अचूक मंच ' आहेत.

कोकणात कृषी पर्यटनामध्ये कालानुरूप वाढ झाली आहे. कोकणामध्ये नैसर्गिक सौंदर्य विपुल प्रमाणात आहे. कृषी पर्यटन केंद्राची वाढ, विकासामध्ये नैसर्गिक घटकांचे महत्व अनन्यसाधारण आहे. कृषी प्रधान देशात कृषी घटकांशी संबंधित अर्थव्यवस्था असते. नागरी भागात राहणाऱ्या तसेच ग्रामीणभागात राहून शहरी मानसिकता जगणाऱ्या लोकांची शेती सोबत नाळ कमी होत गेली आहे. कृषी पर्यटन केंद्रातुन नागरी व ग्रामिण संस्कृतीचे दर्शन घडत आहे. कारण कृषी पर्यटनास येणारे बहुतांश पर्यटक हे नागरी विभागातील आहेत. कृषी पर्यटनामध्ये अनेक देशी-विदेशी मंडळी तसेच कांही स्वयंसेवी संस्था भरीव व मोलाची मदत करतात. कोकणातील कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांना कृषी पूरक व्यवसाय करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) कोकणातील कृषी पर्यटन केंद्रांचा अभ्यास करणे.

**अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व व्दितीय स्वरूपाची माहिती संकलित करण्यात आली आहे. संकलित माहितीचे विश्लेषण करून योग्य सांख्यिकीय अवलंब करण्यात आला आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

प्रस्तुत शोध निबंधाची महाराष्ट्र राज्यातील कोकण विभागाची निवड करण्यात आली आहे. कोकण विभागाचे स्थान महाराष्ट्राच्या पश्चिमेस सह्याद्री पर्वत व अरबी समुद्र यांच्यामध्ये आहे. कोकणाचा अक्षवृत्तीय विस्तार १५° ३६' १५" उत्तर ते २०° १९' ४५" उत्तर अक्षवृत्ताच्या दरम्यान आहे. रेखावृत्तीय विस्तार ७२° ५७' ०२" पूर्व ते ७४° २०' ५५" पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. कोकण विभागाचे क्षेत्रफळ ३०७२८ वर्ग चौ. कि. मी. आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने कोकण हा महाराष्ट्रातील महत्वपूर्ण प्रशासकीय विभाग आहे. कोकण विभागात मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा समावेश होतो, सन २०११च्या जनगणनेनुसार कोकण विभागाची एकुण लोकसंख्या २,८६,०२,००० इतकी असून

यापैकी १,५१,०४,००० पुरुष व १,३४,९८,००० स्त्रिया आहेत.

**विषय विवेचन:**

**कोकणातील कृषी पर्यटन केंद्रांचे वर्गीकरण:**

कोकणातील कृषी पर्यटन केंद्रांचे वर्गीकरण भांडवल गुंतवणुकीवर आधारित आहे. मोठे कृषी पर्यटन केंद्राची सुरुवातीची भांडवल गुंतवणूक २० लाख रुपयांपेक्षा अधिक आहे. १०ते २० लाख रु. गुंतवणूक असलेले मध्यम कृषी पर्यटन केंद्र तर १० लाख रुपयांपेक्षा कमी भांडवल गुंतवणुकीतून सुरु केलेले लहान कृषी पर्यटन केंद्र आहे.

**तक्ता क्र. १ कोकणातील कृषी पर्यटन केंद्रांचे वर्गीकरण**

| अ. क्र. | कृषी पर्यटन केंद्र | वारंवारिता | कृषी पर्यटन केंद्राची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मोठे कृषी पर्यटन केंद्र | ०६ | ४०. ०० |
| २ | मध्यम कृषी पर्यटन केंद्र | ०५ | ३३. ३३ |
| ३ | लहान कृषी पर्यटन केंद्र | ०४ | २६. ३७ |
| | एकूण | १५ | १०० |

स्रोत: संशोधकाने अधिकृत माहितीच्या आधारे संकलित केले आहे

**कोकणातील कृषी पर्यटन केंद्राची निर्मिती :**

महाराष्ट्रात २००५ साली बारामती येथे पहिले कृषी पर्यटन केंद्र निर्माण झाले. कोकणात कृषी पर्यटन केंद्राची निर्मिती २००७ नंतर झाली आहे. सन २०१० साली सर्वाधिक ०६ कृषी पर्यटन केंद्र सुरु झाली आहेत. सन २०११ साली ०३ कृषी पर्यटन केंद्र सुरु झाली. सन २००७ ते २०१३ या कालावधीत कोकणातील कृषी पर्यटन केंद्र व्यासायिक स्वरूपात सुरु केली आहेत.

**कोकणातील कृषी पर्यटन केंद्राचे शहरापासून स्थान व अंतर:**

कृषी पर्यटन केंद्राचे स्थान ऐतिहासिक स्थळ, नसर्गिक संपन्नता असलेल्या परिसरात असल्यास कृषी पर्यटकांसाठी आनंददायी ठरते. वाहतूक व दळणवळण सुविधांच्या उपलब्धतेचा आणि कृषी पर्यटन विकासाचा जवळचा संबंध आहे

.

**तक्ता क्र. २ कोकणातील कृषी पर्यटन केंद्राचे शहरापासून स्थान व अंतर:**

| अ. क्र. | शहरापासून अंतर | कृषी पर्यटन केंद्र | कृषी पर्यटन केंद्राची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १० ते २५ | ०७ | ४६. ६७ |
| २ | २६ ते ५१ | ०३ | २०. ०० |
| ३ | ५१ ते १०० | ०३ | २०. ०० |
| ४ | १०० कि. मी. पेक्षा जास्त | ०२ | १३. ३३ |
| | एकूण | १५ | १०० |

स्रोत: संशोधकाने अधिकृत माहितीच्या आधारे संकलित केले आहे.

तक्ता क्र. २ च्या निरीक्षणावरून असे दिसते कि, कोकणामध्ये कृषी पर्यटन केंद्राचे स्थान व अंतर यांचा जवळचा संबंध आहे. कोकणात सर्वाधिक ०७ कृषी पर्यटन केंद्राचे स्थान १० ते २० कि. मी. च्या दरम्यान आहे. ४६.६७ % (०७) कृषी पर्यटन केंद्र शहरालगतच्या प्रदेशाजवळ आहेत. १०० कि. मी. पेक्षा जास्त अंतरावर सर्वात कमी १३.३३ % (०२) कृषी पर्यटन केंद्रे आहेत.

**कोकणामध्ये कृषी पर्यटन केंद्र सुरु करण्याची कल्पना व मार्गदर्शन :**

कोणताही व्यवसाय सुरु करण्यासाठी कल्पनेबरोबरच योग्य मार्गदर्शनाची गरज असते. योग्य मार्गदर्शन व अचूक नियोजनामुळे कृषी पर्यटन व्यवसायाची भरभराट होण्यास मदत होते मार्गदर्शनामुळे केसही पर्यटन केंद्रातील सेवा सुविधांमध्ये सकारात्मक बदल आहेत. त्याचा थेट परिणाम कृषी पर्यटकांच्या संख्येवर झालेला आढळून येतो.

कोकणातील ०२ लहान, ०३ मोठे व ०३ मध्यम कृषी पर्यटन केंद्रे स्वतःच्या कल्पनेतून सुरु केली आहेत.

दुसऱ्या पर्यटन केंद्रांची पाहणी करून व त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन कोकणात ०१ लहान व ०२ मध्यम कृषी पर्यटन केंद्रे सुरु करण्यात सरकारी अधिकारी यांची भूमिका महत्वपूर्ण आहे.

मित्र व जवळचे नातेवाईकांच्या मार्गदर्शनाने ०१ मध्यम व ०२ मोठे कृषी पर्यटन केंद्रे सुरु झालेली आहेत.

वर्तमानपत्रातील जाहिराती व माहितीच्या आधारे ०१ मध्यम आकाराचे केंद्र सुरु केल्याचे आढळते.

**कोकणातील कृषी पर्यटन केंद्रास भेट देणाऱ्या कृषी पर्यटकांचे गटनिहाय वर्गीकरण :**

**तक्ता क्र. ३ कोकणातील कृषी पर्यटन केंद्रास भेट देणाऱ्या कृषी पर्यटकांचे गटनिहाय वर्गीकरण**

| अ. क्र. | गट | कृषी पर्यटन केंद्र वर्गीकरण | | | | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लहान | | मध्यम | | मोठे | | | |
| | | कृषी पर्यटन केंद्र | टक्केवारी | कृषी पर्यटन केंद्र | टक्केवारी | कृषी पर्यटन केंद्र | टक्केवारी | कृषी पर्यटन केंद्र | टक्केवारी |
| १ | एकटे | ०० | ०० | ०१ | २० | ०१ | १६.६७ | ०२ | १३.३४ |
| २ | कुटुंब | ०२ | ५० | ०१ | २० | ०२ | ३३.३३ | ०५ | ३३.३३ |
| ३ | मित्र | ०१ | २५ | ०३ | ६० | ०२ | ३३.३३ | ०६ | ४०.०० |
| ४ | शाळा/ महाविद्यालय | ०१ | २५ | ०० | ०० | ०१ | १६.६७ | ०२ | १३.३३ |
| एकूण | | ०४ | १०० | ०५ | १०० | ०६ | १०० | १५ | १०० |


स्रोत: संशोधकाने अधिकृत माहितीच्या आधारे संकलित केले आहे.

कोकणातील कृषी पर्यटन केंद्रास पर्यटनासाठी कृषी पर्यटक विशिष्ट गट करून येतात. काही कृषी पर्यटक एकटे, कुटुंबसोबत, मित्रासोबत व शाळा/महाविद्यालय अशा विविध गटाने कृषी पर्यटन करतात. तक्ता क्र. ३ च्या निरीक्षणावरून असे दिसते कि, कोकणातील कृषी पर्यटन केंद्रास सर्वाधिक ४०% कृषी पर्यटक मित्रांसोबत कृषी पर्यटनास आलेले आढळून आले आहे. ३३.३३% कृषी पर्यटक आपल्या कुटुंबासोबत कृषी पर्यटनास आलेले आहेत. सर्वात कमी कृषी पर्यटक शाळा/ महाविद्यालय व एकटे प्रत्यकी १३.३४ % कृषी पर्यटन करतात. लहान कृषी पर्यटन केंद्रास कुटुंबासोबत सर्वात जास्त ५० % कृषी पर्यटक येतात. मित्रमंडळी व शाळा / महाविद्यालय सोबत प्रत्येकी २५ % कृषी पर्यटक पर्यटन करतात. मध्यम कृषी पर्यटन केंद्रात ६० % कृषी पर्यटक मित्रांसोबत कृषी पर्यटन करताना आढळून आले आहे. कुटुंबासोबत २० % कृषी पर्यटक पर्यटन करतात. मोठ्या कृषी पर्यटन केंद्रात कुटुंब व मित्रासोबत सर्वाधिक ३३. ३३ % कृषी पर्यटक पर्यटन करताना दिसत आहेत. तर सर्वात कमी एकटे व शाळा आणि महाविद्यालय प्रत्येकी १३. ६७ % कृषी पर्यटक पर्यटन करताना आढळून आले आहे.

**तक्ता क्र. ४ कोकणातील कृषी पर्यटन केंद्रे**

| अ. क्र. | कृषी पर्यटन केंद्राचे नाव व पत्ता | क्षेत्रफळ (एकरमध्ये) |
|---|---|---|
| १ | अन्नपूर्णा कृषी पर्यटन केंद्र, मु. इदगाव पो. वांगणी ता. अंबरनाथ जि. ठाणे | २३ |
| २ | रोहिणी कृषी पर्यटन केंद्र, मु. पो. रहाटपाडा ता. वसई जि. ठाणे | १८ |
| ३ | देशमुख उद्यान कृषी पर्यटन केंद्र, मु. कारवा पो. वांगणी ता. अंबरनाथ जि. ठाणे | ०५ |
| ४ | मंदार कृषी पर्यटन केंद्र, मु. पो. कोळींब ता. कल्याण जि. ठाणे | ०४ |
| ५ | तरफ कृषी पर्यटन केंद्र, मु. रामपूरगाव पो. घोलवड ता. डहाणू जि. ठाणे | ०६ |
| ६ | गारवा कृषी पर्यटन केंद्र, मु. पानशेकोंड ता. माणगाव जि. रायगड | २५ |
| ७ | सगुणा बाग, मालेगाव कृषी पर्यटन केंद्र, मु. पो. नेरळ ता. कर्जत जि. रायगड | १६ |
| ८ | करपे कृषी पर्यटन केंद्र, मु. पो. नागाव ता. अलिबाग जि. रायगड | १० |
| ९ | माझ्या मामाचा गाव, आपट्याचे खोरे, मु. पो. मुंढरता ता. गुहागर जि. रत्नागिरी | २७ |
| १० | औदुंबर कृषी पर्यटन केंद्र, मु. धाऊलवल्ली पो. पारवाडी ता. राजापूर जि. रत्नागिरी | ०५ |
| ११ | वृंदावन कृषी पर्यटन केंद्र, मु. पो. भांबेड ता. लांजा जि. रत्नागिरी | २८ |
| १२ | मधुग्राम कृषी पर्यटन केंद्र, मु. शिवाजीनगर पो. दापोली ता. दापोली जि. रत्नागिरी | ०८ |
| १३ | गणेश कृषी पर्यटन केंद्र, मु. पो नाटे ता. राजापूर जि. रत्नागिरी | २१ |
| १४ | नंदन कृषी पर्यटन केंद्र, मु. पो. डोंगरी ता. सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग | ०९ |
| १५ | कल्पतरू कृषी पर्यटन केंद्र, मु. पो. उभा दांडा ता. वेंगुर्ले जि. सिंधुदुर्ग | २४ |

स्रोत: संशोधकाने अधिकृत माहितीच्या आधारे संकलित केले आहे.




**निष्कर्ष:**

1. कोकणात मोठ्या कृषी पर्यटन केंद्रांची सर्वाधिक आहे.
2. कोकण किनारपट्टीलगत समुद्र किनारा असल्यामुळे पर्यटन विकासाला भापूर वाव आहे.
3. सर्वाधिक ४० % कृषी पर्यटक हे मित्रांसोबत, ३३.३३ % कृषी पर्यटक आपल्या कुटुंबासोबत तर १३.३४ % कृषी पर्यटक हे शाळा आणि महाविद्यालयातून पर्यटनासाठी येत असल्याचे आढळून आले आहे.
4. ४) पर्यटन स्थळांच्या विकासामुळे स्थानिक व्यवसाय चांगल्या प्रकारे चालतात. त्यामुळे कोकणातील कृषी पर्यटन हा कृषिपूरक व्यवसाय म्हणून उदयास आला आहे.

**संदर्भ:**

**1.** Singh, R. (2007) Agritourism in India, http://www.managementparadise.com/forums/archive/ index.php/t-19506.html

**2.** Lamb R (2008) How Agritourism Works, http://adventure.howstuffworks.com/agritourism. htm /printable.

3. महाराष्ट्र पर्यटन संदर्भ (२०००) महाराष्ट्र शासन, मुंबई.

4. महाराष्ट्र पर्यटन स्थळे: (२००१) शारदा प्रकाशन, मुंबई.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# कृषी पर्यटन व विकास - एक अभ्यास

**श्रीकांत भिमराव चंदनशिवे[1] डॉ. एन. एस. मगर[2]**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, लातूर
**Corresponding Author: श्रीकांत भिमराव चंदनशिवे**

**सारांश :**

भारत देश कृषी प्रधान असल्याने भारतात कृषी पर्यटनासाठी अनेक संधी आहेत. परंतु भारतातील लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असल्याने शेत जमिनीचे तुकडी करणाचे प्रमाण जास्त आहे. परंतु कृषी पर्यटनासाठी असे तुकडीकरण अडथळा ठरणारे असतात. शिवाय शेती ही पारंपरिक पद्धतीने केली जाते. शेतीकडे आजही उदरनिर्वाहाचे साधन म्हणूनच पाहिले जाते. भारतीय शेती हा एक प्रकारचा जुगार मानला जातो. एखाद्या वेळेस खूप मोठे उत्पादन येते तर दुसऱ्या वेळेस उत्पादन येऊ शकत नाही. त्यामुळे शेतकरी शेतीमध्ये मोठी गुंतवणूक करण्यास घाबरतात. शेतीमध्ये खूप मोठी गुंतवणूक करून हवे तसे सहाय्य प्राप्त झाले नाही तर खूप मोठा आर्थिक फटका बसतो, यामुळे शेतकऱ्याचे जीवन उद्धवस्त होऊ शकते. त्यामुळे शेतकरी शेतीमध्ये कोणताही नवोपक्रम राबवण्यास धजावतात. परंतु अलीकडे शासनाने कृषी पर्यटनाच्या विकासासाठी राबवलेल्या वेग वेगळया योजना, सरकारी सहाय्य, भांडवलाची उपलब्धता, कृषी पर्यटनाची माहिती याद्वारे नवा दृष्टिकोन ठेवून कृषी पर्यटन यशस्वीपणे राबवून आर्थिक समृद्धी प्राप्त करता येऊ शकते.

**प्रस्तावना :**

कृषी पर्यटन हा शब्द एखाद्या कार्यक्षेत्राला किंवा कोणत्याही कृषी बागायती किंवा कृषी व्यवसायाला मनोरंजन शिक्षण किंवा शेती क्रिया कलापाची माहिति देण्याचा उद्देश आहे. कृषी पर्यटन हा पर्यटनाचा एक प्रकार आहे. या पर्यटनाद्वारे ग्रामीण संस्कृती, शेतीतील लोकांचे जीवन, कृषी पद्धती या सर्वांची माहिती व अनुभव घेण्याचा प्रयत्न केला जातो.

थोडक्यात कृषि पर्यटनामध्ये शेतीची माहिती, शेतीतील जीवन ग्रामीण संस्कृती , मनोरंजन या सर्वच घटकांचा समावेश मध्ये होतो. त्यामुळे कृषी पर्यटनाकडे याच दृष्टीने पाहिले जाते. भारत हा देश कृषिप्रधान देश आहे. आजही देशाच्या उत्पन्नात कृषी क्षेत्राचा २० % वाटा आहे परंतु शेतकरी मात्र दारिद्र अवस्थेतच असलेला दिसून येतो. शेतकऱ्यांना आर्थिक संपन्न बनवण्यासाठी कृषी पर्यटनाला अन्यनसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. भारताची बहुतांशी लोकसंख्या शहरांमध्ये राहत आहे. तसेच आजही शहराकडे ग्रामीण लोकांचे स्थलांतर होत आहे. शहरी लोक हे बहुतांशी बंद दाराआड जीवन जगत जगतात. या लोकांना वेगवेगळया कारणामुळे जीवन खुल्या मनाने जगतात येत नाही. बहुतांशी वेळ शाळा, काम , नोकरी उर्वरित वेळ इंटरनेट, , टीव्ही बंद दरवाजातील खेळ यातच ते अडकलेले दिसून येतात. त्यामुळे मानसिक तणावमुक्त होण्यासाठी मनोरंजन म्हणून ग्रामीण भागाचा अनुभव घेण्यासाठी कृषी पर्यटनास ते पसंत करतात. कृषी पर्यटनाने प्रत्यक्ष ग्रामीण जीवन काय आहे ?शेती कशी पिकवली जाते? शेतीतील ताजी फुले, फळे, फळभाज्या, पालेभाज्या, शेतीमध्ये गाई म्हशीचे दूध काढणे, शेतीमध्ये बसून जेवणाचा आस्वाद घेणे बैलगाडी ट्रॅक्टर यामध्ये फिरणे याचा आनंद घेण्यासाठी अनेक शहरी लोक कृषी पर्यटनाला महत्त्व देतात. यातूनच ग्रामीण शहरी नाळ जोडली जाते तसेच शेतकऱ्यांना रोजगाराच्या संधी प्राप्त होऊन आर्थिक उन्नतीस हातभार लागतो. उत्पन्नाचे स्त्रोत सुरू झाल्याने ग्रामीण लोकांचे शहराकडे होणारे स्थलांतर थांबण्यास प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत होते..

**उदिष्टे -**

1. कृषी पर्यटनातून उत्पनाच्या वेगवेगळया स्त्रोतांचा अभ्यास करणे.
2. कृषी पर्यटनासाठी आवश्यक नैसर्गिक सहाय्यभूत घटकाचा अभ्यास करणे.
3. कृषी पर्यटनासाठी शासनाच्या वेगवेगळया मदतीचा अभ्यास करणे.
4. कृषी पर्यटनासाठी येणाऱ्या अडचणीचा किंवा आव्हानाचा अभ्यास करणे व त्यावर उपाय योजना सुचवणे.

**कृषी पर्यटनाचे फायदे:**

1) आज ही ग्रामीण भागात देशातील संस्कृती व परंपरा टिकून आहेत. या टिकवून ठेवलेला संस्कृती परंपरा यांचे संरक्षण व संवर्धन याची ओळख या कृषी पर्यटनाच्या माध्यमातून होऊ शकत. शहरी व ग्रामीण लोक एकमेकांच्या संपर्कात येत असल्याने विचारांची देवाण घेवाण होण्यास मदत होते.
2) उत्पन्नाच्या स्रोतात विविधता आणता येते. शेतकऱ्यांना कृषी पर्यटनाच्या माध्यमातून स्वतः शेती करता येते. व शेती करतच भेट देण्यास येणाऱ्या पर्यटकांच्या माध्यमातून शेतीतील ताजा भाजीपाला, फळे, फुले, पर्यटनासाठी आलेल्या लोकांचे जेवण, स्थानिक घटकाचा उपयोग केल्याने खर्चात होणारी बचत अशा वेगवेगळया घटकांचा उपयोगाद्वारे उत्पन्नाच्या स्रोतात विविधता आणता येते. व उत्पन्नात वाढ करता येते.
3) पर्यावरण संवर्धन- कृषी पर्यटनामुळे झाडे, फुले, बगीचा, पाणी संवर्धन असे वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. साहजिकच त्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन होण्यास मदत होते. सध्या पर्यावरण संवर्धन ही काळाची खूप मोठी गरज आहे. पर्यावरणाच्या असमतोलमुळे अनेक समस्या उद्धवत आहेत. परंतु कृषी पर्यटनामुळे हे समस्या सोडवण्यास मदत होते.
4) शेती बद्दल नव्या पिढीला माहिती होते - कृषी पर्यटन आधारे शेती शेतीसाठी आवश्यक शेत जमीन, पीक रचना, हवामान, शेतीतील वेगवेगळया संधी, शाश्वता या संदर्भात माहिती मिळण्याची संधी मिळते.
5) स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन - कृषी पर्यटनामुळे स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन मिळते. उदा. बैलगाडी तयार करणे, शेतीतील फळभाज्या, पालेभाज्या, फळे, शेततळयातील मासे, गाई म्हशी यांच्या द्वारे मिळणारे दुधाचे उत्पादन यांचे उत्पादक ग्राहक अशी विक्री होत असल्याने ग्राहकांनाही शुद्ध व ताजा भाजीपाला दूध फळे स्वस्तात मिळतात. व शेतकऱ्यांनाही त्यांच्या मालाच्या उत्पादनाचे रास्त पैसे मिळतात. तसेच पर्यटकांना देण्यात येणाऱ्या वेगवेगळया सोयी मुळे इतर सहाय्यक रोजगाराची संधीही प्राप्त होते.
6) मनोरंजन- कृषी पर्यटनाद्वारे मनोरंजन होते प्रत्यक्ष निसर्गाशी संपर्क येत असल्याने निखळ आनंद प्राप्त होतो. तेथील लोक जीवनाची माहिती मिळते. धबधबे, तळे, पशुपालन, बैलगाडी ट्रॅक्टर मधून सफर, शेतात बसून चुलीवरचे जेवण खाणे, हुरडा पार्टी तसेच म्हशीचे दूध काढणे यासारखे प्रत्यक्ष अनुभव हि घेता येतात. या सर्वांच्या माध्यमातून निखळ आनंद प्राप्त होतो.
7) पायाभूत सुविधांचा विकास होतो - कृषी पर्यटनामुळे रस्ते वीज पाण्याच्या सुविधा यासारख्या सोयी सवलती तेथे निर्माण होण्यास मदत होते.
8) आरोग्य व निरोगीपणा - कृषी पर्यटनामध्ये प्रत्यक्ष निसर्गाच्या सानिध्यात येत असल्याने, निरोगी वातावरण प्राप्त होते, येथील वातावरण प्रदूषण मुक्त असते, स्वच्छ हवा,पाणी, रासायनिक खते व फवारणी मुक्त भाजीपाला प्राप्त होतो. त्यामुळे साहजिकच आरोग्य व निरोगीपणासाठी कृषी पर्यटन अत्यंत उपयोगाची वाटते.
9) शेतकऱ्यांशी संवाद - कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांशी संवाद साधता येतो. शेतकऱ्यांचे जीवन जवळून पाहता येते. त्याची दिनचर्या, शेतीतील कामे, शेतीसाठी आवश्यक हवामान, हवामानाचा शेतीवर होणारा प्रभाव, शेतीतील चढ उतार, शेतीतील होणारे फायदे तोटे, बाजारभावाचा होणारा प्रभाव या सर्व घटकांची माहिती शेतकऱ्याच्या संवादानातून प्राप्त होते.
10) संशोधनाची संधी प्राप्त होते - कृषी पर्यटनामुळे शेतीतून प्राप्त होणाऱ्या रोजगाराच्या संधी, आव्हाने, अडचणी, उपायोजना, सरकारी सहाय्य यासारख्या अनेक घटकावर संशोधनाच्या संधी मिळतात.

**कृषी पर्यटनासाठी आवश्यक घटक**

1. भांडवल- कृषी पर्यटनासाठी भांडवल हा एक आवश्यक घटक आहे. कृषी पर्यटनासाठी वेगळा सोयीसुविधा या ठिकाणी निर्माण कराव्या लागतात. यामध्ये काही भौतिक साधन सुविधा पायाभूत सुविधा याची निर्मिती करावी लागते यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची ही गरज असते. भांडवलाशिवाय कृषी पर्यटनाचा विकास होऊ शकत नाही.
2. कृषी पर्यटनासाठी शेतीची ज्ञान असणे गरजेचे आहे. शेतीच्या वेगवेगळया हंगामात कोणकोणते पिके घ्यावेत, हवामानाला अनुसरून कशी पिके घ्यावीत, उपलब्ध पाण्याचा वापर करून त्या पाण्याच्या वापरावर कसे पिके घ्यावीत, स्थानिक उपलब्ध घटकांचा वापर करून शेतीला कशीमदत होईल याचे ज्ञान असावे.
3. मूलभूत सुविधा- कृषी पर्यटन करत असताना काही मूलभूत सुविधा असणे गरजेचे असते उदाहरणार्थ रस्ते वीज पाणी वाहतूकअश्या महत्त्वाच्या सुविधा उपलब्ध

असणे गरजेचे आहे. या मूलभूत सुविधांचा अभाव असल्यास कृषी पर्यटनाचा विकास करणे अत्यंत अवघड आहे.

4. कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण - कृषी पर्यटनाच्या वेळी भेट देण्यास येणाऱ्या पर्यटकांना वेगळा सोयी सुविधा पुरवाव्या लागतात. त्यांना योग्य ती माहिती द्यावी लागते. वेळेवर अन्न पाण्याच्या सुविधा द्याव्या लागतात. राहण्याची योग्य सोय करावी लागते. त्यांच्याशी व्यवस्थित संवाद साधावा लागतो. त्यासाठी प्रशिक्षणाची गरज असते.

**कृषी पर्यटनातील आव्हाने**

1) शेतीचे हंगामी स्वरूप

2) सरकारचे नाकर्ते धोरण

3) मूलभूत सुविधाचा अभाव.

4) जमिनीचे तुकडीकरण.

5) शेतकऱ्यांना माहितीचा अभाव.

6) भांडवलाचा अभाव.

7) पाण्याच्या सुविधाचा अभाव.

**निष्कर्ष-**

भारत देशात शेतीप्रधान देश आहे. आजही देशाच्या एकूण उत्पन्नात शेतीचा वाटा महत्त्वाचा आहे. शेती व पर्यटन हा जोड व्यवसाय केल्यास आर्थिक समृद्धी प्राप्त होऊ शकते. भारत हा कृषिप्रधान देश जरी असला तरी शेतकरी हा मात्र कायम दारिद्र्य अवस्थेत असलेल्या दिसून येतो. त्यामुळे शेताचाच पर्यटनासाठी वापर केल्यास शेतकऱ्यांना दुहेरी फायदा होऊ शकतो. पर्यटकांना वेगवेगळया सोयी उपलब्ध करून दिल्यास उत्पन्नाचे वेगवेगळे मार्ग निर्माण होऊ शकतात. ग्राहकांनाही स्वच्छ ताजा भाजीपाला दूध फळे फुले उपलब्ध होऊ शकतात, निसर्गाच्या सानिध्यात आनंद मिळू शकतो, प्रदूषण मुक्त, आरोग्यदायी निरोगी वातावरणाचा लाभ मिळू शकतो, शहरी व ग्रामीण संस्कृतीची नाळ जोडली जाऊ शकते, ग्रामीण जीवन जवळून अनुभवता येते. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही होते. तसेच ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर थांबण्यास मदत होते. शासनाच्या वेगवेगळया सोयीसुविधा उपलब्ध होऊन शेतकऱ्यांना आर्थिक समृद्धी प्राप्त होण्यास मदत होते. पर्यायाने उत्पन्नात वाढ होऊन देशाच्या ही आर्थिक उत्पन्नात वाढण्यास मदत होते.

**संदर्भ -**

1. Maharashtra krishi paryatan vistar yojana, 2008,ATDC. Pune.
2. Maharashtra krushi paryatan (Agri tourism )vistar yojana. 2007
3. Maharashtra krishi paryatan yojana 2010,MART, pune.
4. Kumbhar vijay (2009)Agro Tourism :A cash crop for farmars in maharashtra ( India)MPRA
5. Dr. K. N. Dhumal. Dr. Sayyad Iliyasyas Agro Tourism -Nirali prakashan 2024.

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No.15(A)** **Jan-Feb 2025**

# पंढरपूर येथील श्री संत गजानन महाराजांचा मठ एक धार्मिक पर्यटन स्थळ: एक भौगोलिक अभ्यास

**सोमनाथ नागनाथ लोंढे[1] प्रो. डॉ. बी.बी. राऊत[2]**
[1]संशोधक विद्यार्थी,डी.बी.एफ. दयानंद कला आणि विज्ञान महाविद्यालय,सोलापूर.
[2]संशोधक मार्गदर्शक वसुंधरा कला महाविद्यालय,सोलापूर.
**Corresponding Author: सोमनाथ नागनाथ लोंढे**
**Email:** somanathlondhe50@gmail.com

**गोषवारा:**

भारतीय समाजात पर्यटनाला प्राचीन काळापासूनच महत्व प्राप्त झाले आहे. भारतीय पर्यटनात प्राचीन काळापासून धार्मिक पर्यटनाला अनन्यसाधारण महत्व आहे. कारण धार्मिक स्थळांना भेटी दिल्याने आत्मिक शांती प्राप्त होते. अशी भारतीय लोकांची प्राथमिक भावना आहे. धार्मिक स्थळांच्या ठिकाणी गेल्याने मोक्ष प्राप्ती होते. तसेच जिवनाचे साफल्य होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात भारतात धार्मिक पर्यटन केले जात आहे. धार्मिक पर्यटन स्थळे ही आपली संस्कृती जागृत ठेवण्याचे काम करत असतात.

महाराष्ट्रातील सोलापूर जिल्हयात चंद्रभागा नदीच्या काठी वसलेले, पंढरपूर हे एक लोकप्रिय धार्मिक स्थळ आहे. दक्षिण काशी हे महाराष्ट्रातील विस्मयकारक शहराचे एक प्रसिद्ध टोपणनाव आहे. श्री संत गजानन महाराजांचा मठ हे एक मोठे आकर्षण पंढरपूर मध्ये आहे. विशेषतः ऑक्टोंबर आणि नोव्हेंबर महिन्यात मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी येतात. काही वारकरी संप्रदायातिल ल मंडळी आपल्या मंदीरापर्यंत पायी चालत येतात.

**नमुना शब्द :–** धार्मिक पर्यटन स्थळ, पंढरपूर, गजानन महाराज मठ, विठ्ठल रूक्मिणी मंदिर इत्यादी.

**प्रास्ताविक :-**

पंढरपूर शहर तालुका हे ऐतिहासिक, धार्मिक, भौगोलिक, वैद्यकीय, पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. दरवर्षी विविध परप्रांतातून, परदेशातून पर्यटक पंढरपूर मध्ये येतात. महाराष्ट्राचे श्रद्धास्थान म्हणून पंढरपूर ला ओळखले जाते, दरवर्षीप्रमाणे भाविक पंढरपूरच्या विठ्ठल दर्शनासाठी येत असतात, पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदीर हे प्रमुख भाविकांचे आकर्षण आहे. विठ्ठल-रुक्मिणी मंदीराबरोबरच कैकाडी महाराज मठ, गजानन महाराज मठ, तुळशी वृदावन, तनपुरे महाराज मठ इत्यादींचे आकर्षण पंढरपूर मध्ये आहे, यातिलच श्रीसंत गजानन महाराज यांचा मठ भाविकांना बघण्यासारखा आहे. मठ हा, गजानन महाराज संस्थान शेगाव ट्रस्टने पंढरपूरमध्ये उत्तम स्थापना केली आहे.

**उद्दिष्ट्ये :–**

1. पंढरपूर येथील गजानन महाराज मठ या धार्मिक पर्यटन स्थळाचा अभ्यास करणे.
2. पंढरपूर येथील गजानन महाराज मठाचे धार्मिक ऐतिहासिक महत्त्व आणि वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करणे.
3. गजानन महाराज मठांमधील तसेच त्याच्या अवतीभवती असणाऱ्या सेवा सुविधांचा अभ्यास करणे.
4. गजानन महाराज मठाचा पर्यटन स्थळ म्हणून त्या भागातील आर्थिक प्रगतीचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर केला आहे. तसेच लिखित – अलिखित साधनांच्या आधारे माहिती मिळविली आहे. तसेच संशोधन क्षेत्रास प्रत्यक्ष भेट देण्यासाठी येणाऱ्या भाविक पर्यटकांची मुलाखतीच्या माध्यमाने प्रश्नावली भरून घेऊन त्यातून निष्कर्ष काढले आहेत. तसेच परिसरातील वेगवेगळया घटकांचे सर्वेक्षण करून, त्यासंबंधी उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**मर्यादा:-**


सदरचे संशोधन अभ्यास हे पंढरपूर येथील श्री संत गजानन महाराज मठापुरतेच मर्यादित असून या मठाचा धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे. तसेच या मठाच्या परिसरातील आर्थिक परिस्थिती तसेच व्यावसायिक दृष्ट्या सामाजिक जिवनावर झालेला परीणाम वाहतूक सूविधा यांचा अभ्यास केला आहे.

**अभ्यास क्षेत्र :-**


सोलापूर जिल्ह्यामध्ये पंढरपूर हा एक तालुका आहे. पंढरपूर हे शहर पंढरपूर तालुक्याचे प्रशासकीय ठिकाण म्हणून ओळखले जाते. पंढरपूर हे शहर भीमा नदीच्या काठावर वसले आहे. सोलापूरच्या पश्चिमेस 71 किलोमीटर वरती पंढरपूर हे शहर असून भीमा नदीच्या उजव्या तीरावर समुद्रसपाटीवरून 450 मीटर उंचीवर आहे. हे कुर्डूवाडी व मिरज लोहमार्गावरील स्थानक आहे. पंढरपूर येथून महाराष्ट्र मध्ये कोणत्याही कानाकोपऱ्यात जाण्यासाठी बस उपलब्ध आहे.


2011 च्या जनगणनेनुसार पंढरपूरची लोकसंख्या 98,923 आहे. लोकसंख्येच्या 52 % पुरुष आणि 48% स्त्रिया आहेत. 71 % लोक साक्षर आहेत त्यामध्ये 78 % पुरुष व 64 % महिला आहेत भारताच्या 2011 च्या जनगणनेनुसार पंढरपूर नगरपरिषदेची लोकसंख्या 98,923 होती ज्यामध्ये 50,645 पुरुष आणि 48,278 महिला आहेत. पंढरपूरचे क्षेत्रफळ 1303.6 चौरस किलोमीटर आहे. तसेच क्षेत्रफळ 1303.6 चौरस किलोमीटर असून त्याचा अक्षवृत्तीय विस्तार 17°40'42" उत्तर व 75°19'48" दक्षिण असा आहे.

**नकाशा:- सोलापूर जिल्हा**




सोमनाथ नागनाथ लोंढे, प्रो. डॉ. बी.बी. राऊत


THE TOWN–PANDHARPUR
77
To Isbavi
To Akluj
To Karad
To Miraj
To Takli
To Sangola
To Solapur
Shegaon
To Mangalwedha
TAKLI TANK
Railway Station
MSEB
Bund Ground
Puspavati River
N
0 500 METRES
INDEX
Lord Vitthal Temple
① Mahadwar Area
② Govind pura
③ Santa Peth
④ Ram bag
⑤ Anilnagar
⑥ Navi Peth
⑦ Manishanagar
⑧ Ujani Colony
⑨ Pundliknagar
⑩ Ganeshnagar
⑪ Pardeshinagar
⑫ Padmavati Area
⑬ Railway Station
⑭ Bus-Stand
⑮ Market yard
⑯ College
⑰ Takli Tank
⑱ Water Warks
⑲ Water Pumping Station
⑳ Causeway
㉑ New-Bridge
㉒ Railway Bridge




**व्याप्ती व महत्त्व:-**

सध्याच्या परिस्थितीमध्ये पर्यटनला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामध्ये कृषी पर्यटन, धार्मिक पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, शैक्षणिक पर्यटन, राजकीय पर्यटन इत्यादी पर्यटन हे महत्त्वाचे बनले आहेत. परंतु समाजामध्ये धार्मिक पर्यटनाला अत्यंत महत्त्व दिले जाते. धार्मिक पर्यटनामुळे तेथील संस्कृती, माणसांचे जीवनमान, आरोग्य विषयक माहिती तेथील सोयी सुविधांचा अभ्यास केला जात आहे. सदरचे संशोधन हे पंढरपूर येथील श्री संत गजानन महाराज मठ पंढरपूर या मठाशी संबंधित आहे. श्री संत गजानन महाराज मठ या धार्मिक स्थळाचे पर्यटनाच्या दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे. या स्थळाचे अभ्यास केल्यानंतर आपल्याला तेथील

सोयी सुविधांचा तसेच तेथील आर्थिक व सामाजिक परिस्थितीची स्थिती समजेल.


**श्री संत गजानन महाराज मठ :-**

पहिली शाखा श्री संस्थानाची पंढरपूर येथे साडेआठ एकर पुण्यभूमीत श्रींचे संगमरवरी दगडाचे मंदिर तयार करण्यात आले आहे. या भव्य मंदिरात श्रींच्या मूर्तीची विधीवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. तसेच 72 फूट उंच व 51 फूट रुंद ढोलपुरी दगडाचे कलाकुसरयुक्त महाद्वार आहे. महाराष्ट्रातील एक नामवंत संत म्हणून गजानन महाराज यांना ओळखले जाते. महाराष्ट्रातील शेगाव हे स्थान त्यांच्यामुळे नावावर रूपाला आले आहे. गजानन महाराजांचा जन्म 23 फेब्रुवारी 1878 साली झाला असून शेगाव येथे दिगंबरा अवस्थेत लोकांच्या प्रथम दृष्टीस पडले आहेत. महाराजांनी कर्ममार्ग, भक्तीमार्ग, आणि योग मार्ग हे तीन मार्ग जीवात्म्याला आत्मज्ञान प्राप्त करून देतात असा उपदेश मानवास दिला आहे.

बस स्थानकापासून एक किलोमीटर अंतरावर श्री संत गजानन महाराजांचा मठ आहे. साडेआठ एकर जागेत पसरलेला हा मठ आहे. या ठिकाणी भक्तांना विविध सुविधांसह विविध सुविधा पुरविल्या जातात. फिल्टर केलेले स्वच्छ पाणी, आरोग्य सुविधा, दवाखाना आणि होमिओपॅथी दवाखाना संस्थेने सुरू केला आहे. हे एक निसर्गरम्य ठिकाण आहे. वातावरण हे एकदम शांत आहे. येथे राहण्याची चांगली व्यवस्था आहे. वाताअनुकूलित बिगर वाताअनुकूलित रूम येथे भाविकांना परवडेल अशा किमतीमध्ये राहण्यासाठी भाविकांना दिली जाते. खोली बुकिंग साठी ऑनलाइन सुविधा सुद्धा उपलब्ध आहे. तसेच भाविकांना कमी पैशांमध्ये जेवणाची सोय सुद्धा उपलब्ध करून दिली आहे. हे देवस्थान श्री गजानन महाराज भक्तांचे मन वेधून घेत आहे.

सर्वधर्म समभाव जपणार जपणारे हे देवस्थान म्हणून ओळखले जाते. आषाढी वारी कार्तिकी वारी तसेच माघी वारी या वाऱ्यांसाठी भाविक मोठ्या प्रमाणात जमा होत असतात. सर्व धर्मातील लोक एकत्रित येऊन भजन, किर्तन सोहळा पार पाडत असतात. सर्व वारकरी लहान असो की मोठा वयोवृद्ध या कार्यक्रमात सहभागी झालेले दिसून येतात.






मंदिराच्या बाहेर पूजा पाठ साहित्य विक्रेते दिसून येतात. श्रींच्या पूजेसाठी आवश्यक असणारे साहित्य येथे उपलब्ध आहे. त्यामध्ये आष्टीगंध, बुका, फुलांचे हार, बेल, पेढे, खडीसाखर, चुरमुरे, शेव इत्यादी साहित्यांची विक्री येथे केली जाते. तसेच ज्या भावी भक्तांचे उपवास जसे की एकादशी , चतुर्थी, गुरुवार असतात त्यांच्यासाठी फराळाचे साहित्य उपलब्ध असते. त्यामध्ये शाबू खिचडी, वेफर्स, भगर इत्यादी पदार्थ असतात. मंदिराच्या परिसरामध्ये विविध दुकाने दिसून येतात. तसेच येथे हॉटेल, लॉजिंग, उपहारगृह इत्यादी सेवा ही उपलब्ध आहेत. दररोज होणारा भक्तांचा मेळा आणि पूजा अर्चा यातून स्थानिक व्यक्तींना रोजगार मिळाला आहे. या माध्यमातून स्थानिक व्यक्ती आपली आर्थिक परिस्थिती मध्ये सुधारणा करत आहे. तसेच भाविकांना श्रींच्या मठापासून इतरत्र ठिकाणी जायचे असल्यास रिक्षा उपलब्ध आहेत.

**भाविक पर्यटकांचे प्रश्नावली व मुलाखतीच्या साह्याने करण्यात आलेले अवलोकन (एकूण 195 )**

| अ. क्र. | धर्मानुसार वर्गीकरण | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | हिंदू | 157 | 80.51% |
| | बिगर हिंदू धर्मीय | 38 | 19.49% |
| | | | |
| 2 | **लिंग गुणोत्तारानुसार वर्गीकरण** | | |
| | पुरुष | 114 | 58.46% |
| | स्त्रिया | 81 | 41.54% |
| | | | |
| 3 | **शैक्षणिक स्तर** | | |
| | उच्च पदवीत्तर | 45 | 23.07% |
| | पदवी | 53 | 27.17% |
| | 10 वी व 12 वी पास | 42 | 21.53% |
| | माध्यमिक शाळा | 30 | 15.39% |
| | न शिकलेले | 25 | 12.84% |
| | | | |
| 4 | **व्यवसाय** | | |
| | शेती | 95 | 48.72% |
| | नोकरी | 60 | 30.76% |
| | काम न करणारे | 40 | 20.52% |

दररोज या मठाला भेट देणाऱ्या भाविकांपैकी 81.51 % पेक्षा जास्त भाविक हिंदुधर्मीय असून 19.49% पेक्षा इतर धर्मीय भाविक मठाला भेट देतात. दररोज येणाऱ्या भाविकांमध्ये पुरुषांचे प्रमाण 58.46 % असून स्त्रियांचे प्रमाण 41.54 % आहे. शैक्षणिक स्तरानुसार उच्च पदवीदर 23.07 % , पदवीदर लोकांचे प्रमाण 27.17 %, दहावी व बारावी पास असलेल्या लोकांचे प्रमाण 21.53 % माध्यमिक शाळांत लोकांचे प्रमाण 15.39 % आणि न शिकलेले लोकांचे प्रमाण 12.84% तसेच शेतकरी लोकांचे प्रमाण 48.72 % नोकरी करणाऱ्या लोकांचे प्रमाण 30.76 % इतके आहे. कोणताच व्यवसाय न करणारे बेरोजगार लोलोकांचे प्रमाण 20.52 % इतके आहे.

**उपलब्ध सोयीसुविधा :-**

1. सर्व भाविक भक्तांना श्रींचे दर्शन भेटते.
2. गाडी पार्किंगची उत्तम सोय उपलब्ध आहे.
3. राहण्यासाठी भाविकांना कमी किमतीत परवडेल अशा स्वरूपात रूम्स भाड्याने दिल्या जातात.
4. भाविक भक्तांना जेवणाची उत्तम सोय केली आहे.
5. पंढरपूर हे प्रामुख्याने तीर्थक्षेत्र असताना तुम्ही विठ्ठल मूर्ती, गजानन महाराजांची मूर्ती, तुळशी माळ, अध्यात्मिक पुस्तके, धार्मिक पुस्तके खरेदी करण्याची सोय उपलब्ध करून दिले आहेत.
6. पारंपारिक महाराष्ट्रीयन दागिने आणि हस्तकलेची स्थानिक बाजारपेठांमध्ये विक्री केली जाते.
7. पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय केलेली आहे.
8. भाविक भक्तांच्या चप्पल बूट सोडण्यासाठी योग्य त्या ठिकाणी जागोजागी सोयी सुविधा केल्या आहेत.
9. मंदिराच्या अवतीभोवती सर्व परिसरामध्ये उत्तम स्वच्छता ठेवली जाते. या स्वच्छतेसाठी सफाई कामगार सुद्धा आहेत.

**शिफारशी :-**

1. मठामध्ये मंदिराचा इतिहास व त्यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी स्वतंत्र गाईड नियमावा.
2. शहराच्या सर्व भागातून मंदिराकडे येणारे रस्ते रुंद करावेत, विशेषता यात्रेच्या वेळी वाहनांची व भाविकांची जास्त गर्दी होणार नाही.
3. मंदिर परिसरात डिजिटल वाहिनींचा वापर करून मठाविषयी पर्यटकांना माहिती द्यावी.
4. मठामध्ये येणारी भाविक भक्त पर्यटन यांना आवश्यक त्या मूलभूत पायाभूत सेवा सुविधा देण्यात याव्यात.
5. स्थानिक स्वराज्य संस्था व नगरपालिका यांचा आधार घेऊन शहरांमध्ये कमी खर्चात भाविक भक्तांना परवडेल अशा स्वरूपात ई- रिक्षा ची व्यवस्था करावी, जेणेकरून खाजगी वाहनांकडून होणारी भक्तांची लूट रोखली जाईल.
6. जेवणाची व्यवस्था फक्त मठामध्ये खोली करून राहणाऱ्या भक्तांबाबत मर्यादित न ठेवता इतर भक्तांना सुद्धा त्याचा लाभ देण्यात यावा.
7. स्थानिक खाद्य विक्री आणि पूजा साहित्य वाटपाची अधिकृत केंद्र उभारावेत.
8. पुरुष व महिलांसाठी सार्वजनिक शौचालय बांधावे.
9. मंदिर परिसरामध्ये खाण्यापिण्याच्या सोयी उत्तम व स्वस्त दरात उपलब्ध करून देण्यात याव्यात.
10. मठाच्या प्रवेशद्वाराजवळ गाड्या पार्किंग ची सुविधा करून देणे.
11. सर्वसामान्य भाविक भक्तांना परवडेल अशा स्वरूपात रूम भाडे घेण्यात यावे.

**निष्कर्ष :-**

शेवटी, पंढरपूर एक अनोखा अध्यात्मिक अनुभव व आनंद देणारे शहर आहे. जो समुद्रासारखा ज्ञानवर्धक आहे. ही अशी जागा आहे जिथे तुम्ही भक्तीमध्ये मग्न होऊ शकता आणि आंतरिक शांती मिळवू शकता. धार्मिक पर्यटनाच्या ठिकाणी स्थानिक व्यक्तींना रोजगाराची संधी उपलब्ध होते. हा रोजगार मिळाल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारते. धार्मिक पर्यटनामुळे तेथील सामाजिक परिस्थिती आर्थिक परिस्थिती राजकीय परिस्थिती याविषयी माहिती मिळते.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) पर्यटन भूगोल : राजेश शुक्ला, रश्मि शुक्ला
2) पर्यटन भूगोल : प्रा. के.ए. खतीब
3) पर्यटन भूगोल: संकल्पना व व्यवस्थापन
4) उस्मानाबाद जिल्यातील उमरगा तालुक्यातील उमरगा शहरातील हेमाडपंथीय श्री महादेव मंदीर या धार्मिक पर्यटन स्थळाचा एक भौगोलिक अभ्यास : Dr. Ankush Shankar Shinde.
5) सोलापूर जिल्यामधील मोहोळ तालुक्यातील वडवळ येथील नागनाथ मंदिराचा एक धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून अभ्यास : Dr. Ankush Shinde
6) लक्ष्मण खंडागळे : सोलापूर जिल्हातील धार्मिक पर्यटन स्थळे : एक अभ्यास
7) www.wikpediya.com

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# अलिबाग तालुक्यातील सागरी मत्सव्यवसायावर पर्यटनाचा होणारा परिणाम : एक चिकीत्सक अभ्यास

**श्रीमती तृप्ती प्रभाकर पाटील[1] डॉ. सतीश गुलाबराव जाधव[2]**
[1]संशोधक विद्यार्थीनी, भूगोल विभाग,
श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी, महिला विद्यापीठ कर्वे रोड, पुणे
[2]संशोधक मार्गदर्शक, उपप्राचार्य, अरुणोदय ज्ञान प्रसारक मंडळ संचलित कला,
वाणिज्य व गृह विज्ञान महिला महाविद्यालय जळगाव
**Corresponding Author: श्रीमती तृप्ती प्रभाकर पाटील.**
**Email:**trupri2018@gmail.com

**सारांश:**

मत्स्यव्यवसाय (Fisheries) आणि पर्यटन (Tourism) हे दोन्ही भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे घटक आहेत. निसर्ग सुंदर अलिबाग तालुक्यात 54.5 कि.मी किनारी परिसरात निसर्गाची विविध रूपे पाहता येतात. अलिबाग तालुक्याला निसर्ग संपदेबरोबर ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व असलेली ठिकाणे, समुद्र, वाळू, मंदिरे, किल्ले, जंगल आणि वन्य जीव संपत्ती असलेला प्रदेश लाभला आहे. पर्यटनामुळे हॉटेल, रेस्टॉरंट आणि इतर सेवा उद्योगांना चालना मिळते. येथील सागरी मासेमारी व्यवसाय तसेच खाद्य संस्कृतीमुळे पर्यटक संख्येत लक्षणीय वाढ दिसून येते. मासेमारी बरोबरच पर्यटनातून उत्पन्नाचा स्रोत निर्माण होतो.पर्यटन व मासेमारी एकमेकांना पूरक ठरत आहेत. त्यामुळे स्थानीक रोजगार निर्मिती होते आणि लोकांना मासेमारीपूरक व्यवसाय करण्याची संधी मिळते.

**मुख्य शब्द:** अलिबाग तालुका, सागरी किनारा, मस्त्यव्यवसाय, पर्यटन,

**प्रस्तावना:**

मासेमारी म्हणजे उदरनिर्वाह किंवा व्यापारी अशा निश्चित हेतूने आवश्यक त्या योग्य साधनांद्वारे नियमितपणे केलेल्या मासळी पकडण्याच्या क्रिया होय .भारताला लाभलेल्या 8,129 कि.मी. सागरी किनारपट्टीवरील 3000 गावांमध्ये सुमारे 3.5 दशलक्ष मच्छिमार राहतात. महाराष्ट्र हे देशातील मत्स व्यवसायाद्वारे मत्स उत्पादन करणारे महत्वाचे राज्य आहे. कोकणातील मच्छिमार अनेक शतकांपासून पारंपरिक पद्धतीने सुरू असलेली मासेमारी बदलत्या काळानुसार, मासेमारीच्या साधनसामुग्रीत सुधारणा करून आज यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून प्रगती साधत आहेत; ज्यावर येथील मच्छिमार उदरनिर्वाह करीत आहेत. अलिबाग हे रायगड जिल्ह्यातील एक तालुक्याचे ठिकाण आहे, जेथे पर्यटनाचे प्रमाण जास्त आहे. या तालुक्यातील सर्वाधिक भेटी दिल्या जाणारी पर्यटन स्थळे अलिबाग, वरसोली, किहीम, सासवणे, मांडवा, आक्षी, नागाव, रेवदंडा आहेत. पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकाला सेवा पुरविण्यासाठी विविध टप्प्यावर रोजगार उपलब्ध होतात. किरकोळ वस्तू विक्री, कोकणी खाद्यपदार्थ विक्री, दूध, भाजीपाला विक्रेता, हॉटेल, गाईड व इतर प्रकारच्या लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने रोजगार निर्माण होतो.

**उद्दिष्ट्ये:**

1. अलिबाग तालुक्यातील मासेमारी व्यवसायाचा अभ्यास करणे.
2. अलिबाग तालुक्यातील पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे.
3. पर्यटन स्थळे मासेमारी व्यवसायास चालना देतात याचा अभ्यास करणे.
4. अलिबाग तालुक्यातील मासेमारी व पर्यटनामुळे होणाऱ्या सामाजिक व आर्थिक

a. परिणामांचा अभ्यास करणे.

5. पर्यटनामुळे मासेमारीपूरक व्यवसाय निर्माण होऊन स्थानिक रोजगार निर्माण होण्यास
6. मदत झाली आहे याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

वरील संशोधनात रायगड जिल्हातील अलिबाग तालुक्यातील एकूण मच्छिमार गावांपैकी संभाव्यता नमुना निवड पद्धतीने लॉटरी पद्धतीचा वापर करून 05 मच्छिमार गावांची निवड केली. या मच्छिमार गावांतील प्रत्येकी 10 उत्तरदात्यांची सहेतूक पद्धतीने निवड केली. अशा एकूण 50 उत्तरदात्यांची निवड करण्यात आली. संशोधनाच्या प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीतील मुलाखत अनुसूचीद्वारे तसेच ऐतिहासिक, वर्णात्मक व निरीक्षणाद्वारे तथ्य संकलीत करण्यात आले. तसेच दुय्यम माहितीच्या स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. संकलीत तथ्यांचे विश्लेषण करून त्याद्वारे निष्कर्ष मांडण्यात आले.

**अभ्यास क्षेत्र: अलिबाग**

रायगड जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण पश्चिम बाजूला स्थित आहे. रायगड जिल्ह्याचे मुख्यालय अलिबाग आहे. अलिबाग भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आणि अरबी समुद्राच्या किनारी वसलेले शहर आहे. अलिबागचा अक्षांश विस्तार: 18°
56' उ. ते 18° 29' उ. अलिबागचा रेखांश विस्तार: 72° 51' पू. ते 73° 04' पू.




Source: Priyanka Barge, Journal of the Maharaja Sayajirao University of Baroda ISSN : 0025-0422 Volume-56 No.3(II)2022Pp 179

**मासेमारी:**

महाराष्ट्राला 720 कि.मी.समुद्र किनारा लाभला आहे. सागरी मासेमारीसाठी 1.12 लाख चौ. कि.मी. क्षेत्र उपलब्ध होते. राज्यातील सहा जिल्ह्यात मासेमारी चालते. त्यामध्ये पालघर 102 कि.मी., ठाणे 25 कि. मी., मुंबई उपनगर 114 कि.मी., रायगड 122 कि.मी., रत्नागिरी 237 कि.मी., सिंधुदुर्ग 120 कि.मी., तर अलिबाग तालुक्याला 54.5 कि.मी. समुद्र किनारा लाभला आहे. महाराष्ट्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या आकडेवारीनुसार ठाणे व पालघर या जिल्ह्यामध्ये 98, मुंबईमध्ये 36, रायगडमध्ये 195 ,रत्नागिरी 110 आणि सिंधुदुर्ग मध्ये 87 अशी एकूण 526 मासेमारी गावे आहेत. ठाणे व पालघर जिल्ह्यात मच्छिमार लोकसंख्या 1,14,899 इतकी आहे ,मुंबई जिल्ह्यात 32,516, रायगडमध्ये 1,13,847 ,रत्नागिरी जिल्ह्यात 71,720 आणि सिंधुदुर्गमध्ये 32,017 मच्छिमार लोकसंख्या आढळून येते. कोकणातील सर्व सागरी जिल्ह्यामधून सन 2020-21 मध्ये 3, 98,511 दशलक्ष टन सागरी मत्स्य उत्पादन झाले. यामध्ये ठाणे व पालघर जिल्ह्याचे 67,547 दशलक्ष टन , मुंबई 2,10,260 दशलक्ष टन; रायगड 38,019 दशलक्ष टन; रत्नागिरी 65,374 दशलक्ष टन व सिंधुदुर्ग 17,311 दशलक्ष टन सागरी मत्स्योत्पादन झाले आहे .

**रायगड जिल्ह्यातील अलिबाग मधील सागरी मत्स्योत्पादन**

| अनु.क्र. | सन | सागरी मत्स्योत्पादन ( मे. टन) |
|---|---|---|
| 1 | 2019-20 | 29,432 |
| 2 | 2020-21 | 24,564 |
| 3 | 2021-22 | 27,115 |
| 4 | 2022-23 | 31,998 |
| 5 | 2023-24 | 10075 |

स्रोत: महारष्ट्र शासन, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन रायगड जिल्हा सन 2021-22 व 2023-24 अहवालनुसार

**अलिबाग पर्यटन स्थळे:**




















अलिबाग मधील समुद्रकिनारे बरोबरच कुलाबा किल्ला, कनकेश्वर मंदिर, चौल, गणेशमंदिर (बिर्ला मंदिर), कान्होजी आंग्रे समाधी, उमा–महेश्वर मंदिर, बालाजी मंदिर, दत्तमंदिर, हिंगूळजा मंदिर, शितळादेवी मंदिर, चुंबकीय वेधशाळा, ही काही मुख्य प्रेक्षणीय स्थळे अलिबाग आणि आजूबाजूच्या परिसरात आहेत. याचबरोबर मराठी भाषेतील पहिला मानला जाणारा शिलालेख आक्षी गावात आहेत. तसेच सासवणे येथील करमरकर शिल्पलयातील

अतिशय सुबक व मूर्त शिल्पे प्रसिद्ध आहेत. ह्यामुळे अलिबाग हे पर्यटन स्थळ व खवय्यांसाठी पर्वणी ठरले आहे. येथे विविध प्रकारचे ताजे मासे मिळतात. शेती नंतर मासेमारी हा व्यवसाय व त्यात गुंतली लोक जास्त आहेत.

देवदुर्लभ अशा सौदर्याने नटलेली अनेक ठिकाणं, तसेच किना-यावर अविरतपणे येऊन फेसाळणाऱ्या लाटांनी हा किनारा अतिशय मनोहारी बनलेला आहे. निसर्गाची ही सगळी मनस्वी रूपं बघण्यासाठी अलिबागच्या कोणत्याही किनाऱ्यावर जावे येथील समुद्र नेहमीच आपलं स्वागत करीत असतो. यामुळेच येथे शनिवार, रविवार व अन्य सुट्टीच्या दिवशी मोठ्या संख्येने पर्यटक आवर्जून भेटी देतात.

**3) अलिबागचे वैशिष्ट्ये:**

अलिबाग खाद्यसंस्कृती वैशिष्ट्यपूर्ण आहे. अलिबागमध्ये उपलब्ध असणारी साधनसामग्री म्हणजे तांदूळ, नारळ, फणस, आंबे, काजू, भौगोलिक मानांकन प्राप्त पांढरा कांदा आणि रम्य समुद्रकिनाऱ्यामुळे लाभलेली सीफूडची संपन्नता तसेच नयनरम्य सागरकिनारे, ऐतिहासिक कुलाबा किल्ला आणि जलदुर्ग खांदेरी- उंदेरी, रेवदंडा किल्ला ही अलिबागची ठळक वैशिष्ट्ये.

**4) पर्यटन व मासेमारी आंतरसंबंध:**


मत्स्यव्यवसाय आणि पर्यटन हे दोन्ही भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहेत. अलिबाग तालुक्यातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे या बरोबरच होणारी सागरी मासेमारी व्यवसाय तसेच येथील खाद्य संस्कृतीमुळे पर्यटक वाढले आहेत. मुंबई-मांडवा रो-रो जलमार्गामुळे अलिबाग पर्यटक संख्या वाढण्यास मदत झाली आहे. यामुळे येथील मासेमारी व इतर पूरक व्यवसायात वृद्धी होण्यास मदत झाली आहे. यातून स्थानिकांना रोजगाराचे दालने खुली होण्यास मदत होत आहे.

केंद्रीय मत्स्य उद्योग धोरण 2016 नुसार मच्छिमारास मासेमारी बरोबरच पर्यटन असे दोन परवाने देण्याची तरतूद केली आहे. मासेमारी व पर्यटनातून उत्पन्नाचा स्रोत निर्माण झाला आहे. हे दोन्ही उद्योग स्थानिक व राष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहेत. मासेमारीमुळे रोजगार निर्माण होतो आणि लोकांना मासेमारीपूरक व्यवसाय करण्याची संधी मिळते. पर्यटनामुळे हॉटेल, रेस्टॉरंट, खाद्य पदार्थ विक्री आणि इतर सेवा उद्योगांना चालना मिळते. पर्यटक स्थानिक कला, हस्तकला आणि खाद्यपदार्थ यांचा अनुभव घेतात, ज्यामुळे स्थानिक लोकांना त्यांची संस्कृती जतन करण्यास मदत होते.

**5) मुलाखत अनुसूची:** अलिबाग तालुक्यातील मस्त्यव्यवसाय करणाऱ्या लोकांची मते:


मस्त्यव्यवसाय व पर्यटन हे एकमेकांना किती प्रमाणात पूरक आहेत, याचे अध्ययन करावयाचे असल्यास गावपातळीवरील मस्त्यव्यवसाय करणाऱ्या लोकांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. संशोधन करताना अलिबाग तालुक्यातून काही मच्छिमार गावांमधून नमुना निवडीतून काही व्यक्तींची नमुना निवड म्हणून निवड करण्यात आली. या नमुना निवडीत मस्त्य व्यवसाय घटकातील व्यक्तींना स्थान देण्यात आले. प्रश्नावलीच्या माध्यमातून 50 जणांना सागरी मत्सव्यवसायावर पर्यटनाचा होणारा परिणाम विषयक विविध प्रश्न विचारून मिळालेल्या माहितीचे संकलन करून त्याचे विश्लेषण करण्यासाठी गणितीय पद्धती, सांख्यिकी व वेन आकृती यांचा वापर करण्यात आला आहे.

**आकृती क्रमांक 1 प्रश्न: मासे विक्रीसाठी कसे उपलब्ध करता?**





वरील आकृतीचे अध्ययन केले असता असे समजते की; मस्त्यव्यवसाय करणारे 60% लोक स्वत:मासेमारी करून, 30% घाऊक पद्धतीने तर 10 % किरकोळ पद्धतीने मासे उपलब्ध करतात.

**आकृती क्रमांक 2 प्रश्न: मासेमारी खालीलपैकी कोणती करता?**





वरील आकृतीचे अध्ययन केले असता असे समजते की; मस्त्यव्यवसाय करणाऱ्या लोकांच्या मते 90% खारे पाण्यातील मासेमारी केली जाते तर 10 % गोड्या पाण्यातील करतात.

**आकृती क्रमांक 3 : अलिबाग पर्यटन स्थळामुळे मासे विक्रीत वाढ झाली आहे असे वाटते का ?**





वरील आकृतीचे अध्ययन केले असता असे समजते की; मस्त्यव्यवसाय करणाऱ्या 90% लोकांच्या मते पर्यटनामुळे मासे विक्रीत वाढ होते; तर 10% लोकांच्या मते कोणताही परिणाम होत नसल्याचे मत नोंदवले.

**आकृती क्रमांक 4: मासे खरेदी मध्ये पर्यटकांचा वाटा किती प्रमाणात आहे?**





वरील आकृतीचे अध्ययन केले असता असे समजते की; मस्त्यव्यवसाय करणाऱ्या 70% लोकांच्या मते पर्यटनाचा मासे विक्रीत 50% पेक्षा जास्त वाटा आहे; तर 30 % लोकांच्या मते मासे विक्रीत पर्यटनाचा वाटा 25 % ते 50 % असल्याचे मत नोंदवले.

**आकृती क्रमांक 5: मासेमारी व्यवसाय पर्यटकांवर अवलंबून आहे असे वाटते का?**




वरील आकृतीचे अध्ययन केले असता असे समजते की; मत्सव्यवसाय करणाऱ्या 70% लोकांच्या मते पर्यटनावर मासे विक्री अवलंबून आहे. तर 30% लोकांच्या मते पर्यटनावर मासे विक्री आवलंबून नसल्याचे मत नोंदवले.

**आकृती क्रमांक 6: अलिबाग तालुक्यातील मस्त्य व्यापारास पर्यटनामुळे चालना मिळाली असे वाटते का?**




वरील आकृतीचे अध्ययन केले असता असे समजते येते की; मस्त्यव्यवसाय करणाऱ्या 80% लोकांच्या मते पर्यटनामुळे मासे विक्रीस चालना मिळाली आहे; तर 20% लोकांच्या मते पर्यटनामुळे मासे विक्रीस चालना मिळाली नसल्याचे मत नोंदवले

**आकृती क्रमांक 7: मासेमारी आणि पर्यटन स्थळामुळे तुमच्या उत्पन्नातवाढ झाली आहे असे वाटते का?**




वरील आकृतीचे अध्ययन केले असता असे समजते येते की; मस्त्य व्यवसाय करणाऱ्या 100% लोकांच्या मते मासेमारी आणि पर्यटन स्थळामुळे उत्पन्नातवाढ झाली आहे असे मत नोंदवले.

**निष्कर्ष:**

अलिबाग तालुक्यातील पर्यटनाचा सागरी मत्सव्यवसायावर झालेल्या परिणांमाचा अभ्यास या मुख्य संशोधन समस्येवर आधारित विविध पैलूंचे अध्ययन करून काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत ते पुढीलप्रमाणे:

1. अलिबाग तालुक्यातील लोकांचे उत्पन्नाचे मुख्य स्रोत सागरी मस्त्यव्यवसाय व पर्यटन आहे.
2. अलिबाग तालुक्यातील प्रक्षेणीय पर्यटन स्थळामुळे मस्त्यव्यवसायास चालना मिळाली आहे.
3. पर्यटन व मासेमारी एकमेकांना पुरक ठरत आहेत.
4. अलिबाग तालुक्यात मासेमारी व पर्यटन मुळे इतर पूरक व्यवसाय वाढीस लागले आहेत. यातून रोजगार निर्मिती होण्यास मदत झाली आहे.
5. मासेमारी आणि पर्यटनामुळे मत्सव्यवसायकांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.
6. अलिबाग तालुक्यातील एकूण मासेविक्रीत पर्यटकांचा वाटा 50 टक्के पेक्षाजास्त आहे.

**शिफारसी:**

अलिबाग तालुक्यातील मस्त्यव्यवसायवर पर्यटनाचा होणारा परिणामांचे अध्ययन केले असता; त्यामध्ये काही समस्या आढळून आलेल्या आहेत. त्यावर उपाययोजना म्हणून संशोधकाने काही शिफारशी सुचविल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे.

1. पर्यटनासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची निर्मिती उदा. सार्वजनिक वाहतुकीची सोय, करमणुकीच्या साधनांची उपलब्धता करणे आवश्यक आहे.

2. मत्स्यव्यवसास अधिक चालना देण्यासाठी मच्छिमारसांठी शासकीय मदत व अल्प दरात कर्ज सुविधा याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.
3. शासनाने पर्यटन व मासेमारीसाठी आधुनिक साहित्य व तंत्रज्ञानची उपलब्धता करणे आवश्यक आहे.
4. प्रत्येक गावनिहाय सर्व सुविधायुक्त मच्छीमार्केट जाळे तयार करणे आवश्यक आहे जेणेकरून मत्स्यव्यवसाय अधिक वाढीस लागेल.
5. मालाच्या साठवणुकीसाठी शीतगृहे निर्माण करावीत.
6. अलिबाग पर्यटनाचा प्रसार राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचवण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा.

**संदर्भ:**


1. महाराष्ट्र शासन (2022),अर्थ व सांख्यिकी संचालनालय (नियोजन विभाग), जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन रायगड जिल्हा
2. मेहेर, चंद्रकांत भास्कर (2013): 'कोळी समाज विहंग मावलोकान', सुभाय प्रकाशन, मुंबई
3. के. सागर (2004): महाराष्ट्र भूगोल
4. दैनिक आपली सिंधुदुर्ग नगरी, दिनांक 7 ओक्टोंबर 2023
5. दैनिक कृषिवल रायगड दिनांक 1 एप्रिल 2023
6. https://www.pinterest.com/ideas/alibag-maharashtra/939185057272/
7. https://en.wikipedia.org/wiki/Alibag
8. https://www.bing.com/images/search?q=Alibag+Fort&form=RESTAB&first=1
9. https://raigad.gov.in/
10. https://raigad.gov.in/tourist-place/
11. वार्षिक कार्यक्रम (2022-23) क्षेत्रनिहाय गोषवरा, क्षेत्र / उपक्षेत्र निहाय गोषवार, राज्य योजनेस केंद्र सहाय्य योजनाचा क्षेत्रनिहाय गोषवारा
12. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (2024): जिल्हा रायगड, जिल्हा सांख्यिकी कार्यालय रायगड, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, (नियोजन विभाग), महाराष्ट्र शासन, मुंबई.
13. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (2022-23): अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
14. वार्षिक कार्यक्रम (2022-23): संक्षिप्त विवरणपत्रे, महाराष्ट्र राज्य नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
15. वार्षिक विकास कार्यक्रम (2021-22): मत्स्य व्यवसाय विभाग मत्स्य व्यवसाय आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.
16. Priyanka Barge(2022), Identifying the Tourism Potential and Exploring relevant development for local beneficiaries: case of Alibaug, India Journal of the Maharaja Sayajirao University of Baroda ISSN :0025-0422 Volume-56 No.3(II)2022Pp 179

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# पर्यटन नियोजन एक भौगोलिक अभ्यास

**डॉ.गौतम नागनाथ येडे**
(भुगोल विभाग)कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरुर कासार
ता.शिरुर (का.) जि.बीड.
**Corresponding Author: डॉ.गौतम नागनाथ येडे**
**Email:** gautamyede28@gmail.com

**सारांश:-**

पर्यटन नियोजन या भौगोलिक अभ्यासामध्ये पर्यटन उद्योगावर विशेष भर देण्यात आलेला आहे. वाढते पर्यटन आणि अनियोजनात्मक विकास यामुळे अनेक दुष्परिणाम जाणून आलेले दिसतात. पर्यटन नियोजनामध्ये मागणी व पुरवठा याचा तौलणिक विचार केला जातो. यामध्ये बाजारपेठेचा विकास, देशाला मिळणारा महसुल व परकीय चलन इत्यादींचा पर्यटनाच्या आथिक फायद्यासाठी विचार केला जातो. या माध्यमातूनच आचार विचार व संस्कृतीची देवाण-घेवाण राष्ट्रीय एकात्मतेची भावना कशा वाढीस लागतात हे देखील पाहिले जाते. तसेच पर्यटनाची सांस्कृतिक व राजकीय फायदे पाहिले जातात. मागासलेल्या देशामध्ये पर्यटन व्यवसायाचे महत्व व त्याचे फायदे जाणून देणे विशेष महत्वाचे असते. आजच्या काळातील पर्यटकांच्या वाढत्या गर्दीमुळे विविध घटकांच्या माध्यमातून होणारे वाढते प्रदुषण त्यामध्ये हवा प्रदुषण जलप्रदुषण जमिनीचे प्रदुषण यातून होणाऱ्या मानव, पशु, पक्षी, प्राणी इत्यादींवर होणाऱ्या परिणामांचा तसेच ऐतिहासिक वास्तुशिल्पे स्मारके सृष्टीसौंदर्य नैसर्गिक वनस्पती यामध्ये कशा पद्धतीन घट होवू लागलेली आहे याचाही अभ्यास केला जातो इत्यादी सर्व घटकांची शहानिशा करुन पर्यटन नियोजन करणे आवश्यक असते.

**बिजसंज्ञा-** पर्यटन नियोजन, ऐतिहासिक घटक, पर्यटन विकास, पर्यावरण कार्यक्रम व क्रियाकलाप

**प्रस्तावना:**

नियोजनबद्ध विकासाच्या माध्यमातून पर्यटन नियोजन हे सामाजिक, आर्थिक व पर्यावरणाच्या दृष्टीने किती महत्वाचे किंवा फायद्याचे आहे हे पाहिले जाते. यामध्ये त्या ठिकाणच्या स्थानिक लोकसहभागाचाही विचार केला जातो. प्राकृतिक आकर्षणे म्हणजे तेथील आल्हाददायक हवामान, सृष्टीसौंदर्य, सरोवरे, धबधबे, गरम पाण्याचे झरे, किनारे तसेच सांस्कृतिक आकर्षणामध्ये तेथील ऐतिहासिक घटक निवास व्यवस्था, प्रदेशाची सुगमता करमणुकीच्या सोयी, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, धार्मिक तिर्थिक्षेत्र इत्यादी घटकांची व्यवस्थित देखभाल असेल व शासन स्तरावर विविध नियम व अटी घालून दिलेल्या असतील तर अशा ठिकाणी पर्यटन नियोजन करणे सोपे जाते. पर्यटकांना जास्तीत जास्त सुविधा कशा उपलब्ध होतील त्या दृष्टीने पर्यटन केंद्राच्या ठिकाणी स्वच्छ पक्के रस्ते, हॉटेल्स, मोटेल्स, विश्रामालये, हॉलिडे कॅम्पस अशा विविध पर्यटक उपयोगी गोष्टीचा विचार करुन त्यासाठी विविध पर्यटन क्षेत्रामध्ये विविध घटकांसाठी भुसंपादन करणे गरजेचे असते. सध्या आपण पाहिले तर अनेक पर्यटन केंद्राच्या ठिकाणी पर्यटकांच्या मागण्या लक्षात घेवून सहज उपलब्ध झालेले हॉटेल्स, रस्ते, लोहमार्ग व हवाई मार्गाच्या सोयी अस्तित्वात आहेत मात्र त्यामध्ये विशेष असे नियोजन केलेले नाही. त्यासाठी पर्यटनाचा विकास आणि नियोजन स्थानिक क्षमता लक्षात घेवून व त्या ठिकाणच्या संसाधनाचा विचार करुन केले पाहिजे अन्यथा तेथील विकासाच्या नियोजनामध्ये समतोलपणा आढळणार नाही.

पर्यटनाचा विकास करण्यासाठी धोरण तयार करणे तेथील नियोजनामध्ये शाश्वत असणे आर्थिक विकास, सांस्कृतिक संरक्षण, यासारख्या घटकांचा विचार केला जातो आणि अशा पर्यटन नियोजनामुळे पर्यटन उद्योगाचे व्यवस्थापन व नियमन झाले जाते.

शोधनिबंधाची उद्दिष्टे-

1. पर्यटन व्यवसायाचे अचुक नियोजन करुन अग्रगण्य व्यवसाय ठरु शकेल असे नियोजन करणे.
2. पर्यटकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे.
3. पर्यटन क्षेत्राच्या ठिकाणी सर्व चैनीच्या वस्तु व बालसाहित्य व सर्व आधुनिक खेळण्या उपलब्ध करुन देणे.
4. पर्यटनामधुन रोजगारांच्या संधी उपलब्ध होवून स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करणे
5. पर्यटनामुळे पर्यावरण व स्थानिक लोकांच्या समुदायावर होणारे नकारात्मक परिणाम कमी करणे.
6. पर्यटन स्थळाच्या बाबतीत आथिक विकास साधणे.
7. पर्यटन ठिकाणचा सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा टिकवून ठेवून आधुनिक प्रगती करणे.
8. पर्यटन क्षेत्रामध्ये साधन संपत्तीचा शाश्वत वापर होवून स्थानिक समुदाय आणि क्षेत्राचे एकत्रिकरण करणे.

**संशोधनाची गृहितके:-**

1. पर्यटन नियोजनात पर्यावरणाचा अधिक विचार होणे आवश्यक आहे.
2. पर्यटनाची स्थानिक क्षमता, समाज निर्णय व साधन संपत्ती याचा समतोल ठेवणे.
3. उपलब्ध असलेल्या पर्यटनाच्या सर्व सोयी व भविष्यात अशा सोयीसाठी वाढणारी मागणी याचे संशोधन करणे.
4. पर्यटन क्षेत्राच्या ठिकाणी देशी व विदेशी पर्यटकांना संभाव्य गुंतवणुकीसाठी सोयीची उपलब्धता.
5. पर्यटन विकासाच्या दृष्टीने पर्यटन नियोजन हे व्यवस्थापनाशी जोडले पाहिजे.
6. पर्यटकांना योग्य संधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासन स्तरावर पर्यटन करणे.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये तथ्यसंकलन करण्यासाठी संशोधन पद्धतीमध्ये दुय्यम स्त्रोताचा आधार घेण्यात आलेला आहे यासाठी विविध संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, विविध मासिके यांच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

**विषयाचा अर्थ आणि व्याख्या:-**

पर्यटन नियोजनामध्ये पर्यटक हा केंद्रबिंदु असतो. त्यासाठी पर्यटकांची गरज लक्षात घेवून सर्वोत्तम संसाधने, कार्यक्रम आणि क्रियाकलाप ठरवणे किंवा एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील पर्यटन क्षेत्राची देखभाल आणि विस्तार म्हणजे पर्यटन नियोजन होय.

1987 मध्ये D.Getz यांनी पर्यटन नियोजनाची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. "संशोधन आणि मुल्यमापनावर आधारित प्रक्रिया जी मानवी कल्याण आणि पर्यावरणीय गुणवत्तेसाठी पर्यटनाच्या संभाव्य योगदानाला अनुकुल करण्याचा प्रयत्न करते. "

वरील व्याख्येनुसार बहुतांशी पर्यटकांच्या अपेक्षा त्याच्यासाठी उपलब्ध संसाधने, पुर्ण गरजा व पर्यावरणे गुणवत्ता टिकण्यासाठी पर्यटन नियोजन आवश्यक असते.

**विषय विवेचन-**

पर्यटनाच्या विशिष्ट गुणधर्मामुळे हा व्यवसाय आर्थिकतेच्या दृष्टीकोनातून विशेष फायद्याचा आहे. देशाच्या आर्थिक नियोजनाचा एक भाग म्हणून त्या देशाच्या सर्वांगीण विकासाबरोबरच पर्यटनाकडे विशेष लक्ष जर दिले तर याचा देखील विकास होवू शकतो. त्यासाठी नियोजनात्मक समन्वय आवश्यक आहे. ज्या देशात पर्यटन व्यवसायाची नुकतीच सुरुवात झाली आहे अशा विकसनशील देशात सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग आवश्यक आहे. कोणत्याही देशात सरकारला नवीन पर्यटन धोरण राबवयाचे असेल तर त्यासाठी तेथील पर्यटनाची उद्दीष्टे, आर्थिक घटकांचा विचार पर्यटनाच्या दृष्टीने नवनवीन पर्यटन स्थळांचा शोध अशा विविध घटकांचा विचार करणे आवश्यक आहे.

कोणत्याही ठिकाणी पर्यटनाच्या दृष्टीने आराखडा तयार करत असतांना पर्यटनाचे अर्थव्यवस्थेतील स्थान लक्षात घ्यावे लागते. तसेच तेथील खासगी व सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग किती असावा हे देखील निश्चित करावे लागते. ज्या ठिकाणी पर्यटन हा व्यवसाय आर्थिकतेच्या दृष्टीने खर्चिक आहे त्यावेळेस लोकसहभागातून त्या ठिकाणी सहकार्य करणे आवश्यक असते. आथिक नियोजनाचा विचार करतांना पर्यटन व्यवसायात देशातील व विदेशातील पर्यटक आपल्या देशात गुंतवणुक किती करतात तेही पाहिले जाते. तसेच यामध्ये बाजारपेठ व साधन संपत्तीचा अभ्यासही केला जातो. कारण बाजारपेठेचा अभ्यास पर्यटन नियोजनाचा एक आधार असतो.

विशिष्ट एखाद्या क्षेत्रामध्ये पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी आवश्यक असतात त्यामध्ये त्या ठिकाणच्या जागेची निवड, तेथील आकर्षणे, त्या ठिकाणच्या विविध सवलतीसाठी लागणाऱ्या गोष्टी, तेथील जमीनीचा वापर व नियंत्रण, पैशाची उपलब्धता व कायदे अशा विविध गोष्टी पर्यटन नियोजनामध्ये आवश्यक आहेत.कारण पर्यटन नियोजनामध्ये मास्टर प्लान करणे फार महत्वाचे असते.

प्रादेशिक स्तरावर पर्यटनाचे नियोजन करतांना प्रथमतः त्या ठिकाणी असणारे निसर्ग सौंदर्य, पर्यावरण याकडे विशेष लक्ष दिले जाते. पर्यटनाचे नियोजन करतांना त्या ठिकाणी असणारे सुप्तगुण विचारात घेवूनच दिशा ठरविली जाते. जशी की महाबळेश्वर, माथेरान, अशा प्रसिद्ध पर्यटन क्षेत्राच्या ठिकाणी आज प्रचंड गर्दी होत चाललेली आहे आणि हे टाळण्यासाठी पर्यायी पर्यटन स्थळाचे नियोजन आवश्यक आहे. कारण पर्यटनस्थळी होणारी वाहतुकीची कोंडी, पर्यटकांना न परवडणारी त्या ठिकाणची सेवा, महागड्या अशा जिवनावश्यक गोष्टी इत्यादींना त्यांना सामोरे जावे लागते त्यामुळे त्यांच्या खिशाला न परवडणारी पद्धत अवलंबावी लागते. परिणाम म्हणून पर्यटकांना त्यातून मिळणारा आनंद हा कमी असतो.

आज राष्ट्रीय पातळीवर पर्यटनाचे नियोजन करत असतांना अशा ठिकाणी पर्यटन मंत्रालय स्थापन केले जाते आणि या माध्यमातून प्रत्येक देशातील विविध भागांना पर्यटनांसाठी अनुदान दिले जाते अशा पर्यटनामुळे मिळणाऱ्या परकीय चलनाचा खुप मोठा वाटा देशाच्या तिजोरीत जातो. राष्ट्रीय पातळीवर पर्यटन नियोजन करतांना अद्ययावत सरकारी विश्रामधामे, मोठे पक्के रस्ते, विमानतळ अशा विविध गोष्टी शासन स्तरावर उपलब्ध केल्यामुळे पर्यटन नियोजन करणे सोपे जाते.

**यशस्वी पर्यटन नियोजन:-**

1. स्थानिक पर्यटनाची क्षमता व समाजाचा निर्णय आणि त्या ठिकाणचे निसर्ग सौंदर्य या सर्वांचा समतोल ठेवणे.
2. उपलब्ध असलेल्या पर्यटनाच्या सर्व सोयी व पुढे त्याला असणारी मागणी याचा सहसंबंध ठेवणे.
3. पर्यटनाचा विकास प्राकृतिक किंवा आर्थिक व सामाजिक घटकाशी आवश्यक.
4. पर्यटनाची सध्याची बाजारपेठ आणि भविष्यात पर्यटकांची वाढणारी संख्या.
5. अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरणावर पर्यटनाच्या प्रभावाचे नियमित. निरीक्षण.
6. पर्यटन विकासाच्या दृष्टीने पर्यटन नियोजन हे व्यवस्थापनाशी जोडले पाहिजे.
7. मागास भागात पर्यटनाद्वारे आर्थिक विकास घडून आणणे.
8. स्थलांतराचा ओघ कमी करुन निसर्गाचा अर्थकारणावर असलेला प्रभाव निसर्गाच्या मदतीनेच कमी करणे.
9. नवीन शाश्वत पध्दती आणि तंत्रज्ञान जसे उपलब्ध होतील तसे स्विकारणे.
10. ज्ञान आणि संसाधने सामाईक करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संस्थासह कार्य करणे.

**पर्यटन नियोजनाची आव्हाने:-**

पर्यटन नियोजनाचे ज्ञान असून देखील आव्हाने कायम आहेत.

- पर्यटन क्षेत्रामध्ये विशिष्ट बदलाला विरोध.
- पर्यटन क्षेत्रामध्ये सहसाधनाचा अभाव.
- पर्यटनाच्या दिर्घकालीन फायद्यासाठी चांगल्या शिक्षणाची गरज.
- पर्यटन क्षेत्रामध्ये शासन स्तरावरील नियोजनाचा अभाव.
- पर्यटन क्षेत्रामध्ये विविध नाविन्यपुर्ण गोष्टीचा अभाव.
- पर्यटन क्षेत्रामध्ये विशेष करुन शौचालयाचा अभाव.

अशा प्रकारे विविध पर्यटन नियोजनाच्या आव्हांनांना पर्यटकांना आजही सामोरे जावे लागते.

**पर्यटन नियोजनासाठी उपाययोजना:-**

- पर्यटन क्षेत्राच्या ठिकाणी स्वच्छ पाण्याची उपलब्धता शासन स्तरावर करुन देणे.
- राष्ट्रीय उद्याने तयार करणे.
- पर्यावरण दुषितीकरण कमी करण्यासाठी रस्त्यांची व्यवस्थित मांडणी व निर्मिती करणे.
- ऐतिहासिक विकासाचे व म्युझियमचे संवर्धन करणे.
- मानवी वसाहतीमधील अतिक्रमणे हटविणे.
- पर्यटक आणि स्थानिक लोकांसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे.
- शाश्वत पर्यटन पद्धतीची अंमल बजावणी करणे.
- पर्यटकांना मौजमजा, आनंद मिळेल असे पर्यटनांच्या ठिकाणी पुर्ण नियोजन करणे.

- पर्यटन क्षेत्रामध्ये सर्व देखभाल शासन स्तरावर राबवणे.

**निष्कर्ष:-**

पर्यटन नियोजनामध्ये स्थानिक समुदाय आणि पर्यावरणाच्या हिताचे रक्षण करतांना पर्यटनाच्या फायद्याकडे विशेष लक्ष दिलेले आहे.

1. पर्यटन व्यवसायातील सर्व भागधारकांनी शाश्वत विकासाची तत्वे अंमलात आणलेली आहेत.
2. प्रत्येक पर्यटकाला भेट देण्यासाठी आवडत असलेली ठिकाणे पुढील पिढ्यांसाठी जिवंत आणि अबाधित राहतील याची खात्री करणे.
3. पर्यटन नियोजनातून दिर्घकालीन आर्थिक परिणामांचा अंदाज लावला जातो.
4. पर्यटन नियोजनातून पर्यटनातील आर्थिक नियोजनासाठी धोरणे आखली जातात.
5. पर्यटन नियोजनामध्ये गुंतवणुकीबाबत माहितीपुर्ण निर्णय घेतली जातात.
6. कायद्याद्वारे उद्योग मानकांचे नियमन करुन पर्यटकांचे रक्षण केले जाते.
7. नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा स्थळांचे जतन करुन पर्यटन नियोजन केले जाते.

**संदर्भग्रंथ:-**


1. पर्यटन भूगोल-डॉ.विठ्ठल घारपुरे
2. पर्यटन भूगोल-प्रा.के.ए.खतीब
3. https://www/tboacademy.com
4. https://ww.google.com/search
5. https://thetourism.institute/tourism
6. https://in.docworkspace.com

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# नंदूरबार जिल्हयाच्या प्राकृतिक स्थितीचा अभ्यास

**प्रा.डॉ.बालाजी आव्हाड[1]प्रा.डॉ.एस.जी. बिराजदार[2]**
भूगोल विभाग,शंकरराव चव्हाण महाविद्यालय
अर्धापूर जि.नांदेड
**Corresponding Author: प्रा.डॉ.बालाजी आव्हाड**

**सारांश:**

भारतात नैसर्गिक विविधता आढळून येते. या जिल्हयातील सातपुडा पर्वत, सह्याद्री रांगा आणि तापी खो-यात आदिवासी लोकसंख्या असल्याने हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. येथील आदिवासी जमात ही त्यांच्या वैविध्यपूर्ण जीवनशैलीमुळे इतर समाजाहून भिन्न आहे. आदिवासी जमातीच्या जीवनशैलीवर येथील सभोवतालच्या पारिस्थितिकीचा अधिक प्रभाव पडत असल्याने त्यांची आर्थिक, सामाजिक आणि संस्कृतिक जडणघडण वेगवेगळया स्वरुपात दिसते.

**बिजसंज्ञाः** प्राकृतिक रचना, जलप्रणाली, मृदा

**प्रस्तावनाः**

भारतात नैसर्गिक विविधता आढळून येते. नंदुरबार जिल्ह्याच्या ग्रामीण संस्कृतीमध्ये आदिवासी हा बहुतांशी वन्य व दुर्गम भागात वास्तव्य करणारा समाज म्हणून ओळखला जातो. या जिल्हयातील सातपुडा पर्वत, सह्याद्री रांगा आणि तापी खो-यात व तापी, गोमाई, वाकी, निझरी, वाताक्षी, वल्हेरी, देहाली या नदीकाठी अनुक्रमे भिल्ल, पावरा, धनका, मावची, तडवी, कोकणी या आदिवासी जमातींच्या वसाहती आहेत. महाराष्ट्राच्या एकूण आदिवासी लोकसंखेच्या 10.02 टक्के लोकसंख्या केवळ नंदुरबार जिल्ह्यातील आहे. नंदुरबार जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येत 65.53 टक्के लोकसंख्या अनुसूचीत जमातीची आहे. म्हणून हा जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. येथील आदिवासी जमात ही त्यांच्या वैविध्यपूर्ण जीवनशैलीमुळे इतर समाजाहून भिन्न आहे. आदिवासी जमातीच्या जीवनशैलीवर येथील सभोवतालच्या पारिस्थितिकीचा अधिक प्रभाव पडत असल्याने त्यांची आर्थिक, सामाजिक आणि संस्कृतिक जडणघडण वेगवेगळया स्वरुपात दिसते. अन्न संकलन, शेती, हस्त व कुटिर उद्योग हे आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासाचे प्रमुख साधन मानले जाते. विशेषकरून हे लोक या परिसरात असणा-या नैसर्गिक वन्य साधन संपत्तीचा वापर वसाहतीच्या स्थिरीकरणासाठी करत असतात. येथील वसाहतींचे वितरण प्रकार, वाढ आणि विकासावर उपरोक्त प्राकृतिक व संास्कृतिक घटकांचा परिणाम होत राहिले आहे. म्हणून या प्रस्तुत संशोधनामध्ये अभ्यास क्षेत्राची प्राकृतिक स्थितीचा विस्तृत आढावा घेण्यात आला आहे.

**उद्दिष्टयेः**

1. नंदूरबार जिल्हयातील नैसर्गिक घटकाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती व माहिती संकलनः**

प्रस्तुत संशोधनासाठी स्थलनिर्देशक नकाशा, जनगणना अहवाल, गुगलअर्थ इमेजरी, मृद सर्वेक्षण विभाग, इंटरनेट मासीके, संशोधन पत्रिका, प्रबंध, सर्वेक्षण इत्यादी स्वरूपाच्या साहयाने माहितीचे संकलन करून तीचे सारणीकरण, आलेख व नकाशाच्या मदतीने अभ्यास करण्यात आलेला आहे.

**अभ्यास क्षेत्रः**

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्र राज्यातील नंदूरबार जिल्हा निवडलेला असून अक्षवृत्तीय विस्तार 21° 00' उत्तर ते 22° 03' उत्तर व रेखावृत्तीय विस्तार 73° 31' पूर्व ते 74° 32' पूर्व असा आहे. जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ 5894.55 चै.कि.मी. एवढे असून जिल्हयात नवापूर, शहादे तळोदे, अक्कलकुवा, अक्राणी नंदूरबार हे सहा तालुके आहेत. सातपुडा पर्वत रांगाच्या कुशीत असणारा महत्त्वपूर्ण जिल्हा होय. दक्षिण भागामध्ये सह्याद्री पर्वतरांगाचे आच्छादन असलेले आढळते. नंदुरबार जिल्ह्याच्या उत्तर सीमेवरून नर्मदा नदीचा सुमारे 70 कि.मी. प्रवाह वाहतो.

**प्राकृतिक रचनाः**

**उत्तर पर्वतीय प्रदेशः**

नंदुरबार जिल्ह्याच्या उत्तर दिशेला तापी व सातपुडा पर्वतरांगाच्या समांतर दिशेला नर्मदा नदीचा प्रवाह वाहतो. नंदुरबार जिल्हा हा उत्तर बाजूनी उंच डोंगररांगानी व्यापलेला आहे. उत्तर दिशेला असणा-या सातपुडा पर्वतरांगा अतिशय उंच असून त्यांची

समुद्रसपाटीपासून सरासरी उंची 600 मी. इतकी असलेली आढळते. नर्मदेच्या दिशेने सातपुडा पर्वतरांगाचा उतार वाढत गेलेला आढळतो. संपूर्ण सातपुडा पर्वतरांगाचे निरीक्षण केले असता पर्वतांची काही ठिकाणी उंची सुमारे 1000 मी. असलेली आढळते. खाई, नदीचा उगम हा सुमारे 1017 मी. इतक्या उंचीवर तर तोरणमाळ पर्वत रांगामधील अस्तित्वात असणा-या नदी प्रवाहाचा उगम 1155 मी. इतक्या उंचीवर असलेला आढळतो. एकंदरीत सातपुडा पर्वत रांगाच्या अधिक उंचीमुळे उत्तरेकडून येणारे उष्ण वारे अडवले जाऊन मानवी वास्तव्यास सुसाह्यता निर्माण होते. सातपुडा पर्वतरांगाच्या दक्षिण दिशेला आढळणाÚया पर्वताची सुमारे उंची 1000 ते 1200 मी. इतकी असलेली आढळते.

**तोरणमाळ पठारी भूप्रदेशः**

तोरणमाळ पठाराची उंची सुमारे 1155 इतकी असून अधिक उंचीवर हे पठार असल्यामुळे येथील वातावरण थंड स्वरुपात आहे. हे थंड हवेचे ठिकाण म्हणून त्यास पर्यटनाच्या दृष्टीने अधिक महत्त्व असलेले आढळते. तोरणमाळ पठाराच्या सभोवताली अतिशय खोलगट व तीव्र उताराच्या दÚया अधिक प्रमाणात आढळतात. या ठिकाणी आढळणारी सिताखाई ही दरी अत्यंत खोल असून त्याची खोली सुमारे 200 फुट इतकी आहे. तोरणमाळ हे छोटे पठार असून याच भागावर यशवंत तलाव आहे. सदर पठाराचे क्षेत्रफळ 41 चै.कि.मी. आहे.

**मध्य मैदानी प्रदेशः**

मध्य मैदानी प्रदेश हा तापी नदीच्या दोन्ही बाजूनी विस्तारलेला असून या प्रदेशातून वाहणारी तापी नदी ही महत्त्वपूर्ण नदी असून ती पूर्व-पश्चिम वाहते. नदीच्या वहनामुळे येथील मृदा अतिशय सुपीक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील इतर भागाच्या तुलनेने येथील उत्पादन अधिक असते. या प्रदेशाची सरासरी उंची 30 मीटर इतकी आहे. हा प्रदेश छोट्या-छोट्या डोंगरागांनी पसरलेला असून तो पूर्वेकडून पश्चिमेकडे निमुळता होत गेलेला आहे.


**दक्षिणेकडील डोंगराळ प्रदेशः**


दक्षिणेकडील डोंगराळ प्रदेश नंदुरबार तालुक्याचा पश्चिम व दक्षिण व नवापूर तालुक्याचा दक्षिण भाग त्यामध्ये समाविष्ट होतो. हा प्रदेश डोंगराळ स्वरूपाचा असून उथळ माथ्याची खंदक स्वरुपाच्या रचनेचा भूप्रदेश म्हणून याचे वेगळेपण आहे. मुरमाड आणि खडकाळ स्वरुपाची मृदा या भागाचे ठळक वैशिष्ट्य आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगा या भागात असून त्या नंदुरबार जिल्ह्याच्या पूर्वे दिशेला सुरु होतात व याच ठिकाणाची बरीचशी उंचीची डोंगर पर्वत स्थित आहेत.

**नदीप्रणालीः**

तापी आणि नर्मदा या नद्या नंदुरबार जिल्ह्याच्या प्रमुख जलस्रोत असून नर्मदा ही नंदुरबार जिल्ह्याच्या उत्तर सीमेवरून वाहते. सातपुडा पर्वत रांगाच्या विभिन्न क्षेत्रातून समांतर नद्या वाहतात व त्या नर्मदेला येऊन मिळतात. त्यामध्ये झारकल, उडाइ, खाई, सांबर आणि देवगंगा इत्यादी प्रमुख नद्या नर्मदा नदीच्या उपनद्या आहेत. सदर भागातील पाण्याची उपलब्धता आणि सुपीक जमीन या अनुकूल गोष्टीमुळे अक्राणी भागात लोकसंख्येची घनता अधिक आहे. सातपुडा पर्वतरांगेच्या विशिष्ट रचनेमुळे येथील नद्या अरुंद व जलद वाहतात.

आकृती क्र. 1.1 नंदुरबार जिल्हाः प्राकृतिक रचना आकृती क्र. 1.2 नंदुरबार जिल्हाः प्राकृतिक रचना




(स्त्रोतः भारतीय स्थलदर्शक नकाशा)

**तापी नदीः**

नंदुरबार जिल्ह्याच्या मध्य भागातून तापी नदी वाहते. तापी नदीचा बराचसा भाग मध्यभारताने व्यापलेला असून पश्चिम दिशेने वाहणारी ही नदी आहे. तिची एकूण प्रवाह लांबी 725 कि.मी. इतकी आहे. खंबायतच्या आखातात अरबी समुद्रास मिळते. नंदुरबार जिल्ह्यात 45 कि.मी. लांबीचा प्रवास तापी नदीचा आहे. तीला मिळणा-या उपनद्याचे दोन भागात वर्गीकरण केले आहे. त्यामध्ये उत्तर दिशेने मिळणा-या नद्या गोमाई नदी, वाकी नदी, वाताक्षी नदी, वल्हेरी नदी, देहाली नदी तर दक्षिण वाहिनी उपनदी निझरी नदी ही आहे.

**मृदाः**

नंदुरबार जिल्ह्यामध्ये गर्द काळी, मध्यम काळी व हलकी काळी अशी तीन प्रकारची मृदा आढळते. ही मृदा दख्खनच्या बेसाल्ट पठ्यापासून ते तापी नदीच्या दक्षिण भागादरम्यानही आढळते. तापी नदीच्या उत्तर भागातील मृदा ही बेसाल्ट खडकापासून निर्माण झाली आहे तर नंदुरबार जिल्ह्याच्या उत्तर भागामध्ये हलक्या प्रतीच्या काळी मृदा आढळते. नंदुरबार जिल्ह्याच्या मृदेपैकी 40 टक्के मृदा शेती योग्य व हलक्या स्वरुपाची आहे. 35 टक्के मृदा ही मध्यम प्रतीची तर 25 टक्के मृदा उपजाऊ स्वरुपाची आढळते. मृदेपैकी अधिक प्रमाणात काळी मृदा आढळते. गर्द काळी मृदा ही तापी व नर्मदा नदीच्या किनाÚयालगत असणा-या भागावरती आढळते. हलक्या खडकाळ स्वरुपाची काळी मृदा ही अक्राणी, नवापूर तालुक्याच्या पश्चिम भागात व नंदुरबार जिल्ह्याच्या दक्षिण भागात आढळते. मध्यम प्रकारची जमीन नंदुरबार जिल्ह्याच्या शहादे, नवापूर तालुक्यात पूर्व भागात आढळते. काळी मृदा शहादे, तळोदे, अक्कलकुवा व नंदुरबार तालुक्याच्याही भागात आढळते.

**तापमानः**

नंदुरबार जिल्ह्याचे तापमान उष्ण व कोरड्याा स्वरूपाचे आढळते. उन्हाळयातील तापमान 450 से. तर हिवाळयातील तापमान 120 से. इतके आढळते. नंदुरबार जिल्ह्यामध्ये तोरणमाळ हे थंड हवेचे ठिकाण असून येथील हिवाळयातील तापमान 80 से.व उन्हाळयातील तापमान 370 से. इतके असते. नंदुरबार जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान 924 मि.मी. असून तोरणमाळ भागात वार्षिक सरासरी पर्जन्यमान 1050 मि.मी. इतके आहे.

.

**वनेः**

नंदुरबार जिल्ह्यात टिक वृक्षासाठी पोषक वातावरण असल्याने या ठिकाणी हे अधिक प्रमाणात आढळतात. येथ्ील वनस्पती उष्ण कटिबंधीय शुष्क प्रकारची असून पश्चिम घाटातील प्रत्येक वनस्पतीचे प्रकार या जिल्ह्यामधील सातपुडा पर्वतरांगेत आढळतात. घनदाट जंगलाची व्याप्ती नंदुरबार जिल्ह्याच्या अक्राणी, अक्कलकुवा व तळोदे तालुक्याच्या उत्तर भागात आढळते. टिक व खैर या प्रदेशातील प्रमुख वनस्पती असून अक्राणी तालुक्याच्या उत्तर भागात अंजन वृक्ष अधिक प्रमाणात आढळते. नंदुरबार जिल्ह्यामध्ये बांबू वनस्पती या भागात मोठ्या प्रमाणात आढळते. नंदुरबार जिल्ह्याच्या एकूण जामिनीच्या 104000 हेक्टर जमिनीच्या तुलनेत 20.78 टक्के जमीन जंगलव्याप्त असून सर्वाधिक जंगलाखालील क्षेत्र नंदुरबार जिल्हामधील अक्कलकुवा तालुक्यात 42.34 टक्के एवढे क्षेत्र आहे.

नंदुरबार जिल्ह्यामध्ये 44 टक्के क्षेत्र जंगलाखाली आहे व त्यापैकी 65 टक्के क्षेत्र हे केवळ अक्राणी तालुक्याचे आहे. त्यामध्यें प्रामुख्याने टिक, पळस, धवड, खैर, चंदन, साग, मोह, निम इत्यादी वृक्ष आढळतात. तोरणमाळ पठारावर काकड, मोडल, आवळा, रोहीण व अनेक इतर जातीचे वृक्ष आढळतात.

**भूमीउपयोजनः**


उत्पादनाच्या दृष्टीने जमीन हे प्राथमिक साधन आहे. भारतातील 65 टक्के लोकसंख्या ही कृषीवर आधारित आहे. जमिनीच्या लागवडीच्या क्षेत्रीय विभाजनानुसार तेथील भौगीलिक परिस्थिती, पर्जन्य व मृदेचे क्षेत्र याचा अधिक प्रमाणात प्रभाव आढळतो. कुटुंब व्यवस्था व भौगोलिक संरचना इत्यादी कारणे कारणीभूत आहेत

सारणी क्र. 1 नंदुरबार जिल्हयातील भूमी उपयोजन 2011

| v-dz- | Hkweh mi;kstukps izdkj | {ks= ¼gsDVj½ | VDdsokjh |
|---|---|---|---|
| 1 | ,dw.k fidk[kkyhy {ks= | 289908 | 41-12 |
| 2 | ykxoMh ;ksX; ulysys {ks= | 38121 | 5-41 |
| 3 | iMhd {ks= | 25871 | 3-67 |
| 4 | Ukkihd {ks= | 17860 | 2-53 |
| 5 | Tkaxy {ks= | 333276 | 47-27 |
| | ,dw.k | 705036 | 100-00 |

(**Source:** Tahsil Revenue Records, 2011)

आकृती क्र.3 नंदुरबार जिल्हयातील भूमीउपयोजन 2011




**निष्कर्ष:**

नंदूरबार जिल्हयाच्या भौगोलिक रचनेच्या अभ्यासावरून असे निदर्शनास येते की, नैसर्गिक विभिन्नता मोठया प्रमाणात आढळते. त्याचबरोबर नदी खो-यामध्ये सुपीक मृदा तर पठारी क्षेत्रात मध्यम मृदा व उंचवटयाच्या ठिकाणी खडकाळ मृदा आढळते. तसेच येथील उंचसखल स्थितीमुळे अनेक लहान प्रवाहप्रणालीची निर्मीती झाल्याचे पहावयास मिळते.

**संदर्भग्रंथः**


1. Chauhan, T.S. (1987): Agricultural Geography: A case Study of Rajasthan State, Academic Publisher, Jaipur.
2. The Encyclopedic District Gazetteers of India, (1998): Western Zone Vol. 7, Gyan Publication New Delhi.
3. Advanced Spaceborne Thermal Emission and Reflection Radiometer (ASTER): SRTM imagery.
4. Groundwater Survey and Development Agency, Nandurbar district.
5. National Bureau of soil survey and Land use planning, 1995.
6. www. msamb.com.
7. www. nandurbar nic. com.
8. www. Google earth. com
9. जिल्हा जनगणना अहवाल, नंदुरबार 1991, 2001 व 2011.
10. भारतीय स्थलदर्शक नकाषा.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# ग्रामीण आणि शहरी विकासात पर्यटनाची भूमिका आणि आव्हाने

**प्रा डॉ. अतिश सारंगधर तिडके**
सहाय्यक प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग
**Corresponding Author: प्रा डॉ. अतिश सारंगधर तिडके**
**Email:** tidkeatish @gmail.com

**सारांशः**

ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही प्रकारच्या भू प्रदेशांना आकार देण्याच्या क्षमतेसह पर्यटन एक महत्त्वपूर्ण जागतिक शक्ती म्हणून विकसित झाले आहे. हा संशोधन लेख या विशिष्ट परिस्थितींमध्ये विकासाला चालना देण्यात पर्यटनाच्या बहुआयामी भूमिकेचा शोध घेतो. संशोधन लेख पर्यटनाचे आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय परिणाम तपासते आणि त्याचे संभाव्य फायदे आणि आव्हाने अधोरेखित करते. विद्यमान साहित्य आणि केस स्टडीजचे विश्लेषण करून, संभाव्य नकारात्मक परिणामांना संबोधित करताना आणि जबाबदार पर्यटन व्यवस्थापनासाठी शिफारसी देताना, ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासासाठी पर्यटन कसे योगदान देऊ शकते याची सर्वसमावेशक समज प्रदान करणे हा या संशोधन लेखाचा उद्देश आहे.

**प्रस्तावना:**

पर्यटनाचा प्रभाव विश्रांती आणि करमणुकीच्या पलीकडे आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय क्षेत्रांमध्ये विस्तारित आहे. पर्यटन ग्रामीण आणि शहरी विकासासाठी अद्वितीय संधी प्रदान करते, विकास आणि परिवर्तनासाठी उत्प्रेरक म्हणून पर्यटन काम करते. हा लेख पर्यटन आणि विकास यांच्यातील संबंधांचा अभ्यास करतो, विशिष्ट वातावरणाला पर्यटन कसे आकार देते आणि त्याच्या क्षमतेचा प्रभावीपणे वापर करण्याशी संबंधित आव्हाने तपासतो.

पर्यटनाने ग्रामीण आणि शहरी परिदृश्ये आकारण्यात एक शक्तिशाली शक्ती म्हणून उदयास आले आहे. विकासासाठी एक उत्प्रेरक म्हणून कार्य करत आहे ज्याचे बहुपरिमाणीय परिणाम आहेत. आर्थिक वाढ उत्तेजित करण्याची, सामाजिक कल्याण वाढवण्याची आणि पर्यावरणीय टिकाऊपणात योगदान देण्याची त्याची क्षमता अन्वेषण करतो.

ग्रामीण भागात पर्यटन हा आर्थिक विविधीकरणाचा मार्ग प्रदान करतो जेथे पारंपारिक उपजीविकेसाठी अनेकदा आव्हाने असतात. आदरातिथ्य, वाहतूक आणि स्थानिक हस्तकलांमध्ये संधी निर्माण करून, ते समुदायांना पुनरुज्जीवित करू शकते आणि उत्पन्न निर्माण करू शकते. शिवाय, पर्यटन स्थानिक परंपरा आणि चालीरीतींचे प्रदर्शन करून सांस्कृतिक वारसा जतन करण्यात मदत करू शकते, तसेच रहिवासी आणि संशोधक दोघांसाठीही पायाभूत सुविधा सुधारू शकते. तथापि ग्रामीण भागातील पर्यटन विकास शाश्वत आहे हे सुनिश्चित करणे, पर्यावरणीय परिणाम कमी करणे आणि स्थानिक लोकसंख्येसाठी जास्तीत जास्त लाभ निश्चित करणे महत्त्वाचे आहे.

शहरी केंद्रे त्यांच्या आकर्षणे आणि पायाभूत सुविधांच्या एकाग्रतेमुळे देखील पर्यटनातून महत्तम लाभ मिळवू शकतात. शहरी अर्थव्यवस्थांमध्ये चैतन्य आणू शकते, रोजगार निर्माण करू शकते आणि गुंतवणुकीला आकर्षित करू शकते. याव्यतिरिक्त पर्यटन शहरी पुनरुज्जीवनात योगदान देऊ शकते. ऐतिहासिक स्थळे आणि सांस्कृतिक खुणांच्या संवर्धनास प्रोत्साहन देऊ शकते. आंतर सांस्कृतिक देवाणघेवाणीला चालना देऊन पर्यटन शहरांच्या सामाजिक रचनेला समृद्ध करू शकते. तथापि, गर्दी आणि संसाधनांवरील ताण, प्रदूषण, वाहतूक समस्या, पायाभूत

सुविधांचा अभाव, स्थानिक संस्कृतीवर परिणाम, वाढलेला राहणीमानाचा खर्च यासारखे नकारात्मक परिणाम कमी करण्यासाठी नियोजन करणे आवश्यक आहे.

प्रस्तूत संशोधन लेख ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही संदर्भातील पर्यटन विकास, शासकीय धोरण आणि आव्हाने यांच्यातील परस्पर संवादाचा शोध घेईल. पर्यटन हे आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती आणि पर्यावरणीय शाश्वततेमध्ये योगदान देऊ शकते अशा विविध मार्गांचे परीक्षण करेल, तसेच त्याच्या विकासाशी संबंधित आव्हाने आणि अडचणी दूर करेल. ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासासाठी पर्यटनाचा एक साधन म्हणून कसा वापर केला जाऊ शकतो याबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करणे हा या लेखाचा उद्देश आहे.

**संशोधन लेखाची उद्दिष्टे:**

1. ग्रामीण आणि शहरी पर्यटनासाठी असलेल्या शासकीय धोरणाचा अभ्यास करणे.
2. ग्रामीण आणि शहरी विकासावर पर्यटन प्रभावाचा अभ्यास करणे.
3. ग्रामीण आणि शहरी पर्यटनातील आव्हाने यांचा अभ्यास करणे.
4. ग्रामीण आणि शहरी पर्यटनातील आव्हानावर मात करण्यासाठी उपाय योजना सुचविणे.

**ग्रामीण आणि शहरी पर्यटन: शासकीय धोरण:**

महाराष्ट्र सरकारने ग्रामीण आणि शहरी पर्यटनाला चालना देण्यासाठी विविध धोरणे आणि उपक्रम सुरू केले आहेत. या धोरणांचा उद्देश राज्याच्या पर्यटन क्षेत्राचा विकास करणे, रोजगार संधी निर्माण करणे आणि सांस्कृतिक वारसा जतन करणे आहे.

**ग्रामीण पर्यटन धोरण:**

ग्रामीण भागातील पर्यटन क्षमता वाढवणे, स्थानिक समुदायांना सहभागी करणे आणि शाश्वत पर्यटन विकासाला प्रोत्साहन देणे हा ग्रामीण पर्यटन धोरणांचा उद्देश आहे आणि होम स्टे आणि कृषी पर्यटन उपक्रमांना प्रोत्साहन, ग्रामीण भागातील कला, संस्कृती आणि हस्तकला यांना प्रोत्साहन, पर्यटन विकासासाठी पायाभूत सुविधांचा विकास, स्थानिक लोकांना पर्यटन व्यवसायात सहभागी होण्यासाठी प्रशिक्षण आणि मार्गदर्शन हे ग्रामीण पर्यटन धोरणांचे मुख्य वैशिष्ट्ये आहे.

**शहरी पर्यटन धोरण:**

शहरी भागातील पर्यटन आकर्षणांचा विकास करणे, पर्यटकांना सोयीसुविधा पुरवणे आणि शहरांची Brand value वाढवणे हा शहरी पर्यटन धोरणांचा उद्देश आहे आणि शहरांतील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांचे जतन आणि संवर्धन, शहरांमध्ये विविध पर्यटन कार्यक्रमांचे आयोजन, पर्यटकांना माहिती देण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी सुविधांचा विकास, शहरी पर्यटन विकासासाठी खाजगी क्षेत्रासोबत भागीदारी हे शहरी पर्यटन धोरणांचे मुख्य वैशिष्ट्ये आहे.

**पर्यटन धोरणाची उद्दिष्ट्ये:**

1) महाराष्ट्र राज्यात पर्यटनाच्या माध्यमातून १८ लाख रोजगार निर्मिती करणे.

2) राज्याच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात (GDP) पर्यटन क्षेत्राचा वाटा वाढवणे.

3) महाराष्ट्र राज्याला देशातील आघाडीचे पर्यटन राज्य बनवणे.

**शासकीय उपक्रम:**

1) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) राज्यातील पर्यटन विकासासाठी कार्यरत आहे.

2) राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास आणि संवर्धन करण्यासाठी विविध योजना राबवल्या जातात.

3) पर्यटन क्षेत्रातील उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध सवलती आणि योजना सरकारद्वारे दिल्या जातात.

महाराष्ट्र शासनाने ग्रामीण आणि शहरी पर्यटनाला चालना देण्यासाठी महत्वाचे पाऊल उचलले आहेत. या धोरणांमुळे राज्याच्या पर्यटन क्षेत्रात सकारात्मक बदल होण्याची अपेक्षा आहे.

**ग्रामीण विकासावर पर्यटनाचा प्रभाव:**

बऱ्याचदा पारंपरिक उपजीविका आणि नैसर्गिक सौंदर्याने विशेषीकृत असलेल्या ग्रामीण भागांना पर्यटनाचा लक्षणीय फायदा खालील प्रमाणे होऊ शकतो.

**1) आर्थिक लाभः**

पर्यटन ग्रामीण अर्थव्यवस्थेत विविधता आणू शकते, शेती, वाहतूक , आतिथ्य आणि हस्तकला उद्योगांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करू शकते. पर्यटन स्थानिक समुदायांसाठी उत्पन्न निर्माण करू शकते. पारंपारिक क्षेत्रांवरील अवलंबित्व कमी करू शकते आणि उद्योजकता वाढवू शकते.

**2) सामाजिक फायदेः**

स्थानिक परंपरा, हस्तकला आणि सण यांचे प्रदर्शन करून ग्रामीण संस्कृती आणि वारसा जतन करण्यात पर्यटन योगदान देऊ शकते. यामुळे पायाभूत सोयी आणि सुविधा सुधारू शकतात. ज्यामुळे रहिवासी आणि अभ्यागत दोघांनाही फायदा होऊ शकतो. पर्यटकांशी वाढलेला संवाद सांस्कृतिक देवाणघेवाण आणि ग्रामीण समुदायांसाठी व्यापक जागतिक दृष्टिकोनास कारणीभूत ठरू शकतो.

**3) पर्यावरणीय फायदेः**

पर्यावरणीय पर्यटन आणि निसर्ग-आधारित पर्यटन संवर्धनाच्या प्रयत्नांना चालना देऊ शकते आणि पर्यावरण संरक्षणाबद्दल जागरूकता वाढवू शकते. पर्यटनातून मिळणारा महसूल नैसर्गिक संसाधने आणि जैवविविधतेच्या संवर्धनासाठी पुन्हा गुंतवला जाऊ शकतो.

**ग्रामिण पर्यटनातील आव्हाने:**

**1) पायाभूत सुविधांचा अभाव:** ग्रामीण भागात पर्यटन वाढवण्यासाठी चांगल्या रस्त्यांची, वीज, पाणी आणि इंटरनेटची उपलब्धता आवश्यक आहे.

**2) वाहतूक आणि दळणवळणाची समस्या:** ग्रामीण भागात पोहोचण्यासाठी चांगली वाहतूक व्यवस्था नसल्यामुळे पर्यटकांना अडचणी येतात.

**3) निवासाची सोय:** ग्रामीण भागात चांगल्या दर्जाचे हॉटेल आणि होम स्टे उपलब्ध नसल्यामुळे पर्यटकांना निवास शोधणे कठीण होते.

**4) प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता:** ग्रामीण भागात पर्यटन व्यवसायात काम करण्यासाठी प्रशिक्षित लोकांची कमतरता आहे.

**5) मार्केटिंग आणि प्रसिद्धीचा अभाव:** ग्रामीण पर्यटन स्थळांची योग्य माहिती आणि प्रसिद्धी नसल्यामुळे पर्यटकांना त्यांची माहिती मिळत नाही.

**6) स्थानिक लोकांचा सहभाग कमी:** पर्यटन विकासात स्थानिक लोकांचा सहभाग नसल्यामुळे त्यांचा फायदा होत नाही.

**7) पर्यावरणाचा ऱ्हास:** जास्त पर्यटकांच्या येण्यामुळे ग्रामीण भागातील पर्यावरणावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. अनियंत्रित पर्यटनामुळे प्रदूषण, संसाधनांचा अतिवापर आणि नाजूक परिसंस्थांचे नुकसान होऊ शकते.

**8) सांस्कृतिक मूल्यांचा ऱ्हास:** स्थानिक संस्कृतींचे अतिरेकी व्यापारीकरण केले जाऊ शकते, त्यांची विश्वासार्हता गमावली जाऊ शकते आणि ती पर्यटकांसाठी रंगवली जाऊ शकते.पर्यटनामुळे स्थानिक संस्कृती आणि परंपरा कमी होऊ शकतात.

**9) लाभांचे असमान वितरणः** पर्यटनाच्या महसुलाचे समान वाटप केले जाऊ शकत नाही, ज्यामुळे समाजातील काही घटकांना इतरांपेक्षा जास्त फायदा होतो.

**शहरी विकासावर पर्यटनाचा प्रभावः**

सांस्कृतिक आकर्षणे, ऐतिहासिक स्थळे आणि करमणुकीची ठिकाणे असलेली शहरी केंद्रे ही प्रमुख पर्यटन स्थळे आहेत. शहरी भागांना पर्यटनाचा लक्षणीय फायदा खालील प्रमाणे होऊ शकतो.

1. **आर्थिक फायदेः**
   हॉटेल, उपहारगृहे, दुकाने आणि करमणुकीच्या ठिकाणी खर्च वाढवून पर्यटन शहरी अर्थव्यवस्थेला चालना देते. यामुळे विविध क्षेत्रांमध्ये रोजगार निर्माण होतात आणि पायाभूत सुविधा आणि विकासामध्ये गुंतवणूक आकर्षित होते.
2. **सामाजिक फायदेः**
   ऐतिहासिक जिल्ह्यांचे पुनरुज्जीवन करून सार्वजनिक जागा सुधारून आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देऊन पर्यटन शहरी पुनरुज्जीवनात योगदान देऊ शकते. पर्यटन रहिवासी आणि अभ्यागत यांच्यात आंतरसांस्कृतिक समज आणि देवाणघेवाण वाढवू शकते.
3. **पर्यावरणीय फायदेः**
   शाश्वत शहरी पर्यटन सार्वजनिक वाहतुकीच्या वापरास प्रोत्साहन देऊ शकते. ऊर्जा कार्यक्षमतेस प्रोत्साहन देऊ शकते आणि शहरांमधील हरित जागांच्या संवर्धनास समर्थन देऊ शकते.

**शहरी पर्यटनातील आव्हाने:**

शहरी पर्यटन हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे, परंतु ते अनेक आव्हानांना तोंड देत आहे. शहरी पर्यटनातील आव्हाने खालील प्रमाणे:

1. **गर्दी आणि ताण:** लोकप्रिय पर्यटनस्थळांवर गर्दी होऊ शकते, ज्यामुळे पायाभूत सुविधांवर ताण येतो आणि रहिवाशांच्या जीवनाचा दर्जा कमी होतो.
2. **प्रदूषण:** पर्यटनामुळे शहरांमध्ये प्रदूषण वाढते. अनियंत्रित पर्यटनामुळे प्रदूषण, संसाधनांचा अतिवापर आणि नाजूक परिसंस्थांचे नुकसान होऊ शकते.

3. **वाहतूक समस्या:** पर्यटनामुळे शहरांमध्ये वाहतूक कोंडी वाढते.
4. **पायाभूत सुविधांचा अभाव:** अनेक शहरांमध्ये पर्यटकांना आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा अभाव असतो. पर्यटकांच्या वाढत्या क्रियाकलापांमुळे जलसंपदा, कचरा व्यवस्थापन प्रणाली आणि इतर शहरी पायाभूत सुविधांवर ताण येऊ शकतो.
5. **स्थानिक संस्कृतीवर परिणाम:** पर्यटनामुळे स्थानिक संस्कृतीवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.
6. **वाढलेला राहणीमानाचा खर्चः** पर्यटनामुळे घरे, वस्तू आणि सेवांच्या किंमती वाढू शकतात, ज्यामुळे स्थानिकांना शहरात राहणे अधिक कठीण होते.

**शाश्वत पर्यटनः**

पर्यटनाचे नकारात्मक परिणाम कमी करताना त्याचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी शाश्वत पर्यटन आवश्यक आहेत. यामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे.

1. **समुदायाचा सहभागः** स्थानिक समुदायांना पर्यटन विकासाचा फायदा होईल हे सुनिश्चित करण्यासाठी पर्यटन नियोजन आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी करणे.
2. **पर्यावरण संरक्षणः** नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करण्यासाठी, प्रदूषण कमी करण्यासाठी आणि जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी उपायांची अंमलबजावणी करणे.
3. **सांस्कृतिक जतनः** स्थानिक संस्कृती आणि परंपरांचा आदर करणे आणि सांस्कृतिक वारशाचे वस्तूकरण टाळणे.

   **आर्थिक व्यवहार्यताः** पर्यटन आर्थिकदृष्ट्या टिकाऊ आहे याची खात्री करून घेणे, स्थानिक समुदायांसाठी दीर्घकालीन लाभ निर्माण करणे.

**प्रकरणांचा अभ्यासःग्रामीण पर्यटनः- नळदुर्ग किल्ल्याचा पर्यटन विकास:**

नळदुर्ग किल्ला हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा ऐतिहासिक किल्ला आहे. हा किल्ला धाराशिव जिल्ह्यात आहे आणि पर्यटकांना आकर्षित करतो. नळदुर्ग किल्ल्याचा पर्यटन विकास करणे महत्त्वाचे आहे. ज्यामुळे पर्यटकांना चांगल्या सुविधा मिळतील आणि स्थानिक लोकांना रोजगार संधी उपलब्ध होतील.

नळदुर्ग किल्ला पर्यटन विकासासाठी उपाययोजना:

1. **पायाभूत सुविधांचा विकास:**

a. किल्ल्यावर पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृहे, आणि कचरा व्यवस्थापन यांची व्यवस्था करणे.
b. पर्यटकांना किल्ल्यावर फिरण्यासाठी चांगले रस्ते तयार करणे.
c. किल्ल्याच्या परिसरात वाहनतळ आणि निवास व्यवस्था उपलब्ध करणे.

2. **माहिती केंद्र:**

a. किल्ल्याच्या इतिहासाची माहिती देणारे केंद्र स्थापन करणे.
b. पर्यटकांना किल्ल्याबद्दल माहिती देणारे मार्गदर्शक उपलब्ध करणे.
c. किल्ल्याच्या आसपासच्या पर्यटन स्थळांची माहिती उपलब्ध करणे.

3. **संवर्धन आणि जतन:**

a. किल्ल्याची नियमित साफसफाई करणे आणि त्याची देखभाल करणे.
b. किल्ल्यावरील ऐतिहासिक वास्तूंचे जतन करणे.
c. किल्ल्याच्या परिसरातील नैसर्गिक सौंदर्य टिकवून ठेवणे.

4. **पर्यटन उपक्रम:**

a. किल्ल्यावर विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे.
b. पर्यटकांना किल्ल्यावर ट्रेकिंग आणि कॅम्पिंग करण्याची सोय उपलब्ध करणे.
c. स्थानिक खाद्यपदार्थ आणि वस्तूंची विक्री करण्यासाठी दुकाने उपलब्ध करणे.

5. **स्थानिक सहभाग:**

a. पर्यटन विकासात स्थानिक लोकांचा सहभाग घेणे.
b. स्थानिक लोकांना रोजगार संधी उपलब्ध करून देणे.
c. स्थानिक संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे.

**पर्यटन विकासाचे फायदे:**

* स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना: पर्यटनामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळतो आणि त्यांची आर्थिक स्थिती सुधारते.

* महसुलात वाढ: पर्यटन विकासामुळे सरकारला महसूल मिळतो, ज्यामुळे विकास कामांना मदत होते.

* सांस्कृतिक जतन: पर्यटनामुळे स्थानिक संस्कृती आणि परंपरांचे जतन होते.

* जागरूकता वाढ: पर्यटनामुळे लोकांना ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठिकाणांबद्दल माहिती मिळते.

नळदुर्ग किल्ल्याचा पर्यटन विकास योग्य प्रकारे झाल्यास, तो एक उत्कृष्ट पर्यटन स्थळ बनू शकतो आणि अनेक लोकांना त्याचा फायदा होईल.

**शहरी पर्यटन:- बीबी का मकबरा: विकास आणि आव्हाने**

**ऐतिहासिक महत्त्व:**

- बीबी का मकबरा, औरंगजेबाची पत्नी राबिया-उद-दुर्रानी हिच्या स्मरणार्थ बांधलेला एक भव्य मकबरा आहे.
- हे ताजमहालच्या धर्तीवर असून, मुगल स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.
- १६७८ मध्ये या स्मारकाचे बांधकाम सुरू झाले आणि १६८१ मध्ये ते पूर्ण झाले.

**संवर्धनाचे प्रयत्न:**

- भारतीय पुरातत्व सर्वेक्षण द्वारे या स्मारकाची नियमित देखभाल आणि दुरुस्ती केली जाते.
- पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी आणि सोयीसुविधा पुरवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत.
- परिसरात स्वच्छता राखण्यासाठी विशेष मोहीम चालवली जाते.

**बीबी का मकबरा पर्यटन स्थळासमोरील आव्हाने:**

- बीबी का मकबरा परिसरात मोठ्या प्रमाणात पर्यटकांची नेहमीच खूप गर्दी असते, त्यामुळे स्मारकाची
- स्वच्छता राखणे एक मोठे आव्हान आहे.
- स्मारकाच्या देखभालीसाठी आणि संवर्धनासाठी निधीची उपलब्धता महत्त्वाची आहे.
- हवामानातील बदल आणि प्रदूषणामुळे स्मारकावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

**विकास योजना:**

- बीबी का मकबरा आणि परिसराचा विकास करण्यासाठी विविध योजना प्रस्तावित आहेत.
- पर्यटकांना अधिक माहिती देण्यासाठी मार्गदर्शकांची व्यवस्था करणे.
- परिसरात पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृहे आणि विश्रांतीसाठी चांगली व्यवस्था करणे.
- स्मारकाच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी उद्याने आणि आकर्षक विद्युत रोषणाईची व्यवस्था करणे.
- पार्किंगची व्यवस्था सुधारणे.

बीबी का मकबरा हे एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा आहे. त्याचे संवर्धन करणे आणि पर्यटकांना चांगल्या सुविधा पुरवणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष:**

ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात विकासाला चालना देण्यासाठी पर्यटनात लक्षणीय क्षमता आहे. तथापि, या संभाव्यतेची जाणीव होण्यासाठी काळजीपूर्वक नियोजन, जबाबदार व्यवस्थापन आणि शाश्वततेसाठी वचनबद्धता आवश्यक आहे. स्थानिक समुदाय, पर्यावरण आणि पर्यटन उद्योगाच्या गरजांचा विचार करणारा एक समग्र दृष्टीकोन स्वीकारून आपण हे सुनिश्चित करू शकतो की पर्यटन सर्वांसाठी सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासात योगदान देते. पर्यटनाची विकसित होणारी गतिशीलता आणि विविध समुदाय आणि वातावरणावरील त्याचा प्रभाव शोधण्यासाठी प्रस्तूत संशोधनाची आवश्यकता आहे.

**शिफारसीः**

**ग्रामीण पर्यटनातील आव्हानांवर मात करण्यासाठी उपाययोजना:**

1) **पायाभूत सुविधांचा विकास:** सरकारने ग्रामीण भागात रस्ते, वीज, पाणी आणि इंटरनेटची उपलब्धता वाढवण्यासाठी गुंतवणूक करावी.
2) **वाहतूक आणि दळणवळणाची सुधारणा:** ग्रामीण भागात पोहोचण्यासाठी बस, टॅक्सी आणि रेल्वेची सोय उपलब्ध करावी.
3) **निवासाची सोय:** ग्रामीण भागात चांगले हॉटेल आणि होमस्टे तयार करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.
4) **प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी:** स्थानिक लोकांना पर्यटन व्यवसायात काम करण्यासाठी प्रशिक्षण द्यावे.
5) **मार्केटिंग आणि प्रसिद्धी:** ग्रामीण पर्यटन स्थळांची माहिती आणि प्रसिद्धी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करावी.
6) **स्थानिक लोकांचा सहभाग:** पर्यटन विकासात स्थानिक लोकांचा सक्रिय सहभाग घ्यावा.
7) **पर्यावरणपूरक पर्यटन:** पर्यावरणाची काळजी घेऊन पर्यटन विकास करावा.
8) **सांस्कृतिक जतन:** स्थानिक संस्कृती आणि परंपरांचे जतन करावे.

या उपायांमुळे ग्रामीण पर्यटन अधिक विकसित होऊ शकते आणि स्थानिक लोकांना त्याचा फायदा होऊ शकतो.

**शहरी पर्यटनातील आव्हानांवर मात करण्यासाठी उपाययोजना:**

शहरी पर्यटन हे जगातील सर्वात मोठ्या आणि वेगाने वाढणाऱ्या पर्यटन क्षेत्रांपैकी एक आहे. हे अनेक संधी आणि फायदे घेऊन येते पण त्याचबरोबर काही गंभीर आव्हानं देखील उभी करते. या आव्हानांवर मात करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

1) **पर्यटकांची संख्या नियंत्रित करणे:** शहरात एका वेळी किती पर्यटक येऊ शकतात याची मर्यादा निश्चित करणे.
2) **पर्यटनाचे व्यवस्थापन करणे:** पर्यटकांना शहरात वेगवेगळ्या ठिकाणी विभागणे, ज्यामुळे गर्दी कमी होईल.
3) **पर्यावरणपूरक पर्यटन:** पर्यटनामुळे पर्यावरणाला कमी नुकसान कसे पोहोचेल यावर लक्ष केंद्रित करणे.
4) **स्थानिक लोकांना सहभागी करणे:** पर्यटनाच्या विकासात स्थानिक लोकांना सहभागी करणे, ज्यामुळे त्यांना त्याचा फायदा होईल.
5) **सांस्कृतिक संवर्धन:** स्थानिक संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे.
6) **शिक्षण आणि जागरूकता:** पर्यटक आणि स्थानिक लोकांना पर्यटनाच्या सकारात्मक आणि नकारात्मक प्रभावांबद्दल शिक्षित करणे.

वरिल उपायांमुळे शहरे पर्यटनाचे फायदे घेऊ शकतील आणि त्याचबरोबर त्याच्या नकारात्मक परिणामांवर नियंत्रण ठेवू शकतील.

**इतर शिफारसीः**

1) **एकात्मिक नियोजनः** पर्यटनाच्या आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय परिणामांचा विचार करणाऱ्या सर्वसमावेशक पर्यटन योजना विकसित करणे.

2) **हितधारक सहकार्यः** सरकार, व्यवसाय, स्थानिक समुदाय आणि इतर भागधारकांमध्ये सहकार्य वाढवणे.

3) **क्षमता बांधणीः** पर्यटन क्षेत्रात प्रभावीपणे सहभागी होण्यासाठी स्थानिक समुदायांना प्रशिक्षण आणि शिक्षण देणे.

4) **देखरेख आणि मूल्यमापनः** पर्यटनाच्या परिणामांवर नियमितपणे लक्ष ठेवणे आणि आवश्यकतेनुसार धोरणे स्वीकारणे.

**संदर्भसूची:**

1. Macckan Ujin. (2016), Urban Tourism: City, Culture and Commerce. Routledge.
2. Ashwarth Greg. (2015), Tourism, Mobility and Second Homes: Between Fixity and Motion. Channel View Publications.
3. Hall C.M. (2017), Tourism and Sustainable Development. Routledge.
4. Telor J. (2013), The role of tourism in rural development. Journal of Rural Studies, 30.
5. Marteen S. (2014), Urban tourism and the transformation of the city. Tourism Management, 40.
6. Devid D. (2015). The social impacts of tourism. Annals of Tourism Research, 50.
7. Clark A. (2016). The economic impacts of tourism. Journal of Travel Research, 55(1).
8. Brown. B. (2017), The environmental impacts of tourism. Journal of Sustainable Tourism, 25(1).
9. Smith, J. (2018). The role of tourism in rural development: A case study of the Lake District. Journal of Rural Development, 35(2).
10. Davis, E. (2022). The environmental impacts of tourism: A case study of the Great Barrier Reef. Journal of Sustainable Tourism, 30(1).
11. https://maharashtratourism.gov.in.
12. https://www.incredibleindia.org

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# जालना जिल्ह्यातील पर्यटन स्थळे आणि रोजगार संधी यांचा भौगोलिक अभ्यास

**प्रा. डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर**
भूगोल विभाग(सहयोगी प्राध्यापक), संत रामदास महविद्यालय घनसावंगी,
ता. घनसावंगी जिल्हा. जालना.
**Corresponding Author:** **प्रा. डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर**
**Email:** bhausdevkar@Gmail.com

**सारांश (Abstract) :**

पर्यटन व्यवसाय हा सध्या अत्यंत लाभदायक आणि वेगाने वाढणारा व्यवसाय आहे. कोरोना महामारीनंतर पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळाली आहे आणि लोक पुन्हा प्रवासाकडे आकर्षित होत आहेत. दैनंदिन जीवनातून काही काळासाठी बाहेर पडून वेगवेगळ्या ठिकाणी प्रवास करणे व तिथल्या अनुभवांचा आस्वाद घेतात. पर्यटनाचे स्वरूप वेळ, उद्देश, स्थान आणि व्यक्तीच्या आवडीनुसार बदलत जाते. प्रत्येक प्रकाराच्या पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्था वाढते आणि सांस्कृतिक देवाण-घेवाण होते. ग्रामीण पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्था आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळते. स्थानिक उद्योग, हस्तकला आणि खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन मिळते. लहान गावे आणि दुर्गम भाग पर्यटकांच्या माध्यमातून प्रसिद्ध होतात.

जालना जिल्ह्यात अनेक ऐतिहासिक आणि धार्मिक पर्यटन स्थळे आहेत. जालना जिल्हयात महत्वाची पर्यटन स्थळे विकसित होत आहेत त्यातील काही धार्मिक तीर्थक्षेत्रे, यात्रास्थळे आहेत. जालना शहराची मंमादेवी, आनंदस्वामी मठ, दुर्गामाता मंदीर प्रसिघ्द असुन, अंबड येथे डोंगरावर मत्स्योदरी देवीचे हेमाडपंथी मंदिर असून, अंबड येथे जवळपास ४०० वर्षापूर्वीचा चौघाडा व कल्याणस्वामींचा मृदंग तसेच वेणूबाईचा तानपूरा संगीतप्रेमींनी केलेल्या संग्रहात आढळतो. मराठवाडयातील प्रसिद्ध गणपती राजुर येथे आहे. जांब समर्थ येथे समर्थ रामदास स्वामींचे जन्मस्थान आहे तिथे त्यांचे मंदीर आहे. हेलस तालुका मंठा हे शिल्पकलेचे प्रणेते हेमाद्रीपंत यांचे गाव आहे. भोकरदन तालुक्यातील अन्वा या गावात पुरातन भव्या हेमाडपंथी शिवपंदिर असून, येथे कोरीव शिल्पही आहेत. शिवाय रऊनापराडा ता. अंबड येथे प्रसिध्द दर्गा असुन तेथे दरवर्षी मोठा ऊरुस भरतो. भौगोलिकदृष्टया जालना जिल्हा राज्याच्या मध्यभागी येत असल्याने केंद्रीय दळणवळण मंत्रालयाने जालना शहराजवळील इंदेवाडी येथे उपग्रह अनुश्रवण भूकेंद्र ऊभारले आहे.

**बीज संज्ञा (Key words):** पर्यटन व्यवसाय, स्थानिक उद्योग, कृषी आणि हस्तकला, इको-टुरिझम आणि ग्रामीण पर्यटनाला प्रोत्साहन, रोजगार संधी .

**प्रस्तावना (Introduction) :**

पर्यटनाचे सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्व आहे. सामाजिक दृष्टिकोनातून पर्यटन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे आहे. हे केवळ लोकांना आनंद देत नाही तर सामाजिक समरसता, आर्थिक प्रगती आणि सांस्कृतिक जतनालाही चालना देते. त्यामुळे जबाबदारीने शाश्वत पर्यटनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. पर्यटन हा केवळ विरंगुळ्याचा किंवा आर्थिक उपक्रम नसून, तो विविध संस्कृतींना एकत्र आणणारा महत्त्वाचा दुवा आहे. पर्यटनामुळे लोक वेगवेगळ्या परंपरा, कला, भाषा आणि जीवनशैली समजून घेतात, ज्यामुळे सांस्कृतिक जतन आणि संवर्धनाला चालना मिळते. अध्यात्म आपल्याला परिस्थिती स्वीकारण्याची आणि संकटांचा सामना करण्याची शक्ती देते. वर्तमान परिस्थितीत अध्यात्म हा केवळ धर्माशी संबंधित विषय न राहता मानसिक, सामाजिक आणि शारीरिक स्वास्थ्यासाठी आवश्यक घटक बनला आहे. अध्यात्मिक विचारसरणी आत्मविश्वास, संयम आणि सकारात्मक दृष्टीकोन वाढवते, जे आजच्या जगात अत्यंत महत्त्वाचे आहेत.

वर्तमान काळात पर्यटन व्यवसाय लाभदायक आहे. पर्यटन व्यवसाय हा सध्या अत्यंत लाभदायक आणि वेगाने वाढणारे क्षेत्र आहे. कोरोना महामारीनंतर पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळाली आहे आणि लोक पुन्हा प्रवासाकडे आकर्षित होत आहेत. मात्र, त्यातील नफा आणि संधी अनेक घटकांवर अवलंबून असतात.लोकांचा प्रवासाकडे कल वाढला आहे.धार्मिक, साहसी, वैद्यकीय आणि पारंपरिक पर्यटनाला अधिक मागणी आहे.ऑनलाइन बुकिंग, टूर प्लॅनिंग, आणि सोशल मीडियामुळे प्रवासी जलद निर्णय

घेतात. छोटे व्यवसायसुद्धा मोठ्या बाजारपेठेत पोहोचू शकतात. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. हॉटेल, रेस्टॉरंट्स, टॅक्सी, स्थानिक वस्तूंची विक्री यामुळे रोजगार वाढतो.पर्यटनामुळे कृषी आणि हस्तकला क्षेत्रालाही फायदा होतो.

**अभ्यास क्षेत्र (Study Area) :**

भौगोलिकदृष्टया जालना जिल्हा राज्याच्या मध्यभागी येत असल्याने केंद्रीय दळणवळण मंत्रालयाने जालना शहराजवळील इंदेवाडी येथे उपग्रह अनुश्रवण भूकेंद्र ऊभारले आहे. अंतराळात सोडलेल्या उपग्रहांशी सातत्याने संपर्क ठेवणे सोईचे ठरते. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ ७७१८ चौ.कि.मी. आहे. जिल्हयात भोकरदन, जाफ्राबाद, जालना, बदनापूर, अंबड, घनसावंगी, परतूर, मंठा असे ८ तालुके असून, जिल्हयात एकूण ९७१ गावे असून त्यापैकी ९६३ गावे वस्ती असलेली व ८ ओसाड गावे आहेत. जिल्हयात ७८१ स्वतंत्र ग्रामपंचायती आहेत. जालना जिल्हयाचे भौगोलीक स्थान व जिल्ह्याचा अक्षांश व रेखांश विस्तार १९.१६ ° उत्तर ते २१ .३२ ° उत्तर अक्षांस असून ७५.३०° पूर्व ते ७६.४५° पूर्व रेखांश आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives) :**

**प्रस्तुत शोधनिबंधामध्ये खालील उद्दिष्टांच्या आधारे संशोधन करण्यात आलेले आहे.**

१. पर्यटन हा एक वेगाने वाढणारा उद्योग आहे,जो विविध प्रकारच्या व्यवसाय संधी उपलब्ध करून देतो. नैसर्गिक सौंदर्य, ऐतिहासिक वारसा, धार्मिक स्थळे याठिकाणी पर्यटन व्यवसायाची मोठी संधी कशी निर्माण होईल याविषयी अभ्यास करणे.
२. ग्रामीण पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्था आणि रोजगार निर्मितीला चालना मिळण्यासाठी व स्थानिक उद्योग, हस्तकला आणि खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन देऊन लहान गावे आणि दुर्गम भाग पर्यटकांच्या माध्यमातून प्रसिद्ध कसे होतील याविषयी अभ्यास करणे.

**गृहितके (Hypothesis) :**

१. वर्तमान परिस्थितीत पर्यटन हा केवळ धर्माशी संबंधित विषय न राहता मानसिक, सामाजिक आणि शारीरिक स्वास्थ्यासाठी आवश्यक घटक बनला आहे. पर्यटन हे अध्यात्मिक विचारसरणी आत्मविश्वास, संयम आणि सकारात्मक दृष्टीकोन वाढवते.यामुळे पर्यटन व्यवसायाची मोठी संधी निर्माण होईल.
२. पर्यटन व्यवसाय हा सध्या अत्यंत लाभदायक आणि वेगाने वाढणारा आहे. कोरोना महामारीनंतर पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळाली आहे आणि लोक पुन्हा प्रवासाकडे आकर्षित होत आहेत.

**माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती (Research Methodology) :**

प्रस्तुत शोध निबंधा करिता प्राथमिक व दुय्यम साधनसामग्रीवर आधारित माहिती संकलित केलेली आहे. प्राथमिक व दुय्यम साधन सामग्री वेगवेगळया माध्यमातून मिळवलेली आहे.दुय्यम साधन सामग्री प्रकाशित अहवाल, संदर्भ पुस्तके, विविध लेख, नियतकालिके व दर्जेदार मासिकात प्रसिद्ध झालेले लेख इत्यादींचा संदर्भ साहित्य म्हणून वापर केलेला आहे. द्वितीयक सामुग्रीच्या आधारे प्रस्तुत संशोधन निबंधात विश्लेषण करण्यात आलेले आहे. संशोधनातील निष्कर्ष हे उद्दिष्टावर आधारित असून विश्लेषण व निष्कर्ष यावरच काढलेले आहेत व त्यानुसार शिफारशी दिलेल्या आहेत.

**विषय विवेचन (Subject Analysis) :**

पर्यटन व्यवसाय हा सध्या अत्यंत लाभदायक आणि वेगाने वाढणारा क्षेत्र आहे. कोरोना महामारीनंतर पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळाली आहे आणि लोक पुन्हा प्रवासाकडे आकर्षित होत आहेत. मात्र, त्यातील नफा आणि संधी अनेक घटकांवर अवलंबून असतात. पर्यटनाचे स्वरूप म्हणजे लोक आपल्या दैनंदिन जीवनातून काही काळासाठी बाहेर पडून वेगवेगळ्या ठिकाणी प्रवास करणे व तिथल्या अनुभवांचा आस्वाद घेणे. हे पर्यटन विविध कारणांमुळे आणि वेगवेगळ्या प्रकारांत विभागले जाते. पर्यटनाचे स्वरूप वेळ, उद्देश, स्थान आणि व्यक्तीच्या आवडीनुसार बदलत जाते. प्रत्येक प्रकाराच्या पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्था वाढते आणि सांस्कृतिक देवाण-घेवाण होते.पर्यटन क्षेत्रात नवकल्पना, उत्तम सेवा आणि स्थानिक संसाधनांचा योग्य वापर करून व्यवसाय संधी विकसित करता येतात. योग्य नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, कोणताही इच्छुक उद्योजक या क्षेत्रात चांगली संधी मिळवू शकतो. सामाजिक दृष्ट्या पर्यटनाचे महत्त्व आहे.पर्यटन हा केवळ मनोरंजनाचा साधन नाही, तर तो समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो. पर्यटनामुळे विविध समाजातील लोक एकमेकांच्या संपर्कात येतात, सांस्कृतिक देवाण-घेवाण होते आणि सामाजिक एकता वाढते.

**जालना जिल्ह्यात अनेक ऐतिहासिक आणि धार्मिक पर्यटन स्थळे आहेत. काही प्रमुख स्थळांची माहिती खालीलप्रमाणे:**

**जालना तालुक्यात काही प्रसिद्ध पर्यटन स्थळे आहेत. त्यापैकी काही ठिकाणांची माहिती खालीलप्रमाणे:**

1. **छत्रपती संभाजी उद्यान (मोती बाग):** जालना शहरातील हे सुंदर उद्यान नाट्यगृह, मिनी ट्रेन आणि संगीत कारंज्यांसाठी प्रसिद्ध आहे. हे स्थानिक आणि पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. जालना शहर वासियांसाठी एक आकर्षनाचे ठिकाण आहे. उद्यानामध्ये सुंदर हिरवळीने युक्त बगीचा आहे तसेच रंगीबेरंगी फुलांची झाडे व इतर अनेक प्रकारची झाडे

आहेत. लहान मुलांना खेळण्यासाठी खेळणी असून झुकझुकगाडीचे मुख्य आकर्षण मुलांना उद्यानाकडे आकर्षीत करते. उद्यानाच्या मागे व उत्तरेस मोती तलावाचा सुंदर किनारा आहे. तसेच उद्यानामध्ये संगीत कारंजे असून ते देखील उद्यानाचे मुख्य आकर्षन आहे

2. **घानेवाडी तलाव:** १९३१ साली फरीदूनजी जालनावाला यांनी जालना शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी हा तलाव बांधला. जरी सध्या त्याची स्थिती खराब असली तरी, ऐतिहासिक दृष्ट्या याचे महत्त्व आहे.
3. **काली मशीद:** जुना जालना येथील कचेरी रोड परिसरात स्थित ही मशीद सुमारे ४०० वर्षे जुनी आहे. काळ्या दगडांमध्ये बांधलेली ही मशीद धार्मीक गुरू जमशेद खान यांनी बांधली होती. मुस्लिम बांधव येथे नियमित नमाज अदा करतात आणि ईदच्या दिवशी विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात.
4. **गुरू गणेश तपोधाम:** जालना शहरातील हे जैन धर्मीयांचे पवित्र स्थळ आहे. येथे जैन धर्माच्या विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. जैन धर्मातील बांधवांसाठी जालना शहरामधील गुरू गणेश भवन हे एक महत्वाचे पवित्र ठिकाण आहे. गुरू गणेश भवन हे कर्नाटक केसरी या नावाने देखील ओळखले जाते. श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ या जैन ट्रस्टमार्फत या धार्मीक स्थळाची देखरेख व विकासाची कामे केली जातात. या ट्रस्टमार्फत शालेय संस्थान, महाविद्यालय, अंधांची शाळा, ग्रंथालय, गोशाला चालविल्या जातात. संस्थानची गोशाला ही मराठवाडयामध्ये सर्वात मोठी गोशाला आहे.
5. **आनंदी स्वामी मंदिर** : जालना शहरातील आनंदस्वामी मठ हे धार्मिक आणि आध्यात्मिक केंद्र आहे. आनंदी स्वामी मंदीर हे २५० वर्षापुर्वीचे मंदीर आहे.जुना जालना या ठिकाणी श्री संत आनंदी स्वामी यांनी समाधी घेतली होती. प्रत्येक आषाढी एकादशीनिमीत्त येथे मोठया प्रमाणात भाविक दर्शनासाठी येत असतात.
6. **श्री बालाजी मंदिर :** जुना जालना परिसरातील कचेरी रोड येथे, श्री. बालाजीचे दोनशे वर्षे प्राचीन मंदिर आहे. या मंदिराचा जिर्णोध्दार (नुतनीकरण) सन २०१० ते २०१५ या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये करण्यांत आले. विजयादशमीचे (दसऱयाचे ) दिवशी श्री. बालाजींची पालखी मिरवणूक रात्री काढण्यांत येते.

**अंबड तालुक्यातील काही प्रसिद्ध धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळे :**

१. **मत्स्योदरी देवी मंदिर अंबड:** अंबड शहरात स्थित हे मंदिर जालना शहराच्या दक्षिणेस सुमारे २१ किमी अंतरावर आहे. मंदिर ज्या टेकडीवर आहे, तिचा आकार मासोळी (मत्स्य) सारखा असल्यामुळे या देवीस मत्स्योदरी देवी असे नाव पडले. हे मंदिर अतिशय प्राचीन असून, नवरात्रोत्सवाच्या काळात येथे मोठी यात्रा भरते.

२. **मझर-इ-मौलया नुरुद्दीन साहेब दर्गा शरीफ** : मौलया नुरुद्दीन यांची समाधी मझर-इ-मौलया, डोणगांव ता. अंबड येथे आहे. मौलया नुरुद्दीन यांची वली अल-हिंद (भारतीय प्रतिनिधी / काळजीवाहू) या पदावर दाऊदी बोहरा दावत, येमेन केंद्रातर्फे नियुक्त करण्यात आले होते. येथे खूप लोक येत असतात.

३. **रऊनापराडा येथील दर्गा:** अंबड तालुक्यातील रऊनापराडा येथे एक प्रसिद्ध दर्गा आहे, जिथे दरवर्षी मोठा उरूस भरतो. हे धार्मिक स्थळ मुस्लिम बांधवांसाठी महत्त्वपूर्ण आहे,जिथे दरवर्षी मोठा उरूस भरतो. धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे असले तरी, हे ठिकाणही तुलनेने कमी प्रसिद्ध आहे.

४. **खंडोबा मंदीर :**अंबड शहरातच खडोबाचे मंदीर आणि दगडी बांधकाम असलेले पाण्याचे कुंड आहे. आठराव्या शतकाच्या शेवटी पवित्र आणि परोपकारी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी या दोन्हींचेही निर्माण केले होते.

५. **स्वामी रामानंद :** या परीसरामध्ये जे पंथ उदयास आले त्यात रामभक्त स्वामी रामानंद यांचा एक आहे. ते अंबडजवळील गोंदी या गावाची होते. मात्र ते अंबडचे रहिवाशी झाले आणि त्यांनी आपल्या भक्तांना उपदेश केला. अच्युताश्रम स्वामी हे त्यांचे प्रमुख भक्त होते. अंबड आणि परिसरामध्ये आजही रामानंद स्वामी यांच्या आठवणी सांगितल्या जातात.

६. जामखेड : अंबड तालुक्यातील जामखेड गावाच्या पूर्वेस प्राचीन जांबुवंत महाराजांचे मंदिर आहे, जे धार्मिक आणि पर्यटनाच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण आहे. जांबुवंत मंदिर हे एकमेव मंदिर आहे की,जे द्वापार युगाची माहिती देते.

**घनसावंगी तालुक्यातील प्रसिद्ध धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळे :**

१. **जांबसमर्थ:** जांबसमर्थ हे संत रामदास स्वामींचे जन्मस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. हे ठिकाण घनसावंगी तालुक्यातील एक महत्त्वपूर्ण धार्मिक स्थळ आहे. जांबसमर्थ येथे संत रामदास स्वामी यांचा जन्म झाला. हे ठिकाण जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यामध्ये आहे. राम मंदिरामध्ये दर वर्षी राम नवमी निमीत्त यात्रा भरते. हे राम मंदिर रामदास स्वामी यांच्या घरामध्ये स्थीत आहे, संस्थेमार्फत येथे राहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. येथे एक इमारत माता राणी होळकर, इंदोर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ देवी अहिल्याबाई होळकर यांनी दिलेल्या देणगीमधून बनविण्यात आली आहे. तीर्थक्षेत्र पर्यटनचा ब दर्जा मिळालेला असून या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात श्रीसमर्थ संस्थांनच्या वतीने निवास व्यवस्था

व भोजन व्यवस्था करण्यात आलेली आहे, या ठिकाणी प्राचीन वस्तू पाहण्यास मिळतात.

२. **सखलादी बाबा दर्गा, बोधलापुरी:** बोधलापुरी येथे सखलादी बाबा यांचा दर्गा आहे, जो स्थानिक मुस्लिम बांधवांसाठी श्रद्धेचे केंद्र आहे. येथे दरवर्षी उरूस भरतो, ज्यामध्ये अनेक भक्त सहभागी होतात.

३. **घनसावंगी :** पुर्वीच्या काळी हे एक महत्वाचे ठिकाण होते. आजही इथे अस्तित्वात असलेल्या भग्नावेशातील वस्तुंवरुन त्याची खात्री पटते. शहरांमध्ये श्री नरसिंह मंदिर आहे या ठिकाणी यात्रा भरते हे ग्रामदैवत असून या ठिकाणी प्राचीन काळापासून खूप मोठे लोक दर्शना करता येत असतात.

४. **पिंपरखेड:** तालुक्यातील हे सुद्धा धाकटे पंढरपूर म्हणून ओळखल्या जाते या ठिकाणीही आषाढी एकादशी निमित्त खूप मोठ्या प्रमाणात यात्रा भरती आज ब दर्जाचे पर्यटन तीर्थक्षेत्र म्हणून गणल्या जाते.

**भोकरदन तालुक्यातील काही प्रसिद्ध धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळे :**

१. **असईच्या लढाई : सन** १८०३ मध्ये भोकरदनच्या पुर्वेला १० कि.मी असलेल्या असईच्या लढाईत कर्नल स्टिवनसनच्या तुकडीने विजय मिळवला होता.**राजू**

२. **श्रीक्षेत्र राजूर गणेश मंदिर:** जालना शहरापासून २५ किमी अंतरावर राजूर येथे हे गणेश मंदिर आहे. राजूर हे गणपतीच्या साडेतीन पीठांपैकी एक पूर्णपीठ मानले जाते .

३. **श्रीकृष्ण (तुकाई) लेणी:** भोकरदन शहराजवळ प्राचीन श्रीकृष्ण (तुकाई) लेणी आहेत, ज्यांची निर्मिती बौद्ध कालखंडात झाली असल्याचे मानले जाते. या लेणींमध्ये कोरीवकाम आणि शिल्पकला पाहायला मिळते.

४. **शनिदेव मंदिर जैनपूर कोठारा:** जैनपूर कोठारा गावातील शनिदेव मंदिर हे भव्य आणि दिव्य आहे. येथे शनिदेवाची मूर्ती आणि मंदिराची रचना भक्तांना आकर्षित करते.

५. **जुई धरण:** भोकरदन तालुक्यातील जुई धरण हे पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. पावसाळ्यात धरण ओव्हरफ्लो होत असल्याने येथे निसर्गसौंदर्य अनुभवायला मिळते.

६. **भोकरदन किल्ला:** भोकरदन शहरातील हा किल्ला ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे. सध्या या किल्ल्याच्या परिसरात तहसील कार्यालय आहे.

७. **अन्वा येथील हेमाडपंथी शिवमंदिर:** भोकरदन तालुक्यातील अन्वा गावात हे प्राचीन हेमाडपंथी शैलीतील शिवमंदिर आहे. मंदिराच्या भव्य शिल्पकलेमुळे त्याचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित होते. तथापि, हे ठिकाण तुलनेने कमी प्रसिद्ध आहे.

८. **जाळीचादेव:** जाळीचा देव हे महानुभाव पंथामधील भाविकांसाठी अत्यंत महत्वाचे धार्मीक ठिकाण आहे. या धार्मीक ठिकाणी श्री चक्रधर स्वामी यांचे काही काळ वास्तव्य होते.

**जाफ्राबाद तालुक्यातील काही प्रसिद्ध धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळे :**

१. **जाफ्राबाद :** जाफ्राबाद हे ठिकान खेळणा आणि पुर्णा नदीच्या संगमावर वसलेले आहे. पुर्वी या ठिकाणाला मजबुत दगडी भिंतीची तटबंधी होती, मात्र काळाच्या ओघात त्याची वाताहत झाली आह. तथापी एक लहानशी गढी उत्तम स्थितीत आहे. या ठिकाणाचे नाव जाफ्राबादचा संस्थापक जफर खान याच्या नावावरुन पडले आहे. मुगल बादशाहा ओरंगजेब याने इतर ११५ गावांसोबत या ठिकाणाची जहागीरी जफर खानला सोपवीली होती. जाफ्राबाद मध्ये एकुन सात मशीदी आणि मंदीरे उभारण्यात आलेली होती.

२. **खासगाव :** हे विकसनशील गाव आहे, जे जाफ्राबादपासून ९ किमी अंतरावर आहे. येथे वृक्ष लागवड, स्वच्छता अभियान, तसेच तंत्रज्ञानाच्या विविध योजना व उपक्रम राबवले जातात.

**बदनापूर तालुक्यातील काही प्रसिद्ध धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळे :**

१. **रेणुका माता देवी मंदिर सोमठाणा:** बदनापूर तालुक्यातील सोमठाणा गावात रेणुका माता देवीचे प्राचीन मंदिर आहे. हे मंदिर मराठवाड्यातील एक महत्त्वाचे श्रद्धास्थान मानले जाते. नवरात्रोत्सवाच्या काळात येथे मोठी यात्रा भरते, ज्यामध्ये अनेक भक्त सहभागी होतात. सोमठाणा गावाजवळच दुधना नदीवर सोमठाणा धरण आहे. हे धरण निसर्गसौंदर्याने परिपूर्ण असून पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे.

२. **भगवान बाबा मंदिर अकोला:** दुधना नदीच्या काठावर वसलेल्या अकोला गावात भगवान बाबांचे भव्य मंदिर आहे. हे मंदिर भक्तांसाठी श्रद्धेचे स्थान आहे.

३. **स्वामी विवेकानंद आश्रम किन्होला :** स्वामी विवेकानंद आश्रमाचे ध्यान केंद्र,जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे.

**मंठा तालुक्यातील काही प्रसिद्ध धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळे :**

१. **हेलस गाव:** मंठा तालुक्यातील हे गाव शिल्पकलेचे प्रणेते हेमाद्रीपंत यांचे जन्मस्थान म्हणून ओळखले जाते. गावाच्या सांस्कृतिक वारशामुळे त्याचे महत्त्व आहे, परंतु पर्यटनाच्या दृष्टीने हे ठिकाण दुर्लक्षित आहे.

२. **श्री जगदंबा देवी मंदिर मंठा:** मंठा शहराच्या उत्तरेस सुमारे २ किमी अंतरावर उंच टेकडीवर हे मंदिर स्थित आहे. हे मंदिर सुमारे ३०० वर्षांपूर्वीचे आहे आणि विशेषतः मंगळवारी भाविक येथे दर्शनासाठी येतात. नवरात्रोत्सव आणि चैत्र पौर्णिमेच्या निमित्ताने येथे मोठी यात्रा भरते. मंठा शहराच्या उत्तरेस एका छोट्या टेकडीवर हे मंदिर स्थित आहे. देवी रेणुका हिला "शहराची देवी" म्हणून ओळखले जाते. शुक्रवारी येथे विशेष पूजा आणि कार्यक्रम आयोजित केले जातात.

**परतूर तालुक्यातील काही प्रसिद्ध धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळे :**

१. **नृसिंह मंदिर परतूर:** परतूर शहराचे प्राचीन नाव प्रल्हादपूर होते,येथे नृसिंह मंदिर आहे. मंदिराजवळ करक्षेत्र कुंड आहे, ज्यामुळे या स्थळाचे धार्मिक महत्त्व अधोरेखित होते.
२. **दुधना नदी:** परतूर शहर दुधना नदीच्या काठी वसलेले आहे. नदीकाठचा परिसर निसर्गप्रेमी आणि पर्यटकांसाठी आकर्षक आहे.
३. **श्री हनुमान मंदिर परतूर:** परतूर शहरात श्री हनुमानाचे एक प्राचीन मंदिर आहे, जे भक्तांसाठी श्रद्धेचे स्थान आहे. हनुमान जयंतीच्या दिवशी येथे विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात.
४. **श्रीराम मंदिर परतूर:** शहराच्या मध्यभागी श्रीरामाचे मंदिर आहे, जे रामनवमीच्या उत्सवासाठी प्रसिद्ध आहे. या दिवशी भक्त मोठ्या संख्येने येथे उपस्थित राहतात.

**साईबाबा मंदिर :** परतूर शहरातील साईबाबा यात्रा ही गेल्या ६४ वर्षांपासूनची परंपरा आहे. कोरोना महामारीमुळे दोन वर्षांच्या खंडानंतर, २०२३ मध्ये ही यात्रा उत्साहात साजरी करण्यात आली. यात्रेदरम्यान, साईबाबा मंदिरासमोरील वटवृक्षाजवळ भक्तांची गर्दी होते. भाविक मंदिर परिसरात बसून साईबाबांच्या दर्शनाचा लाभ घेतात.

**तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी महत्त्वाच्या सुविधा :**

**तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी खालील प्रमाणे महत्त्वाचे सुविधा असाव्यात**

१. **धार्मिक आणि सांस्कृतिक सुविधा** : अनेक तीर्थक्षेत्र व पर्यटन ठिकाणी मोठ्या संख्येने भाविक येतात, म्हणून मंदिर,धर्मस्थळाच्या आवारात प्रशस्त जागा असावी. धार्मिक ग्रंथालय आणि चित्र प्रदर्शन असावेत. यात्रेकरूंना इतिहास आणि परंपरांचा परिचय देण्यासाठी माहितीपट आणि प्रदर्शन केंद्र महत्वाची आहेत.धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कीर्तन व प्रवचन यासाठी सभागृह असावेत. प्रार्थना आणि पूजेच्या सुविधा
२. **रस्ते व वाहतूक:** तीर्थक्षेत्राकडे जाण्यासाठी चांगले रस्ते, उड्डाण पूल आणि सार्वजनिक वाहतूक सुविधा जसे की, बस, रिक्षा, ई-वाहने,पार्किंग सुविधा, भाविकांच्या सुरक्षेसाठी CCTV, आपत्कालीन मदत केंद्रे, आणि पोलिस चौक्या इत्यादीची गरज आहे.
३. **निवास आणि भोजन व्यवस्था :** भाविकांसाठी परवडणाऱ्या दरात धर्मशाळा आणि निवासगृहे,हॉटेल्स आणि भोजनालये, सात्त्विक आणि शुद्ध अन्न,शुद्ध पिण्याचे पाणी व्यवस्था आणि वॉटर प्युरिफिकेशन प्लांट, सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि स्नानगृहे व सुव्यवस्थित असावीत.
४. **कचरा व्यवस्थापन व आरोग्य सुविधा :** तीर्थक्षेत्र तसेच पर्यटन ठिकाणी प्लास्टिकमुक्त, कचराकुंडी, पुनर्वापर व्यवस्था,हिरवळ आणि उद्याने, पर्यावरणस्नेही झाडे, बगीचे आणि हरित पट्टे असावेत.आपत्कालीन परिस्थितीसाठी प्राथमिक आरोग्य सेवा केंद्र आणि रुग्णवाहिका सेवा, औषध दुकाने आवश्यक उपलब्ध असावीत.
५. **डिजिटल आणि माहिती तंत्रज्ञान सुविधा** भाविकांना माहिती मिळण्यासाठी चांगले इंटरनेट कनेक्शन,माहिती केंद्र आणि हेल्पडेस्क, मार्गदर्शनासाठी माहिती केंद्र, दर्शन, निवास, भोजन इत्यादी गोष्टींसाठी ऑनलाईन सेवा
६. **पर्यटन आणि आर्थिक विकास :** स्थानिक व्यवसायांना चालना देण्यासाठी हस्तकला, धार्मिक वस्तू, आणि प्रसाद विक्री केंद्रे.गाईड्स आणि माहिती फलक, रोपवे, बॅटरी ऑपरेटेड वाहने. मोठ्या तीर्थक्षेत्रांमध्ये चालण्याचा त्रास टाळण्यासाठी रोपवे आणि इको-फ्रेंडली वाहने असावीत.दिव्यांग व वृद्ध भाविकांसाठी व्हीलचेअर आणि गाईड सुविधा आणि रॅम्पची व्यवस्था असावी.

**तीर्थक्षेत्रात विविध प्रकारचे रोजगार आणि व्यवसायाच्या संधी निर्माण होतात, काही प्रमुख रोजगार संधी पुढीलप्रमाणे आहेत:**

पर्यटन हे केवळ फिरण्यासाठी नसून, रोजगार आणि अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने एक मोठा उद्योग आहे. योग्य कौशल्ये आणि प्रशिक्षण घेतल्यास यात चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

**ग्रामीण भागातील पर्यटन व्यवसाय संधी :** ग्रामीण पर्यटन (Rural Tourism) हा भारतातील वेगाने वाढणारा उद्योग आहे. शहरातील लोक निसर्गरम्य ठिकाणी शांततेचा अनुभव घेण्यासाठी आणि ग्रामीण संस्कृती समजून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शहरी लोक ग्रामीण भागात जात आहेत. त्यामुळे, ग्रामीण भागातील लोकांसाठी पर्यटनाच्या विविध संधी उपलब्ध होत आहेत. यामध्ये

१. **कृषी पर्यटन (Agri Tourism) व्यवसाय संधी:**

कृषी पर्यटन केंद्र सुरू करणे,पर्यटकांना शेतीतील विविध उपक्रमांचा अनुभव देता येतो. तसेच सेंद्रिय शेती पर्यटन (Organic Farming Tourism) सेंद्रिय शेती पाहण्यासाठी आणि अनुभवण्यासाठी शेतकरी आपल्या शेतात पर्यटकांना बोलावू शकतात. शेतीशी संबंधित कार्यशाळा आयोजित करून पारंपरिक पद्धतीने नांगरणी, रोप लागवड, कापणी याचा अनुभव देण्यासाठी कृषी पर्यटन केंद्र इत्यादी रोजगार निर्माण होऊ शकतात.

२. **सांस्कृतिक आणि पारंपरिक पर्यटन (Cultural Tourism) व्यवसाय संधी :**

ग्रामीण मेळावे आणि उत्सवांचे आयोजन करून जत्रा, बैलगाडी शर्यत, लावणी आणि तमाशा यांसारखे पारंपरिक कार्यक्रम, ग्रामीण हस्तकला आणि कला पर्यटन, वारली चित्रकला, चर्मकला, हातमाग वस्त्रनिर्मिती यांसाठी कार्यशाळा, पारंपरिक खाद्य पर्यटन, घरगुती आणि स्थानिक पदार्थ पर्यटकांना अनुभवायला मिळावेत.

३. **इको-टूरिजम आणि जंगल सफारी (Eco-Tourism & Jungle Safari) व्यवसाय संधी:**

गावाजवळील डोंगर, धरणे आणि जंगल सफारी आयोजित करणे,बांबू हॉटेल्स किंवा मड हाऊसेस (Mud Houses) उभारणे, ट्रेकिंग आणि साहसी कॅम्पिंग (Adventure Camping) आयोजित करणे.

४. **धार्मिक आणि अध्यात्मिक पर्यटन (Religious & Spiritual Tourism) व्यवसाय संधी:**

मंदिर आणि धार्मिक स्थळांभोवती गाईड सेवा उपलब्ध करणे, सत्संग, योग आणि ध्यान केंद्र सुरू करणे. हस्तकला आणि धार्मिक वस्तूंची विक्री करणे. धार्मिक वस्तू विक्रेते – देवाच्या मूर्ती, चंदन, रुद्राक्ष, तुळशीमाळ यांसारख्या वस्तूंची विक्री करणारे दुकानदार,हस्तकला आणि स्मृतिचिन्ह विक्रेते – भाविकांसाठी देवतांच्या मूर्ती, तसबिरी, हाताने बनवलेल्या वस्तू विकणारे व्यावसायिक.

५. **होमस्टे आणि गेस्ट हाऊस (Rural Homestay & Guest House) व्यवसाय संधी:**

गावात पर्यटकांसाठी होमस्टे सुविधा सुरू करणे, स्थानिक शेतकरी आणि कुटुंबांनी आपली घरे पर्यटकांसाठी खुली करून ग्रामीण जीवनशैलीचा अनुभव देण्यासाठी विशेष पॅकेजेस तयार करणे. स्वच्छता, राहण्याची उत्तम सोय आणि स्थानिक अन्न पुरवठा याकडे लक्ष वेधण्यासाठी फेसबुक, इंस्टाग्राम, यूट्यूबवर आपल्या व्यवसायाचे प्रमोशन करून लाभ घेता येईल.पर्यटकांसाठी विशेष बैलगाडी सफर, गावफेरी, स्थानिक खेळ यांचा समावेश करावा लागेल. ग्रामीण पर्यटन हि एक व्यवसाय संधी आहे ती ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देऊ शकतो. योग्य नियोजन, स्थानिक संसाधनांचा योग्य वापर आणि उत्तम व्यवस्थापन केल्यास ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगार संधी निर्माण करता येतात.

**धार्मिक आणि पूजासंबंधित रोजगार संधी :**

मंदिरात पूजा करीता भक्तांसाठी पूजेच्या वस्तू फुले, अगरबत्ती, प्रसाद विकणारे दुकानदार.धार्मिक मार्गदर्शक भाविकांना मंदिराचा इतिहास, परंपरा आणि तीर्थस्थानाची माहिती देणारे स्थानिक गाईड,कीर्तनकार, भजन मंडळे धार्मिक कार्यक्रमांमध्ये कीर्तन, प्रवचन करणारे कलाकार,धार्मिक ग्रंथांची विक्री करणारे व्यावसायिक इत्यादी रोजगार निर्माण होऊ शकतात.

**पर्यटन आणि वाहतूक क्षेत्रातील रोजगार संधी :**

हॉटेल आणि लॉज व्यवस्थापन,धर्मशाळा, विश्रांतीगृहे, हॉटेल्समध्ये व्यवस्थापक, कर्मचारी, स्वच्छता कामगार,वाहतूक सेवा (टॅक्सी, ऑटो, बैलगाडी, रोपवे ऑपरेटर),यात्रेकरूंना मंदिर किंवा आसपासच्या ठिकाणी नेणारे वाहनचालक,पर्यटक गाईड आणि स्थानिक भाषा अनुवादक – विविध भाषांतील पर्यटकांसाठी माहिती देणारे गाईड इत्यादी रोजगार निर्माण होऊ शकतात.

**खाद्यपदार्थ आणि भोजन व्यवस्था क्षेत्रातील रोजगार संधी :**

प्रसाद व अन्नछत्र व्यवस्थापक, मंदिरात किंवा धर्मशाळेत भाविकांसाठी अन्नाची सोय करणारे कर्मचारी, हॉटेल आणि भोजनालयांचे कर्मचारी,स्वयंपाकी, वेटर, व्यवस्थापक, सफाई कर्मचारी तसेच स्थानिक पदार्थ विक्रेते पिठले-भाकरी, साबुदाणा खिचडी, पोहे यासारखे पदार्थ विकणारे छोटे दुकानदार इत्यादी रोजगार निर्माण होऊ शकतात.

**वर्तमान स्थितीत अध्यात्माचे महत्त्व :**

आजच्या तणावग्रस्त आणि वेगवान जीवनशैलीमध्ये अध्यात्म अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आणि भौतिक सुखसोयींमुळे जीवन सोपे झाले असले तरी मानसिक आणि भावनिक स्थैर्य राखणे अधिक कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत अध्यात्म जीवनाला दिशा आणि शांती देण्याचे काम करते. मानसिक आणि भावनिक स्थैर्य,तणाव, नैराश्य आणि चिंता यावर मात करण्यासाठी ध्यान, योग, आणि प्रार्थना फायदेशीर ठरतात.आत्मचिंतनामुळे मन शांत राहते आणि नकारात्मक विचारांवर नियंत्रण ठेवता येते. नातेसंबंध आणि सामाजिक समतोल राखण्यास मदत होते,अध्यात्म आपल्याला सहिष्णुता, प्रेम, आणि क्षमाशीलता शिकवते, ज्यामुळे नातेसंबंध अधिक सुदृढ होतात.अहंकार आणि स्वार्थ कमी करून सहकार्याची भावना वाढवते.नैतिक मूल्ये आणि जीवनशैलीमध्ये प्रामाणिकपणा, सहानुभूती, आणि सेवा यासारखी नैतिक मूल्ये वाढवते.लोभ, द्वेष, आणि मोह यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते.शारीरिक आरोग्य,योगसाधना आणि ध्यान यामुळे शरीर निरोगी राहते.सकारात्मक विचारसरणीमुळे रक्तदाब, मधुमेह, आणि हृदयरोग यासारख्या आजारांवर नियंत्रण ठेवता येते. वर्तमान परिस्थितीत अध्यात्म हा केवळ धर्माशी संबंधित विषय न राहता मानसिक, सामाजिक आणि शारीरिक स्वास्थ्यासाठी आवश्यक घटक बनला आहे. अध्यात्मिक विचारसरणी

आत्मविश्वास, संयम आणि सकारात्मक दृष्टीकोन वाढवते, जे आजच्या जगात अत्यंत महत्त्वाचे आहेत.

**निष्कर्ष (Conclusion) :**

ग्रामीण पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्था आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळते. स्थानिक उद्योग, हस्तकला आणि खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन मिळते. लहान गावे आणि दुर्गम भाग पर्यटकांच्या माध्यमातून प्रसिद्ध होतात. स्थानिक संसाधनांचा शाश्वत वापर करण्याची जाणीव होते. इको-टुरिझम आणि निसर्ग पर्यटनामुळे लोकांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीबद्दल जागृती होते. पर्यटनामुळे समाजातील गुन्हेगारी कमी होण्यास मदत होते, कारण रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. व्यसन, गरिबी आणि स्थलांतर यांसारख्या समस्यांवर उपाय मिळतो. लोकांमध्ये शिक्षण आणि आरोग्यासंबंधी जागरूकता वाढते.

सामाजिक दृष्टिकोनातून पर्यटन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे आहे. हे केवळ लोकांना आनंद देत नाही तर सामाजिक समरसता, आर्थिक प्रगती आणि सांस्कृतिक जतनालाही चालना देते. त्यामुळे जबाबदारीने आणि शाश्वत पर्यटनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. पर्यटन हा केवळ विरंगुळ्याचा किंवा आर्थिक उपक्रम नसून, तो विविध संस्कृतींना एकत्र आणणारा महत्त्वाचा दुवा आहे. पर्यटनामुळे लोक वेगवेगळ्या परंपरा, कला, भाषा आणि जीवनशैली समजून घेतात, ज्यामुळे सांस्कृतिक जतन आणि संवर्धनाला चालना मिळते.

पर्यटन व्यवसाय हा सध्याच्या काळात खूप फायदेशीर ठरू शकतो, विशेषतः योग्य नियोजन आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर केल्यास. वाढती मागणी, प्रवाशांचे बदलते कल आणि सरकारचा पाठिंबा यामुळे या व्यवसायात मोठी संधी आहे. मात्र, नवनवीन ट्रेंड आणि ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन व्यवसाय करणे महत्त्वाचे आहे. पर्यटन स्थळे आणि तीर्थक्षेत्रांचा विकास हा केवळ आर्थिक फायद्यासाठी नसून, तो सांस्कृतिक जतन, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. जर योग्य नियोजन आणि जबाबदारीने पर्यटन विकास केला गेला, तर तो स्थानिक आणि जागतिक स्तरावर मोठा सकारात्मक परिणाम करू शकतो.

**शिफारसी (Recommendation) :**

१. पर्यटन स्थळांवर प्लास्टिकमुक्त परिसर आणि स्वच्छता मोहीम राबवणे. जैवविविधता आणि निसर्गसंपत्तीचे संवर्धन करून पर्यावरणस्नेही पर्यटनाला चालना देणे. इको-टुरिझम आणि ग्रामीण पर्यटनाला प्रोत्साहन देणे, जेणेकरून स्थानिक लोकांना रोजगार मिळेल.
२. चांगल्या रस्त्यांची सोय, रहदारी नियंत्रण, सुरक्षितता व्यवस्था आणि सार्वजनिक वाहतूक सुधारणे.स्वच्छ आणि दर्जेदार निवास सुविधा उभारणे. स्वच्छ पाणी, आरोग्य सुविधा आणि स्वच्छतागृह उपलब्ध करून देणे.
३. तीर्थक्षेत्र आणि पर्यटन स्थळांमध्ये सामाजिक समरसता वाढवणे, विविध धर्मीय आणि सांस्कृतिक गटांमध्ये परस्पर समजूतदारपणा वाढवणे,जागतिक पर्यटकांसाठी बहुभाषिक सेवा आणि माहितीपर साहित्य उपलब्ध करणे,धार्मिक आणि सांस्कृतिक सहिष्णुता वाढवण्यासाठी विशेष कार्यक्रम राबवणे.
४. पर्यटनाचा फायदा स्थानिक लोकांपर्यंत पोहोचेल यासाठी धोरणे राबवणे, प्रशिक्षित गाईड्स आणि स्थानिक सुरक्षारक्षकांची नेमणूक करणे, स्थानिक हस्तकला, व्यवसाय, शेती आणि खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन देणे,पर्यटकांसाठी गाईड, वाहन चालक, हॉटेल कर्मचारी यांसाठी रोजगार संधी निर्माण करणे.

**संदर्भ (Reference) :**


१. आपला जालना जिल्हा : डॉ.भगवान काळे ,साकेत प्रकाशन ,जालना
२. जालना जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन : जिल्हाधिकारी कार्यालय जालना-२०२२
३. डॉ. विठ्ठल घारापुरे: पर्यावरण भूगोल. पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर
४. डॉ.विठ्ठल घारापुरे : मानवी भूगोल. पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर
५. कृषी भूगोल: प्रा . दीपक उद्धव गुरवप्रका, निराली प्रकाशन-नोव्हेंबर 2019
६. महाराष्ट्राचा भूगोल – प्रा. के. ए खतीब, के सागर पब्लिकेशन पुणे, तृतीय आवृत्ती २०१९. https//Ma
७. harashtra.gov.in
८. https://jalna.gov.in/
९. https://www.census2011.co.in
१०. https://traveltriangle.com

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No.15(A)** **Jan-Feb 2025**

# देवगिरीचा किल्याचा पर्यटनाच्या दृष्टिकोनातून भौगोलिक अभ्यास

**Dr. Shaista Yakub Shaikh**
Assistant Professor, Department of Geography
Chistiya Arts, Science & Commerce Collage, Khuldabad
Tq- Khuldabad, Dist-Aurangabad (Maharashtra)
**Corresponding Author: Dr. Shaista Yakub Shaikh**
**Email:** shaikhshaista906@gmail.com

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रात अनेक डोंगरी, भुईकोट व सागरी किल्ले आहेत. त्यातच डोंगरी किल्ले अधिक आणि भक्कम. देवगिरीचा किल्ला असा आहे की डोंगरी आणि भुईकोट यांचा मिलाफ झालेला. अतिशय सुंदर, देखणा, अजिंक्य आणि भक्कम असलेला व पर्यटकांना आकर्षित करून घेणारा किल्ला म्हणजे किल्ले देवगिरी! या देवगिरीचा इतिहास जाणून घ्यायला कोणाला बरे आवडाणर नाही. देवगिरीचा किल्ला म्हणजे दौलताबादचा एक डोंगरच होय. या किल्ल्याचे मूळ नाव "देवगिरी" असेच आहे. काही इतिहासकारांच्या मतानुसार या बुलंद किल्ल्याची निर्मिती राष्ट्रकूट राजा श्री वल्लभ याने इ.स. आठव्या शतकात केली. या राष्ट्रकूटांच्या दुबळया सत्तेचा फायदा घेऊन कल्याणीच्या चालुक्याची ताबेदारी झुगारून यादव कुळातील पराक्रमी राजा भिल्लम यादव याने या बलाढ्य दुर्गाच्या सहाय्याने आपली स्वतंत्र सत्ता स्थापन केली. त्याचा केंद्रबिंदू होता "देवगिरी". काही इतिहासकारांच्या मते यादवांच्या काळातच हा किल्ला उदयास आल. कदाचित राष्ट्रकूटांच्या काळात अर्धवट राहिलेल्या या किल्ल्याचे पुनरुज्जीवन भिल्लम यादव या पराक्रमी राजाने केले असावे. इ.स. 1187 ते इ.स. 1318 या प्रदीर्घ काळात येथे यादवांचे राज्य होते. नाशिकजवळील सेऊण देशचा राजा पाचवा भिल्लम याने इ.स. 1187 साली हा दुर्ग निर्माण करून या दुर्गावर यादव कुळाच्या सत्तेची मुहूर्तमेढ रोवून इतिहासात यादव कुळाचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहावे असे महान कार्य केले. दौलताबादच्या या किल्ल्याला देवगिरी हे नाव कसे पडले याचा वेगवेगळा इतिहास आहे. यादवकुलीन राजे आपल्या नावापुढे देव ही उपाधी लावून घेत असत. या देवांचा अधिपत्य असलेला गिरी म्हणजे "देवगिरी" असेही म्हटले जाते; पण देवगिरी हे नाव यादवांच्या कुलापेक्षाही प्राचीन आहे. या देवगिरी नावावरूनच देव ही उपाधी यादवांनी लावली असण्याची शक्यता आहे. दौलताबद म्हणजे दौलतअआबाद खूप धनसंचयाचा साठा असलेला तो किल्ला म्हाण्जे "दौलताबाद" होय. आज या किल्ल्याला "दौलताबादचा किल्ला" या नावानेच ओळखले जाते. या दौलताबद किल्ल्याला एक वैभवशाली परंपरा आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

खुल्दाबाद व दौलताबाद परिसराला प्राचीन असा ऐतिहासीक वारसा लाभलेला आहे. या परिसराची ऐतिहासीक व्याप्ती ही खूप मोठी आहे. म्हणून प्रस्तुत संशोधन करत असतांना संशोधनासाठी पुढील उद्दिष्ट ठरविण्यात आलेली आहेत.

1. अभ्यासक्षेत्राची ऐतिहासीक पार्श्वभूमी अभ्यासणे.
2. अभ्यासक्षेत्रातील ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधन हे ऐतिहासीक दस्तऐवज, संदर्भ आणि माहितीच्या आधारे केलेले आहे. त्यासाठी ऐतिहासिक दृष्टिकोनाचा वापर करण्यात आला आहे. ऐतिहासिक संशोधन हे भूतकाळातील घडामोडींवर व पुराव्यांवर अवलंबून असते. प्राचिन साहित्य, ऐतिहासीक कागदपत्रे, पुरावे की ज्याव्दारे भूतकाळातील घटना व परिस्थितीचे विश्लेषण करणे व अर्थ स्पष्ट करणे हा संशोधनाचा प्रमुख हेतू असतो. परंपरागत व शास्त्रीय या दोन्ही पद्धतींचा वापर करुन निष्कर्ष काढण्यात आले आहेत. ऐतिहासिक संशोधन पद्धत ही निरीक्षणावर अवलंबून असून, यामध्ये संशोधक घटनांचे आणि संदर्भ साहित्यांचे निरीक्षण करतो. यामध्ये भूतकालीन विचारांच्या आधारे नवीन विचारांची मांडणी केली जाते. प्रस्तुत संशोधनात शीलालेख, विविध प्रकाशने, डायरी, आत्मचरित्र, कथा, गाथा, व्याख्याने, जुनी नाणी, शस्त्रे, बांधकामवाडा, जुन्या इमारती (वास्तू) इत्यादींचा वापर साधन किंवा स्त्रोत म्हणून केला आहे.

**देवगिरी किल्ल्याची वैशिष्ट्ये :**

देवगिरी किल्ल्यात प्रवेश करून अनेक राजांनी इतिहास रचला. जनार्दन पंतसारख्या संतांचा याच किल्ल्याचा सहवास लाभला. संत ज्ञनेश्वर यांच्या पदस्पर्शाने हा किल्ला पुनित झाला. ग्रंथकार हेमाद्री, गोपदेव, कवी नरेंद्र यांचेही या किल्ल्यावर वास्तव्य होते. त्यातील हेमाद्रीने हेमाडपंथी मंदिरांचा पाया रचला होता. आजही महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हेमाडपंथी मंदिरे अगदी मजबूत स्थितीत आहेत.

दिल्लीचा सुलतान महंमद तुघलक याने दिल्लीचा गादी काही काळ देवगिरीला आणली होती. या ऐश्वर्यसंपन्न किल्ल्याला "दौलताबाद" असे नाव त्यानेच दिले होते. दक्षिण भारतातील महत्त्वाचे सत्ताकेंद्र असलेल्या या किल्ल्यावर अनेक राजवटींनी ऐश्वर्य भोगले.

हा किल्ला दौलताबादच्या डोंगरमाथ्यावर निसर्गनिर्मित असून अतिशय दुर्गम, उत्तुंग, भव्य, सुंदर आणि अभेद असा आहे. किल्ल्याचा आकार शंङ्काकृती आहे. किल्ल्याची उंची सुमारे 200 मीटर असून किल्ल्याचा निम्मा भाग सभोवार तासला आहे. या तासून गुळगुळीत केलेल्या कातीव भागावरून चढणे अतिशय मुश्किल आहे. हा किल्ला भुईकोट आणि डोंगरी अशा दोन्ही प्रकारात मोडतो. संपूर्ण किल्ल्याच्या भोवताली कोरडा खंदक आहे. शत्रूला सहजासहजी किल्ल्यावर प्रवेश करता येऊ नये म्हणून हा खंदक निर्माण केला आहे. त्याचबरोबर बाले किल्ल्याच्या सभोवार पाण्याचा खंदक आहे. कोरड्या खंदकातून शत् डिग्री आत आलाच तर पाण्याच्या खंदकात त्याला अडवता येते.

दौलताबादच्या किल्ल्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तीन मजबूत तटबंद्या. तटबंदीला येथे कोट म्हटले आहे. संपूर्ण गावाभोवती एक तट आहे. त्याला अंबरकोट म्हणतात. या डोंगरी दुर्गावर जाण्यासाठी दोन तटबंद्या पार कराव्या लागतात. किल्ल्यात प्रवेश करताच महाकोट तटबंदी लागते. महाकोटास आठ दरवाजे आहेत. त्यातील एकही दरवाजा समोरासमोर नाही. त्या काळी हत्तीला दा डिग्री पाजून दरवाजा तोडायला लावत पण हे दरवाजे एका सरळ रेषेत नसल्यामुळे हत्तीला पळवत नेता येत नाही. किल्ला बांधताना प्रत्येक ठिकाणी वेगळी कल्पकता वापरली आहे. हेच तर किल्ल्याचे वैशिष्ट्य आहे.

किल्ल्याच्या आतील तटबंदीला कालाकोटची तटबंदी म्हणतात. किल्ल्याचा भुईकोट भाग संपल्यानंतर बालेकिल्ल्यास आरंभ होतो. बालेकिल्ल्याच्या सभोवती खोल खंदक आहे. या अभूतपूर्व खंदकाला पाणी आहे. पूर्वी या खंदकात मागरी सोडलेल्या असायच्या. शत् डिग्री बालेकिल्ल्यावरून खाली पाण्यात पडला तर तो मगरीच्या तावडीतून सुटायचा नाही म्हणूनच ही खंदकाची योजना केलेली आहे. खंदक ओलांडताच बालेकिल्ल्यात प्रवेश करण्यास अंधारी मार्ग लागतो. गडावर जायचे तर बॅट-या हव्यात. अंधारातून जाणारा हा मार्ग भुलभुलैया मार्गासारखा आहे. या मार्गास अंधारी मार्ग म्हणतात. अंधारातून शत्रूला सहजासहजी गडावर येता येऊ नये म्हणूनच ही योजना आखली आहे.दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याने रामदेवराय राजाचा पराभव केला तो केवळ फितुरीमुळेच याचे प्रत्यंतर गड चढत असताना पावलोपावली आल्याशिवाय राहत नाही. या अंधारी मार्गात शत् डिग्री निश्चितच संभ्रमात पडतो. त्याला पुढचा मार्ग सापडण्यासाठी वाटाड्याचीच गरज भासते, असा हा मार्ग आहे. किल्ल्याच्या प्रत्येक बुरुजाचे वैशिष्ट्य म्हणजे बुरुजांवर मजबूत तोफा आहेत. इतक्या मोठ्या तोफा गडावर कशा नेल्या असतील? असा प्रश्न पडणे साहजिकच आहे. कदाचित गडावरच त्य तोफा बनवल्याही असतील. गड पाहिल्यानंतर, गडाची रचना पाहिल्यानंतर गड किती अजिंक्य आहे याची कल्पना पावलोपावली होती. केवळ नमकहरामांमुळेच गड शत्रूच्या ताब्यात गेल्याचे जाणवते. किल्ल्याच्या टोकावर जाण्यासाठी सरळ मार्ग आहे. घुमटाकार असलेला हा किल्ला टोकावरून संपूर्ण दिसतो.

**किल्ल्यातील महत्त्वाची स्थळे :**

किल्ल्याला मुख्य तीन तटबंद्या आहेत. त्यातील महाकोट तटबंदीला किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार आहे. हे प्रवेशद्वार आजही मजबूत आणि कणखर आहे. या महाकाय प्रवेशद्वारातून एका वेळी सहज दोन हत्ती प्रवेश करतील. या प्रवेशद्वाराल अजही लाकडी दारे आहेत. त्या दारांना मोठाले खिळे ठाकले आहेत. हे टोकदार खिळे अद्यापही सुस्थितीत आहेत हे विशेष! या महाकोटालाच दुसरा एक दरवाजा आहे. हाही सुस्थितीत असलेला दरवाजा आहे. या दरवाजाच्या दोन्ही बाजूस दगडात कोरलेले हत्ती स्पष्टपणे दिसतात. दौलताबाद परिसरात सापडलेल्या तोफा या दुस-या दरवाजच्या प्रांगणात मांडून ठेवलेल्या आहेत.

**महाकोटावरील टेहळणी बुरुज :**

महाकोटञवर असलेला टेहळणी बुरुज अतिशय मजबूत आहे. या बुरुजावरून दुरवरून आलेल्या शत्रूची चाहूल लागते. शत्रूवर मारा करताना लपून बसण्याची सोय आहे. बुरुजावरून शत्रूवर गुप्तपणे मारा करता येतो. या बुरुजावरून संपूर्ण किल्ला दिसतो. घुमटाकार असलेल्या किल्ल्याचे मनोहारी दृश्य खेचून घेण्यासाठी नकळत कॅमेरा हातात येतो. बुरुजाच्या वरच्या भागात तीन कमानी असलेला सज्जा आहे. या सज्जाचा टेहळणीसाठी आणि शत्रूवर लपून मारा करण्यासाठी उपयोग होतो.

**किल्ल्यातील विहिरी:**

प्रत्येक गडावर पिण्याच्या पाण्याची सोय आहे. त्याप्रमाणे दौलताबाद किल्ल्यावरही पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी खणल्या आहेत. विहिरींचे बांधकाम करून घेतले आहे. आजही त्या सुस्थितीत असून विशेष म्हणजे या विहिरींना बारमाही पाणी असते. त्यापैकी सरस्वती विहीर, कचेरी विहीर, शक्कर बावडी, कडा बावडी या प्रसिद्ध विहिरी आहेत. पाय-या असलेल्या विहिरींना त्याकाळी बारव किंवा बावडी म्हणत. कचेरी जवळ असलेली विहीर कचेरी बारव या नावाने ओळखली जाते. अंबरकोटच्या जवळ शक्कर बावडी आहे. तटाबाहेर कडा बावडी आहे.

**हत्ती हौद :**

दौलताबादमधील अतिभव्य हौद म्हणजे ""हत्ती हौद"" होय. हा हौद इतका भव्य आहे की त्याच्या भव्यतेमुळेच त्याला हत्ती हौद हे नाव पडले. हौदाच्या काठावर टाळी वाजविल्यास त्याचा स्पष्टपणे प्रतिध्वनी ऐकू येतो. या हौदाची लांबी 47.75 मीटर, रुंदी 46.75 व खोली 6.61 मीटर आहे.

**भारतमाता मंदिर :**

हत्ती हौदाच्या बाजूलाच घुमट असलेले एक प्रचंड व संुदर प्रवेशद्वार आहे. या प्रवेशद्वारातून आत जातच विशाल असे प्रांगण लागते. या प्रांगणाच्या समोरच अनेक स्तंभ असलेले मंदिर स्पष्टपणे दिसते.

मंदिरात प्रवेश केल्यानंतर स्तंभांच्या मधोमध भारतमातेची उभी मूर्ती दृष्टिक्षेपास पडते. मूर्ती अतिशय संुदर असून तिने हातात तलवार, नाग, सुदर्शन चक्र, त्रिशूल, शंख इत्यादी शस्त्रे-अस्त्रे घेतली आहेत. मंदिराची शिल्पकला अतिशय सुंदर आहे. स्तंभ एका सरळ रेषेत आहेत. मंदिराच्या प्रांगणात स्तंभांचे अवशेष पडलेले आहेत.

हे मंदिर यादवांच्या काळतील असावे असे मानले जाते. मुळात हे जैन मंदिर होते. दिल्लीचा सुलतान कुतुबद्दीन मुबारक खिलजी याने इ.स. 1318 मध्ये या मंदिराचे मशिदीत रूपांतर केले. इ.स. 1948 साली संस्थानांचे विलिनीकरण झाल्यानंतर येथे भारतमातेच्या मूर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली. तेव्हापासून हे मंदिर ""भारतमाता मंदिर"" म्हणून ओळखले जाते. भारतामाता मंदिराच्या प्रांणातून किल्ल्याचे निसर्गरम्य दृश्य दिसते.

**चांदमिनार :**

दौलताबाद किल्ल्याचे वैभव म्हणजे येथील ""चांद मिनार"" होय. दिल्लीच्या कुतुब मिनाराप्रमाणे शोभिवत असा हा मिनार आहे.

महाकोट ओलांडताच चांदमिनार दिसू लागतो. किल्ल्याच्या बहुतेक सर्व परिसरातून चांद मिनार दिसतो. किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या भारतमाता मंदिराच्या उजवीकडील दरवाजातून बाहेर पडताच आपण चांदमिनार जवळ येतो.

चांदमिनारची इमारत तीन मजली असून त्याची उंची 65 मीटर आहे. मिनारच्या पायाजवळील परीघ 10 मीटर आहे. मिनारवर संपूर्ण नक्षीकाम कोरलेले आहे. या मिनारात अगदी तिस-या मजल्याच्या गच्चीवर जाण्यासाठी आतून पाय-या आहेत. सुरक्षिततेच्या अभावामुळे सध्या मिनारवर जाता येत नाही. हा मिनार सुलतान अहमदशहा )बहामनी( च्या काळात बांधण्यात आला असावा व इ.स. 1447 मध्ये मिनारचे बांधकाम पूर्ण झाले असावे.

**चिनी महाल :**

चिनी महालाच्या सजावटीत व नक्षीकामात चिनी मातीच्या टाईल्सचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला होता म्हणूनच या महालाचे नाव "चिनी महाल" असे पडले.

या महालाचा काही काळ कारागृहासाठी उपयोग केला गेला होता. मराठ्यांचे छत्रपती संभाजी महाराज यांचा वध केल्यानंतर त्यांच्या पत्नी महाराणी येसूबाई व पुत्र शाहू यांना औरंगजेबने याच चिनी महालात बरीच वर्षे डांबून ठेवले होते. तसेच गोवळकोंड्याचा शेवटचा कुतुबशहा अबुल हसन, तानाशहा, विजापूरच्या आदिलशाहीचा शेवटचा बादशहा सिकंदर यांनाही याच महालात कैद करून ठेवले होते.

**मेंढा तोफ :**

अतिशय मजबूत आणि सुस्थितीत असलेली ही तोफ "मेंढा तोफ" या नावाने ओळखली जाते. तोफेच्या एका बाजूस मेंढ्याच्या आकाराचे तोंड आहे. त्यामुळेच या तोफेला मेंढा तोफ असे नाव पडले.

चिनी महालाच्या डावीकडे एका बुरुजावर ही मेंढा तोफ आहे. या तोफेवर ""तोफ किला शिकन"" असे लिहिलेले आहे. याचा अर्थ किल्ला उद्ध्वस्त करणारी तोफ असा आहे. या तोफेचे वैशिष्ट्य म्हणजे ही तोफ सर्व बाजूला वळवता येते.

तिची लांबी सात मीटर असून ती अनेक मिश्र धातूंनी बनवलेली असल्यामुळे तिला अद्यापही गंज चढलेला नाही. ही तोफ औरंगजेब बादशहाच्या काळातील असण्याची शक्यता आहे. कारा या तोफेवर औरंगजेब बादशहाचे नाव आहे. तसेच कारागीर महंमद अरब याचेही नाव कोरलेले आहे. तोफेच्या तोंडावर पवित्र कुराणातील एक वचन कोरलेले आहे.

**निजामशाही राजवाडा :**

दौलताबादमधील केवळ अवशेष रूपात उभा असलेला महाल म्हणजे "निजामशाही राजवाडा होय." मेंढा तोफे जवळच डावीकडे काही अंतरावर निजामशाही राजवाड्याचे अवशेष आहेत. या राजवाड्यास दोन दरवाजे आहेत. अतिशय कलाकुसर आणि नक्षीकाम असलेला हा राजवाडा म्हणजे स्थापत्यकलेचा व सौंदर्यकलेचा उत्तम नमुना होय. विविध कमानी आणि रंगीत नक्षीकाम आजही सुस्थितीत पाहायला मिळते.

**किल्ला संरक्षक खंदके :**

दौलताबाद किल्ल्याला लाभलेले वेगळे वैशिष्ट्य म्हणजे या किल्ल्याला असलेली खंदके. एक कोरडे खंदक आणि दुसरे पाण्याचे खंदक. केवळ फंदफितुरीमुळेच ही खंदके गनिम पार क डिग्री शकेल, अशी ही मजबूत आणि धोकादायक खंदके आहेत. बालेकिल्ल्याला वळसा घातलेले खंदक पाण्याचे खंदक आहे. बालेकिल्ल्यावर जाण्यासाठी हे खंदक पार करावे लागते. खंदकात पाणी सोडण्याची व कमी करण्याची सोय आहे. शत्रूची चाहूल लाताच पूर्वीच जुना पूल आहे त्या पुलाच्या वर पाणी सोडले जाई. त्यामुळे पूल कोठे आहे हे कळत नसे. आता पर्यटकांच्या सोईसाठी 1952 साली नवीन लोखंडी पूल बांधला आहे. या पुलावरूनच बालेकिल्ला पाहायला जाता येते.

**अंधारी व भुलभुलैय्या मार्ग :**

महाराष्ट्रातील कोणत्याही किल्ल्याच्या बालेकिल्ल्यावर प्रवेश करण्यासाठी इतका बिकट आणि जादूमय मार्ग नसेल, असा मार्ग किल्ले देवगिरीवर आहे. त्यालाच "अंधारी मार्ग" असे म्हणतात.

खंदकावरील लोखंडी पूल ओलांडल्यानंतर आपण बालेकिल्ल्याच्या तोंडावर येऊन पोहोचतो. हा मार्ग डोंगर पोखरून केलेला आहे. अंधारी मागचे प्रवेशद्वार अतिशय कोरीवकाम केलेले असून प्रवेशद्वारातून आत जाताच अंधारी मार्ग सु डिग्री होतो. वळणावळणांचा हा मार्ग आहे. हा मार्ग ओलांडण्यासाठी पूर्वी मशालींचा वापर केला जाई. आता काही पर्यटक बॅटरी घेऊन जातात. हा मार्ग म्हणजे

वळणावळणांचा आणि फसवा आहे. म्हणूनच या मार्गाला भुलभुलैय्या मार्ग असेही म्हणतात.

**बारादरी :**

दौलताबाद किल्ल्यावरील उत्कृष्ट कलेचा नमुना म्हणजे "बारादरी" इमारत होय. संपूर्ण किल्ल्यात चांगल्या अवस्थेत असलेल्या इमारतींपैकी एक बारादरी ही एक अष्टकोनी इमारत असून मुघल सम्राट शाहजहान याच्या काळात बांधलेली आहे. या इमारतीला एकुण बारा कमानी आहेत. म्हणूनच दिला बारादरी असे म्हणतात. अतिशय भक्कम स्थितीत असलेली एकमेव इमारत! या बारादरी इमारतीजवळून संपूर्ण किल्ला न्याहाळता येतो. या इमारतीजवळच मोती टाकी आहे. या टाकीतील पाणी आजही पिण्यास वापरतात. किल्ल्यावर खूप उंचावर आल्यामुळे थंड हवेची झुळूक मनाला उत्साहित करते.

**श्री. जर्नादनस्वामी यांची ध्यानगुंफा :**

संत श्री एकनाथ महाराज यांचे गु डिग्री श्री जनार्दन स्वामी यांनी या किल्ल्यावर काही काळ वास्तव्य करून हे स्थळ पावन केले आहे. किल्ल्याच्या अगदी उंचावरील स्थळ म्हणजे श्री जर्नादनस्वामींची "ध्यानगुंफा" होय. संत जनार्दन हे चाळीसगावचे देशपांडे. निजामशाहीच्या काळात दौलताबादचे किल्लेदार होते. त्यांनी याच गडावर खूप ध्यान साधना केली आणि संतश्रेष्ठ झाले. येथे ज्या ठिकाणी )गुंफेत( स्वामी ध्यानसाधना करीत होते, तेथेच श्री दत्तांनी संत जनार्दन स्वामींना प्रकट होऊन दर्शन दिले असा सर्वत्र बोलबाला आहे. या ठिकाणी श्री दत्तात्रेय यांच्या व श्री जर्नादन स्वामी यांच्या पादुका आहेत. मार्गशीर्ष वद्य एकादशीला येथे मुख्य यात्रा भरते. लोक श्री दत्तात्रेय व श्री जनार्दन स्वामी यांच्या पादुकांचे दर्शन घेतात.

**कालापहाट तोफ व दुर्गा तोफ :**

गडावर अगदी उंचावर असलेल्या या दोन तोफा काळ्या कुळकुळीत असून मिश्रधातू वापरून बनवलेल्या आहेत. आजही त्या कित्येक वर्षांचा ऊन-पाऊस सहन करून अभंग अवस्थेत आहेत. ना गंज ना झीज.

**दौलताबाद मधील शाही हमाम :**

किल्ल्याच्या बाहेर असलेली महाकोट आणि अंबर कोट यांच्यामध्ये असलेली ही इमारत औरंगाबद-खुल्दाबाद राष्ट्रीय महामार्गाच्या उजवीकडे आहे. या इमारतीचे वैशिष्ट्य म्हणजे हिला कोठेही खिडक्या नाहीत. प्रकाश येण्यासाठी छतावर झरोक्याची सोय आहे. त्या काळी येथे थंड व गरम पाण्याची सोय होती. किल्ल्यातील अशा प्रकारची सर्व स्नानगृहे आता नष्ट झाली आहे. शाही हमामातील स्नानगृह बघण्यासारखे आहे.

शाही हमाम

**संदर्भ :-**

1. Gazetter of the Nizami diominons Aurangabad District print at The times of India press 1884 Reprint Govt. of maha. pub. 2006 mumbai P.n. 830
2. Gazetter of the Nizami diominons Aurangabad District Reprint Govt. of Maharashtra Press, 2006 mumbai P.n. 827
3. अल हाज मोहम्मद अब्दुल हाई - गुलीस्ताने खुल्दाबाद, प्रकाशक सवेरा ऑफ सेट, 2011 प्रथम आवृत्ती, पृ. 39
4. जोशी, महादेवशास्त्री (संपा.), होडारकर, पद्मजा (सह. संपा.), भारतीय संस्कृतिकोश, सिंधी लोक ते ज्ञानेश्वरी, खंड दहावा, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे पृ.क्र. 345
5. पाटणकर, पांडूरंग, सहली एक दिवसाच्या परिसरात औरंगाबादच्या, स्नेहल प्रकाशन, पुणे, 2009, पृ.क्र. 25.
6. शेख, ऐजाज, तारिख-ए-खुल्दाबाद (वास्तुशिल्प आणि पर्यटन स्थळ), चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, 2012, पृ.क्र. 110
7. गुप्ते-कुरेशी, दुलारी, टुरिझम पोटेन्शियल इन औरंगाबाद विथ अजंता, एलोरा ॲण्ड दौलताबाद, भारतीय कला प्रकाशन, त्रीनगर, दिल्ली, 1999 पृ.क्र. 85.
8. ईश्वरशरण विश्वकर्मा (1986), “काशी का ऐतिहासीक भूगोल” रामानन्द विद्या भवन, नई दिल्ली, पृ. क्रं. 80-121
9. http://www.aurangabadmetro.com/karnapura_fair_Aurangabad/
10. https//en.m.wikipedia.org/wiki/shuli_bhanjan_eknath
11. https//en.m.wikipedia.org/wiki/shuli_bhanjan_eknath/

**Dr. Shaista Yakub Shaikh**

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# खुल्दाबादच्या परिसरातील प्राचीन तलाव व जल व्यवस्थापनाचा भौगोलिक अभ्यास

**Smt. Sangita Subhash Bharati**
Hon. B. J. Arts, Commerce and Science College Ale, Tal-Junnar Dist-Pune
**Corresponding Author: Smt. Sangita Subhash Bharati**
**Email:** bharati.sangita@gmail.com

**प्रस्तावना :-**

खुल्दाबाद पासून चार मैल पश्चिम उत्तरेला सुलिभंजनचा परिसर आहे. हा भाग सपाट जमिनीपासून साधारणत: 900 फूट उंचीवर आहे. प्राचीन काळात या भग्न वस्तीतील लोकांचा मुख्य व्यवसाय गुरे पालनाचा असावा. डोंगराचा उंच सुळका ते भंजन होऊन जो सपाट भू-प्रदेश निर्माण झाला. या ठिकाणी दत्ताचे धाम आहे. या भागावार पडणारे पाणी चंद्र कुंड व सुर्य कुंड यात एकत्र साठवले जाते. याचा वापर पाळीव प्राणी व लोकांना होत व आजही होत आहे. चंद्रकुंड व सूर्य कुंडाला धार्मिक महत्त्वही आहे. याचा उल्लेख पुराणात आलेला आहे. संत जनार्दन स्वामींना येथेच भगवान श्री दत्ताने मलंग वेशात दर्शन दिलेले आहे. याच ठिकणी श्री जनार्दन स्वामी व श्री एकनाथांनी तपश्चर्या केलेली आहे. येथे एक मंदिर बांधण्यात आले. गाभा-यात दत्ताची व स्वामी जनार्दन स्वामी व शिष्य एकनाथांची मूर्ती आहे. मंदिराच्या पाठीमागे जमिनीत शेती केली जाते. गुरांना सूर्य कुंडातील पाण्याचा उपयोग होतो. सूर्य कुंड हे प्राचीन काळातील लहान तलाव आहे. तलावात दगडाने बांधलेली चोरस विहीर आहे. परिसरातील पाणी यात साठवले जाते. उन्हाळ्यात सुध्दा कुंडात पानी असते. लोकांना व गुरांना पाण्याची व्यवस्था आहे. येथे प्राचीन घरोंचे काही अवशेषही पाहावयास मिळतात. येथील हवामान आल्हादायक आहे. हा परिसर जमिनीपासून किमान 1000 फूट उंच आहे. या परिसरात अनेक म्हत्वाचे प्राचीन तलाव आढळतात.

**अभ्यास क्षेत्रातील तलाव :**

मुस्लिमांच्या आगमनपूर्वी हा परिसर खाकसार, नंद्राबाद, सुलिभंजन भग्न वस्तीच्या स्वरुपात होते. या वस्तीच्या खुणा आजही पाहावयास मिळतात. हा परिसर डोंगरावर व डोंगराळ भागात असलेल्या येथे बारमाही वाहणा-या नद्या नाहीत. या वस्तीला व जनावरांना बारा महिने पाणीपुरवठा व्हावा म्हणून प्राचीन काळातील तलावांचे अस्तित्व अद्यापही आहे. सुलीभंजन व नंद्राबाद येथे शेतात खोदकाम करताना घराचा पाया पाहावयास मिळतो. नैसर्गिक आपत्तीने हा कसबा निर्मनुष्य झालेला असावा. म्हणून मध्ययुगात येथील भग्न वस्तीच्या दगडांचा वापर खुल्दाबाद, औरंगाबाद येथील वास्तूंच्या निर्मितीसाठी केलेला आहे. असा उल्लेख औरंगाबाद जिल्हा राजपत्रात केलेला आहे.

**परियों का तलाव :**

या तलावाला गंजे रवा तलाव असेही म्हणतात. या भागात मुस्लिमांच्या आगमनपूर्वी प्राचीन तलाव दगडांनी बांधलेला आहे. त्यात सूर्यकुंड, भद्रा तलाव, गंजे रवा तलाव होय. हा तलाव प्राचनी वस्ती ज्यास भद्रावंती, बुध्दवंती किंवा युनास नगरी नावाने ओळखले जात असे. या वस्तीच्या पश्चिमेला दोन डोंगरांच्या पायथ्याशी आहे. हा भाग यादव काळात देवगिरीचा एक भाग समजला जात असे. 13 व्या शतकाच्या प्रारंभी येथे येणारे प्रथम सुफी हजरत जलालालेद्दीन गंजे रवाँ यांनी परियों का तलावाजवळ आपली खानखाह निर्माण केली.

पश्चिमेला उंच डोंगर, पूर्वेला डोंगर, टेकडीच्या दरमयान तलाव. तलावात उतरण्यासाठी दगडी पाय-या, दक्षिणेला मोठ्या दगडी शिळांची पाय-यांची भिंत, उत्तरेला दर्ग्याची दगडी भिंत. ही भिंत 40 फूट उंच 300 फूट लांब आहे. या तलावाचा ओवर फ्लो सांडत नाही. पाण्याचा प्रचंड साठा तलवात होतो. तिन्ही ऋतुत तलावात पाणी असते. तलावाला पाय-या व वस्तीच्या जवळ असल्याने पूर्वी प्राचीन वस्तीतील लोक या पाण्याचा वापर पिण्यासाठी करत असता. तलावाच्या पूर्वेला व पश्चिमेला असणा-या डोंगराचे पाणी तलावात साठवले जाते. अद्यापही हा तलाव व्यवस्थित आहे. मात्र भिंतीवर व पाय-यांवर चोहो बाजून झाडे झुडपे वाढल्याने पाण्याचा निचरा जास्त होत असला तरीही तलावात 10 ते 15 फुट खोल पाणी असते. तलावाच्या तळापर्यंत पाय-या आहेत. पाय-यांचा उतार तीव्र नसल्याने गुरेसुध्दा पाण्यापर्यंत सहज जातात.

तलावांच्या दक्षिण भिंतीच्या मध्यभागी प-यांचे (अप्सरांचे) सिंहासन आहे. हिंदू-मुस्लिम समाजातील स्त्रिया परियाँ, अप्सरा (आसरा) घालवण्यासाठी स्त्रिया तलवात स्नान करुन "तबख" तिरडी घेऊन जातात. यात हिरव्या बांगड्या, हिरवी चोळी, फुले इ. वस्तू असतात. तसेच हिंदू समाजातील स्त्रियाही या ठिकाणी "आसरा" किंवा अप्सरा

बाधित स्त्रिया मुस्लिम स्त्रियाप्रमाणे विधी करुन आसरा काढतात. तिरडी व नैवेद्य पाण्यात सोडून अंघोळ करतात. ही परंपरा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. तलावाच्या बांधकामात घडीव मोठ्या शिळांचा वापर केलेला आहे. बांधकामात चुना किंवा अन्य साहित्य वापरलेले नाही.

**भद्रा तलाव :**

या तलावाचा उल्लेख औरंगाबाद जिल्हा गॅझिटियरमध्ये "दबराव तलाव" असा आहे. मात्र रौजतुला अखताबमध्ये "भद्रा तलाव" असाच आहे. हा तलवा तटबंदीच्या बाहेर उत्तर पूर्वेला भद्रा मारुती मंदिराच दक्षिणेला आहे. हा तलाव सुध्दा दगडांच्या मोठ्या शिळांचा वापर करुन बांधलेला आहे. दगडी पाय-या पाण्यापर्यंत जाण्यासाठी होत्या. हा तलाव सखल भागात आहे. पाण्याचा जास्त साठा होत नाही. मात्र साठवलेले पाणी बाराही महिने असते. मंंदिराला येणारे भाविक या तलावात स्नान करुन आपली रोगराई घालवतात व आल्यावर आलेले अमंगळ व अरिष्ट घालवतात. 20 वर्षापूर्वी तलावाचा जीर्णोध्दार श्री भद्रा मारुती ट्रस्ट तर्फे करण्याता आलेला आहे.

तलावात कुमारिका मुलीने स्नान केल्यास तिचे अरिष्ट जाऊन तिला चांगला वर मिळतो अशी श्रध्दा आहे. तलावाच्या पश्चिमेला काही अंतरावर सुफीच्या कबरी आहेत.

**खाकसार तलाव :**

खुल्दाबाद शहरापसून 4 कि.मी. अंतरावर पश्चिम-उत्तरेला सुलिभंजन डोंगराच पायथ्याशी तिन्ही दिशांनी डोंगर खो-यात हा तलाव आहे. या परिसरात अनेक तलाव आहेत. त्यातील सर्वांत मोठा तलाव खाकसारचा आहे. डोंगराचे पाणी दगडी भिंतींनी अडवलेले आहे. भिंतीची लांबी एक किलोमिटर पेक्षा जास्त आहे. प्राचीन काळातील या तलावाच्या दक्षिणेला युनास नगरीच्या भग्न वस्तीच्या खुणा आजही आढळतात. तलावाच्या वर आणखी लहान तीन तलाव आहेत. ही सर्व तलाव प्राचीन काळातील आहेत. आसफजॉही काळात या तलावाची दुरुस्ती केल्याची नोंद अभिलेखागारात आढळते. रौजा खुल्दाबाद कसब्याला याच तलावातून खापरी पाईप लाईनद्वारे पाणीपुरवठा होत असे. यात प्रामुख्याने दोन्ही दर्ग्यातील हौद, लालबाग, बाग-ए-मुनम, बिलगौर इत्यादी ठिकाणी पाणी पुरवठा होत असे. पाईपलाईन व पाण्याचे वॉल, पाण्याची समातळी साठी बांधलेले मनोरे आजही उभे आहेत. खुल्दाबाद व सुलिभंजन गावाला या तलावातून पाणीपुरवठा होतो खाकसार तलावात खूप गाळ साठल्याने उन्हाळयात पाणीपुरवठा पुरेसा होत नाही. डोंगराच्या पायथ्याशी व तलावाच्या पाण्याला लागून सूफी खकसारचा दर्गा आहे. हा परिसर उन्हाळ्यातही हिरवागार असतो. यात पांढ-या शुभ्र दर्ग्याची वास्तू सौंदर्यात आणखीच भर टाकते. पर्यटकांसाठी हे ठिकाण एक मेजवानीच आहे. हजरत सूफी खाकसार यांच्या दर्ग्यामुळे व त्यांच्या वास्तव्यामुळे या तलावाला खाकसार तलाव म्हणून संबोधले जाते.

**जामून तलाव :**

सुलिभंजन परिसरात प्राचीन वस्तीला लागून दक्षिण दिशेला परियों का तलावाकडे जाणा-या रस्त्याच्या दक्षिणेला जामून तलाव आहे. दोन्ही टेकड्यांच्या मधून जाण-या नदीवर बांध घालून पाणी अडवलेले आहे. या परिसरात शेती योग्य जमीन नसल्याने या परिसरातील जलसाठ्याचा सिंचनसाठी वापर करण्याचा प्रश्नच येत नाही. पशुपालनासाठी हा परिसर अतिशय अनुकूल आहे. जामून तलाव हे अलीकडचे नाव असावे. कारण या परिसरात जांभळांची झाडे जास्त असल्याने या तलावात जामून तलाव असे म्हणतात. तलावाच्या दक्षिणेला प्राचीन वस्तीच्या खुणा आहेत.

**खडकाली तलाव, आम तलाव:**

नंद्राबाद गावाच्या उत्तरेला 1 कि.मी. अंतरावर हा तलाव आहे. या तलावाच्या बांधावरुन पीर मुबारक कारे खाँ सूफींच्या दर्ग्याला जाण्याचा मार्ग आहे. दर्ग्यांच्या उत्तरेला खूप खोल दरी आहे. या तलावाच्या परिसरात वीटभट्या असल्याने परिसर मोहक वाटत नाही. तलावातील पाण्याचा वापर वीटभट्यांसाठी करतात. तलावाचे पाणलोट क्षेत्र नंद्राबाद गाव व परसिर आहे. मध्ययुगीन कालीन रौजतुल अख्ताब या फारसी साधनाचां वापर करुन लिहिलेल्या ग्रंथात वरील दोन्ही तलावांचा उल्लेख आहे. या परिसरात एकूण सहा तलाव आहेत आणि सर्व तलाव भग्न वस्तीच्या चोहोबाजूंनी वेढलेले आहे. जल हे वस्तीसाठी आवश्यक बाब असल्याने वस्तीला व गुरांना तिन्ही ऋतुत पाणीपुरवठा व्हावा या दृष्टीने उपरोक्त तलावांची निर्मिती झाली आहे.

**मध्ययुगीन तलाव:**

सुफी हजरत मौलाना मुन्तजीबोद्दीन यांनी 14 व्या शतकात प्रारंभी सध्या सुफी दर्गा आहे तेथे अध्यात्मिक ठाणे स्थापन केले. हळूहळू येथे वस्ती वाढू लागली. त्यांचया मृत्यूनंतर वस्तीला रौजा असे नाव ठवेले. येथे पूर्वी बारमाही पाण्याची व्यवस्था नव्हती म्हणून कसब्याच्या चारही दिशेला लहान मोठी तलावांची निर्मिती करण्यात आली. "हौज खास" तलाव वगळता सर्व तलाव तटबंदीच्या बाहेर आहे. वस्तीला लागून एकूण चार तलाव आहेत. 1 हौज खास, 2. धर्म तलाव, 3. पांगरा तलाव, 4. हौद्री तलाव.

**हौज-ए-खास:**

तटबंदीच्या आत नगारखाना प्रवेशद्वाराच्या पश्चिमेला व लाल बागेच उतरेला आहे. औरंगजेबाच्या उत्तर काळात औरंगाबाद हे दक्षिण सुभेदारीचे मुख्य ठिकाण होते. शाही कुटूंबातील लोक औरंगाबाद येथे राहत व कधी कधी विश्रांतीसाठी खुल्दाबाद येथे राहत होते. म्हणून शाही परिवारासाठी हा खास हौद बांधलेला आहे. शहजादा शहाआलम बहादुरने तटबंदी बांधत असताना हा तलाव बांधलेला आहे. सडकेच्या कडेला व हौज खास तलावाच्या पूर्वला दरम्यानच्या जागेत मोगलांच्या सेवेत असणा-या शिया धर्मिय लोकांच्य कबरी आहेत. कबरीवर लहान घुमट व काही चार भिंतीत आहे. कबरी व वास्तू अतिशय पडक्या अवस्थेत आहेत. या तलावात एक विहिर मध्यभागी आहे.

विहरीचे बांधकाम जमिनीपासून 5 ते 6 फुट उंच आहे. तलावात व विहीरीत बारमाही पाणी असते. तलावाच्या पश्चिमेला तटबंदीत एक खिडकी आहे. पझावा कब्रस्तानातून तलावात येण्यासाठी या खिडकीचा वापर होतो. तलावाच्या पाणलोट क्षेत्रात आता वस्ती झालेली आहे. यात हमालवाडी, फकीरवाडा, कमान मोहल्ल, फर्श मोहल्ला ही नगरे वसलेली आहेत. सध्या तलावात पाणी असते. मात्र त्यात झाडे झुडपे व गाळ साचलेला आहे. तालावाचे चांगले व्यवस्थापन केले तर पाण्याचा वापर नागरिकांसाठी होऊ शकतो.

**हौद्री तलाव:**

हा लहान तलाव हौद्री प्रवेशद्वाराच्या समोर व गिरिस्थान नगर पालिकेच्या पाठीमागे आहे. गाळाने हा तलाव जवळ जवळ पूर्ण भरलेला आहे. कमी पाऊस झाला तरी तलावात पाणी साचते मात्र खेल नसल्यामुळे पाणी जास्त काळ टिकत नाही. पाणी संपल्यावर या तलावाचा वापर क्रीडांगण म्हणून केला जातो. या तलावातील पाणी पुढे पांगरा तलावात साठवले जाते.

**पांगरा तलाव:**

पांगरा प्रवेशद्वाराच्या उत्तरेला सडकेच्या पूर्वेला पांगरा तलाव आहे. या तलावाला तिन्ही बाजूंनी नैसर्गिक टेकड्या आहेत. पश्चिमेला पक्की दगडी भिंत आहे. या तलावात 8 ते 10 फुट खोल जलसाठा असतो. पूर्वी तलावातील पाण्याचा वापर नागरिक करत. मात्र आता गुरांना पिण्यासाठी व वापरण्यासाठी त्याचा उपयोग होतो. या तलावाचा ओव्हर फ्लो धमर तलावाला जाऊन मिळतो. यात झुडपे व बेशरमची खुप झाडे वाढली आहेत. यामुळे यातील मत्स्य व्यवसायही धोक्यात आला आहे.

**धरम तलाव:**

धरम तलाव बनी बेगम बागेच्या पश्चिम उत्तरेला आहे. या तलावाच्या तिन्ही दिशेने उंच भाग आहे. वेरुळ सडकेच्या समांतर दगडी भिंतीने पाणी अडवले आहे. या तलावाचे दोन भाग केले आहेत. वेरुळ सडकेपासून बागेपर्यंत तलावाच्या मधून रस्ता केलेला आहे. वरच्या भागात कमी जलसाठा होतो. मात्र खालच्या भागात खुप जलसाठा आहे. येथे मत्स्य उत्पादनही मोठ्या प्रमाणात होते. वार्षिक मक्ता नगरपालिकातर्फे होतो. या तलावातील जलसाठ्यांचा वापर शहरातील लोक कपडे धुण्यासाठी व बांधकामासाठी करतात. महत्त्वाचे म्हणजे पूर्वी बनी बेगम बागेला पाणी पुरवठा खाकसार तलावातून होत असे. आता वीज पंपाद्वारे धरम तलावातून होत आहे. 1972 च्या दुष्काळापासून हा तलाव कोरडा पडलेला नाही. नैसर्गिक सानिध्यात तलाव असल्याने येथे प्रसन्न वाटते. हा तलाव मोगल काळाती बांधलेला आहे. कारण बनी बेगम बागेला लागून आहे. महाराष्ट्र पर्यटन विभागाने हा परिसर विकासासाठी हाती घेतलेला आहे. परिसर भिंतीने बंदिस्त केलेला आहे. भव्य प्रवेशद्वार बांधण्यात आलेले आहे. तलावातील जास्तीचे सांडपाणी वेरुळ घाटाच्या दरीत कोसळते.

**संदर्भ :-**


1. Gazetter of the Nizami diominons Aurangabad District print at The times of India press 1884 Reprint Govt. of maha. pub. 2006 mumbai P.n. 830
2. Gazetter of the Nizami diominons Aurangabad District Reprint Govt. of Maharashtra Press, 2006 mumbai P.n. 827
3. अल हाज मोहम्मद अब्दुल हाई - गुलीस्ताने खुल्दाबाद, प्रकाशक सवेरा ऑफ सेट, 2011 प्रथम आवृत्ती, पृ. 39
4. जोशी, महादेवशास्त्री (संपा.), होडारकर, पद्मजा (सह. संपा.), भारतीय संस्कृतिकोश, सिंधी लोक ते ज्ञानेश्वरी, खंड दहावा, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे पृ.क्र. 345
5. पाटणकर, पांडूरंग, सहली एक दिवसाच्या परिसरात औरंगाबादच्या, स्नेहल प्रकाशन, पुणे, 2009, पृ.क्र. 25.
6. शेख, ऐजाज, तारिख-ए-खुल्दाबाद (वास्तुशिल्प आणि पर्यटन स्थळ), चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, 2012, पृ.क्र. 110
7. गुप्ते-कुरेशी, दुलारी, टुरिझम पोटेन्शियल इन औरंगाबाद विथ अजंता, एलोरा ॲण्ड दौलताबाद, भारतीय कला प्रकाशन, त्रीनगर, दिल्ली, 1999 पृ.क्र. 85.
8. ईश्वरशरण विश्वकर्मा (1986), "काशी का ऐतिहासीक भूगोल" रामानन्द विद्या भवन, नई दिल्ली, पृ. क्रं. 80-121
9. http://www.aurangabadmetro.com/karnapura_fair_Aurangabad/
10. https//en.m.wikipedia.org/wiki/shuli_bhanjan_eknath
11. https//en.m.wikipedia.org/wiki/shuli_bhanjan_eknath/

International Journal of Advance and Applied Research

www.ijaar.co.in

ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141

Peer Reviewed Bi-Monthly

Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# भौगोलिक माहिती प्रणालीच्या सहाय्याने दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे स्थान निश्चिती व सुनियोजनाचा अभ्यास

**कु. अस्मिता खट्टे[1]प्रा. डॉ. शिवाजी शंकर मस्के[2]**

[1]एम. ए. भाग 1 भूगोल विभाग संगमेश्वर कॉलेज, सोलापूर

[2]प्राध्यापकभूगोल विभाग ,संगमेश्वर कॉलेज

**Corresponding Author: कु. अस्मिता खट्टे**

**सारांश (Abstract) -**

प्राथमिक आरोग्य केंद्र हे भारतातील आरोग्यसेवेच्या उतरंडीतील सर्वात खालचे एकक आहे देशातील दूरवरच्या भागातील मनुष्यवस्तीपर्यंत किमान आरोग्य सुविधा पोचविण्याच्या उद्देशाने भारतातील मध्यवर्ती सरकारच्या धोरणानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रांचे जाळे विणण्यात आले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी आणि परिचालनाबाबतचे सर्व निर्णय मात्र राज्य सरकारांची आरोग्य खाती घेतात. प्राथमिक आरोग्य केंद्रे ही व्यक्तीच्या आरोग्याच्या गरजा पूर्ण करतात. आरोग्याच्या जाहिरातीपासून ते रोग प्रतिबंध, उपचार, पुनर्वसन, उपशामक काळजी इत्यादी कार्य करतात. दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे आदर्श स्थान निश्चिती व सुनियोजनाचा अभ्यास करणे हा सदर संशोधनाचा मुख्य उद्देश आहे. प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व द्वितीय स्वरूपाच्या माहितीवर आधारलेले आहे. प्राथमिक स्वरुपाची माहिती प्रश्नावलीच्या साह्याने प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देऊन गोळा केली आहे. तसेच व्दितीयक स्वरुपाची माहिती ही सोलापूर पंचायत समिती कार्यालय दक्षिण सोलापूर, सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, भारतीय जनगणना, विविध मासिके, संशोधन पत्रिका, इंटरनेट आणि संदर्भ ग्रंथ इ. मधून घेतली आहे. गोळा केलेल्या महितीचे संगणकाच्या आधारे वर्गीकरण व तक्त्यात रुपांतर करून आलेखाच्या सहाय्याने दर्शविली आहे. सदर संशोधनाचे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, दक्षिण सोलापूर तालुक्यात 6 प्राथमिक आरोग्य केंद्र कांही ठराविक भागातच आढळतात. आज दक्षिण सोलापूर तालुक्यात 16 प्राथमिक आरोग्य केंद्राची आवश्यकता असून ते तालुक्याच्या आदर्श भागात असावेत.

**बीज संज्ञा (key word) –** प्राथमिक आरोग्य केंद्र, भौगोलिक माहिती प्रणाली (GIS), आदर्श स्थान,

**प्रस्तावना (Introduction) –**

प्राथमिक आरोग्य केंद्रे (Primary Healthcare center) ही भारताच्या आरोग्यसेवेचा एक महत्वाचा भाग आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रे ही ग्रामीण आरोग्यसेवेचा कणा म्हणून ओळखली जातात. प्राथमिक आरोग्य केंद्रे ही रुग्ण आणि आरोग्य सेवा प्रणाली यांच्यातील दुवा आहेत, जी व्यक्तीला चांगल्या आरोग्यासाठी आवश्यक असलेली माहिती आणि सेवा प्रदान करतात. प्राथमिक आरोग्य सेवांचा मुख्य उद्देश जनतेचे आरोग्य सुधारणे आणि संसर्गजन्य रोगांचा प्रसार रोखणे हा आहे. भोर समितीच्या शिफारशीनुसार देशात 1946 मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. ग्रामीण व मागासलेल्या प्रदेशांमध्ये सुलभ, समान आणि परवडणारी आरोग्य सेवा सुनिश्चित करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. जर लोकसंख्येचा विचार केला तर सर्वसाधारण प्रदेशात 30 हजार लोकसंख्येमागे व दुर्गम-डोंगराळ प्रदेशात 20 हजार लोकसंख्येमागे एक प्राथमिक आरोग्य केंद्र असते.

**उद्देश (Objectives) –**

सदर संशोधनाचे मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे आहेत -

1. दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्थानाचा अभ्यास करणे.
2. दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे आदर्श स्थान निश्चिती व सुनियोजनाचा अभ्यास करणे.

**माहिती स्रोत व संशोधन पद्धती (Data Base and Methodology) -**

प्रस्तुत संशोधन कार्य हे प्राथमिक व द्वितीय स्वरूपाच्या माहितीवर आधारलेले आहे. प्राथमिक स्वरुपाची माहिती दक्षिण सोलापूर तालुक्यातील 6 प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देऊन प्रश्नावलीच्या व मुलाखतीच्या द्वारे मिळविलेली आहे. व्दितीयक स्वरुपाची माहिती ही सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, पंचायत समिती कार्यालय दक्षिण सोलापूर, भारतीय जनगणना, इंटरनेट आणि संदर्भ ग्रंथ इत्यादी मधून घेतली आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे स्थान निश्चिती व सुनियोजन करण्यासाठी भौगोलिक माहिती प्रणालीचा (GIS) वापर केला आहे. 2021 वर्षाची प्रक्षेपित लोकसंख्या काढण्यासाठी कंपाऊंड ग्रोथ रेट (Compound Growth Rate) या सूत्राचा वापर करण्यात आला आहे. हे सूत्र वार्षिक सरासरी वाढीचा दर मोजण्यासाठी आणि भविष्यातील लोकसंख्येचा अंदाज करण्यासाठी उपयुक्त आहे.

**लोकसंख्या वाढीचा दर (Population Growth Rate) -**

$$r = \left(\frac{P_{\text{final}}}{P_{\text{initial}}}\right)^{\frac{1}{n}} - 1$$

Pfinal - अंतिम वर्षाची लोकसंख्या

Pinitial - सुरुवातीच्या वर्षाची लोकसंख्या

n - सुरुवातीचे आणि अंतिम वर्षातील अंतर

**प्रक्षेपित लोकसंख्या (Population Projection) -**

$$P_n = P_0 \times (1 + r)^n$$

Pn - प्रक्षेपित (आगामी) लोकसंख्या


P0 - प्रारंभिक (मागील) लोकसंख्या

r - वार्षिक वाढ दर

n - वर्षांचे अंतर

**अभ्यास क्षेत्र (Study Area) –**

दक्षिण सोलापूर हा सोलापूर जिल्ह्यातील एक तालुका आहे. दक्षिण सोलापूर तालुका 170 66' उत्तर अक्षांश ते 750 90' पूर्व रेखांश दरम्यान पसरलेला आहे. दक्षिण सोलापूर तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र 1195.3 चौ. कि. मी. आहे. या तालुक्यात 90 गावे ही 7 मंडलात विभागली गेली आहेत. 2011 च्या जनगणनेनुसार या तालुक्याची एकूण लोकसंख्या 260897 आहे. हा तालुका जिल्ह्याच्या आग्नेय भागात असून ईशान्येस धाराशिव जिल्हा, उत्तरेस उत्तर सोलापूर आणि मोहोळ तालुका, पूर्वेस आणि आग्नेयेस अक्कलकोट तालुका, दक्षिणेस आणि नैऋत्येस कर्नाटक राज्य, पश्चिमेस मंगळवेढा तालुक्यांच्या सीमा आहेत.




**विश्लेषण (Analysis) –**

दक्षिण सोलापूर तालुक्यात 90 गावे ही 7 मंडलात विभागली गेली आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यात औराद, भंडारकवठे, बोरामणी, होटगी, कंदलगाव आणि वळसंग अशी 6 प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत.

तक्ता 1 - दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे

| अ. क्र. | प्राथमिक आरोग्य केंद्रे |
|---|---|
| 1 | औराद |
| 2 | भंडारकवठे |
| 3 | बोरामणी |
| 4 | होटगी |
| 5 | कंदलगाव |
| 6 | वळसंग |

संदर्भ – सामाजिक व आर्थिक समालोचन सोलापूर जिल्हा, 2022

दक्षिण सोलापूर तालुक्यात औराद, भंडारकवठे, बोरामणी, होटगी, कंदलगाव आणि वळसंग अशी 6 प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. या प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी), आंतररुग्ण विभाग (आयपीडी), फार्मसी / दवाखाना, प्रसूती वॉर्ड, ऑपरेशन थिएटर, प्रयोगशाळा / निदान केंद्र, पुरुष / महिला कर्मचारी / रुग्णांसाठी स्वतंत्र शौचालय, रुग्णांसाठी प्रतीक्षा क्षेत्र

तक्ता 2 - दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील सुविधा

| अ. क्र. | सुविधा |
|---|---|
| 1 | बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) |
| 2 | आंतररुग्ण विभाग (आयपीडी) |
| 3 | फार्मसी/दवाखाना |
| 4 | प्रसूती वॉर्ड |
| 5 | ऑपरेशन थिएटर |
| 6 | प्रयोगशाळा/निदान केंद्र |
| 7 | पुरुष/महिला कर्मचारी/रुग्णांसाठी स्वतंत्र शौचालय |
| 8 | रुग्णांसाठी प्रतीक्षा क्षेत्र |

संदर्भ – क्षेत्र कार्य

भारतीय नियोजन आयोगानुसार, देशात सर्वसाधारण प्रदेशात 30 हजार लोकसंख्येमागे एक व दुर्गम-डोंगराळ प्रदेशात 20 हजार लोकसंख्येमागे एक प्राथमिक आरोग्य केंद्र असते. सन 2011 च्या जनगणनेनुसार दक्षिण सोलापूर तालुक्याची एकूण लोकसंख्या 3,13,043 आहे. याचा अर्थ असा आहे कि, दक्षिण सोलापूर तालुक्याची लोकसंख्या विचारात घेता येथे 10 प्राथमिक आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे.

तक्ता 3 - दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राचा अनुशेष

| घटक | संख्या |
|---|---|
| लोकसंख्या (2011) | 260897 |
| उपलब्ध प्राथमिक आरोग्य केंद्रे (Available of Primary Healthcare Centre) | 6 |
| प्राथमिक आरोग्य केंद्रांची आवश्यकता (Need of Primary Healthcare Centre) | 10 |
| प्राथमिक आरोग्य केंद्राचा अनुशेष (Backlog of Primary Healthcare Centre) | 4 |

संदर्भ – सामाजिक व आर्थिक समालोचन सोलापूर जिल्हा, 2022 नोट – प्रत्येक 30,000 लोकसंख्येमागे – 1 प्राथमिक आरोग्य केंद्र

दक्षिण सोलापूर तालुक्यात औराद, भंडारकवठे, बोरामणी, होटगी, कंदलगाव आणि वळसंग अशी 6 प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. याशिवाय दक्षिण सोलापूर तालुक्यात आहेरवाडी, हत्तूर, कुंभारी आणि कासेगाव येथे नवीन 4 प्राथमिक आरोग्य केंद्रे निर्माण करणे आवश्यक आहे.

तक्ता 4 - दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील समस्या

| अ. क्र. | समस्या | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | कर्मचाऱ्याची कमतरता | 06 | 100 |
| 2 | पायाभूत सुविधांचे प्रश्न | 05 | 83.33 |
| 3 | इंटरनेट | 04 | 66.66 |
| 4 | आर्थिक अडचणी | 04 | 66.66 |
| 5 | सेवा वितरणातील आव्हाने | 03 | 50.00 |
| 6 | सुगमतेची समस्या | 03 | 50.00 |
| 7 | जनजागृती आणि विश्वास | 02 | 33.33 |
| 8 | देखरेख आणि जबाबदारी | 02 | 33.33 |
| 9 | राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांशी | 02 | 33.33 |
| 10 | बदलाचा प्रतिकार | 02 | 33.33 |

संदर्भ – क्षेत्र कार्य

दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्मचाऱ्याची कमतरता, पायाभूत सुविधांचे प्रश्न, इंटरनेट, आर्थिक अडचणी, सेवा वितरणातील आव्हाने, सुगमतेची समस्या, जनजागृती आणि विश्वास, देखरेख आणि जबाबदारी, देखरेख आणि जबाबदारी, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांशी आणि बदलाचा प्रतिकार या प्रमुख समस्या आढळून येत आहेत. यापैकी कर्मचाऱ्याची कमतरता ही समस्या सर्व प्राथमिक आरोग्य केद्राना भेडसावत असलेली दिसून येते. तसेच पायाभूत सुविधां ही समस्या 83.33 टक्के प्राथमिक आरोग्य केंद्राना भेडसावत आहे. याशिवाय इंटरनेट, आर्थिक अडचणी, सेवा वितरणातील आव्हाने, सुगमतेचा अभाव या समस्या प्रामुख्याने भेडसावत आहेत.

**शिफारशी (Suggestion) -**

1. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.
2. कुशल कर्मचाऱ्यांची भरती करणे आणि त्यांना कायम ठेवणे गरजेचे आहे.
3. वाहतुकीची सुलभता वाढविणे आवश्यक आहे.
4. लोकांचा प्राथमिक आरोग्य केंद्राविषयी विश्वास वाढविणे.
5. राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांशी एकात्मता वाढविणे गरजेचे आहे.
6. तांत्रिक प्रगतीला प्रोत्साहन देणे.
7. 7)दक्षिण सोलापूर तालुक्याचा भौगोलिक विस्तार व लोकसंख्या पाहता येथे नवीन 4 प्राथमिक आरोग्य केंद्रे निर्माण करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष (Conclusion)** –प्राथमिक आरोग्य केंद्र हे भारतातील आरोग्यसेवेच्या उतरंडीतील सर्वात खालचे एकक आहे. प्राथमिक आरोग्य सेवांचा मुख्य उद्देश जनतेचे आरोग्य सुधारणे आणि संसर्गजन्य रोगांचा प्रसार रोखणे हा आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यात सध्या 6 प्राथमिक आरोग्य केंद्रे असून ती औराद, भंडारकवठे, बोरामणी, होटगी, कंदलगाव आणि वळसंग या ठिकाणी आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्याची लोकसंख्या व विस्तार पाहत आज या तालुक्यात 10 प्राथमिक आरोग्य केंद्राची आवश्यकता असून ती नव्याने हत्तुर, आहेरवाडी, कुंभारी आणि काशेगाव या ठिकाणी स्थापित करणे गरजेचे आहे.

**उपयोजन (Application)**

1. सदर संशोधनाचा उपयोग हा दक्षिण सोलापूर तालुक्यासह इतर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचा विकास आराखडा तयार करण्यासाठी होईल.
2. या संशोधनाचा उपयोग जगातील कोणत्याही तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थान निश्चिती करण्यासाठी होईल.

**संदर्भ सूची (References) -**


1. Census of India (1981, 1991, 2001, 2011): District Census Hand Book, Solapur. Directorate of Census Operations, Maharashtra Bombay.
2. Government of Maharashtra (2022): Socio-Economic Reviews and District Statistical Abstracts, Solapur District.
3. Government of Maharashtra (1997): Gazetteer of the Bombay Presidency, Solapur District. The Government Photozinco Press, Pune.
4. J.K. Singh (2021): National Health Programmes of India, Century Publications
5. डॉ.सफिया सिराज मोमीन: प्राथमिक आरोग्य सेवा – 1, सिराजोशफी प्रकाशन, कोल्हापूर
6. https://nrhm.maharashtra.gov.in/infraphcmarathi.htm
7. https://solapur.gov.in/whoswho/जिल्हा -आरोग्य -अधिकारी

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No.15(A)** **Jan-Feb 2025**

# हत्तरसंग कुडल: एक ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन स्थळ

**कु. सुनिता कोळी [1] डॉ. शिवाजी शंकर मस्के[2]**
[1]एम. ए. भाग 1 भूगोल विभाग संगमेश्वर कॉलेज, सोलापूर
[2] प्राध्यापक, भूगोल विभाग,संगमेश्वर कॉलेज सोलापूर
**Corresponding Author: कु. सुनिता कोळी**

## प्रस्तावना (Introduction) -

पर्यटन हा मानवाचा अत्याधुनिक आर्थिक व्यवसाय असून तो फार झपाट्याने विकसित होत आहे. प्राचीन काळापासून प्रवास हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग बनलेला आहे. त्या काळी ज्या विविध कारणांनी प्रवास केला जात असे त्यात अज्ञात प्रदेशाचा शोध घेणे, व्यापार, नवीन व चमत्कारिक स्थळांचा शोध घेणे, नवीन पर्यावरणातील बदल अनुभवणे आणि धार्मिक दृष्टया पवित्र स्थळांना भेटी देणे इत्यादी गोष्टीचा प्रामुख्याने समावेश होत असे. आज आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिक क्षेत्रातील झालेल्या परिवर्तनाने जागतिक पर्यटन व्यवसायाचा वेगाने विकास झालेला आहे.

पर्यटन हा बहुस्वरूपी व्यवसाय असून त्याचे निरनिराळ्या प्रकारे वर्गीकरण केले जाते. पर्यटनाचे भोगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक पर्यटन असे प्रकार केले जातात. भारत देशाला प्रदीर्घ ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक परंपरा लाभली आहे. त्यामुळे भारतात धार्मिक पर्यटन मोठ्या प्रमाणात होत आहे.

## उद्दिष्टे (Objectives) -

प्रस्तुत शोध निबंधाचा प्रमुख उद्देश हा हत्तरसंग कुडल या ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन स्थळाचा अभ्यास करणे हा आहे.

## माहिती स्रोत आणि अभ्यास पद्धती (Data Source and Methodology) -

सदरील संशोधन लेख हा प्राथमिक व व्दितीयक माहिती स्रोतावर अवलंबून आहे. प्राथमिक माहिती स्रोतामध्ये प्रत्यक्ष ठिकाणी भेट देऊन निरीक्षण करून माहिती संकलित केली आहे. व्दितीयक माहिती स्रोतामध्ये विविध मासिके, पुस्तके, संशोधन पत्रिका, इंटरनेट आणि संदर्भ ग्रंथ इ. आधार घेतला आहे.

## अभ्यास क्षेत्र (Study Area) -

दक्षिण सोलापूर तालुक्यातून भीमा व सीना या दोन नद्या वाहतात या दोन नद्यांच्या संगमावर कुडल संगम हे तीर्थ क्षेत्र आहे. हत्तरसंग कुडल हे ठिकाण सोलापूर जिल्यात दक्षिण सोलापूर तालुक्यात वसलेले आहे. हे ठिकाण सोलापूर शहरापासून 30 कि. मी. इतक्या अंतरावर दक्षिणेस आहे. सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्यातील एक महत्वाचा जिल्हा असून तो महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण भागात वसलेला आहे. हत्तरसंग कुडलचा विस्तार 17◦23'10" उत्तर अक्षवृत्त ते 75◦54'10" पूर्व रेखावृत्त असा आहे. हत्तरसंग (565) कुडलचे (270) क्षेत्रफळ 926 हेक्टर इतके आहे. सन 2011 नुसार हत्तरसंग (1564) कुडलची (750) एकूण लोकसंख्या 2314 इतकी आहे.

## विषयाची निवड (Choice of the Topic) -

भीमा व सीना नद्यांच्या संगमामुळे हे ठिकाण पवित्र म्हणून ओळखले जाते. एकाच अखंड शिळेवर 360 बहुमुखी शिव प्रतिमा कोरलेल्या आहेत. हे जगातील एक अदभूत आहे. शैव व वैष्णव या दोन्ही पंथाचे एकत्रीकरण येथे आहे. प्रत्यक्ष संशोधक या ठिकाणाचा असल्याने अधिक माहिती उपलब्ध आहे.

## विश्लेषण (Analysis) -

जगात पर्यटनाचा एक प्रमुख उद्देश म्हणजे धार्मिक, पवित्र स्थळांना भेटी देणे होय. पाश्चात्य देशात असे पर्यटन मर्यदित असले तरी पौरात्य देशात मात्र पर्यटनाचा हा अत्यंत महत्वाचा उद्देश असून भारतासारख्या देशात दरवर्षी कोट्यावधी लोक असे पर्यटन करतात. या पार्श्व भूमीवर सोलापूरचा विचार केला असता, सोलापूर मध्ये धार्मिक पर्यटनाला खूप वाव आहे. सोलापूर जिल्यातील जवळपास 35 धार्मिक स्थळांना तिर्थछेत्राचा दर्जा प्राप्त आहे. धार्मिक व आध्यात्मिक दृष्टिकोनातून सोलापूर जिल्हा महाराष्ट्रात महत्त्वाचा ठरतो. दक्षिण सोलापूर तालुक्यात हत्तरसंग कुडल येथे भीमा-सीना नद्यांचा संगम झालेला आहे. या ठिकाणी

झालेल्या पुरातत्त्वीय संशोधनामुळे हे आज जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळ बनले आहे.

याठिकाणी मंदिरे, मुख्य मंडप, शिलालेख, सभा मंडप, अंतराळ, गर्भगृह या महत्वाच्या गोष्टी आहेत.

**मंदिरे:**

येथे संगमावर अकराव्या शतकात बांधलेली (कोरलेली) संगमेश्वर व हरिहरेश्वर ही दोन महादेव मंदिरे आहेत. यातील संगमेश्वर मंदिर हे अतिशय वैशिष्ट्य पूर्ण असे आहे. हे मंदिर चालुक्य काळामध्ये बांधलेले आहे. हे मंदिर त्रिकूटात्मक आहे. मंदिराचे प्रवेशद्वार उत्तरेस असून हे मंदिर २७ मीटर लांब आणि ३५ मीटर रुंद आहे. या मंदिराचे मुख्य मंडप, सभा मंडप, अंतराळ व गर्भगृह असे विभाग आहेत.

**मुख्य मंडप-**

मुख्य मंडपाच्या दोन्ही बाजूस कक्षासन आहे. तर मुख्य मंडपाच्या छतावर कमल पुष्प आहे. हे कमल पुष्प फारच आकर्षक व कोरलेले आहे. त्यावरून हे मंदिर चालुक्य कालीन ओळखले जाते. तसेच छतावर दगडी झुंबर आहे.

**सभा मंडप-**

सभा मंडपाच्या तिन्ही बाजूवर बसण्यासाठी कक्षासन आहे. सभा मंडप पूर्ण स्तंभ व अर्ध स्तंभांनी परिपूर्ण आहे. सभा मंडपाचे छत दगडी तुळयांच्या चोकोनाकृतीनी वरच्या बाजूस केलेले असून मध्यभागी शिलेवर लोलकाचे शिल्प अतिशय कलात्मक पद्धतीने कोरले आहे. सभा मंडपातून अर्ध मंडपामध्ये जाता येते. अर्ध मंडपाळी कक्षासन व छत आहे. सभा मंडपामध्ये सप्त मातृकाची प्रतिमा असून ती १.५ मीटर लांबीची आहे. सध्या या प्रतिमेची झीज झालेली दिसून येते. सभामंडपामध्ये पूर्वेकडून व पश्चिमेकडून प्रवेश करता येतो. मंडपाच्या डाव्या बाजूला एक दीड मीटर आकाराचे गर्भगृह चोकोनी आकाराचे आहे. त्यामध्ये एका लहान शिवलिंगाची स्थापना केलेली आहे.

**अंतराळ –**

अर्ध मंडपातून अंतराळात जाण्यासाठी प्रवेशद्वार असून त्याला दोन द्वार शाखा आहेत. अंतराळ पूर्ण स्तंभांनी परिपूर्ण आहे. अंतराळाच्या उत्तर व दक्षिणेस दोन गर्भगृहे किंवा कूट आहेत. त्यात शिवपंडित असाव्यात. अंतराळात उंच केलेली दगडी फरशी आहे. तेथेच नंदीची एक संगमरवरी व नंतरच्या काळातील मूर्ती आहे.

**गर्भगृह –**

अंतराळातून गर्भगृहातून जाण्यासाठी सुमारे दोन मीटर उंचीचे प्रवेशद्वार आहे. या प्रवेशद्वाराला तीन द्वार शाखा आहेत. विविध नक्षी कामानी या द्वार शाखा सुशोभित केलेल्या आहेत. गर्भगृह सुमारे ३ मीटर लांब व ३ मीटर रुंदीचे असून मध्यभागी श्री संगमेश्वर मूर्ती (पिंड) आहे. गर्भगृहा च्या दक्षिणेस एका लहान ओट्यावर सप्तमातृकाची मूर्ती असलेली शिळा आहे. गर्भगृहावर टप्याटप्याने उंच होत गेलेले शिखर आहे.

**हरिहरेश्वर मंदिर:**

संगमेश्वर मंदिराशिवाय या परिसरात हरिहरेश्वर मंदिर पाहावयास मिळते. महाराष्ट्र व कर्नाटकच्या प्रदेशात शेव व वैष्णव पंथाची लोकप्रियता असतानाच या दोन्ही पंथाचे एकत्रीकरण सांगणाऱ्या हरिहरेश्वर पंथाच्या इ.स. ११ व्या शतकाच्या प्रारंभापासून लोकप्रियता मिळू लागली होती. त्या पंथाच्या विचारसरणीचे प्रतीक म्हणजेच येथील हरिहरेश्वर मंदिर होय. १९९६ पर्यंत हे मंदिर १९४९ रोजी भीमा नदीला आलेल्या पुराच्या गाळात बुडालेले होते. मंदिराच्या भोवती सुमारे सात मीटर उंचीचा गाळ साचल्याने मंदिराचे पूर्ण रूप पाहता येत नव्हते. मंदिराच्या मुख्य मंडपावरील व छतावरील पडलेले दगड मंदिराच्या समोर दोन्ही बाजूवर लावून ठेवलेले होते. आत प्रवेश करण्यासाठी केवळ अर्धा मीटर रुंदीचा रस्ता होता. मंदिराचे काही भाग कोसळलेले व काही कोसळण्याच्या अवस्थेत होते. मंदिरातील कलात्मक व एकमेवाद्वितीय शीच, नयन मनोहर व कला पूर्ण अश्या सूर सुंदरी, वाद्य सुंदरी याची रचना आहे. यामुळे मंदिराची प्राचीनता जाणवते.

**शिलालेख-**

संगमेश्वर मंदिर व परिसरात उपलब्ध असलेले शिलालेख हे कन्नड व मराठी भाषेतील आहेत. या शिलालेखाचे वाचन आनंद कुंभार व गजानन भिडे यांनी केलेले आहे. या शिलालेखावरून मंदिर चालुक्य कालीन असल्याचे सिद्ध होते. याच मंदिराच्या बाहेरील बाजूस रांजनाचे अवशेष मिळालेले आहेत त्यावरून तेर ते बदामी असा व्यापार मार्ग असावा. तसेच मंदिराच्या छतावर मराठी भाषेतील शिलालेख आहे. पुरातत्व खात्याचे संचालक डॉ जामखेडकर यांनी या शिलालेखाचे वाचन करून हा शिलालेख मराठी भाषेतील पहिला शिलालेख आहे असे मत मांडले.

**विश्वरूप शिव-**

संगमेश्वर मंदिराच्या उत्तरेकडे प्रवेश द्वाराच्या बाजूला विश्वरूप शिव दर्शन घडवणारे शिल्प पाहावयास

मिळते. या लिंग आकाराच्या शिळेवर एकूण ३६४ प्रतिमा कोरलेल्या आहेत. एखादा अभिषेक केल्या नंतर वर्षभर अभिषेक केल्याचे पुण्य मिळते. अशी भावना शिल्प कोरण्यामागील आहे.

याशिवाय कृष्ण मूर्ती मंदिराच्या बाजूस मिळाली आहे. काळ्या पाषाणातील हि मूर्ती विलोभनीय आहे. तसेच केलीय मर्दन व राधाकृष्णन शिल्प पाहावयास मिळते.

पर्यटनाच्या दृष्टिकोनातून या ऐतिहासिक, धार्मिक व आध्यात्मिक स्थळाचा विचार केला तर तेथील सुविधा या अपुऱ्या आहेत. जर या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या तर साहजिकच येथे पर्यटकांची संख्या वाढेल आणि तरुणांना रोजगार ही उपलब्ध होईल.

**सारांश (Conclusion) -**

पर्यटन हा मानवाचा अत्याधुनिक आर्थिक व्यवसाय असून तो फार झपाट्याने विकसित होत आहे. पर्यटन हा बहुस्वरूपी व्यवसाय असून त्याचे निरनिराळया प्रकारे वर्गीकरण केले जाते. पर्यटनाचे भोगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक पर्यटन असे प्रकार केले जातात. सोलापूर मध्ये धार्मिक पर्यटनाला खूप वाव आहे. सोलापूर जिल्यातील जवळपास 35 धार्मिक स्थळांना तिर्थछेत्राचा दर्जा प्राप्त आहे. यापैकी हत्तरसंग कुडलसंगम हे ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन स्थळ आहे. याठिकाणी संगमेश्वर व हरिहरेश्वर मंदिर, शिलालेख, मुख्य मंडप, सभा मंडप, अंतराळ, गर्भगृह व विश्वरूप शिव इ. पाहावयास मिळतात. हे स्थळ प्राचीन चालुक्य काळातील आहे. भीमा व सीना नद्यांच्या संगमामुळे हे ठिकाण पवित्र म्हणून ओळखले जाते. चालुक्य कालीन इतिहास, व्यापार मार्ग, सामाजिक व धार्मिक जीवनाची माहिती मिळते. वैशिष्ट्ये पूर्ण शिवलिंग येथे पाहावयास मिळते.

**शिफारशी (Suggestion) -**

- पर्यटनाच्या दृष्टिकोनातून या ऐतिहासिक, धार्मिक व आध्यात्मिक स्थळाचा विचार केला तर तेथील सुविधा या अपुऱ्या आहेत. जर या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या तर साहजिकच येथे पर्यटकांची संख्या वाढेल आणि तरुणांना रोजगार ही उपलब्ध होईल.
- या पर्यटन स्थळी निवासस्थाने व हॉटेल्सची व्यवस्था करावी.
- या ठिकाणी रस्ते, वीज, पाणी यासारख्या मूलभूत सुविधा पुरवाव्यात
- या ठिकाणाची परिणामकारक जाहिरात करावी. पर्यटकांना आकर्षित करावे.
- नदीच्या पात्रात बोटिंगची सुविधा करावी.
- या पर्यटन स्थळी जाण्यासाठी सोलापूर येथून वाहनांची उत्तम सुविधा निर्माण करावी.
- शासनाने निधी देऊन या पर्यटन स्थळाचा विकास करावा.

**संदर्भ ग्रंथ:**


1. प्रा. के. ए. खतीब (२०१२): पर्यटन भूगोल, संजोग प्रकाशन कोल्हापूर
2. प्रा प्रकाश सावंत (२०११): पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन कोल्हापूर
3. महाराष्ट्र शासन (२०१४): सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन
4. दै पुण्यनगरी सोलापूर २८ सप्टेंबर २०१८.
5. Wikipedia.org/wiki/कुडल संगम _ सोलापूर
6. Kudal sangam: G. L. Bhide
7. Ancient India: G. L. Bhide
8. Ancient History of Social and Religious: G. L. Bhide & Kadam

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील नळदुर्ग किल्ला: एका ऐतिहासिक पर्यटन स्थळाचा भौगोलिक अभ्यास

**श्री सुधाकर कांबळे [1] डॉ. अंकुश शंकर शिंदे [2]**
[1] संशोधक विद्यार्थी, भूगोल संशोधन केंद्र - द. भै. फ. दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स अंड सायन्स, सोलापूर
[2] प्राध्यापक, सी. बी. खेडगीज् बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स आणि राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट. जिल्हा- सोलापूर
**Corresponding Author: श्री सुधाकर कांबळे**
**Email:** sudhakar07491@gmail.com

**सारांश:**

किल्ला पर्यटन हा साहसी पर्यातांचा प्रकार समाजाला जात असून जमिनीवरील भुईकोट किल्ला पाहण्यासाठी सर्वच प्रकारचे पर्यटक कुतुहलाने येत असतात. प्रय्तांच्या माध्यमातून त्या स्थानिक भागात रोजगार निर्मितिला चालना मिळते. किल्ला पाहण्यासाठी इतिहासप्रेमी, अर्थतज्ञ, भूगोलतज्ञ , पर्यावरण प्रेमी, हौशी लोक येत असतात. नळदुर्ग हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील धाराशिव (पूर्वीचे उस्मानाबाद) जिल्ह्यामधील एक प्रसिद्ध प्राचीन किल्ला आहे. नळदुर्ग हा महाराष्ट्रातील सर्वांत मोठा भुईकोट किल्ला आहे. याची तटबंदी जवळजवळ ३ कि.मी. लांब असून एकूण ११४ बुरूज आहेत. महाराष्ट्राच्या गिरिदुर्ग, जलदुर्गांबरोबरच या किल्ल्याचे महत्त्व आहे. किल्ला हा महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाचे संरक्षित स्मारक आहे. यामध्ये हिंदू धर्माच्या काही मंदिरांचा सुद्धा समावेश आहे जसे की गणपती महाल, लक्ष्मी महाल हे पाहण्यासाठी आकर्षक आहेत. येथे धबधबा आहे त्यासाठीहि हा किल्ला प्रसिद्ध आहे. नळदुर्ग किल्ला हा धाराशिव जिल्ह्यामध्ये तुळजापूर तालुक्यात आहे. पुणे - हैदराबाद या राष्ट्रीय महामार्गावर नळदुर्ग आहे. सोलापूरकडून हैदराबादकडे निघाल्यावर ४८ कि. मी. अंतरावर नळदुर्ग गाव लागते. सदर प्रस्तुत शोध पत्रिकेमध्ये नळदुर्ग किल्ल्याचा ऐताहासिक किल्ल्याचा भौगोलिक दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात येत आहे.

**नमुना शब्द -** तटबंदी, जलविज्ञान, भूदृश्य, धरण, दखन्न सल्तनत आणि दखन्न पठार

**प्रास्ताविक:-**

नळदुर्ग हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील धाराशिव (पूर्वीचे उस्मानाबाद) जिल्ह्यामधील एक प्रसिद्ध प्राचीन किल्ला आहे. नळदुर्ग हा महाराष्ट्रातील सर्वांत मोठा भुईकोट किल्ला आहे. याची तटबंदी जवळजवळ ३ कि.मी. लांब असून एकूण ११४ बुरूज आहेत. महाराष्ट्राच्या गिरिदुर्ग, जलदुर्गांबरोबरच या किल्ल्याचे महत्त्व आहे. किल्ला हा महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाचे संरक्षित स्मारक आहे. यामध्ये हिंदू धर्माच्या काही मंदिरांचा सुद्धा समावेश आहे जसे की गणपती महाल, लक्ष्मी महाल हे पाहण्यासाठी आकर्षक आहेत. येथे धबधबा आहे त्यासाठीहि हा किल्ला प्रसिद्ध आहे. नळदुर्ग किल्ला हा धाराशिव जिल्ह्यामध्ये तुळजापूर तालुक्यात आहे. पुणे - हैदराबाद या राष्ट्रीय महामार्गावर नळदुर्ग आहे. सोलापूरकडून हैदराबादकडे निघाल्यावर ४८ कि. मी. अंतरावर नळदुर्ग गाव लागते.

**उद्दिष्टे**

१) नळदुर्ग किल्ल्याचा ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून झालेला विकासचा अभ्यास करणे.

२) नळदुर्ग किल्ल्यातील ऐतिहासिक वास्तुचा आणि भौगोलिक अभ्यास करणे.

३) नळदुर्ग किल्ल्याचा भू-सामरिक स्थळ म्हणून अभ्यास करणे.

**अभ्यास क्षेत्र:-**

नळदुर्ग किल्ला हा नळदुर्ग शहरात असून तो उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात येतो.

उस्मानाबाद जिल्हा हे महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात असून त्याचे भौगोलिक स्थान १७°३९'४५" उत्तर ते १८°४२'३०" उत्तर अक्षवृत्तीय असून ७५°१८'३०" ते ७५°४६'१५" पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. तो नैऋत्यकडून सोलापूर जिल्हा, वायव्य दिशेकडून अहमदनगर आणि बीड जिल्हे, पूर्वेकडून लातूर जिल्हा आणि दक्षिणेकडून कर्नाटकातील बिदर आणि गुलबर्गा जिल्ह्याने वेढलेला असून दक्षिणोत्तर विस्तार अंदाजे २४० किमी आणि पूर्व-पश्चिम विस्तार २८० किमी आहे. हे भारतीय दख्खन पठारावरील जिल्हा असून त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची अंदाजे ६०० मीटर आहे. या जिल्ह्याचे भोगोलिक क्षेत्रफळ सुमारे ७५१२.४० चौ. किमी असून त्याने महाराष्ट्र राज्याचा एकूण २.४४ % भू-भाग व्यापला आहे. हा जिल्हा महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त पट्ट्यामध्ये येत असून येथील हवामान वर्षभर कोरड्या स्वरूपाचे असून येथील उन्हाळ्याचे कमाल तापमान सुमारे ४२° सेल्सियस पर्यंत पोहचते आणि येथे पर्जन्य जुने ते सप्टेंबर महिन्यात पडतो. येथील सरासरी पर्जन्य सुमारे ७३१.१ मिमी आहे.

**संशोधन पद्धती**: सदर किल्ले अभ्यासासाठी ऐतिहासिक संशोधन व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचावापर केला गेला आहे.

**विश्लेषण:-**

**नळदुर्ग किल्ला - ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

धाराशिव (उस्मानाबाद) शहरापासून सुमारे ४६ कि.मी. अंतरावर असलेला नळदुर्ग किल्ला आणि त्यातील पाणी-महाल प्रेक्षणीय व प्रसिद्ध आहे. या प्रंचड किल्ला २.५ कि.मी. घेराचा असून अजूनही सुस्थितीत आहे. या किल्ल्याजवळून वाहणा-या बोरी नदीचे पाणी अडवून त्याचा उपयोग दुर्ग रक्षणासाठी केलेला फक्त येथेच आढळतो. सुमारे ३००-४०० वर्षापूर्वी देखील लष्करी शास्त्र प्रगतशील होते याचा पुरावाच मिळतो. पावसाळ्यात या पाणी महालावरून पडणा-या पाहण्याचे विहंगमदृश्य पाहण्यासाठी दरवर्षी पर्यटक येतात. तुळजाभवानीच्या दर्शनासाठी देशभरातून भाविक तुळजापूरला येतात. त्याचवेळी अनेक भाविक आणि अन्य पर्यटक तुळजापूरपासून साधारण ३३ किलोमीटर अंतरावर असलेल्या नळदूर्ग किल्ल्याला भेट देतात. अशा नळदूर्ग किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व आणि वैशिष्ट्ये आपण जाणून घेणार आहोत.

राज्यातील भुईकोट किल्ल्यांमध्ये नळदूर्गचा किल्ला हा सर्वात मोठा आहे. नळदूर्ग किल्ल्याचा संबंध पुराणकाळातील नल-दमयंतीशी जोडला जातो. नळ राजाने हा किल्ला बांधला. त्यामुळे त्याच्या नावावरुन या किल्ल्याचं नाव नळदूर्ग असं ठेवण्यात आलं. हा किल्ला काही काळ चालुक्य राजाकडे होता. त्यानंतर तो बहामनी सुलतानांच्या ताब्यात आला. बहामनी राज्यांच्या विघटनानंतर हा किल्ला आदिलशाहाकडे आला. त्यानंतर मुघल आणि निजामांकडेही हा किल्ला होता. इ. स. १७५८ मध्ये हा किल्ला नानासाहेब पेशवे यांनीही जिंकला होता. इ.स. १७९९ मध्ये निजामाने इंग्रजांबरोबर तह केला. त्यानुसार फ्रेंच सैनिकांऐवजी इंग्रजांचे सैनिक ठेवण्याचे ठरले. या तहाने इंग्रजांचे वर्चस्व हैद्राबादेत प्रस्थापित झाले आणि निजामाचे स्वातंत्र्य संपले. नळदुर्ग हा महाराष्ट्रातील सगळयांत मोठा मिश्रदुर्ग आहे. नळदुर्ग आणि रणमंडळ अशा दोन किल्ल्यांना जोडून बनवण्यात आलेला हा किल्ला अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण या किल्ल्यात केलेलं पाण्याचं व्यवस्थापन आणि त्यातून किल्ल्याच्या शासकांनी आजूबाजूच्या प्रदेशावर मिळवलेलं नियंत्रण हा खरोखर अभ्यास करण्याजोगा विषय आहे. नळदुर्ग हा तिन्ही बाजुंनी पाण्याने वेढलेला असून या किल्ल्याच्या चौथ्या बाजूला खोल दरी आहे. नळदुर्ग ज्या डोंगरावर बांधला गेलाय त्या डोंगराला चारही बाजूंनी इतर डोंगरांचं संरक्षण आहे आणि म्हणूनच नळदुर्गच्या अतिशय जवळ गेल्याशिवाय हा किल्ला दिसतच नाही. सुमारे तीन किलोमीटरवर पसरलेल्या या विस्तीर्ण किल्ल्यात असलेला पाणीमहाल अत्यंत प्रेक्षणीय आहे. किल्ल्याजवळून वाहणाऱ्या बोरी नदीचं संपूर्ण पात्र वळवून त्याचा उपयोग किल्ल्याच्या रक्षणासाठी केला गेलाय. पावसाळयात पाऊस झाला की या किल्ल्यातले वेगवेगळया रंगांचे नरमादी धबधबे पाहायला पर्यटकांची प्रचंड गर्दी होते.



**भू-सामरिक महत्त्व:**

नळदुर्ग हा तिन्ही बाजुंनी पाण्याने वेढलेला असून या किल्ल्याच्या चौथ्या बाजूला खोल दरी आहे. नळदुर्ग ज्या डोंगरावर बांधला गेलाय त्या डोंगराला चारही बाजूंनी इतर डोंगरांचं संरक्षण आहे आणि म्हणूनच नळदुर्गच्या अतिशय जवळ गेल्याशिवाय हा किल्ला दिसतच नाही. किल्ल्याजवळून वाहणाऱ्या बोरी नदीचं संपूर्ण पात्र वळवून त्याचा उपयोग किल्ल्याच्या रक्षणासाठी केला गेल्याचे दिसून येते. मराठवाड्याच्या रणरणत्या उन्हात कधी साम्राज्याचं रक्षण करण्यासाठी तर कधी रयतेला रसदेची वानवा जाणवू नये म्हणून नळदुर्ग, परंडा, औसा, उदगीर, रामदुर्ग हे किल्ले कणखरपणे उभे होते. नळदुर्ग आणि रणमंडळ या दोन किल्ल्यांना जोडून हा किल्ला बनवला असल्यामुळे अनेकजण याला जोडकिल्ला असंही म्हणतात. किल्ल्याच्या सुरक्षिततेसाठी तटबंदी उभारली असून या किल्ल्यात एकूण ११४ बुरुजही आहेत. परांडा, उपळी, संग्राम आणि नवबुरुज ही नळदुर्गच्या काही मुख्य बुरुजांची नावं. यापैकी उपळी बुरुजावर तीन तोफा ठेवण्याची प्रशस्त जागा असून किल्ल्यातलं हे सगळ्यांत उंच ठिकाण आहे. किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी हुलमुख दरवाजा हा मुख्य दरवाजा आहे. नळदुर्गच्या किल्ल्याची रचनाच शत्रूला चकवा देण्यासाठी केली गेलीय हे या गडाच्या दरवाजावरूनच कळतं. सुरुवातीला एका दरवाज्यासारख्या दिसणाऱ्या प्रवेशद्वारात गेल्यावर हा गडाचा मुख्य दरवाजा नसून हा केवळ एक चकवा आहे, असे लक्षात येते. काही वळणं घेतल्यानंतर किल्ल्याचं मुख्य प्रवेशद्वार नजरेस येते.

**जलव्यवस्थापनातून राज्यव्यवस्थापन** :

प्राचीनकाळी उंच डोंगरांच्या माथ्यावर किल्ले बांधले जात होतेपण कालानुरूप त्यात बदल होत गेले. युद्धनीतीत बदल होत गेल्यामुळे आणि प्रजेच्या सुरक्षितेच्या दृष्टीने सैनिकांची संख्या वाढत गेल्यामुळे दुर्गमाथ्यावर किल्ले बांधण्यापेक्षा जमिनीवर किल्ले बांधण्याची कल्पना निर्माण झाली. त्यातून या किल्ल्याची निर्मिती झाली. पूर्वी मराठवाड्यातल्या तेर, पैठण, भोकरदन अशा छोट्या छोट्या शहरांमधला माल सह्याद्रीच्या नाणेघाटातून नालासोपारा बंदरात जात होता आणि तेथून जहाजाद्वारे तो माल युरोपात पोहोचवला जात असे. दक्षिण भारत ते युरोप द्वारे मराठवाडा अशा या प्राचीन काळातील व्यापारी मार्गाला संरक्षित करण्यासाठी या रस्त्यावर अनेक महत्त्वाचे किल्ले बांधले गेले. सुमारे २००० वर्षांपासून विविध राजवंशांनी मराठवाड्याच्या या भूमीवर राज्य केलं आणि त्यामुळेच मराठवाड्यातल्या उस्मानाबाद जिल्ह्यात अनेक महत्त्वपूर्ण किल्ले बांधले गेले. किल्ल्यात राहणाऱ्या सैन्याला वर्षभर अन्नधान्याची रसद पुरेल आणि पाण्याची गरज भागेल आणि प्रजेच .रक्षण करता येईल ह्या उद्दात्त हेतूनेच या किल्ल्याची निर्मिती झाली. त्याचबरोबर संबंधित प्रदेशाच्या शेतीला वर्षभर शाश्वत पाणीपुरवठा होईल या हेतूनेच उत्तम जलव्यवस्थापन आणि पर्यायी अर्थव्यवस्थेवर नियंत्रण या दृष्टीकोनातूनच या किल्ल्याची निर्मिती झाली.

**नर-मादी धबधबा -एक विहंगम दृश्य –पर्यटन स्थळ**

नळदूर्ग किल्ल्यावरील नर-मादी धबधबा सर्वाधिक प्रसिद्ध आहे . मुख्य किल्ला आणि रणमंडख हे किल्ल्याचे दोन भाग पाणी महलने जोडलेले आहेत. इब्राहिम आदिलशहा दुसरा याने बोरी नदीवर दगडी धरण बांधून त्यात पाणी महालाची योजना केलेली आहे . हे धरण व महाल बेसाल्ट दगडात बांधलेले आहे . पावसाळ्यात बोरी नदीला पूर आल्यावर पाणी महालावरुन पडते. हे पाणी दोन ठिकाणांहून खाली पडते. हे दोन धबधबे नर व मादी या नावाने ओळखले जातात . यामुळे किल्ल्याच्या नैसर्गिक सौंदर्यात खूपच भर पडली आहे.



**कृषी विकास**

मराठवाड्यात होणारा कमी पाऊस पाहता किल्ल्यात राहणाऱ्या सैन्याला आणि रयतेला दुष्काळात पाणी कमी पडू नये यासाठीसुद्धा हे धरण बांधलं होतं . या धरणाचं एकूण क्षेत्रफळ ८२५६९ वर्ग किलोमीटर आहे आणि विशेष बाब म्हणजे या पठारावर असणाऱ्या शेतीची समुद्रसपाटीपासूनची उंची आणि धरणाची उंची एकच असल्यामुळे शेतीला पाणी पुरवणं देखील अत्यंत सोपं आहे . पाणी अडवण्यासाठी उभारण्यात आलेल्या या धरणाच्या भिंतीत एक अत्यंत हवेशीर पाणी महल बांधलेला आहे . नदीचं पाणी इथे साठलं की याच महालावरून नर व मादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सांडव्यातून हे पाणी वाहू लागतं, हे पाणी वाहत असताना या महालाच्या कोणत्याही भागाला पाण्याचा स्पर्शही होत नाही.

**पर्यटकांसाठी क्रीडात्मक मनोरंजन सुविधा :**

नळदुर्ग किल्ल्याला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी येथे बॅडमिंटन, बास्केटबॉल, फुटबॉल, क्रिकेट, वॉल क्लायम्बिंग इत्यादी खेळांची सुविधा पुरविण्यात येतात. किल्ल्याच्या आतील एका भागात सँड बाईक राईडची सोयही पर्यटकांना उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे . नळदुर्ग किल्ला हा जवळ जवळ १२५ एकर परिसरात पसरलेला असल्यामुळे किल्ला पाहण्यासाठी इलेक्ट्रिक बग्गी राईड ही पर्यटकांसाठी उपलब्ध असणार आहे.

**पर्यटनात्मक किल्ला**

अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत नळदुर्ग हा अत्यंत दुर्लक्षित किल्ला होता, पण पुढे एका खाजगी कंपनीने या किल्ल्याचं व्यवस्थापन केल्याने लातूर, उस्मानाबाद, सोलापूर जिल्ह्यातील पर्यटकांसाठी नळदुर्ग हे एक आकर्षणाचं केंद्र बनले आहे. किल्ल्यामधील बगीचा विकसित करून त्यात कारंजे तयार केले आहेत. याशिवाय पर्यटकांना फिरण्याची सोय व्हावी म्हणून इलेक्ट्रिक गाडी, धरणाच्या जलाशयात बोटिंग इत्यादी सोयी करण्यात आल्या आहेत. या परिसरात पाऊस पडला कि नर-मादी धबधबा बघण्यासाठी गर्दी होते. हा किल्ला पाहण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक लोक येतात. सोलापूर , धाराशिव , लातूर जिल्ह्यातील अनेक शाळा – महाविद्यालयातील विद्यार्थी भेटी देत असतात.

**संदर्भ :**


1. आनंद, एम. एम. (१९७५) भारतातील पर्यटन आणि हॉटेल उद्योग हॉल ऑफ इंडिया लिमिटेड नवी दिल्ली.
2. बत्रे के.एल. (१९९०) पर्यटनाची समस्या आणि शक्यता प्रिंटेबल प्रकाशन जयपूर.
3. भाटिया. ए.के. (१९९१) आंतरराष्ट्रीय पर्यटन मूलतत्त्वे आणि प्रथा स्टर्लिंग प्रकाशन खाजगी मर्यादित ग्रीन पार्क विस्तार नवी दिल्ली.
4. बुर्कर्ट. ए. के. आणि मलिक (१९९०) पर्यटन हेनेमान लंडन.
5. आर्थिक प्रभाव क्रमांक २९ आंतरराष्ट्रीय संप्रेषण संस्था वॉशिंग्टन.
6. Aayushi, R. (2018). विजापूरच्या आदिल शाहीच्या काही स्थापत्य प्रतिकृती. इंटरनॅशनल इंटरडिसिप्लिनरी रिसर्च जर्नल Bronkhorst, J. (2008).
7. इंडियन इस्लामिक आर्किटेक्चर व्हॉल्यूम 20. लीडेन, बोस्टन: ब्रिल कझन्स, एच. (1889).
8. विजापूर - आदिलशाहीची जुनी राजधानी. पुणे, महाराष्ट्र: अनाथालय प्रेस. कुंटे, बी. जी. (2014).
9. महाराष्ट्राचा मध्ययुगीन इतिहास (भाग - १ ). मुंबई, महाराष्ट्र: महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

10. Dr. Arjun Wagh & Dr. Ankush Shinde *Geo-Historic Study of Fort Tourism in District Satara of Maharashtra ; An Overview* Journal of Advance and Applied Research (IJAAR) Impact Factor – 7.328 ISSN – 2347-7075.Vol.4, Issue 8 March-April 2023

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# उस्मानाबाद जिल्यातील उमरगा तालुक्यातील कोळसूर गावाजवळील अचलबेट देवस्थान या धार्मिक पर्यटन स्थळाचा एक भौगोलिक अभ्यास

**श्रीमती सुमित्राबाई राठोड[1] डॉ. अंकुश शंकर शिंदे [2]**
[1]संशोधक विद्यार्थी, , भूगोल संशोधन केंद्र द. भै. फ. दयानंद कॉलेजऑफ आर्ट्स अँड सायन्स, सोलापूर
[2] प्राध्यापक , सी. बी. खेडगीज् बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स आणि राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट. जिल्हा- सोलापूर
**Corresponding Author: श्रीमती सुमित्राबाई राठोड**
**Email:** Rathodsumitra1988@gmail.com

**गोषवारा (Abstract):**

प्राचीन काळी भारतीय समाजात पर्यटन अस्तित्वात होते. भारतात सिंधु संस्कृतीपासुन व्यापार, धर्म, संस्कृती, तत्वज्ञान इ. अनेक कारणांनी पर्यटन झाले आहे. मौर्य कालखंडात मॅगेस्थेनिस हा प्रवासी भारतात आला. सम्राट अशोकाने बौध्द भिक्खुंना भारतातील विविध भागात आणि भारताच्या शेजारील देशात बौध्द धर्माच्या प्रसारासाठी पाठविले होते. भारतीय धर्म, संस्कृती, शिक्षण, कला, यांच्या अभ्यासासाठी अनेक परकिय पर्यटकांनी भारतात प्रवास केला त्यामध्ये हुएन त्संग, इत्सिंग अल्बेरुनी इ. ची नावे सांगता येतील. भारतीय पर्यटनात प्राचीन काळापासुन धार्मिक पर्यटनाला अनन्यसाधरण महत्त्व आहे. कारण धार्मिक स्थळांना भेटी दिल्याने आत्मिक शांती प्राप्त होते. अशी भारतीयांची भावना आहे. धार्मिक स्थळांच्या ठिकाणी गेल्याने मोक्ष प्राप्ती होते. जिवनाचे साफल्य हाते. त्यामुळे मोठया प्रमाणात भारतात धार्मिक पर्यटन केले जाते. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये उस्मानाबाद जिल्यातील उमरगा तालुक्यातील कोळसूर गावानजीक असणारे अचलबेट देवस्थान याचा एक धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून अभ्यास करण्यात आलेला आहे.

**नमुना शब्द :-** धार्मिक पर्यटन, पर्यटक, देवस्थान

**प्रास्ताविक :-**

पर्यटन ही संज्ञा प्रवास या शब्दाशी संबंधित आहे आणि प्रवास हा शब्द लॅटिन भाषेतील 'Tornos' या शब्दांपासून आलेला आहे. पूर्वी पर्यटन हे काही मर्यादित स्वरूपात होते. व्यक्ती किंवा कुटूंब, परिवार काही दिवस मनोरंजनासाठी अशा ठिकाणी जात होते. जेथे धार्मिक क्षेत्र, ऐतिहासिक ठिकाणे निसर्गरम्य वातावरण असलेली ठिकाणे यांचा समावेश होते. पर्यटनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन फक्त मनोरंजनापुरते, करमणुकीपुरते एवढाच होता. एका व्यक्तीने किंवा व्यक्ती समूहाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मनोरंजनासाठी, अभ्यासासाठी कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय. "आज पर्यटनाची शाखा बदललेली आहे. पर्यटन हा फक्त एक विरंगुळा आणि मनोरंजनात्मक क्रियाकलापथ नाही तर एक व्यवसाय देखील आहे. जे पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित करते. करमणूक करते आणि आपल्या देशाला उत्पन्न मिळवून देते. पर्यटनामुळे आपल्याला नवीन संस्कृती शिकायची नवीन लोकांना भेटायची वेगवेगळया ठिकाणी मज्जा करण्याची आणि साहसी कार्य करण्याची संधी मिळते. एखाद्या ठिकाणची संस्कृती, चव, परंपरा, हवामान, पर्यावरण, निसर्ग आणि तेथील यांचा विकास आणि सविस्तर ज्ञान मिळवण्यात मदत करणाऱ्या पर्यटनाला पर्यटन भूगोल असे म्हणतात.

प्रस्तुत पेपरमध्ये उस्मानाबाद जिल्यातील उमरगा तालुक्यातील कोळसूर गावानजीक असणारे अचलबेट देवस्थान या धार्मिक पर्यटन स्थळाचा अभ्यास करण्यात येत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. उमरगा तालुक्यातील कोळसूर गावाजवळील अचलबेट देवस्थान एक धार्मिक पर्यटन क्षेत्र म्हणून अभ्यास करणे.
2. कोळसूर गावाजवळील अचलबेट देवस्थानचा ऐतिहासिक अभ्यास करणे.
3. कोळसूर गावाजवळील अचलबेट देवस्थानचा पर्यटन स्थळ म्हणून विकसित झालेल्या या पायाभूत सेवा-सोयी सुविधांचा अभ्यास करणे.
4. कोळसूर गावाजवळील अचलबेट देवस्थान म्हणून त्या परिसर क्षेत्रातील आर्थिक प्रगतीचा आढावा घेणे.

**मर्यादा :**

सदरचे संशोधन अभ्यास हे उमरगा तालुक्यातील कोळसूर गावाजवळील अचलबेट देवस्थान एवढेच व्यापक असून महादेव मदिराचा धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीकोनातून अभ्यास केलेला आहे. तसेच या स्थळाच्या परिसरातील आर्थिक परिस्थिती तसेच व्यावसायिक दृष्ट्या सामाजिक


जीवनावर झालेला परिणाम, वाहतूक सुविधा यांचा अभ्यास केलेला आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर केलेला आहे. लिखित व अलिखित साधनांच्या आधारे माहिती मिळवली तसेच संशोधन क्षेत्रास प्रत्यक्ष भेट देऊन येणाऱ्या भाविक पर्यटकाची मुलाखतीच्या माध्यमाने प्रश्नावली भरून घेऊन त्यातून निष्कर्ष काढलेले आहेत. तसेच परिसरातील प्रत्येक घटकाचे प्रत्यक्ष निरिक्षण (सर्वेक्षण) करून त्यासंबंधी उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासक्षेत्र )Study Area) :**

उमरगा हे उस्मानाबाद जिल्यातील दक्षिणेकडील तालुका असून तो महाराष्ट्र –कर्नाटक राज्याच्या सीमेवर स्थित आहे. त्याच्या दक्षिणेकडे गुलबर्गा व बिदर जिल्हे येतात. त्याचा अक्षवृत्तीय विस्तार १७° ३८' ते १८° ३' उत्तर अक्षवृत्त आणि ७६°२३' ते ७६°४७' पूर्व रेखावृत्त असा आहे. उमरगा तालुक्याचे क्षेत्रफळ १००५.८ चौ.मी. आहे. उमरगा तालुक्याची लोकसंख्या २४१३३९ व्यक्ती असून (२००१) घनता २४० कि.मी. लिंगगुणोत्तर ९२५ असून साक्षरता ७९.३% आहे. उमरगा हे संशोधनासाठी निवडलेले अभ्यासक्षेत्र असून उमरगा हे महाराष्ट्राच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील एक लहान शहर व उमरगा तालुक्यांचे मुख्यालय आहे. उमरगा सोलापूर शहराच्या ८५ कि.मी. पूर्वेस राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ वर वसले आहे. सन २०११ साली उमरगा शहराची लोकसंख्या सुमारे ३५००० होती. उमरगा परिसरात अनेक धार्मिक स्थळे आहेत. त्यापैकीच उमरगा शहरातील प्राचीन मंदिर धार्मिक क्षेत्राचा अभ्यास केला जातो.




### उमरगा तालुक्यातील कोळसूर गावाजवळील अचलबेट देवस्थान

अचलबेट हे उमरगा महाराष्ट्र कोळसूर जि. महाराष्ट्र येथे स्थित एक हिंदू मंदिर आहे. सुमारे ९१ पुनरावलोकनावर आधारीत या ठिकाणाचे सरासरी रेटींग ५ पैकी ४.६० आहे. या ठिकाणाचा रस्ता, पत्ता RPJ9 + M9G कुंभार पट्ट कोळसूर जि. महाराष्ट्र ४१३६०६ इंडिया आहे.

उमरगा तालुक्यातील तुरोरी, कराळी, कोळसुर परिसरातील अचलबेट देवस्थान दर गुरूवारी भक्तांच्या गर्दीने भरते. श्रावण महिन्यात सलग एक महिना विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम येथे होत असतात . श्रावण महिन्यात दर पौर्णिमेला किर्तन सेवा असते. प्रत्येक गुरूवारी हजारो भाविक सकाळी ८.०० वाजता होणाऱ्या आरतीला उपस्थित राहत असतात.

आरती वेळी पुजारी समवेत हजारो भाविक उपस्थित असतात. आरती नंतर महाप्रसाद तसेच दुपारी भोजना शिवाय प्रत्येक गुरूवारी ५० सेवेकरी मुक्कामी राहून कार्य करतात. कोजागिरी पोर्णिमेला किर्तन व हरीजागर दत्त जयंती, वार्षिक उत्सव, तुकाराम बीज, गोपाळ काळा तर श्रावण महिन्यात प्रत्येक सोमवारी किर्तन सलग २२ दिवस विविध गावांच्या दिंडीचा हरीभजन जागर असतो. शेवटी गोकुळाष्टमीला किर्तन, गुलाल महाप्रसादाने उत्सवाची सांगता होते. असे साधक ज्ञानेश्वर माशाळकर यांनी सांगितले. अचलबेट देवस्थान उमरगा बसवकल्याण निलंगा तालुक्यासह सिमावर्ती भागातील गावांतून भगवंतांच्या भक्ती प्रचाराचे केंद्र म्हणून सर्वश्रुत आहे.



**अचलबेट देवस्थानाचा प्राचीन इतिहास**

सन १९७१ पूर्वी अचलबेट या उजाड माळावर असणाऱ्या डोंगर रांगेत ८०० वर्षापूर्वीच्या गुहेत ६० वर्षापूर्वी नाथपंथी सद्गुरू काशिनाथ महाराज यांनी प्रस्थान केले आणि या ठिकाणी तपश्चर्या करून गुहेला तपभूमी केले. त्यांच्या नावावरच येथे पवित्र धुनी, गुरूगादी आजतागायत सुरु आहे. गुहेत एकाच वेळी ५०० भाविक बसू शकतात एवढी येथे जागा उपलब्ध आहे. परमपूज्य गुरूवर्य उज्वलानंद महाराज यांनी येथे धार्मिक कार्यक्रम व प्रबोधनातून नाथ-पंथीची गुरूगादी पुढे नेली. उस्मानाबाद या जिल्ह्याच्या ठिकाणावरून १०४ कि.मी. अंतरावर आग्नेय दिशेला तुरोरी जवळ असलेले अचलबेट हे मुंबई हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्गावर आहे. अचलबेट हे गावाचे नाव नाही, ती एक उंच डोंगरासारखी टेकडी आहे. हा परिसर निसर्गरम्य असून येथील डोंगरामध्ये एक विस्तीर्ण गुहा कोरलेली आहे. या ठिकाणी प्राचीन कालखंडात अनेक संत व सिद्धयोगी ध्यान धारणेसाठी येत असावेत.



**देवस्थानाची वैशिष्टे :-**

जागृत धुनी, तेजाची तेजोमय पुजा, पवित्र विभूती भक्तीचे वैशिष्टे येथे असून जन्माला आल्यापासून शेवटपर्यतच्या जगण्याचा अर्थ सर्वार्थाने उमजून जिवनात आशेचा किरण निर्माण करणारे भक्ती सुखाची अनुमती देणारे स्थान म्हणजेच अचलबेट होय. अध्यात्मिक ठिकाण ध्यानासाठी खुप चांगली जागा, सुंदर देखभाल संपूर्ण हिरवाईसह, चांगल्या पर्यावरणीय परिस्थितीसह अतिशय शांत आणि स्वच्छ येथे विठ्ठल गणेश हनुमान या सारख्या देवांचे मंदिर पहायला मिळतात. तसेच उज्वलानंद महाराज यांच्या समाधीचे क्षेत्र याच ठिकाणी आहे. तसेच महादेव, विठ्ठल, हनुमान, ब्रम्हा, गणेश यांच्या मुर्तीची स्थापना ही येथे आहे.

**भाविक पर्यटकाचे प्रश्नावली व मुलाखतीच्या साह्याने करण्यात आलेले अवलोकन (एकूण १२९)**

| अ. क्र. | धर्मानुसार वर्गीकरण | एकुण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | १०९ | ८४.४९ |
| | बिगर हिंदू धर्मीय | २० | १५.५० |
| | | | |
| २ | **लिंग गुणोत्तारानुसार वर्गीकरण** | | |
| | पुरुष | ७५ | ५८.१३ |
| | स्त्रिया | ५४ | ४१.८६ |
| | | | |
| २ | **शैक्षणिक स्तर** | एकुण संख्या | टक्केवारी |
| | उच्च पदवीत्तर | २१ | १६.२७ |
| | १० वि व १२ वी पास | ४२ | ३२.५५ |
| | माध्यमिक शाळा | ३८ | २९.४५ |
| | न शिकलेले | २८ | २१.७० |
| | | | |
| ३. | **व्यवसाय** | एकुण संख्या | टक्केवारी |
| | शेती , पशुपालन , शेतकरी | ५९ | ४५.७३ |
| | कुशल कारागीर | १८ | १३.९५ |
| | कामगार, शिक्षक | ०७ | ५.४२ |
| | व्यापारी , दुकानदार | १५ | ११.६२ |
| | न व्यवसाय करणारे | ३० | २३.२५ |

(प्रत्यक्ष सर्वेक्षण )

दररोज या मंदिराला येणाऱ्या भाविकांपैकी ८४%पेक्षा जास्त भाविक हिंदुधर्मीय असून १५% पेक्षा इतर धर्मीय भाविक मंदिराला भेट देतात. दररोज येणाऱ्या भाविकांमध्ये पुरुषांचे प्रमाण ५८% असून स्त्रियांचे प्रमाण ४२% आहे. शैक्षणिक स्तरानुसार उच्च लोकांचे प्रमाण १६.२७% , दहावी व बारावी पास असलेल्या लोकांचे प्रमाण ३२.५५% माध्यमिक शाळांत लोकांचे प्रमाण २९.४५% आणि न शिकलेले लोकांचे प्रमाण २१.७० % इतके आहे. तसेच शेतकरी पशुपालन करणाऱ्या लोकांचे प्रमाण ४६% , गवंडी, सुतार, कुंभार, बिगारी सारख्या व्यवसाय करणाऱ्या लोकांचे प्रमाण १४% , कामगार , शिक्षक लोकांचे प्रमाण ५.४२ %, व्यापारी, अडत, छोटे मोते दुकानदार, भाजीविक्रेते यासारख्या लोकांचे प्रमाण ११% व कोणताच व्यवसाय न करणारे बेरोजगार लोकांचे प्रमाण २३.२५ % इतके आहे.

**मंदिराच्या परिसरातील पुजा पाठ साहित्य विक्रेते** : अचलबेट या ठिकाणी पुजापाठ साहित्यासाठी अनेक विक्रेते आहेत. श्रीफळ, कुंकू, हळद, फुलांचे हार, प्रसादासाठी पेढे, फोटो यांची विक्री तेथे स्थापन झालेले दुकानदार करतात. दररोज येणाऱ्या भाविकांमुळे दुकानदारांना रोजगार प्राप्ती होत असते.

**शिफारशी :**

1. अचलबेट देवस्थान प्राचीन काळातील आहे. यांचे ऐतिहासिक दृष्ट्या संवर्धन करण्यात यावे.
2. अचलबेट देवस्थान हायवे पासून दुर डोंगरावर असल्यामुळे तेथे जाण्यासाठी वाहनांची सुविधा करण्यात यावी.
3. एक धार्मिक पर्यटन ठिकाण म्हणून पर्यावरणीय दृष्टीकोनातून विकास साधण्यात यावा.
4. अचलबेट देवस्थानाचा इतिहास व त्यांचे महत्व पटवून देण्यासाठी स्वतंत्र गाईड नेमावा.

**संदर्भ ग्रंथ :**


1. पर्यटन भूगोल :राजेश शुक्ला, रश्मि शुक्ला
2. पर्यटन भूगोल : प्रा. के.ए. खतीब
3. पर्यटन भूगोल : संकल्पना व व्यवस्थापन
4. पर्यटन भूगोल :डॉ. अंकुश आहेर, प्रा. डी. एम. मारकड
5. सारंग मोहनदेव जोशी :महादेव मंदिर पुजारी
6. Dr Ankush Shinde and Sau Sumitrabai Rathod ***"उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील उमरगा शहरातील हेमाडपंथीय श्री महादेव मंदिर या धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून अभ्यास"*** International Journal of Advance and Applied Research (IJAAR) Impact Factor – 7.328 ISSN – 2347-7075. Vol.4, Issue 8 March-April 2023
7. Dr. Ankush Shinde, Shri Mahendra kasabe , Shri Sudhakar Kamble ***"सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील वडवळ येथील नागनाथ मंदिराचा एक धार्मिक पर्यटन स्थल म्हणून अभ्यास"*** Journal of Advance and Applied Research

(IJAAR) Impact Factor – 7.328 ISSN – 2347-7075. Vol.4, Issue 8 March-April 2023

8. Dr. Arjun Wagh & Dr. Ankush Shinde ***Geo-Historic Study of Fort Tourism in District Satara of Maharashtra ; An Overview*** Journal of Advance and Applied Research (IJAAR) Impact Factor – 7.328 ISSN – 2347-7075. Vol.4, Issue 8 March-April 2023

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# सोलापूर जिल्ह्यातील निवडक धार्मिक पर्यटन स्थळांचा अभ्यास

**Dr. Rajesh Bhimrao Gavakare**
Associate Professor, Department of Geography,
ShriSantDamaji College Mangalwedha
**Corresponding Author: Dr. Rajesh Bhimrao Gavakare**
**Email:** rajeshgavakare@gmail.com

**सारांश:**

आज एकविसाव्या शतकामध्ये पर्यटन व्यवसायाला महत्त्व प्राप्त झाले आहे. व्यक्ती, कुटुंब आणि समाजाच्या दृष्टीने पर्यटन महत्त्वाचे मानले जाते. पर्यटन हे वेगवेगळया प्रकारचे असते त्यामध्ये ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, इत्यादी प्रकारची पर्यटन असू शकते. सोलापूर जिल्हा विशेषत: धार्मिक पर्यटनासाठी प्रसिध्द आहे. जिल्ह्यातील सोलापूर,पंढरपूर, अक्कलकोट, करमाळा आणी बार्शी ही महत्वाची स्थळे आहेत. पंढरपूरहे श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी यांचे पवित्र स्थान आहे. पंढरपूर भारताची दक्षिण काशी व महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणुन पण प्रसिध्द आहे. येथे हिंदू देवतांचे मंदिरे व अनेक संतांचे मठ (धर्मशाळा) आहेत. आषाढी व कार्तिकी एकादशी व्यतिरिक्त पंढरपुरात १२ महिने नेहमीच महाराष्ट्रातील व लगतच्या राज्यातून असंख्य संख्येने भाविक विठूरायाच्या दर्शनासाठी गर्दी करतात. जवळपास ७-८ लाख वारकरी आषाढी एकादशी च्या काळात भेट देवून विठ्ठलाचे दर्शन घेतात.श्री स्वामी समर्थ महाराजांचे स्थान म्हणुन अक्कलकोट प्रसिध्द आहे.सध्याचे स्वामी समर्थ मंदिर हे एका वडाच्या झाडाच्या भोवती बांधले आहे. ह्याच वडाच्या झाडाखाली बसून श्री स्वामी समर्थ ध्यान धारणा करीत व भक्तांना उपदेश देत असत.करमाळयाची कमला देवी श्री कमला देवीच्या मंदिरामुळे करमाळा शहर प्रसिध्द झाले आहे. श्री सिध्देश्वर हे सोलापूर शहराचे ग्रामदैवत आहे. श्री सिध्देश्वर मंदिर शहराच्या मध्यभागी वसलेले आहे. मंदिराच्या तीन बाजूस तलाव असून एकाद्या बेटासारखे मंदिराचे दृश्य दिसते. बार्शी शहर भगवंत मंदिरासाठी प्रसिध्द आहे. भगवंत मंदिर श्री विष्णुला समर्पित आहे. ह्या मंदिराचे वैशिष्ठ्य म्हणजे संपूर्ण भारतात श्री विष्णुला भगवंत या नावाने ओळखले हे एकमेव मंदिर आहे.

**बीजसंज्ञा:** पर्यटन,धार्मिक,ग्रामदैवत,कुलदैवत इ.

**प्रस्तावना:**

एका ठिकाणी दुसऱ्या ठिकाणी आनंदापाई, फिरण्यासाठी गेलेल्या व्यक्ती म्हणजे पर्यटन होय. पर्यटन वेगवेगळया प्रकारचे असते ते धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक, ऐत्याहासिक इ. सोलापूर जिल्हा विशेषत: धार्मिक पर्यटनासाठी प्रसिध्द आहे. जिल्ह्यातील पंढरपूर, अक्कलकोट, करमाळा आणी बार्शी ही महत्वाची स्थळे आहेत.रस्ते व रेल्वे या मार्गाने जिल्हा इतर मोठ्या शहरांस जोडला आहे. हा जिल्हा एक धार्मिक ठिकाणांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. बरीच धार्मिक ठिकाणे सोलापूर जिल्ह्यात आहेत जसे की पंढरपूर हे विठ्ठल मंदिरासाठी प्रसिद्ध आहे तसेच सोलापूरचे ग्रामदैवत सिद्धेश्वर साठी प्रसिद्ध आहे त्याचप्रमाणे करमाळाची कमलादेवी प्रसिद्ध आहे तसेच बार्शीचे भगवंत मंदिर प्रसिद्ध आहे ही प्रामुख्याने जिल्ह्यातील काही महत्त्वाची धार्मिक ठिकाणे प्रसिद्ध आहेत बरीच धार्मिक ठिकाणी जिल्ह्यामध्ये पहावयास मिळतात त्यातील ही काही ठराविक धार्मिक स्थळे प्रसिद्ध आहेत.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळांचा अभ्यास करताना खालील उद्दिष्टे विचारात घेतली आहेत.

1. जिल्ह्यातील वेगवेगळया धार्मिक स्थळांचा पर्यटनाच्या दृष्टीने अभ्यास करणे.
2. जिल्ह्यातील धार्मिक स्थळांचे महत्त्व जाणून घेणे.
3. धार्मिक स्थळांचे ऐतिहासिक महत्त्व जाणून घेणे.

**सोलापूर जिल्ह्यातील काही महत्त्वाचे धार्मिक स्थळे.**

जिल्ह्यामध्ये बरीच धार्मिक स्थळे असून त्यामध्ये पंढरपूर, सोलापूर, बार्शी, करमाळा,अक्कलकोटही महत्त्वाची धार्मिक स्थळे आहेत.

**पंढरपूर–**

पंढरपूरहे श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी यांचे पवित्र स्थान आहे. पंढरपूर भारताची दक्षिण काशी व महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणुन पण प्रसिध्द आहे. सोलापूर जिल्हा मुख्यालयापासून ७२ कि.मी. अंतरावर वसले आहे. पंढरपूर रेल्वे स्थानक मिरज-कुर्डूवाडी-लातूर ह्या रेल्वे मार्गावर आहे.श्री विठ्ठलाच्या प्राचीन मंदिराचे ई स ११९५ मध्ये जीर्णोद्धार करण्यात आले. शहरात इतर हिंदू देवतांचे मंदिरे व अनेक संतांचे मठ (धर्मशाळा) आहेत. पंढरपूर शहर चंद्रभागा (भीमा) नदीच्या काठावर वसले आहे. आषाढी व कार्तिकी एकादशी व्यतिरिक्त पंढरपुरात १२ महिने नेहमीच

महाराष्ट्रातील व लगतच्या राज्यातून असंख्य संख्येने भाविक विठूरायाच्या दर्शनासाठी गर्दी करतात. आषाढी व कार्तिकी वारीसाठी राज्यातील विविध ठिकाणाहून संतांच्या पालख्या निघून वाखरी येथे जमतात.विठ्ठल मंदिरात काकडा आरती, महापूजा, महानैविध्य, पोशाख, धुपारती, पाद्यपूजा, शेजारती इत्यादी विविध नित्योपचार केले जातात. मुख्य मंदिरात नामदेव पायरी दरवाजातून प्रदेश करून पश्चिम दरवाजातून मंदिरातून बाहेर पडताना खालील देव देवतांचे दर्शन होते.संत कैकाडी महाराज मठ – हे शहराच्या उत्तरेस आहे. सर्व देव देवतांचे व संतांचे दर्शन घडवणारे सुंदर असे हे स्थळ आहे. पूर्ण परिसर पाहण्यासाठी कमीत कमी २ तासांचा अवधी लागतो.संत तनपुरे महाराज मठगुजराती देवस्थान – भीमा नदीच्या पलीकडे वसलेले आहे. भक्तांना श्रीनाथजी चे दर्शन घेण्यासाठी नदी पार करून जावे लागते.

**सोलापूर–**

श्री सिध्देश्वर हे सोलापूर शहराचे ग्राम दैवत आहे. श्री सिध्देश्वर मंदिर शहराच्या मध्यभागी वसलेले आहे. मंदिराच्या तीन बाजूस तलाव असून एकाद्या बेटासारखे मंदिराचे दृश्य दिसते. श्री सिद्धेश्वारांचा थोडक्यात इतिहास पुढीलप्रमाणे आहे. १२ व्या शतकात सोलापूर शहरात श्री सिध्दाराम नावाचे थोर संत होऊन गेले. त्यांनी श्री बसवेश्वर यांच्या शिकवणूक व उपदेशाचा प्रसार केला. श्री सिध्दाराम यांच्या शिकवणुकीने व उपदेशानी प्रेरित होऊन एका तरुण कुंभार कन्येने त्यांच्याशी लग्नाची इच्छा व्यक्त केली पण श्री सिध्दाराम हे ब्रम्हचारी असल्याने त्यांनी या लग्नास नकार दिला व त्यांच्या योगदंडाशी लग्न करण्यास सांगितले. हाच प्रतीकात्मक विवाह सोहळा दर वर्षी सिध्देश्वर यात्रा म्हणून मकर संक्रांति च्या काळात भोगी, संक्रांति व किंक्रांती ह्या तीन दिवसात साजरा केला जातो. नंदी ध्वज हे विवाहासाठी प्रतीकात्मक वर व वधू मानले जातात. दर वर्षी साधारणपणे १४ जानेवारीच्या आसपास हा सोहळा पार पडतो. ह्याच काळात १५ दिवसासाठी सिध्देश्वर जत्रेचे आयोजन केले जाते. सिध्देश्वर यात्रेला स्थानिकरीत्या गड्डा जत्रा असेही संबोधले जाते.

**अक्कलकोट-**

श्री स्वामी समर्थ महाराजांचे स्थान म्हणुन अक्कलकोट प्रसिध्द आहे. अक्कलकोट शहर सोलापूर जिल्हा मुख्यालयापासून ३८ कि मी अंतरावर वसलेले आहे. श्री स्वामी समर्थ महाराजांना श्री दत्तात्रयाचे अवतार मानले जाते. श्री स्वामी समर्थांची समाधी भक्ताकडून पुजली जाते. दर वर्षी चैत्र शुद्ध त्रयोदशीला स्वामी समर्थांची पुण्यतिथी साजरी केली जाते. राज्यातून व पर राज्यातून मोठ्या संख्येने भक्त गण नित्य नेमाने भेट देतात.

सध्याचे स्वामी समर्थ मंदिर हे एका वडाच्या झाडाच्या भोवती बांधले आहे. ह्याच वडाच्या झाडाखाली बसून श्री स्वामी समर्थ ध्यान धारणा करीत व भक्तांना उपदेश देत असत. मंदिराच्या परिसरात मुख्य मंदिर, सभा मंटप व भक्तांसाठी राहण्याची व्यवस्था आहे. मंदिर समितीतर्फे भक्तांसाठी अन्नछत्रामध्ये रोज दुपारी व रात्री मोफत भोजनाची (प्रसादाची) व्यवस्था करण्यात आलेली आहे.श्री स्वामी समर्थ महाराज हे शके १७७९ च्या सुरुवातीला अक्कलकोट येथे आले. श्री दत्तात्रयाचे चौथे अवतार मानले गेलेल्या श्री स्वामी समर्थांचा एकूण कार्यकाळ ४० वर्षाचा आहे त्यापैकी २१ वर्षे त्यांचे वास्तव्य अक्कलकोट येथे होते.

इतिहासकारांच्या मते श्री स्वामी समर्थांचे अवतार कार्य शके १८०० मध्ये संपन्न झाले. पण तीन महिन्यानंतर स्वामी समर्थ काशी (वाराणशी) येथे प्रकट झाले. श्री स्वामी समर्थांची पवित्र समाधी त्यांचे शिष्य श्री चोळप्पा ह्यांचा घरात आहे. हे ठिकाण समाधीमठ असे ओळखले जाते. भक्तांना संकट प्रसंगी धीर व मानसिक बळ देणारे “भिऊ नकोस – मी तुझ्या पाठीशी आहे” हे घोष वाक्य श्री स्वामी सामार्थांचेच आहे.

**बार्शी-**

बार्शी शहर भगवंत मंदिरासाठी प्रसिध्द आहे. भगवंत मंदिर श्री विष्णुला समर्पित आहे. ह्या मंदिराचे वैशिष्ठ्य म्हणजे संपूर्ण भारतात श्री विष्णुला भगवंत या नावाने ओळखले हे एकमेव मंदिर आहे. हे मंदिर ई स १२४५ मध्ये हेमाडपंथी कला शैलीत बांधले गेले. मंदिराला चार दिशांनी चार प्रवेश द्वार आहेत पण मुख्य प्रवेश द्वार हे पूर्वाभिमुख आहे. गर्भ गृहा समोर गरुड खांब आहे. श्री भगवंताची मूर्ती काळ्या पाषाणाची असून भगवंताच्या हातात शंख, चक्र व गदा आहेत. राजा अंबरीश ची मूर्ती भगवंताच्या उजव्या हातास आहे. श्री लक्ष्मी भगवंताच्या पाठीमागे आहे. भगवंताच्या कपाळा वर शिवलिंग असून छातीवर भृगू रीशीच्या पायाचे ठसे आहेत.

मंदिराला श्री नानासाहेब पेशवे यांच्याकडून १७६० साली, इस्ट इंडिया कंपनी यांच्याकडून १८२३ साली व ब्रिटीश सरकारकडून १७८४ मध्ये इनाम मिळाल्याचे ईतिहास नोंदी आहेत. मंदिराची देख भाल पंच कमिटी मार्फत केली जाते. मंदिराच्या नित्य सेवा बडव्याकडून केली जाते. नित्य सेवांमध्ये सकाळी काकडा आरती, नित्य पूजा, महापूजा, संध्याकाळी धुपारती व रात्री शेजारती संपन्न होते. आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी एकादशी च्या पंढरपूरच्या यात्रा महोत्सवा दरम्यान मोठ्या संख्येने भक्त गण भगवंताचे दर्शन घेतात. आषाढी व कार्तिकी एकादशीच्या वेळेस भगवंताची गरुडावर बसून नगर प्रदक्षिणा केली जाते. प्रत्येक पौर्णिमाला छबिना काढला जातो.

**करमाळा -**

श्री कमला देवीच्या मंदिरामुळे करमाळा शहर प्रसिध्द झाले आहे. ह्या मंदिरात ९६ ह्या संख्येला विशेष महत्व आहे. श्री राव राजे निंबाळकर यांनी १७२७ मध्ये श्री कमला भवानीचे मंदिर बांधले. करमाळयाच्या कमला देवीच्या मंदिराला तुळजापूरच्या तुळजा भवानीचे दुसरे पीठ असे संबोधले जाते. हेमाड पंथी शैलीत बांधलेल्या ह्या

मंदिराला दक्षिणपूर्व व उत्तर दिशेला प्रवेश द्वार आहेत. ह्या मंदिराची विशेषता म्हणजे मंदिरासमोर असलेल्या विहिरीला ९६ पायऱ्या आहेत. मंदिरात ९६ ओवऱ्या आहेत. मंदिरातील छतावर ९६ चित्र रेखाटले आहेत. मंदिरात एकूण ९६ खांब आहेत. देवीचा नवरात्र उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. वार्षिक यात्रा कार्तिक पौर्णिमा ते चतुर्थी च्या काळात साजरा केला जातो.

**सारांश**:

सोलापूर जिल्हामधील वरील वेगवेगळया धार्मिक पर्यटन स्थळांचा अभ्यास केला असता असे स्पष्ट होते की,पंढरपूरचे विठ्ठल मंदिर संपूर्ण महाराष्ट्राचे,शेजारच्या कर्नाटक राज्याचे धार्मिक ठिकाण असून संपूर्ण भारतातून भाविक या ठिकाणी मोठ्या श्रद्धेने भेटी देत असतात. आषाढी वारी सर्वात मोठी पंढरपूर मधील वारी असून बरेच भावीक या ठिकाणी भेटी देत असतात. तसेच जिल्ह्याच्या ठिकाणी असलेली ग्रामदैवत सिद्धेश्वर हे देखील तेवढेच महत्त्वाचे असून दरवर्षी जानेवारी महिन्यामध्ये गड्डा यात्रा भरते, त्याचबरोबर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यामधील स्वामी समर्थांचे मंदिर देखील धार्मिक दृष्ट्या महत्त्वाचे असून या ठिकाणी देखील मनोभावाने भाविक भेटी देत असतात. तसेच बार्शीचा भगवंत मंदिर हे देखील महत्त्वाचे मंदिर असून या ठिकाणी देखील बरेच भाविक मोठ्या श्रद्धेने येत असतात. तसेच करमाळा तालुक्यातील तालुक्याच्या ठिकाणी कमला भवानी मातेचे मंदिर प्रसिद्ध असून यादेखील मोठा उत्सव साजरा केला जातो.

**संदर्भ**


1. https://solapur.gov.in
2. सोलापूर जिल्हा माहिती पुस्तिका
3. ए. बी. सौदी,पर्यटन भूगोल
4. विठ्ठल घारपुरेपर्यटन भूगोल
5. लक्ष्मण दत्तात्रय खंडागळे(2018) सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळे: एक अभ्यास
6. देशमुख रा. नी. आपला सोलापूर जिल्हा, कल्पना प्रकाशन नांदेड.

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No.15(A)** **Jan-Feb 2025**

# पृथ्वीवरील जैविक विविधता आणि पर्यावरनातील बदल एक भोगोलीक अभ्यास

**प्रा, डॉ.राठोड सूर्यकांत लालचांद**
भूगोल विभागश्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा
ता. उमरगा जिल्हा. धाराशिव.
**Corresponding Author: प्रा, डॉ.राठोड सूर्यकांत लालचांद**

**प्रस्तावना :-**

जैवविविधता बऱ्याच प्रमाणात भूभागाच्या हवामानावर अवलंबून असते. उदाहरणार्थ उष्णप्रदेशीय भागामध्ये जैवविविधता अधिक तर ध्रुवीय भागामध्ये विविधता कमी असते.झपाट्याने होणाऱ्या परिसरातील बदलांमुळे सजीव सामूहिकरित्या लुप्त होतात.पृथ्वीवर असलेल्या एकूण सजीवांपैकी एक टक्का सजीव लुप्त झाले आहेत. सजीवांची पृथ्वीवर निर्मिती झाल्यापासून आजपर्यंत पाच वेळा मोठ्या प्रमाणात आणि अनेक वेळा लहान प्रमाणात जैवविविधतेचा नाश झाला आहे. जैवविविधता ही पृथ्वीवरील जीवसृष्टीची जैविक विविधता आणि परिवर्तनशीलता आहे. जैवविविधता हे जनुकीय प्रजाती आणि परिसंस्थेच्या पातळीवरील भिन्नतेचे मोजमाप आहे. तलाव, तळे, नदी अश्या परिसंस्थांचा अभ्यास करून तेथे पाहण्यात आलेल्या जैवघटकांची माहिती मिळवल्यानंतर सजीवांमधील विविध जाती, परिसंस्था, बायोम किंवा पूर्ण पृथ्वीवरील विविधता आढळून येते. पृथ्वीवरील संजीवामध्ये अढळणाऱ्या विविधतेला जैवविविधता असे म्हणतात जैव विविदकता ही एक व्यापक संकल्पना आहे. जैवविविधता म्हणजे जातीची विविधता आणि जातीमधील संपन्नता होय. जीवशास्त्र प्रमाणे “जैव विविधता म्हणजे जणूकाची विविधता,जातीमधील विविधता आणि परिस्थे मधील विविधता होय.

पृथ्वीवर जैव विविधता तीनं प्रकारचे दिसून येतात.1जनुकीय विविधता 2 जाती विविधता 3 परिसंस्था विवधाता, जनुकीय विविधता संजीवच्या एखानद्या जातीच्या जणूकातील विविधतेचा अभ्यास या स्तरावर केला जातो.जैवविविधता ही पृथ्वीवरील जीवसृष्टीची जैविक विविधता आणि परिवर्तनशीलता आहे. जैवविविधता हे जनुकीय प्रजाती आणि परिसंस्थेच्या पातळीवरील भिन्नतेचे मोजमाप आहे. तलाव, तळे, नदी अश्या परिसंस्थांचा अभ्यास करून तेथे पाहण्यात आलेल्या जैवघटकांची माहिती मिळवल्यानंतर सजीवांमधील विविध जाती, परिसंस्था, बायोम किंवा पूर्ण पृथ्वीवरील विविधता आढळून येते. परिसंस्थेमधील विविधता हे परिसंस्थेच्या निकोपपणाचे एकक आहे. सजीवांची पृथ्वीवर निर्मिती झाल्यापासून आजपर्यंत पाच वेळा मोठ्या प्रमाणात आणि अनेकवेळा लहान प्रमाणात जैवविविधतेचा नाश झाला आहे. फेनेरोझोइक महाकल्पामध्ये (५४ कोटी वर्षांपूर्वी) जैवविविधतेचा महाविकास ‘कॅम्ब्रियनकल्पामधील विविधतेचा स्फोट’ या नावाने ओळखला जातो. ह्यात बहुपेशीय सजीवांमधील सर्व संघांची (फायलम) निर्मिती झालेली होती. त्यापुढील ४० कोटी वर्षांमध्ये जैवविविधतेचा पुन्हा पुन्हा नाश झालेला होता. ‘कार्बोनिफेरस’ युगामध्ये सदाहरित वनांमधील वनस्पती आणि प्राण्यांचा नाश झाला. ‘पर्मियन ट्रायासिक’ युगामध्ये २५ कोटी वर्षांपूर्वी झालेला जैवविविधतेचा नाश सर्वात मोठा होता. तीन कोटी वर्षांपूर्वी पृष्ठवंशी सजीवांनी पुन्हा एकदा आपला जम बसवला. साडेसहा कोटी वर्षांपूर्वी झालेला ‘क्रिटेशियस –टर्शरी विनाश’ हा नजीकच्या काळातील जैवविविधतेचा नाश होय. याच काळात डायनोसॉर नष्ट झाले. जैवविविधतेमध्ये माणसाचा प्रवेश झाल्यानंतर जैवविविधता आणि जनुकीय विविधता हळू हळू नाहीशी होत आहे. यास ‘हॉलोसिन विनाश’ असे म्हणले जाते. मानवी हस्तक्षेपामुळे अधिवास नष्ट झाल्याने जैवविविधतेचा अतोनात नाश होत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने जैवविविधतेच्या नाशाकडे लक्ष देण्यासाठी इसवी सनाचे २०११-२०२० हे दशक जैवविविधता दशक म्हणून जाहीर केले या आहे.इ.स.1968 मध्ये रेमांड एफ दासमान या अभ्यासकणे जैव विविधता ऊया शब्दाचा प्रथम प्रयोग केला आहे. हा शब्द त्याने “ए डिफरंट काइड ऑफ कंट्री” पुस्तकात विविधता टिकवून ठेवण्याच्या संदर्भात वापरला. यापूर्वी ‘नॅचरल डायव्हर्सिटी-नैसर्गिक विविधता’ अशी संज्ञा १९७५ सालापासून वापरात होती. पण १९८०मध्ये रॉबर्ट ई. जेनिन्स याने अमेरिकेत जैविकविविधता असा शब्द रूढ करण्याचा प्रयत्न केला. सध्या अमेरिकेत नॅचरल हेरिटेज असा शब्द वापरला जातो. या शब्दाची व्याप्ती जैवविधतेहून अधिक आहे.

अनेक पर्यावरणीय कारणाने जैवविविधतेचा नाश होत आहे.समूह विलोपन क्रियेमुळे जैवविविधतेमध्ये घट आणि वृद्धी हे प्रकार सजीवांच्या निर्मितीपासून चाललेले आहेत. जैवविविधता विलोपनामध्ये अधिवास बदल किंवा अधिवास नाहीसा होण्याचा मोठा धोका उद्भवतो.शहर

आणि जंगलामध्ये होत असलेली वृक्षतोड, लोकसंख्या वाढ, जंगलाच्या जमिनीमध्ये खाणकाम, हवा प्रदूषण, मृदा प्रदूषण आणि जलप्रदूषण याशिवाय जागतिक हवामान वाढ या सर्वांचा अधिवास बदलाशी संबंध येतो. अधिवासाचे क्षेत्रफळ आणि त्या अधिवासामध्ये असणाऱ्या जातींची संख्या परस्परांवर अवलंबून आहेत. त्यांतल्या त्यात आकाराने मोठ्या जाति व समुद्रसपाटीलगत असणाऱ्या जंगलातील जाति-अधिवासबदलास संवेदनक्षम आहेत. दक्षिण भारतातील सलग जंगलांचे पट्टे नष्ट झाल्याने पश्चिम घाट जंगलामधील अनेक प्राणी,पशू,पक्षी यांचे प्रमाण फार कमी होत गेले आहे. आज आपण पाहतो की जगलचे प्रमाण नष्ट होऊन त्याठिकाणी शहरे,औद्योगीकरण,वाहतूक, वसाहत,वस्ती, कारखाने,लोकसंख्या वाढ झाल्याने जंगले कमी झाल्याने जैविविधात लोप पावत आहे. आशा रहदारीमुळे जंगलातील प्राणी उन्हाळयात पीक क्षेत्रामध्ये घुसतात. मोठ्या प्रमाणात प्राण्याची जीवित हानी होत आहे.लोकसंख्येच्या गरजा वाढल्याने मोठ्या प्रमानात वृक्षतोड झाल्यानंतर पुनर्वनीकरणामध्ये अस्तित्त्वात असलेल्या सर्व वनस्पति परत कधीच लावता येत नाहीत. एकाच प्रकारच्या वृक्षांचे पट्टे लावण्याने त्या परिसरामध्ये असलेली विविधता नष्ट होते. जातींमधील विविधतेसाठी जातींमध्ये जनुकीय विविधता असणे आवश्यक आहे. एका घटकाचा अभाव म्हणजे दोन्हीमधील संतुलन संपणे. अशा वेळी परिसरामध्ये एकच जाति प्रबळ ठरते. पाळीव प्राण्यांच्या बाबतील हे सहज समजून येते. जैवविविधता म्हणजे जातीची विविधता आणि जातीमधील संपन्नता होय. जीवशास्त्र प्रमाणे “जैव विविधता म्हणजे जणूकाची विविधता,जातीमधील विविधता आणि परिस्थे मधील विविधता होय.

**जैवविविधता उद्दीष्टये :-**

1. जैवविविधता आणि पर्यावरण संरक्षण करणे. ऱ्हास
2. जैवविविधते सबंधी जनजागरण निर्मिती करणे.
3. पर्यावरण संतुलन ठेवण्यासाठी वृक्ष लागवड करणे

**जैविविधतेचा विस्तार**

जैवविविधता पृथ्वीवर समप्रमाणात पसरलेली नाही. पृथ्वीवरील जैवविविधतेमध्ये विस्ताराची विविधता आढळते. एवढेच नव्हे तर एकाच प्रदेशामध्ये सुद्धा सारखेपणा आढळून येत नाही. सजीवांमधील विविधता ही तापमान, पडणाऱ्या पावसाचे प्रमाण, समुद्रसपाटीपासूनची उंची, भूप्रदेशाचे गुणधर्म आणि सभोवती असलेल्या इतर सजीवांच्या अस्तित्त्वावर अवलंबून असते. अनेक उद्योगामध्ये सजीवापासून मोठ्या प्रमाणात मिळवलेल्या वस्तूंचा वापर होतो. घरे, कपडा, रंग, रबर आणि इंधन सर्वस्वी सजीवापासून मिळवले जातात. जैवविविधता पाणी, इमारती, लाकूड, कागद, तंतू आणि अन्न यांच्या पुनः पुनः निर्मितीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. जैवविविधतेचा ऱ्हास म्हणजे आर्थिक नुकसान. शाश्वत विकासाकडे वाटचाल करताना जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन वेळीच केले नाही, तर भविष्यात आर्थिक नुकसानीला तोंड द्यावे लागेल. जैवविविधतेची खरी किंमत एखाद्या प्रजातीचे तिथले पर्यावरण टिकवून ठेवण्यात किती योगदान आहे, त्या प्रजातीमुळे इतर जीवनावश्यक गोष्टींना कसा फायदा होतो, या बाबींचे विश्लेषण केल्यासच कळून येईल. अनेक प्रकारची झाडे-झुडपे, वेलींनी समृद्ध असे जंगल टिकून राहिले, तर फळ, मधमाशा, फुलपाखरे, पक्षी, प्राणी तर वाढतीलच; पण त्यामुळे परागीभवन होऊन आपल्या नारळी, पोफळी, आंबा, काजू यांसारख्या बागाही टिकून राहतील.

जैवविविधते मध्ये जगातील मोजक्या देशांपैकी भारत हा एक देश जैवविविधतेने नटलेला आहे.भारतात थरचे वाळवंट,हिमालय पर्वतावर हिरवीगार वृक्ष,सह्याद्री पर्वत,सूचिपर्णी ,तराईचे प्रदेश, विविध अरण्ये, समुद्र किनारी असलेली खारफुटीची राणे,अनेक द्वीपकल्पीय बेटे,असे विविधतेने पर्यावरण आज यामध्ये झालेला बदल दिसून येत आहे. सागराचे सान्निध्य, कमी-जास्त पर्जन्यमान, मृदाप्रकार, भूशास्त्रीय स्तर यांचा वनांवर झालेला परिणाम व त्यामुळे निर्माण झालेली विविधता याचा एकत्रित परिणाम म्हणून येथे अधिवासांची विविधता आहे. घाटमाथ्यांवरील जांभ्याची पठारे अधिवासांची विविधता आहे. घाटमाथ्यांवरील जांभ्याची पठारे दुर्दैवाने अशी पठारे लोह, बॉक्साईटसारख्या खनिजसंपत्तीने विपुल असल्याने खाणींची शिकार होत आहेत.

**जैवविविधता ऱ्हासाची कारणे**:-

1. मागील काही दशकात प्राणी,पक्षी,वनस्पति सूक्ष्मजीव यांच्या जाती नष्ट पावत आहे.
2. जाती नष्ट होण्यामगिल कारण म्हणजे त्यांच्या नैसर्गिक अधिवास लोप होत आहे.
3. डोंगराळ भागात वाढ होत असलेली लोक वस्ती, वाहतूक, उददयोग धंदे,या मुळे नष्ट होत आहे.

विशेषतः पश्चिम घाटात शहरीकरणामुळे जंगलाचे प्रमाण 50 टक्क्यापेक्षा जास्त नष्ट झाले आहे. त्यामुळेच माणसे आणि वन्यप्राणी यातील संघर्ष वाढीला लागला आहे. जुन्नरजवळ बिबट्या, भीमाशंकरजवळ रानडुकरे, सिंधदुर्गात हत्ती मनुष्यवस्तीत, बागायतीत धुडगूस घालत आहेत. 3) जैवविविधतेच्या ऱ्हासाचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे, आर्थिक फायदा नुकसानीच्या हिशोबाशी असणारे सरळ नाते दाखविण्यात आलेले अपयश. कदाचित म्हणूनच की काय, यातून धडा घेऊन कर्नाटकातल्या "अधनाशिनी' नदीच्या भोवताली वसलेल्या स्थानिक लोकांनी व मच्छीमारांनी जीवशास्त्राच्या शिक्षकांना नदीतील कालवे, तिसरे, शिंपले, मासे, झिंगे इत्यादींच्या अभ्यासास मदत केली. त्यातून असे लक्षात

आले, की यांच्या विक्रीतून होणारी आर्थिक उलाढाल वर्षाकाठी सुमारे पाच कोटी रुपये इतकी आहे. त्यामुळे नदी व परिसरातील जैवसंपदेचे नुसतेच संरक्षण व संवर्धनच साध्य झाले नाही तर प्रदूषणकारी कारखाने तेथून हटवावे लागले.भारतातील सर्व जीवसंपदा काही थोड्या राष्ट्रीय उद्याने व अभयारण्यातच फक्त सुरक्षित ठेवता येणार नाही. त्यासाठी संरक्षित केंद्रांचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. देवराया, शेती, नद्यातील डोह, पाणवठे एवढेच नव्हे, तर शहरांमधूनही (टेकड्या, शैक्षणिक संस्थांचे परिसर) जीवसंपदा आहे आणि त्याच्याही संरक्षणाची आवश्यकता आहे.

**अक्षवृत्तीय प्रवणता**[संपादन]

सामान्यपणे ध्रुवीय प्रदेशापासून विषुववृत्तीय प्रदेशापर्यंत जैवविविधता वाढत जाते. शून्य अक्षवृत्तीय प्रदेशामध्ये समुद्रसपाटीजवळ ती सर्वाधिक असते. विषुववृत्तीय प्रदेशात समुद्रसपाटीपासून उंचावर जैवविधता कमी असते. या प्रकारास जाति विविधतेमधील अक्षवृत्तीय प्रवणता असे म्हणतात. पर्यावरणातील अनेक घटकांचा विविधतेवर परिणाम होतो. पण सर्वाधिक परिणामकारक घटक तापमान हा आहे. कमीतकमी आणि सर्वाधिक तापमानातील फरक जेवढा अधिक तेवढी जैवविधता कमी.

**जैवविविधता समृद्ध क्षेत्र (हॉटस्पॉट)**[संपादन]

जैवविविधता समृद्ध क्षेत्र अशा ठिकाणांना "हॉट स्पॉट" म्हणावे ही कल्पना डॉ. सबिना विर्क यांनी १९८८मध्ये मांडली. म्हणजे ज्या ठिकाणी मोठ्या संख्येने स्थानिक जातींचे वस्तीस्थान आहे त्यास जैवविविधता समृद्ध क्षेत्र म्हणता येते. बहुतेक समृद्धक्षेत्रे ही मानवी वस्त्यांजवळ आहेत. समृद्धक्षेत्रे जगभर विखुरलेली असली तरी उष्ण कटिबंधातील वनांत आणि सदाहरित जंगलांत त्यांची संख्या सर्वाधिक आहे.ब्राझीलमधील अटलांटिक पर्जन्य-वन हे त्यांपैकी एक आहे. या वनामध्ये २०,००० प्रकारच्या वनस्पती, १३५० पृष्ठवंशी प्राणी आणि लक्षावधी कीटक आहेत. यातील निम्म्याहून अधिक असे आहेत, की ते इतरत्र कोठेही आढळत नाहीत. मादागास्कर बेटावर एकमेव अरण्य, मादागास्कर शुष्क वन आणि सपाटीवरील पर्जन्यवन आहे. मादागास्कर मूळ आफ्रिकन भूमीपासून साडेसहा कोटी वर्षांपूवी वेगळे झाल्याने या वनातील सजीवांमध्ये प्रदे शनिष्ठता दिसते. मादागास्करच्या भूमीवर अनेक जाती आणि परिसंस्था स्वतंत्रपणे विकसित झालेल्या आहेत. इंडोनेशियामधील १७००० बेटांनी १९,०४,५६० चौरस किलोमीटर क्षेत्र व्यापलेले आहे. या प्रदेशामध्ये जगातील १० टक्के सपुष्प वनस्पती, १२ टक्के पृष्ठवंशी प्राणी, १७ टक्के सरपटणारे प्राणी, पक्षी आणि उभयचर प्राणी असे २४ कोटी माणसांच्या वस्त्यांच्या सहवासात आहेत. समृद्ध जैवविविधता असलेले काही भाग वैशिष्ट्यपूर्ण प्रदेशनिष्ठ भागांपासून उगम पावलेले असल्याने त्यांच्यामध्ये नेहमीच्या बदलाहून वेगळे बदल घडून आलेले आहेत. उदाहरणार्थ उंच पर्वतावर असलेला आल्पीय प्रदेश किंवा उत्तर अमेरिकेतील दलदल (पिट बॉग). जैवविधतेचा अचूक अभ्यास हा असा अभ्यास करणाऱ्या वैज्ञानिकांच्या दृष्टिकोनावर अवलंबून असतो असे ध्यानात आले आहे.

**जैवविविधता विकास (उत्क्रांती)**[संपादन]

आज अस्तित्त्वात असलेल्या जैवविविधतेमागे ३५० कोटी वर्षांचा इतिहास आहे. सजीवांची नक्की निर्मिती केव्हा झाली हे जरी वैज्ञानिकांना सांगता आले नाही तरी पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर वीस ते तीस कोटी वर्षानंतर प्राथमिक रचना असलेले सजीव अस्तित्त्वात आले यावर वैज्ञानिक ठाम आहेत. साठ कोटी वर्षापूर्वी अस्तित्त्वात असलेले सजीव आदिजीव, जीवाणू असे एकपेशीय रचनेचे होते. चौपन्न कोटी वर्षांपूवी फॅनरोझोइक कल्पामध्ये झालेल्या कॅंब्रियन युगामध्ये जैवविधतेमध्ये प्रचंड वाढ झाली. या प्रकारास कॅंब्रियन एक्स्प्लोजन असे म्हणण्याची पद्धत आहे. कॅंब्रियन युगामध्ये बहुपेशीय सजीवांची निर्मिती झाली. पुढील ४० कोटी वर्षांमध्ये विविधतेमध्ये बहुतांशी अपृष्ठवंशी सजीव अधिक संख्येने होते. याच कालखंडात पृष्ठवंशी सजीव घातीय श्रेणीने वाढत गेले. या वाढीबरोबर अनेक पर्यावरणीय कारणाने जैवविविधतेचा नाश होत होता. समूह विलोपन क्रियेमुळे जैवविविधतेमध्ये घट आणि वृद्धी हे प्रकार सजीवांच्या निर्मितीपासून चाललेले आहेत. कार्बनिफेरस युगामध्ये झालेल्या विलोपनामध्ये पर्जन्यवने भूपृष्ठाखाली गाडली गेली. या काळात गाडल्या गेलेल्या जीवाश्मांवर उच्च दाब आणि कार्बन वेगळा होण्याच्या प्रक्रियेतून निर्माण झालेले दगडी कोळसा आणि क्रूड ऑइल आजच्या आपल्या इंधनाची ९०% गरज भागवत आहे. पंचवीस कोटी वर्षापूर्वी पर्मियन-ट्रायसिक युगाच्या संधिकालात झालेल्या विघटनाने जैवविविधतेची सर्वाधिक हानी झाली.(या काळात डायनोसॉर नष्ट झाले). या धक्क्यातून सावरण्यास पृष्ठवंशी सजीवाना तीन कोटी वर्षे लागली. गेल्या दोन-तीन कोटी वर्षांच्या जीवाश्मांच्या अभ्यासावरून असे आढळून आले आहे की आजच्या एवढी जैवविविधता कधीही अस्तित्त्वात नव्हती. सर्व वैज्ञानिकांना हे म्हणणे पूर्णपणे मान्य नाही. जीवाश्मीकरण हे सर्व सजीवांचे कधीही प्रातिनिधित्व करू शकत नाही हा त्यांचा आक्षेप आहे. काही वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार तीस कोटी वर्षांपूर्वीच्या आणि आजच्या जैवविविधतेमध्ये फारसा फरक नसावा. सध्याच्या सजीव जातींची संख्या दोन दशलक्ष ते शंभर दशलक्ष एवढी असावी. सर्व पर्यायांचा विचार करून सजीवांची संख्या १३० ते १४० लाखांपर्यंत पोहोचते. यांमधील संधिपाद प्राण्यांची संख्या सर्वाधिक आहे. ज्या ठिकाणी सजीवामध्ये संघर्ष कमी आहे म्हणजे निसर्ग निवडीच्या “फिटनेस”ला (डार्विनचा सिद्धान्त) सामोरे जावे लागत नाही अशा ठिकाणी जैवविविधता वृद्धिंगत होते.

**अधिकतम सजीव संख्या**[संपादन]

पृथ्वीवर एका वेळी सर्वाधिक किती सजीव राहू शकतील ही पृथ्वी ग्रहाची "सजीव धारण क्षमता" झाली. उदा. एका हेक्टरमध्ये अधिकतम किती गव्हाचे उत्पादन घेता येईल याची जीवशास्त्रीय मर्यादा गणिताने काढता येते.

जाती-विविधता किती असू शकेल याचा अंदाज काढता येतो. सागरी सजीवांची विविधता वृद्धिवक्र पद्धतीने तर भूमीवरील सजीवांची विविधता घातश्रेणीने वाढते. एका वैज्ञानिकाच्या म्हणण्याप्रमाणे चतुष्पाद प्राणी आजच्या घटकेला भूप्रदेशावरील ६४% प्रदेशातसुद्धा पोहोचलेले नाहीत. मानवी हस्तक्षेपाशिवाय चतुष्पाद सजीवांची वाढ अशा पद्धतीने होण्याची शक्यता आहे की सर्व प्रकारच्या परिसंस्थेमेध्ये चतुष्पाद पोहोचतील.याउलट फेनेरोझोइक कालखंडामध्ये जैवविविधतेच्या वाढीचा आलेख अपास्ताकार (हायपरबोलिक) आकाराचा दिसतो. पहिल्या स्तरातील धन पुनःप्रदाय पद्धतीने (पॉझिटिव्ह फीडबॅक) होतो. जेवढी पूर्वजांची संख्या अधिक तेवढी त्यापासून निर्माण होणाऱ्या पिढ्यांची संख्या अधिक. वृद्धीसाठी आवश्यक घटकांचा तुटवडा असल्यास सजीवांची विविधता ऋण पुनःप्रदाय पद्धतीने कमी होते. अपास्ताकार वाढीचे आणखी एक उदाहरण म्हणजे मानवी लोकसंख्येमधील वाढ. तंत्रज्ञानाच्या वाढीबरोबर आणि कृषी क्षेत्रामधील सुधारणामुळे अजून मानवी लोकसंख्या चरम वृद्धी संख्येपर्यंत पोहोचली नाही.मानवाच्या उदयाबरोबर आणखी एक विलोपन क्रिया चालू झाली आहे यावर बहुतेक वैज्ञानिकांचे एकमत होत आहे. यास होलोसीन मास एक्स्टिन्शन असे म्हणण्याची पद्धत आहे. होलोसीन या ग्रीक शब्दाचा अर्थ “आधुनिक” असा आहे. प्लाइस्टोसीन कालखंडाचा अस्त झाल्यानंतर होलोसीन युगाचा सुमारे ११,००० वर्षापूर्वी प्रारंभ झाला. इ.स.पू. १०,००० मध्ये कृषी व्यवस्थेचा प्रारंभ झाला. परिसरामध्ये तंत्रज्ञान आणि अवजारांच्या मदतीने बदल करून नैसर्गिक अधिवास मानवास राहण्यायोग्य बनवणे हे होलोसीन युगाचे वैशिष्ट्य. मानवी हस्तक्षेपामुळे सध्या विलोपन क्रिया एवढी झपाट्याने चालली आहे की फक्त १०० वर्षामध्ये इतर सजीवांचा नाश होण्याची शक्यता आहे.

**जैवविविधतेचा शाश्वत वापर**[संपादन]

जैवविविधता परिसंस्था टिकवून ठेवण्यास मदत करते. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन टिकून राहते.

**कृषि**[संपादन]

पिकांमधील विविधतेमुळे नेहमीचे पीक रोग किंवा किडीमुळे नष्ट झाल्यास पिकामध्ये हवे ते बदल घडवून आणण्यासाठी पिकांच्या वन्य जातींमधून इनब्रीडिंग करता येते.

- १८४६मध्ये आयरिश पोटॅटो ब्लाइट नावाच्या कवक जन्य बटाट्यावरील रोगाने ऐंशी टक्के बटाट्याचे पीक नष्ट झाले. आयरिश लोक अन्नासाठी केवळ बटाट्यावर अवलंबून असल्याने १८४४ मध्ये असलेल्या बटाट्याच्या उत्पन्नापेक्षा १९४६ मधील पीक केवळ वीस टक्के होते. दहा लाख लोक यानंतरच्या दुष्काळात मरण पावले आणि तेवढेच स्थलांतरित झाले. १९४६ पर्यंत बटाट्याच्या पिकासाठी केवळ दोन जातींचे बियाणे वापरात होते. हे बटाट्याचे दोन्ही वाण Phytophthora infestans या कवकास बळी पडणारे होते.
- १९६६मध्ये इंडिनेशियामधील भाताचे पीक ‘ राइस ग्रासी स्टंट व्हायरस’ या रोगामुळे नष्ट झाले. एका तपकिरी रंगाच्या तुडतुड्यापासून विषाणूचा प्रसार होतो. इंडोनेशियाचे प्रमुख अन्न भात असल्याने या विषाणूचा प्रतिकार करण्यासाठी १९७० मध्ये ६२७३ या भारतीय भाताचे वाण तपासण्यात आले. त्यातील केवळ एका भाताचे वाण विषाणूचा प्रतिकार करणारे निघाले. या एका भाताच्या वाणाचा इतर भातांशी संकर करून इंडोनेशिया, फिलिपाइन्स, चीन, जपान मधील भाताचे पीक यशस्वीपणे वाचविण्यात आले.
- १९७०मध्ये श्रीलंकेमध्ये पडलेल्या कॉफीवरील तांबेऱ्यामुळे तेथील सर्व कॉफीचे मळे नष्ट झाले. याचा परिणाम एवढा भयंकर होता की एकेकाळी कॉफी निर्यात करणाऱ्या श्रीलंकेचे राष्ट्रीय उत्पन्न चाळीस टक्क्यानी कमी झाले. त्यानंतर श्रीलंका हा केवळ चहा निर्यात करणारा देश अशी ओळख या देशाची झाली.

शेतीमध्ये अधिक उत्पादन मिळावे यासाठी एकच पीक विस्तृत क्षेत्रावर घेण्याची पद्धत आहे. कृषि व्यवसायातील बहुतेक अरिष्टे एकाच वाणाची निपज विस्तृत क्षेत्रावर केल्याने झालेले आहेत. यातील प्रमुख म्हणजे युरोपमध्ये १९व्या शतकातील मद्य उद्योगावरील संकट आणि अमेरिकेतील मक्यावरील रोगामुळे पडलेला १९७०चा दुष्काळ.

मानवी वापरासाठी असलेले ८०% अन्न फक्त वीस प्रकारच्या वनस्पतीपासून मिळविण्यात येते.पण त्याच्या ४०,००० जाती प्रत्यक्ष मानवी वापरात आहेत. यामध्ये निवारा, अन्न, फळे, औषधे, आणि वस्त्रप्रावरणे यांचा समावेश होतो. पृथ्वीवरील जैवविविधता वाढत्या लोकसंख्येची गरज अजून भागवत आहे यात शंका नाही पण मानवी वापराच्या जातींमधील विविधता झपाट्याने कमी होत आहे. याचा विचार करण्याची पाळी आली आहे.

**मानवी आरोग्य**[संपादन]

जैवविविधता आणि मानवी आरोग्य हे सध्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचे कारण होत आहे. जैवविविधतेच्या नाशामुळे पृथ्वीच्या आरोग्यावर परिणाम होत आहे यावर शास्त्रीय संशोधन झाले आहे. जागतिक हवामान बदलाचे कारण हे मानवी आरोग्यावर परिणाम करणाऱ्या अनेक कारणापैकी एक. रोगाचे वाहक आणि कारक असणाऱ्या सजीवांचा प्रसार, गोड्या पाण्याची कमतरता, कृषि उत्पादनामधील घट, कृषि उत्पादनामधील तोच तोच पणा वगैरे. एखादी जाति नष्ट झाल्यानंतर निसर्गतः त्यास पर्याय उपलब्ध असायचा. पण आता असे पर्याय कमी उपलब्ध होत आहेत. ज्या जाति टिकून राहत आहेत त्या नवीन पोषितामध्ये संक्रमित होत आहेत. जुनेच आजार नव्या दाद न देणाऱ्या आजारांत बदलले जात आहेत. बर्ड फ्लू, स्वाइन फ्लू आणि इन्फ्लुएंझा हे एकाच विषाणूचे बदललेले स्वरूप आहे. वेस्ट नाइल व्हायरस, लाइम आजार, हांटाव्हायरस असे नवीन विषाणू माणसामध्ये येण्यामध्ये

त्यांच्या मूळ पोषितामध्ये झालेले परिवर्तन कारणीभूत आहे.पाण्याची वाढती मागणी आणि पिण्यायोग्य पाणी उपलब्ध नसणे हा मानवी आरोग्याशी निगडित महत्त्वाचा प्रश्न बनलेला आहे. स्वच्छ पाण्याचे वितरण वाढले असले तरी अनेक देशामध्ये पाण्याचे स्रोत नाहीसे होत आहेत. २००८ च्या जागतिक लोकसंख्येच्या अभ्यासावरून निघालेल्या माहितीनुसार अविकसित राष्ट्रामधील फक्त ६२% व्यक्तीना स्वच्छ पिण्यायोग्य पाणी उपलब्ध आहे.जैवविविधतेशी संबंधित आणखी काहीं प्रश्न म्हणजे अन्न सुरक्षा आणि सकस अन्नाची उपलब्धता, संसर्गजन्य आजार, आरोग्य विज्ञान , औषधांची उपलब्धता , सामाजिक आणि मानसिक आरोग्य. जैवविविधतेमधून औषध निर्मिती, आणि नव्या औषधांचा स्रोत सतत उपलब्ध आहे. आजच्या घटकेस अमेरिकन औषध उद्योगातील ५०% औषधामध्ये वनस्पति , प्राणी किंवा जीवाणू, कवके यांचा प्रक्रियेमध्ये कोठेतरी वापर केलेला आहे. जगातील ८०% लोकसंख्या प्राथमिक आरोग्यसेवेसाठी नैसर्गिक उपचारपद्धति किंवा नैसर्गिक औषधावर अवलंबून आहे. आजपर्यंत फार थोड्या जातींचा त्यांच्या औषधी गुणधर्मांचा अभ्यास झालेला आहे. जैवविविधतेचा नव्या इलेक्ट्रॉनिक्स आणि बायालॉजी यांच्यापासून निघालेली संयुक्त शाखा 'बायॉनिक्स' मध्ये झपाट्याने वापर चालू आहे. १९८०नंतर औषध उद्योगामध्ये नव्या औषधांची निर्मिती कमी झाल्यासारखे वाटत होते. पण जनुकीय शास्त्र आणि मानवी जनुक प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नव्या रासायनिक औषधांच्या निर्मितीवर भर पडत आहे. सागरी जैवविविधतेवर आधारित औषध निर्मिती नव्याने तपासून पाहण्याची गरज उत्पन्न झाली आहे.

**औद्योगिक वापर**[संपादन]

अनेक उद्योगामध्ये सजीवापासून मोठ्या प्रमाणात मिळवलेल्या वस्तूंचा वापर होतो. घरे, कपडा, रंग, रबर आणि इंधन सर्वस्वी सजीवापासून मिळवले जातात. जैवविविधता पाणी, इमारती, लाकूड, कागद, तंतू आणि अन्न यांच्या पुनः पुनः निर्मितीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. जैवविविधतेचा ऱ्हास म्हणजे आर्थिक नुकसान.

**छंद, संस्कृती आणि सौंदर्यदृष्टी**[संपादन]

जैवविविधता आस्तित्वात असण्याने पक्षी निरीक्षण, फुलपाखरे निरीक्षण, वनस्पति आणि प्राण्यांमधील सहसंबंध यांचा अभ्यास असे छंद जोपासता येतात. जंगलातील आडवाटा तुडवणे, फुलांचे ताटवे न्याहाळणे अशा निसर्ग सहलीनी जो आनंद मिळतो तो जैवविविधता नष्ट करण्याने हिरावून घेतला जातो. शंभर वर्षापूर्वी फक्त पुस्तकांमध्ये वर्णन केलेला एखादा पक्षी किंवा फुलपाखरू किंवा एखादी औषधी वनस्पति आणि त्याची फुले परत एकदा पहावयास मिळावी याचा आनंद अवर्णनीय आहे. सध्या जंगलामधून केवळ वाघ पहायला किंवा हत्तीवरून जंगल तुडवणे यासाठी सफारी आयोजित केल्या जात आहेत. केन्यासारखा देश सिंह,झेब्रा,आणि, पाणघोडे पहाण्यासाठी जगभरातील पर्यटकाना आकर्षित करतो आहे.जैवविविधतेमुळे अनेल संगीतकार, चित्रकार, शिल्पी, लेखक आणि कलावंतामध्ये सौंदर्यदृष्टी आलेली आहे. अनेक संस्कृतीमध्ये जैवविविधता टिकवून राहणे म्हणजेच संस्कृति असा दृष्टिकोन उत्पन्न झाला आहे. राजस्थानसारख्या कमी पावसाच्या प्रदेशामध्ये खेजडी झुडूप आणि कृष्णमृग यांच्या रक्षणासाठी बिष्णोई जमातीनी प्राण गमावले आहेत. महराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि केरळमधील अनेक देवस्थानांच्या आश्रयाने वाढलेल्या देवरायामध्ये झाडाचे पानसुद्धा तोडायचे नाही अशा अलिखित नियमामुळे अनेक प्रजाति टिकून राहिलेल्या आहेत. बागामध्ये शोभेच्या वनस्पति लावणे, वाढवणे, औषधी वनस्पति उद्यान, घरगुति मत्स्यपालन, प्राणिसंग्रहालये, मत्स्यालये, अशा अनेक व्यबसासायांचा उगम जैवविविधतेमध्ये आहे. सर्वसामान्य व्यक्ती अशा छंदाना मनापासून प्रतिसाद देते. व्यावसायिकपणे दुर्मीळ प्राणी जोपासणे, त्यांना वाढवणे, दुर्मीळ पक्षी सांभाळणे त्याना परत निसर्गामध्ये सोडणे, त्यांचे संवर्धन अशा छंदांचे नेमके मूल्यमापन करणे हे कठीण काम आहे. पण केवळ निसर्गाच्या प्रेमापोटी काहीं संस्था हे काम पदरमोड करून करत आहेत. राजकीय दृष्ट्या ग्रीन पार्टी नावाचा पक्ष १९७०पासून जर्मनी, बेल्जियम, स्वीडन यांमध्ये पर्यावरणरक्षण या अजेंड्यावर काम करतो आहे. आज ही लाट युरोप आणि उत्तर अमेरिकमध्ये एक प्रभावी पक्ष बनली आहे.

**पर्यावरण सेवा**[संपादन]

जैवविविधतेमुळे अनेक पर्यावरण सेवा उपलब्ध झाल्या आहेत. या सेवा प्रत्यक्ष नसून अप्रत्यक्षपणे मानवी जीवन सुसह्य बनवतात. हवेच्या घटकांचे संतुलन, गोड्या पिण्याच्या पाण्याचे चक्र, यांचे मूल्यमापन अशक्य आहे. यामधील जैवविविधतेच्या मदतीची रुपयात किंवा डॉलरमध्ये किंमत केल्यास कोणत्याही प्रगत राष्ट्राला ती चुकवता येणार नाही. मृदेमधील अन्नघघटक चक्र, सुपीक जमीन तयार करणे, अशी कामे मानवी प्रयत्नांनी करायची ठरवली तर ते अशक्य आहे. केवळ संतुलितपणे ज्या सेवा जैवविविधतेमुळे मिळतात त्या अमूल्य आहेत.एकच उदाहरण द्यायचे तर ते कीटकाद्वारे करण्यात येणाऱ्या परागीभवनाचे द्यावे लागेल. कीटकांनी मानवास दिलेली ही देणगी पैसे खर्च करून करवून घ्यायची तर किती रक्कम द्यावी लागेल याचा विचारच केलेला बरा.

**सजीव जातींची संख्या**[संपादन]

जागतिक सजीव वर्गीकरण विभागाने आणि युरोपियन डिस्ट्रिब्यूटेड इंस्टिट्यूट ऑफ टॅक्सॉनॉमी या संस्थानी सजीवांच्या प्रत्येक वर्गातील (फायला) एकूण जातींचा २०१०मधील केलेला अंदाज प्रत्यक्षात असलेल्या जातीहून कितीकरी कमी असावा असे म्हणले आहे.

- १ ते कोटी कीटक

- अर्धा ते १ कोटी जिवाणू
- १५ लाख कवके
- १० लाख अष्टपाद
- सूक्ष्म जीवांची नक्की संख्या किती याचा अंदाज अजून आलेला नाही. जागतिक सागरी पाण्यातील सूक्ष्म जीवांची पाहणी केल्यानंतर असे आढळून आले की प्लवंगामधील सूक्ष्म जीवांमध्ये अधिक विविधता आहे. २००४-२००६मध्ये केलेल्या सूक्ष्म जीवांच्या अभ्यासानंतर सध्या 'जाति' या व्याख्येमध्ये ओळखले जाणाऱ्या सजीवांना काही मर्यादा आहेत.

सध्याचा जाति विलोपनाचा वेग वाढला आहे. हा वाढलेला वेग ध्यानात घेतला तर कित्येक जाति ओळखण्याआधी विलुप्त होण्याची शक्यता अधिक आहे.

**जाति विलोपनाचा वेग**[संपादन]

गेल्या शतकात जैवविविधतेमधील घट मोठ्याप्रमाणात लक्षात आली. २००७मध्ये जर्मन फेडरल प्रशासनातील एक मंत्री सिग्मार गॅब्रिएल यानी सध्या अस्तित्त्वात असलेल्या प्रजातीमधील ३०% प्रजाति २०५०पर्यंत नष्ट होतील असे विधान केले. यापैकी ठाऊक असलेल्या वनस्पतींपैकी एक अष्टमांश विलोपनाच्या मार्गावर आहेत. हा विलोपनाचा वेग दरसाल १,४०,००० जाती एवढा प्रचंड आहे. हा धोका मुख्यत्वेकरून पर्यावरणातील असंतुलित बदलांमुळे आहे. आजपर्यंत कधी नव्हे एवढ्या वेगाने विलोपनाचा वेग वाढला आहे यावर बहुतेक वैज्ञानिकांचे एकमत झाले आहे.

**जैवविविधतेस असणारे धोके**[संपादन]

अधिवास नाहिसा होणे, अतिशिकार, नव्या अधिवासात नव्या जातींचा प्रवेश, आणि द्वितीय विलोपन यामुळे जैवविविधतेस धोका उत्पन्न होतो असे जेअर्ड डायमंड या निसर्गतज्ज्ञाने वर्णन केले आहे. एडवर्ड ओ विल्सन यानी जैवविविधतेच्या धोक्याचे संक्षिप्त रूप हिप्पो असे केले आहे. हॅबिटॅट डिस्ट्रक्शन(अधिवास नाश), इन्व्हॅझिव स्पिशीज(नव्या ठिकाणी नको त्या जातीचा प्रवेश), ह्यूमन ओव्हर पॉप्युलेशन(मानवी लोकसंख्येची वाढ) आणि ओव्हर हार्वेस्टिंग(कृषि क्षेत्राची अनिर्बंध वाढ) असे केले आहे. "इंटरनॅशनल युनियन ऑफ कॉन्झरव्हेशन ऑफ नेचर"(आययूसीएन) या आंतरराष्ट्रीय संघटनेनुसार हे सर्व जैवविविधतेचे प्रत्यक्ष धोके आहेत.

**अधिवास बदल**[संपादन]

जैवविविधता विलोपनामध्ये अधिवास बदल किंवा अधिवास नाहीसा होण्याचा मोठा धोका उद्भवतो. सहाहरित जंगलामध्ये होत असलेली वृक्षतोड, लोकसंख्या वाढ, जंगलाच्या जमिनीमध्ये खाणकाम, हवा प्रदूषण, मृदा प्रदूषण आणि जलप्रदूषण याशिवाय जागतिक हवामान वाढ या सर्वाचा अधिवास बदलाशी संबंध येतो. अधिवासाचे क्षेत्रफळ आणि त्या अधिवासामध्ये असणाऱ्या जातींची संख्या परस्परांवर अवलंबून आहेत. त्यांतल्या त्यात आकाराने मोठ्या जाति व समुद्रसपाटीलगत असणाऱ्या जंगलातील जाति-अधिवासबदलास संवेदनक्षम आहेत. दक्षिण भारतातील सलग जंगलांचे पट्टे नष्ट झाल्याने पश्चिम घाट जंगलामधील हत्ती उन्हाळ्यात पीक क्षेत्रामध्ये घुसतात. ऊस हे त्याना त्यांचे नैसर्गिक खाद्य वाटल्याने ते तेथेच राहतात. त्याना हुसकून लावण्याचा प्रयत्न केल्यास ते परत परत तेथेच येत राहतात. मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्यानंतर पुनर्वनीकरणामध्ये अस्तित्त्वात असलेल्या सर्व वनस्पति परत कधीच लावता येत नाहीत. एकाच प्रकारच्या वृक्षांचे पट्टे लावण्याने त्या परिसरामध्ये असलेली विविधता नष्ट होते. नॅशनल सायन्स फाउंडेशन यानी केलेल्या २००७मधील अभ्यासामधून असे समजले की जैवविविधता आणि जनुकीय विविधता यांचा परस्पर संबंध आहे. जातींमधील विविधतेसाठी जातींमध्ये जनुकीय विविधता असणे आवश्यक आहे. एका घटकाचा अभाव म्हणजे दोन्हीमधील संतुलन संपणे. अशा वेळी परिसरामध्ये एकच जाति प्रबळ ठरते. पाळीव प्राण्यांच्या बाबतील हे सहज समजून येते. पशुपालनासाठी राखीव कुरणे म्हणजे फक्त दूध किंवा मांसासाठी जनावरे पाळणे. हाच प्रकार कृषिव्यवस्थेमध्ये घडतो. उत्पादन घटण्याच्या भीतीने दुसरी वनस्पति म्हणजे तण शेतामध्ये वाढू दिले जात नाही.

**जैवविविधता उद्दिष्टे**[संपादन]

पर्यावरण संरक्षण आणि जैवविविधता संवर्धन कायदा १९९९ वाणाचा ऱ्हास

**संदर्भ आणि नोंदी**[संपादन]


1. Gaston, K. J. (*2000-05-11*). "Global patterns in biodiversity". Nature. ***405** (6783):* 220–*227.* doi*:10.1038/35012228.* ISSN *0028-0836.* PMID *10821282.*
2. Dasmann, Raymond Fredric (*1968*). A Different Kind of Country *(इंग्रजी भाषेत).* Collier Books.


वर्ग:

- जीवन
- जैवसंपदा
- या पानातील शेवटचा बदल १० नोव्हेंबर २०२४ रोजी ११:२२ वाजता केला गेला.
- येथील मजकूर हा क्रियेटीव्ह कॉमन्स अट्रीब्युशन-शेअरअलाईक लायसन्स अंतर्गत उपलब्ध आहे; अतिरिक्त अटी लागू असू शकतात. हे संकेतस्थळ वापरुन आपण याच्या वापरण्याच्या अटी आणि गोपनीयता धोरणांचे पालन करण्यास आपली सहमती देत आहात. Wikipedia® हे Wikimedia Foundation, Inc. एक ना-नफा ना-तोटा संस्थेचे नोंदणीकृत ट्रेडमार्क आहे.
- गुप्तता नीती
- विकिपीडिया बद्दल
- उत्तरदायित्वास नकार
- Code of Conduct
- विकसक
- Statistics
- कुकिंचा तक्ता
- भ्रमणध्वनी-दृश्य

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# अक्कलकोट नगरीतील श्री स्वामी समर्थ –राजेराय मठ या धार्मिक पर्यटनस्थळाचा एक भौगोलिक अभ्यास

**श्री धूळोबा बाळू वाघमोडे[1] डॉ. अंकुश शंकर शिंदे[2]**
[1]एम.ए. (भूगोल), श्री.छत्रपती शिवाजी महाराज महाविद्यालय, उमरगा , जिल्हा- उस्मानाबाद.
[2]प्राध्यापक, सी. बी. खेडगीज् बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स आणि राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट. जिल्हा- सोलापूर
**Corresponding Author: श्री धूळोबा बाळू वाघमोडे[1]**
**Email:** wdhuloba@gmail.com

**सारांश :**

मराठा साम्राज्याच्या काळातील ऐतिहासिक ठिकाण आणि श्री स्वामीसमर्थांचे पावित्र्य स्थान म्हणून ओळखले जाणारे अक्कलकोट नगर हे अक्कलकोट तालुक्यात येत असून सोलापूर जिल्ह्यात क्षेत्रफळाच्या बाबतीत तालुक्याचा ६ वा क्रमांक लागतो. हा तालुका महाराष्ट्र –कर्नाटक राज्याच्या सीमेवर स्थित असून ते सोलापूर जिल्ह्याच्या आग्रेय भागात असून कोरड्या स्वरूपाच्या बोरी नदी व हरणा नदी खोऱ्यात वसलेले आहे. उत्तरेला उस्मानाबाद जिल्हा, पूर्वेला कर्नाटकचा विजापूर जिल्हा आणि पश्चिमेला दक्षिण सोलापूर तालुका आहे. याचे भौगोलिक क्षेत्रफळ १४०१ चौरस किमी आहे. याचा अक्षवृत्तीय विस्तार १७˚१७'५४" उत्तर ते १७˚४४'३" उत्तर आणि रेखावृत्तीय विस्तार ७५˚५३'४२" पूर्व ते ७६˚२५'४३" पूर्व आहे. अक्कलकोट तालुक्याचे हवामान कोरडे आणि उष्ण आहे. येथील दैनिक तापमान उन्हाळा ऋतूत तापमान कधीकधी ४४° से. ते ४५° से. पर्यंत जाऊ शकते. हिवाळा ऋतूत तापमान १४° से. पर्यत येते. सन २०११ नुसार पर्जन्यमान ६७६.३ मिमी आहे. या तालुक्यात जलसिंचन सुविधा कमी असून येथील प्रादेशिक विकास इतर तालुक्याच्या दृष्टीने कमी झाल्याचे दिसून येते. हा तालुका कर्नाटक व महाराष्ट्र सीमेवर असल्याने येथे दोन्ही राज्यांची संस्कृती दिसून येते. अक्कलकोट हे दत्त संप्रदायाचे एक महत्त्वाचे केंद्र असून स्वामीं समर्थांचे मंदिर आहे. स्वामी समर्थाचे पावन नगर म्हणून अक्कलकोट नगरीमध्ये येणाऱ्या भाविक-पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली दिसून येते. मागील १० वर्षाच्या कालखंडात येथे विविध उपहारगृहे, हॉटेल्स, खाणावळी, लॉजिंग अँड बोर्डिंग, स्टे-हौसिंग यांची संख्या वाढत चाललेली आहे. या संशोधन पत्रिकेमध्ये अक्कलकोट नगरीतील श्री स्वामी समर्थ - राजेराय मठ या धार्मिक स्थळाचा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून झालेला विकास अभ्यास करण्यात येत आहे.

**बीजसंज्ञा :-** पर्यटन स्थळ, धार्मिक पर्यटन, राजेराय मठ, सेवाभाव, पर्यटन

**प्रास्ताविक :**

प्राचीन काळी भारतीय समाजात पर्यटन अस्तित्वात होते. भारतात सिंधु संस्कृतीपासुन व्यापार, धर्म, संस्कृती, तत्वज्ञान इ. अनेक कारणांनी पर्यटन झाले आहे. मौर्य कालखंडात मॅगेस्थेनिस हा प्रवासी भारतात आला. सम्राट अशोकाने बौध्द भिक्खुंना भारतातील विविध भागात आणि भारताच्या शेजारील देशात बौध्द धर्माच्या प्रसारासाठी पाठविले होते. भारतीय धर्म, संस्कृती, शिक्षण, कला, यांच्या अभ्यासासाठी अनेक परकिय पर्यटकांनी भारतात प्रवास केला त्यामध्ये हुएन त्संग, इत्सिंग अल्बेरुनी इ. ची नावे सांगता येतील. भारतीय पर्यटनात प्राचीन काळापासुन धार्मिक पर्यटनाला अनन्यसाधरण महत्त्व आहे. कारण धार्मिक स्थळांना भेटी दिल्याने आत्मिकशांती प्राप्त होते. अशी भारतीयांची भावना आहे. धार्मिक स्थळांच्या ठिकाणी गेल्याने मोक्ष प्राप्ती होते. जिवनाचे साफल्य हाते. त्यामुळे मोठया प्रमाणात भारतात धार्मिक पर्यटन केले जाते. अक्कलकोट हा तालुका कर्नाटक व महाराष्ट्र सीमेवर असल्याने येथे दोन्ही राज्यांची संस्कृती दिसून येते. अक्कलकोट हे दत्त संप्रदायाचे एक महत्त्वाचे केंद्र असून स्वामीं समर्थांचे मंदिर आहे. स्वामी समर्थाचे पावन नगर म्हणून अक्कलकोट नगरीमध्ये येणाऱ्या भाविक-पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली दिसून येते. मागील १० वर्षाच्या कालखंडात येथे विविध उपहारगृहे, हॉटेल्स, खाणावळी, लॉजिंग अँड बोर्डिंग, स्टे-हौसिंग यांची संख्या वाढत चाललेली आहे. या संशोधन पत्रिकेमध्ये अक्कलकोट नगरीतील श्री स्वामी समर्थ – सद्‌गुरू बेलानाथ बाबांचा राजेराय मठ या धार्मिक स्थळाचा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून झालेला विकास अभ्यास करण्यात येत आहे.

**अभ्यास क्षेत्र**

सोलापूर जिल्ह्यात क्षेत्रफळाच्या बाबतीत अक्कलकोट तालुक्याचा ६ वा क्रमांक लागत असून हा

तालुका महाराष्ट्र –कर्नाटक राज्याच्या सीमेवर स्थित असून ते सोलापूर जिल्ह्याच्या आग्नेय भागात असून कोरड्या स्वरूपाच्या बोरी नदी व हरणा नदी खोऱ्यात वसलेले आहे. उत्तरेला उस्मानाबाद जिल्हा, पूर्वेला कर्नाटकचा विजापूर जिल्हा आणि पश्चिमेला दक्षिण सोलापूर तालुका आहे. अक्कलकोट शहराचे स्थान १७°३२' उत्तर अक्षांश आणि ७६°७५' पूर्व रेखांशावर आहे. या शहराची समुद्रसपाटीपासून उंची ४५१ मीटर आहे. या शहराने सुमारे ४.४२ चौरस किलोमीटर इतके क्षेत्र व्यापलेले आहे. अक्कलकोट हे उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर व उमरगा हे तालुक्याच्या सीमेवर आहे. या तालुक्याच्या पूर्वेला आणि दक्षिणेला कर्नाटक राज्याचे सीमा आहे. अक्कलकोट हे धार्मिक पर्यटन स्थळ स्वामी-समर्थामुळे झाले आहे. अक्कलकोट तालुक्याचे व शहराचे हवामान कोरडे आणि उष्ण आहे. येथील दैनिक तापमान उन्हाळा ऋतूत तापमान कधीकधी ४४° से. ते ४५° से. पर्यंत जाऊ शकते. हिवाळा ऋतूत तापमान १४° से. पर्यत येते. सन २०११ नुसार पर्जन्यमान ६७६.३ मिमी आहे. या तालुक्यात जलसिंचन सुविधा कमी असून येथील प्रादेशिक विकास इतर तालुक्याच्या दृष्टीने कमी झाल्याचे दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. अक्कलकोट पुण्यनगरीमधील मधील राजेराय मठ या धार्मिक स्थळाकडे येणाऱ्या पर्यटकाचे अभ्यास करणे .
2. श्री स्वामी समर्थ –राजेराय मठामधील धार्मिक स्थळाचे ऐतिहासिक महत्त्व व यांचा अख्यायिका अभ्यासणे
3. श्री स्वामी समर्थ -राजेराय मठामधील उपलब्ध सर्व सुविधांचा अभ्यास करणे

**मर्यादा :**

सदरचे संशोधन अभ्यास हे अक्कलकोट तालुक्यातीअक्कलकोट पुण्यनगरीतील श्री स्वामी समर्थ –राजेराय मठ या धार्मिक स्थळाचा एवढेच व्यापक असून महादेव मदिराचा धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीकोनातून अभ्यास केलेला आहे. तसेच या स्थळाच्या परिसरातील आर्थिक परिस्थिती तसेच व्यावसायिक दृष्ट्या सामाजिक जीवनावर झालेला परिणाम, वाहतूक सुविधा यांचा अभ्यास केलेला आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर केलेला आहे. लिखित व अलिखित साधनांच्या आधारे माहिती मिळवली तसेच संशोधन क्षेत्रास प्रत्यक्ष भेट देऊन येणाऱ्या भाविक पर्यटकाची मुलाखतीच्या माध्यमाने प्रश्नावली भरून घेऊन त्यातून निष्कर्ष काढलेले आहेत. तसेच परिसरातील प्रत्येक घटकाचे प्रत्यक्ष निरिक्षण (सर्वेक्षण) करून त्यासंबंधी उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**विश्लेषण**

**श्री स्वामी समर्थ -राजेराय मठाची स्थापना, इतिहास आणि पार्श्वभूमी :-**

श्री स्वामीसमर्थांनी अक्कलकोट पुण्यनगरीत धार्मिक सेवाभाव करत असताना अनेक लीला-चमत्कार करून भक्तांचे दु: ख वेदना कमी केल्या आहेत. त्यातीलच एक लीला म्हणून राजेराय मठ स्थापन झालेला आहे.

श्री स्वामी-समर्थांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या. अक्कलकोट नगरातील स्वामी महाराजांच्या इच्छेने बांधलेला मठ म्हणजेच श्री राजेराय मठ होय. या मठात स्वामी महाराजांच्या चैतन्य पादुकांचे मंदिर आणि सद्‌गुरु बेलानाथ बाबांचे वास्तव्य स्थान असलेले मठ असून तो हैदराबाद संस्थानाच्या एका श्री शंकरराव राजेराय रायबहाद्दूर जहागीरदाराकडून बांधला गेला आणि चैतन्य पादुकाची स्थापना इ. स. १८७७ साली झाली. श्री शंकरराव राजेराय रायबहाद्दूर यांना कुष्ठव्याधी झाल्यावर ते बरे होण्यासाठी ते गाणगापूर येथे अनुष्ठान करत असताना त्यांना श्री दत्त महाराजांचा "मी अक्कलकोटात श्री स्वामी समर्थांच्या रुपात आहे, तिकडे ये." असा दृष्टांत झाला आणि ते अक्कलकोट मध्ये आले. त्यांना श्री स्वामी समर्थाच्या अवतार कार्याझाली. ची महती कळाली आणि त्यांनी आपली व्याधी निरसन होण्याकरीता त्यांनी भक्तांसमोर श्री चरणी दशसहस्त्र रुपये वाहण्याचा संकल्प केला पुढे त्यांची व्याधी बरी झाल्यावर स्वामी समर्थांच्या चरणावर दशसहस्त्र रुपये अर्पण करत असताना त्यांना श्री स्वामी समर्थांनी या पैशातून गावाबाहेर श्रीराम मंदिराजवळ चुनेगच्ची मठ बांधून त्यात पादकांची स्थापना करा , असे सांगितले. अशा प्रकारे हा मठ बांधला गेला असून त्यात चैतन्य पादुकांची स्थापना केली. म्हणजेच श्री स्वामी समर्थांच्या हयातीतच हा मठ बांधला गेला. त्यामुळे श्री स्वामी समर्थांचे विश्रांतीस्थान म्हणून या मठाची वेगळी ओळख पहावयास मिळते.

महाराजांची समाधी झाल्यानंतर इ.स. १८७८ ते १९५३ या सालापर्यंत हा राजेराय मठ दुर्लक्षित राहिला होता. गावापासून दूर असल्यामुळे आणि येणाऱ्या भक्तांचे प्रमाण अल्प असल्यामुळे तो सुमारे ७५ वर्षापर्यंत अडगळीत राहिला होता. तेथे फक्त पादुका आणि स्वामी समर्थ महाराजांचा प्रवेशद्वार महादरवाजा शिल्लक राहिले होते. इ.स.१९५३ ला एक बाळ साधू विश्व भ्रमण करत अक्कलकोटला आले. त्यांनी मठाची दुरवस्था पाहिल्यावर येथेच वास्तव्य करून मठाचा जीर्णोद्धार केला. त्यांनी श्री स्वामी समर्थ आणि श्री सी बाबाप्रमाणे धार्मिक कार्यास सुरवात केली. हळूहळू मठाचा कायापालट होऊन मंदिरासमोर सभामंडप व खोल्या बांधल्या. इ.स. १९९६ चंपा सृष्टीच्या दिवशी मूर्तीची स्थापना केली आणि ते बाळ साधू पुढे सद्‌गुरु बेलानाथ बाबा म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे इ.स .२००३ मध्ये ट्रस्ट स्थापन करून विश्वस्थांच्या हाती कारभार सोपवून समाधिस्थ झाले.




**राजेराय मठातील धार्मिक सेवाभाव व सुविधा**

1. **लॉजिंग आणि बोर्डींग** :- राजेराय मठाने सुरवातीस भक्तासाठी भक्त निवास बांधले त्यात एकूण ३० खोल्यांची रचना केली आहे. तर अलीकडेच नवीन बांधलेल्या बेलानाथ मातृ भवन ४५ खोल्यांची रचना केली आहे. त्यापैकी काही खोल्या वातानुकुलीत असून प्रशस्त आणि हवेशीर आहेत.
2. **मोफत महाप्रसाद/ अन्नदान** :- राजेराय मठाकडून येणाऱ्या सर्व भक्तांना मोफत सकाळच्या वेळेला मोफत चहा-नाष्ठा अल्पोपहार , दुपारच्या आणि रात्रीच्या वेळेला महाप्रसाद दिला जातो. येणारा आणि निवास करणारा भक्त समाधानी होतो. अक्कलकोट येथील ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना आणि त्यांच्या सोबत असणाऱ्यानां देखील अन्नदानाची सोय केली जाते.
3. **दत्तक विद्यार्थी योजना :** राजेराय मठात काही विद्यार्थी सेवेकरी म्हणून मठाची सेवा करत असताना ते महाविद्यालयीन शिक्षण देखील पूर्ण करतात. त्यांच्या राहण्याची आणि भोजनाची व्यवस्था देखील माथाकडून केली जाते. राजेराय मठाचे ट्रस्टचा माध्यमातून दरवर्षी सुमारे १५-२० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शैक्षणिक काळ पूर्ण होईपर्यंत दत्तक घेतले जाते .विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च दिला जातो आणि महाविद्यालयीन गणवेशाचा खर्च दिला जातो.
4. **धार्मिक उत्सव -: जयंती साजरी ,**श्री स्वामी समर्थ प्रकटदिनी, श्रीराम नवमी ( चैत्र शुद्ध नवमी ), हनुमान जयंती ( चैत्र शुद्ध पौर्णिम , श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी ( चैत्र वैद्य त्रयोदशी), गुरु पौर्णिमा व्यासपूजा ) , आषाढ पौर्णिमा (, श्री दत्त जयंती मार्ग )शीर्ष पौर्णिमा ( महाशिवरात्रीया दिवशी भक्तांची गर्दी असते. हजारोच्या संख्येत भाविक –पर्यटक येऊन महाप्रसाद घेतात. सर्वधर्म समभावाचा आणि विविध जाती धर्माच्या लोकांचा समावेश असतोसकाळच्या पूजा . अर्चना वेळी आलेले भाविकांना मंदिराच्या गाभाऱ्यात मंदिराची पूजा भक्तांकडूनच करून .प्रवेश मिळतो .घेतली जाते
5. **पर्यावरण संरक्षित राजेराय मठ** :- राजेराय मठाच्या परिसरात महादेवाच्या शिवलिंगामागे बेलाचा झाड आहे .मंदिराच्या पुढच्या बाजूला पिंपळाचा वृक्ष आहे . .व बाजूला कडुनिंबाचा आणि उंबऱ्याचा वृक्ष आहेत

मंदिराच्या बाहेरच्या बाजूला एक विहीर आहे. सुरवातीस अक्कलकोट नगरीमधील बरेचसे लोक पूजेचे साहित्य आणून विहिरात फेकत होते आणि विहीर गाळाने भरून गेली होती. अशा वेळी मठाच्या विश्वस्ताने करारपत्रावर विहीर ताब्यात घेऊन तिचे सुशोभीकरण केले. तिला कुंपणाचे जाळे मारले आणि विहिरचे जल-पुनर्भरण केले. विहिरीच्या बाजूला नैसर्गिक रम्य असा बगीचा निर्माण केला आहे. भाविक- पर्यटकांना बसण्याची व्यवस्था केली आहे. यामुळे राजेराय मठाच्या सौंदर्यात आणखी भर पडली आहे.



श्री राजेराय मठ येथील विहीर

**श्री राजेराय मठ येथील निवडक भाविक पर्यटकाचे प्रश्नावली व मुलाखतीच्या साह्याने करण्यात आलेले अवलोकन (एकूण १५०)**

| अ. क्र. | **धर्मानुसार वर्गीकरण** | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | १२९ | ८६.०० |
| | बिगर हिंदू धर्मीय | २१ | १४.०० |
| | | | |
| २ | **लिंग गुणोत्तारानुसार वर्गीकरण** | | |
| | पुरुष | ८० | ५३.३३ |
| | स्त्रिया | ७० | ४६.६६ |
| | | | |
| २ | **शैक्षणिक स्तर** | एकूण संख्या | टक्केवारी |
| | उच्च पदवीत्तर | ४५ | ३० |
| | १० वि व १२ वी पास | ४२ | २८ |
| | माध्यमिक शाळा | ३८ | २५.३३ |
| | न शिकलेले | २५ | १६.६६ |
| | | | |
| ३. | **व्यवसाय** | एकूण संख्या | टक्केवारी |
| | शेती शेतकरी , पशुपालन , | २० | १३.३३ |
| | कुशल कारागीर | १५ | १०.० |
| | शिक्षक ,/ नोकर / कामगार | ६० | ४०.० |
| | व्यापारी दुकानदार , | २५ | १६.६६ |
| | न व्यवसाय करणारे लोक | ३० | २०.० |

(प्रत्यक्ष सर्वेक्षण )

दररोज या मंदिराला येणाऱ्या भाविकांपैकी ८६%पेक्षा जास्त भाविक हिंदुधर्मीय असून १४% पेक्षा इतर धर्मीय भाविक मंदिराला भेट देतात. दररोज येणाऱ्या भाविकांमध्ये पुरुषांचे प्रमाण ५४% असून स्त्रियांचे प्रमाण ४६% आहे. शैक्षणिक स्तरानुसार उच्च लोकांचे प्रमाण ३०% , दहावी व बारावी पास असलेल्या लोकांचे प्रमाण २८% माध्यमिक शाळांत लोकांचे प्रमाण २५.३३% आणि न शिकलेले लोकांचे प्रमाण १६.१६ % इतके आहे. तसेच शेतकरी पशुपालन करणाऱ्या लोकांचे प्रमाण १३.१३% , गवंडी, सुतार, कुंभार, बिगारी सारख्या व्यवसाय करणाऱ्या लोकांचे प्रमाण १०% , कामगार , शिक्षक लोकांचे प्रमाण ४०.० %, व्यापारी, अडत, छोटे मोते दुकानदार, भाजीविक्रेते यासारख्या लोकांचे प्रमाण १६.६६% व कोणताच व्यवसाय न करणारे बेरोजगार लोकांचे प्रमाण २०.० % इतके आहे.

**शिफारशी :**

1. श्री स्वामी समर्थ – राजेराय मठ जुनाट जरी असला तरी आज त्याचे नुतनीकरण झाल्याचे पहावयास मिळते.
2. श्री स्वामी समर्थ – राजेराय मठाचे भौगोलिक स्थान आज अक्कलकोट शहरच्या मध्यवर्ती भागात आले आहे. त्यामुळे भाविकांना सहज येता येईल असे मोठे रस्ते निर्माण होणे आवश्यक आहे. वाहनतळाची आवश्यकता आहे.
3. एक धार्मिक पर्यटन ठिकाण म्हणून पर्यावरणीय दृष्टीकोनातून याचा विकास साधण्यात यावा.
4. मठाचा इतिहास व त्यांचे महत्व पटवून देण्यासाठी स्वतंत्र मार्गदर्शक असावा.

**संदर्भ ग्रंथ :**


1. पर्यटन भूगोल: राजेश शुक्ला, रश्मि शुक्ला
2. पर्यटन भूगोल : प्रा. खतीब .ए.के
3. पर्यटन भूगोल : संकल्पना व व्यवस्थापन
4. पर्यटन भूगोल: डॉअंकुश आहेर ., प्रामारकड .एम .डी .
5. सारंग मोहनदेव जोशी महादेव मंदिर पुजारी:

Dr Ankush Shinde and Sau Sumitrabai Rathod “उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील उमरगा शहरातील हेमाडपंथीय श्री महादेव मंदिर या धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून अभ्यास” International Journal of Advance and Applied Research (IJAAR) Impact Factor – 7.328 ISSN – 2347-7075 .Vol.4, Issue 8 March-April 2023

Dr. Ankush Shinde, Shri Mahendra kasabe , Shri Sudhakar Kamble “सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील वडवळ येथील नागनाथ मंदिराचा एक धार्मिक पर्यटन स्थल म्हणून अभ्यास” Journal of Advance and Applied Research (IJAAR) Impact Factor – 7.328 ISSN – 2347-7075 .Vol.4, Issue 8 March-April 2023

Dr. Arjun Wagh & Dr. Ankush Shinde ***Geo-Historic Study of Fort Tourism in District Satara of Maharashtra ; An Overview*** Journal of Advance and Applied Research (IJAAR) Impact Factor – 7.328 ISSN – 2347-7075.Vol.4, Issue 8 March-April 2023

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# लातूर जिल्ह्यातील पाळीव प्राण्यांचे विश्लेषण :- एक पर्यावरणीय अभ्यास

डॉ.एन.एस.गौंड[1]डॉ.बी.टी.पाटील[2]
[1]सहयोगी प्राध्यापक, भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकुर तालुका चाकूर जिल्हा लातूर
[2]सहाय्यक प्राध्यापक, महात्मा फुले महाविद्यालय, मुखेड तालुका मुखेड.जिल्हा नांदेड.
Corresponding Author: डॉ.एन.एस.गौंड

**सांराश:-**

मानवी भूगोल ही भूगोल शास्त्राची अतिशय महत्वपूर्ण शाखा आहे. मानवाच्या कर्तृत्वाला अनुसरुन तसे मानवाची जीवनपध्दती (a living) व मानव जगण्यासाठी (making living) जी विविध कार्य करतो त्याला अनुसरुन मानवी भूगोलाच्या कांही उपशाखा निर्माण झाल्या. व्यापार हा मानवाचा तृतिय श्रेणीचा व्यवसाय आहे. बाजारकेंद्र हे बाजारपेठ भूगोलाचे छत समजले जाते. बाजार हा शब्द इंग्रजीतील Market व लॅटीन भाषेतील Mercatus या शब्दापासून तयार झाला आहे. बाजार म्हणजे ग्राहक व विक्रेता यांच्या भेटीचे ठिकाण होय. "बाजारहाट" हा शब्द मराठीत दोन शब्दाच्या संयोगातून तयार झाला आहे. बाजार म्हणजे आठवडयाचे विक्री होण्याचे ठिकाण तर हाट म्हणजे विशीष्ट कालावधीनंतर भरणारे. पाळीव प्राण्यांचे बाजारकेंद्र म्हणजे "बैल बाजार" या ठिकाणी गाय आणि बैल दोन्ही प्रकारच्या प्राण्यांचा समावेश होतो.

**बीज संज्ञा:- गोधन जाती**

**प्रस्तावना:-**

भारत हा शेतीप्रधान देश आहे. आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार शेती व पशुपालन होय. पशुधन राष्ट्राची अनमोल संपदा आहे. शेतीशी निगडीत असलेला एक जोडधंदा म्हणजे पशुसंवर्धन होय. लातूर जिल्हयातील पाळीव प्राण्यांचे वर्गीकरण आणि पशुचे महत्त्व अभ्यासले आहे.

**पशुधन अर्थ:-**

पशुधन हा शब्द पशु + धन असा विभागला जातो. संयुक्तपणे पशु हा शब्द पुल्लिंगी असून त्याचा अर्थ जनावर निर्बुद्ध किंवा द्रव असा होतो. थोडक्यात पशुधन हा नैसर्गिक साधनसंपत्ती असून तिचा मानवाला विविध माध्यमातून उपयोग होतो. पशुगणना ही मोजणी दर पाच वर्षाला केली जाते.

**पशुसंवर्धन व्याख्या:-**

पाळीव जनावरे (उदा. गाय, म्हैस, शेळी, मेंढी, उंट, घोडा इ.) जोपासना करुन त्यांच्यापासून दूध व इतर उत्पादने मिळवणे म्हणजे पशुसंवर्धन होय.

थोडक्यात उपयुक्त अशा पशुंची जोपासना करणे म्हणजे पशुसंवर्धन होय.

**उदिष्ट:-**

लातूर जिल्हयातील पाळीव प्राण्याचे स्वरुप व महत्त्व अभ्यासणे.

**अभ्यास क्षेत्र:-**

लातूर हा महाराष्ट्रातील 36 जिल्यापैकी एक असून त्याचे अक्षवृत्तीय स्थान 17⁰ 51' ते 18⁰ ते 50' उत्तर असून 76⁰12' ते 77⁰18' पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. जिल्हयाची पूर्व पश्चिम लांबी 106 कि.मी, उत्तर - दक्षिण लांबी 109 कि.मी. आहे. जिल्याच्या पूर्वेस नांदेड, उत्तरेस परभणी, पश्चिमेस उस्मानाबाद, दक्षिणेस उस्मानाबाद जिल्हा व कर्नाटक राज्याची सिमा आहे. जिल्हयाचे भौगोलीक क्षेत्रफळ 7157 चौ. कि.मी. असून क्षेत्रफळानुसार जिल्हयाचा राज्यात 26 वा क्रमांक लागतो. 2001 च्या जनगननेनुसार जिल्हयाची लोकसंख्या 20,80,285 होती. लातूर जिल्हयाला नैसर्गीक सिमा फारश्या लाभल्या नाहीत.

लातूर जिल्हयात पाळीव प्राण्यांच्या महत्वांच्या अशा बाजारपेठा आहेत. प्रसिध्द अशा बैलांच्या जाती आहेत. हंडरगुळी, देवणी, नळेगाव, मुरुड ही महत्वाची बाजारपेठा आहेत. जिल्हयातील 13 महत्वाच्या बाजारपेठांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला आहे.

**माहिती स्त्रोत व संशोधन पध्दती:-**

प्राथमिक व द्वितीयक स्त्रोताद्वारे मिळवलेली माहिती अभ्यासासाठी घेतलेली आहे, जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, शासकीय कार्यालय, प्रश्नावली माहिती विश्लेषणासाठी अनुभवजन्य पध्दती, सैध्दांतिक पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**विषयविवेचन:-**

**लातूर जिल्हयातील गोधन:-**

भारतात गोवंशाच्या एकूण 27 जाती आहेत. देशातील वेगवेगळया राज्यात त्याचे मूळ स्थान आहे. अभ्यासक्षेत्रासाठी आपण लातूर जिल्हयाची निवड केली आहे. त्यामुळे लातूर जिल्हयात पुढील गोधन जातीचा समावेश होतो. 1) खिलारी, 2) देवणी, 3) लालकंधारी, 4) डांगी , 5) हालस्टिन, 6) जर्सी इ. लातूर जिल्हयातील महत्त्वाच्या जाती पुढीलप्रमाणे :

1. **खिलारी :-**

**मुळस्थान :** महाराष्ट्रातील सांगली, सोलापूर, सातारा, कोल्हापूर व लातूर जिल्हयात प्रामुख्याने आढळतात. म्हसवड खिलार, तापी खिलार, जातीमध्ये आटपाडी खिलार (द.महाराष्ट्र) व नकली खिलार या पोटजाती आढळतात.

**शारीरिक वैशिष्ट्ये :-**

अत्यंत चपळ व शक्तीमान, शेताच्या कामासाठी बैल अत्यंत उपयुक्त, शर्यतीसाठी बैल प्रसिद्ध, रंग शुभ्र पांढरा किंवा राखाडी, डोळे बारीक व रागीट, कपाळ फुगीर चेहरा लांबट व अरुंद, शिंगे टोकदार व सरळ उभी असतात, मान आखूड व शिंड मोठी असते. कान लहान व टोकदार जमिनीस समांतर असतात.

**भौगोलिक परिस्थिती :-**

खिलार ही जनावरांची जात ज्या भागात आढळते तो भाग अर्धशुष्क आहे. या भागात 40 ते 70 सेमी पाऊस पडतो. येथील उन्हाळे उष्ण असतात. येथील जमिन हलकी आणि साधारण काळसर आहे. लातूर जिल्हयात मांजरा नदीच्या खो-यात काळी गाळाची जमिन आढळते. येथे ज्वारी, कापूस पिके घेतात, येथील जनावरे गवत व कडब्यावर जगतात.

शेतीच्या कामासाठी खिलार जातीचे बैल नावाजनेले असतात. तसेच शर्यतीसाठी अत्यंत वेगाने धावण्यासाठी प्रसिद्ध आहेत. खिलार ही महाराष्ट्रातील गुरांची जात असल्यामुळे ती महाराष्ट्रात वातावरणात निकोप वाढते व खिलार वळूला बाजारात भरपूर किंमत मिळते.

**गायीचे जनन व दुध क्षमता :-**

खिलार जातीच्या कालवडी 3 वर्षानंतर वयात येतात. त्यांचे प्रथम विण्याचे सरासरी वय 4 वर्ष आहे. या जातीच्या गाईचे दूध वासरांनाच पुरते. या रोज 1 ते 1.5 लिटर दूध देतात. या गाई साधारणत: 8 महिने दूध देतात.

2. **देवणी :-** लातूर व उस्मानाबाद जिल्हयात ही जात आढळते. अहमदपूर , निलंगा , उदगीर , उस्मानाबाद , उमरगा इत्यादी.

**मुळस्थान :-** मराठवाडा व कर्नाटक सीमा, आंध्रप्रदेश.

**शारीरिक वैशिष्ट्ये :-**

रंग पांढरट व वानराच्या रंगासारखा म्हणून वानरी म्हणतात, शरीर ऐटदार, सवाई चाल, कान लांब व खाली मागे वळलेली शिंगे आखूड बाजूस मागे वळलेले असतात. पाय जाड, बेंबी मोठी, शेपटी लांब चाबकासारखी असते तिचा गोंडा काळसर, या जातीच्या गाईचे वजन 300 व बैलाचे 500 कि.ग्रॅ. असते.

**भौगोलिक परिस्थिती :-**

देवणी जनावरे जेथे आढळतात तो भाग जरा डोंगराळ आहे. या भागात पावसाचे प्रमाण 80 ते 100 सेमी आहे. उन्हाळे जास्त उष्ण असतात. या भागात कापूस, ज्वारी, बाजरी, भूईमुग ही पिके घेतात. तसेच थोडया प्रमाणात गवत वाढते. तेथील जनावरे कडबा व गवतावर जगतात.

देवणी जातीचे बैल अतिशय चपळ व मजबूत असल्याने ओढकामासाठी, शेती व वाहतुकीसाठी उपयुक्त असतात.

**गायीचे जनन व दूध क्षमता :-**

देवणी जातीच्या कालवडी साधारणपणे 3.5 ते 4 वर्षाच्या झाल्यावर प्रथम वितात. या गाई एका वेतात 900 कि.ग्रॅ. दूध देतात.

3. **लालकंधारी :-**

**मुळस्थान :** मराठवाडा, कर्नाटक सीमा, लातूर, नांदेड जिल्हयातील कंधार, देगलूर, बिलोली व मुखेड तालुके लातूर जिल्हयामध्ये लातूर, अहमदपूर , उदगीर इत्यादी.

**शारीरिक वैशिष्ट्ये :-**

कंधारी जातीच्या जनावरांचा रंग फिका व ते गडद लाल असतो. म्हणून या जनावरांना लालकंधारी म्हणतात, ही जनावरे मध्यम आकाराची असून यांचे कपाळ रूंद व फुगीर असते. त्यांची शिंगे प्रथम बाहेर आणि नंतर आत वळलेली आणि मध्यम आकाराची असतात, कान लांब दोन्ही बाजूस झुकलेले असतात. त्यांचे शरीर व शेपूट लांब असते. खुरे कठीण असतात, या जातीच्या गाईचे वजन 300 व बैलाचे 500 कि.ग्रॅ. असते.

**भौगोलिक परिस्थिती :-**

ही जात जेथे आढळते तेथे पावसाचे प्रमाण कमी व तापमान जास्त असते. येथे उन्हाळे 40 ते 500 असते. एकूण तेथील हवामान अर्धशुष्क आहे. या भागात साधारण व चांगली दोन्ही प्रकारच्या मृदा आढळतात. येथील जनावरे कडबा व गवतावर वाढतात.

लालकंधारी जातीचे बैल काटक, मजबूत व चपळ असतात. या बैलांचा शेती व वाहतुकीसाठी उपयोग होतो.

**गायीचे जनन व दूध क्षमता :-**

देवणी जातीच्या कालवडचे प्रथम पिण्याचे वय 3.5 ते 4.5 वर्ष असते. या जातीच्या गायी दूधास कमी असतात.

4. **डांगी :-**

**मुळस्थान :** गुजरातमधील डांग जिल्हा हे या जातीचे मुळस्थान आहे.

**प्रदेश :** महाराष्ट्रात डांग जातीची जनावरे नाशिक जिल्हा इगतपुरी व घोटी, अहमदनगर जिल्हा, अकोला तालुका, रायगड, कर्जत, ठाणे, शहापूर, जव्हार माखाडे, डहाणू, लातूर, नांदेड, उस्मानाबाद या भागात आढळतात.

**शारीरिक वैशिष्ट्ये :-**

डांगी जनावरांचा रंग काळा असतो. त्यांच्या शरीरावर पांढरे डाग असतात. यांच्या शरीराची कातडी तेलकट व मऊ असते, डोळे लहान व कपाळ रुंद असतात. या जातीच्या बैलाचा खांदा रुंद असतो, या जातीचे जनावरे काटक व पावसाळा सहन करणारी असून शक्तीशाली असतात, या जातीच्या गाईचे वजन 300 व बैलाचे 450 कि.ग्रॅम. असते.

**भौगोलिक परिस्थिती :-**

हे पशु जेथे आढळतात, त्या प्रदेशाची उंची 500 ते 600 मी. असते. येथील जमीन काळी आणि उतारावर लालसर आहे. या भागात 150 ते 225 सेमी पाऊस पडतो. येथे भात, नाचणी, ज्वारी ही पिके येतात. या जनावराबरोबरच व मारवेल व गवत प्रमुख खाद्य असते.

डांगी जातीचे वळू 3 ते 3.5 वर्षानंतर पैदाशीसाठी वापरतात. बैल शेती वाहतुकीसाठी उपयोगी पडतात. मात्र त्यांची गती कमी असते.

**गायीचे जनन व दूध क्षमता :-**

डांगी गाईच्या कालवडी 4 ते 4.5 वर्षाच्या वयात प्रथम वितात. या जातीच्या गाई एका वेतात 550 ते 680 कि.ग्रॅ. दूध देतात.

**समस्या :-**

जिल्ह्यात हालक्या व मध्यम प्रतीच्या मृदेचे प्रमान जास्त आहे.

देवणी जातीच्या गायी व वळू यांची संख्या कमी होत आहे.

**उपाय :-**

जिल्ह्यातील मृदेचे परिक्षण करून खताचा योग्य वापर करुन विविध पिके चारा व कडबा यांचे प्रमान वाढवणे जेणेकरुन पशुसंख्यात वाढ होईल.

गायी व बैल यांचे महत्व पटवून देण्यासाठी लोकामध्ये जनजागृती व प्रोत्साहनम्हणुन बक्षीस ठेवण्यात यावीत.

आधिक दुध देणा-या गायीचे पैदास करणे गरजेचे आहे. त्यासाठी संशोधन करुन नवीन जातीची निर्मिती करावी

जिल्ह्यातील लोंकाचा मुख्य व्यावसाय शेती व पशुपालन असल्याने शेतीचा योग्य विकास करण्यासाठी शेतक-याना मार्गदर्शन शिबीर आयोजित करावे.

**निष्कर्ष :-**

1. देवणी लाल कंधारी डांगी या जनावरासाठी जिल्ह्यात पोषक वातावरण आहे. हि जनावरी 51 वेळा राष्ट्रीय पुरस्काराने गौरविले आहेत.
2. खिलारी जात अत्यंत नावजलेली असतात व शर्यतीसाठी अत्यंत वेगाने धावण्यासाठी प्रसिध्द आहेत.
3. प्राण्याच्या किमती त्यंचा रंग, वय, जात, प्रकार व रुबाबदारपणा इत्यादी बाबी वरुन ठरतात.

**संदर्भ सुची :-**


1. Abiodun J.C. (1967) : Urban Hierarchy in Devloping Country", Economic Geography, Vol.XIII, No.43, Pp.347-367.
2. Census of India (1951-2001) : District Census Handbook", Latur District, Maharashtra Part XII , A and B.
3. Christaller W. (1933, 1966) : The Central Places in Southern Germany Translated by from German (1933) into English C.W. Baskin (1966) Prentice Hall, New Jersey.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# धाराशिव जिल्ह्यातील दुर्लक्षित पर्यटन स्थळांचा अभ्यास

**Prof. Dr. Gaikwad S. M.**
Dept. of Geography
M. H. Mahadik Art's & Comm.
College, Modnimb Tal. MadhaDist. Solapur
**Corresponding Author: Prof. Dr. Gaikwad S. M**

**Introduction (प्रस्तावना):-**

पर्यटन ही संज्ञा 'प्रवाशा' शब्दाशी संबंधित आहे. प्रवास करणे हे प्राचीन काळापासून मानवी जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. प्राचीन काळी विविध कारणासाठी प्रवास केला जात असे त्यात अज्ञात प्रदेशाचा शोध घेणे, नवीन पर्यावरणातील बदल अनुभवणे, धार्मिकदृष्ट्या पवित्र स्थळांना भेटी देणे इत्यादी गोष्टींचा समावेश होत असे. सध्या मानवाचा आधुनिक व्यवसाय म्हणून पर्यटनाचा उल्लेख केला जातो पण त्याचे मूळ प्राचीन प्रवासात आढळते. आंतरराष्ट्रीय पर्यटन ग्रंथाचे लेखक पीटर्स् यांच्या मते पर्यटन हा जागतिक व्यापारातील सर्वात महत्त्वाचा भाग असून त्याचे दरवर्षी व्यापारी महत्व वाढत आहे. म्हणून भारतात ही ब्रिटिश राजवटी पासून पर्यटनाचा विकास करण्यासाठी तत्कालीन सरकारने अनेक प्रयत्न केले होते.

पर्यटन हा विविध घटकांचा संयुक्त अविष्कार आहे. धाराशिव जिल्ह्यात नैसर्गिक, धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पर्यटन स्थळे असून काही धार्मिक पर्यटन स्थळांचा अपवाद वगळता अनेक पर्यटन स्थळे दुर्लक्षित आहेत. धाराशिव जिल्ह्यात धार्मिक पर्यटन स्थळांच्या ठिकाणी प्रत्येक वर्षी एक तरी मोठी यात्रा भरते. यात्रा काळात हजारोच्या संख्येने पर्यटक पर्यटन स्थळी येतात. धाराशिव जिल्ह्यात हिंदू धर्मिय व जैन धर्मिय पर्यटन स्थळे असून त्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

"धाराशिव जिल्ह्यातील दुर्लक्षित पर्यटन स्थळांचा अभ्यास" हा विषय घेऊन अक्कलकोट येथील सी.बी. खेडगी महाविद्यालयात आयोजित नॅशनल कॉन्फरन्स मध्ये वाचन करण्यासाठी व संशोधन जर्नलमध्ये प्रकाशित करण्यासाठी हा संशोधनपेपर तयार केला आहे.

**Study Region (अभ्यास क्षेत्र):-**

धाराशिव जिल्ह्याचा विस्तार १७.३५° ते १८.४०° उत्तर अक्षांश आणि ७५.१६° ते ७६.४०° पूर्व रेखांश असा आहे. धाराशिव जिल्ह्याच्या दक्षिण पश्चिमेस सोलापूर जिल्हा उत्तर पश्चिमेस अहमदनगर जिल्हा उत्तरेस बीड जिल्हा ईशान्य पूर्व दिशेला लातूर व दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बिदर व गुलबर्गा जिल्हे आहेत. धाराशिव जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 7569 चौरस किलोमीटर असून २०११ च्या जनगणने नुसार लोकसंख्या १६५७५७६ आहे. धाराशिव जिल्ह्यात धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक व नैसर्गिक पर्यटन स्थळे आहेत. त्यापैकी काही पर्यटन स्थळांचा विकास झाला आहे पण काही विकासापासून वंचित आहे त्याचा शोध आपण या शोधनिबंधात घेणार आहोत.

सदरील संशोधन पेपर द्वितीय स्वरूपाच्या माहिती स्त्रोताचा आधार घेऊन तयार केला आहे. "धाराशिव जिल्ह्यातील दुर्लक्षित पर्यटन स्थळांचा अभ्यास" या विषयावर आधारित द्वितीयक माहिती विविध मासिके, वर्तमानपत्रे, संशोधन पत्रिका, संदर्भ ग्रंथ, आंतरजाल इत्यादी मधुन संकलन केलेली आहे. या माहितीचा उपयोग करून विषय विवेचन व विश्लेषण केले आहे.

**Objective (अभ्यासाचे उद्दिष्ट):-**

धाराशिव जिल्ह्यातील दुर्लक्षित पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे हा या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**Hypothesis (गृहितके):-**

1. पर्यटन विकासासाठी धाराशिव जिल्हा महत्त्वाचा आहे.
2. पर्यटन विकासामुळे दुष्काळी भागाच्या विकासास चालना मिळते.
3. दुर्लक्षित पर्यटन स्थळांकडे पर्यटकांना आकर्षित करणे.

**Database & Methodology (माहिती स्त्रोत व संशोधन पध्दती) :-**

सदरील संशोधनामध्ये द्वितीयक माहिती स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे ही माहिती जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन धाराशिव जिल्हा राजपत्र प्रकाशित अप्रकाशित नकाशे आणि शासकीय प्रकाशनामधून घेतले आहे. शोधनिबंध मासिके वर्तमानपत्रे इंटरनेट यांच्या माध्यमातून माहितीचे संकलन करण्यात आले आहे विविध प्रकारच्या माहितीस्त्रोतांच्या आधारे मिळविलेल्या माहितीचे पृथ्थकरण करून त्याचे स्पष्टीकरण करण्यात आले.

**विषय विवेचन:-**

धाराशिव जिल्ह्यात दुर्लक्षित पर्यटन स्थळांमध्ये येडशी अभयारण्य, अचलबेट देवस्थान, अचलेर, श्रीक्षेत्र अणदूर, सावरगाव क्षेत्र, शमशोद्दीन गाझी दर्गा, रामलिंग देवस्थान, माणकेश्वर, परंडा किल्ला, धाराशिव लेणी इत्यादी पर्यटन स्थळे दुर्लक्षित असुन त्यांचा विकास होने काळाची गरज आहे.

**येडशी अभयारण्य:-**

धाराशिव पासून 22 किलोमीटर अंतरावर धाराशिव बीड रस्त्यावर येडशी गावाजवळ बालाघाट डोंगरात येडशी अभयारण्य आहे.या अभयारण्याचे भौगोलिक स्थान १८°१६' ते १८°२०' उत्तर अक्षांश आणि ७५°५४' ते ७५°८०' पूर्व रेखांश असे आहे. हे अभयारण्य १७ में १९९७ मध्ये अस्तित्वात आले. हे अभयारण्य म्हणजे निसर्ग सौंदर्याचा खजिना असून त्यातून वाहणारे पाण्याचे ओहोळ, त्यांचा खळखळाट, रानफुले, खेकडे, विंचू, पक्षांचा किलबिलाट लक्ष वेधून घेतात. तांबट, मुनिया, राघु, मोर हे पर्यटकांना भरपूर आनंद देतात.

**अचलबेट देवस्थान:-**

हे ठिकाण उमरगा तालुक्यात समुद्रसपाटीपासून अकराशे ते पंधराशे फूट उंचीवर पुणे - विजयवाडा राष्ट्रीय महामार्ग क्र. 65 वर उमरगा पासून नऊ किलोमीटर अंतरावर आहे. हा परिसर निसर्गरम्य असून मंदिरापर्यंत जाण्यासाठी 105 पायऱ्या आहेत. या मंदिरात भुयार, भव्यसभा मंडप, गोमाता मंदिर असे प्रेक्षणीय ठिकाणे आहेत. या परिसरात हरीण, काळवीट, ससे, माकड, वानर, कोल्हा, लांडगे, विविध पक्षी, बदक, मोर, कबूतर, चिमण्या यांचा नेहमी वावर असतो.

**अचलेर:-**

हे ठिकाण उमरगा तालुक्यातील मुरूम पासून सात किलोमीटर अंतरावर आहे आणि उमरगा पासून 29 किलोमीटर अंतरावर आहे. येथे यादवकालीन ऐतिहासिक शिल्प व देखणी मंदिरे हे या गावचे वैशिष्ट्य आहे. या परिसरात 28 सेवालाल असल्याचा उल्लेख आंबेजोगाईला उत्खननाच्या वेळी सापडलेल्या एका शिलालेखात आढळून आला आहे आजही अचलेर गावाबाहेर चीन शिवालय सुस्थितीत आहेत येथील मंदिराचे बांधकाम हेमाडपंथी असून त्यावर सुंदर कलाकुसर आहे.

**श्री क्षेत्र अणदूर:-**

सोलापूर हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 65 वर सोलापूर पासून 40 किलोमीटर अंतरावर अणदूर हे ठिकाण आहे. खंडोबाचे हे मंदिर हेमाडपंथी व भव्य असून मंदिराचे गर्भ ग्रह, बंदिस्त मंडप व खुला मंडप असे एकूण तीन भाग पडतात. गर्भगृहात मूर्तीभोवती पिवळी मखर व प्रभावळ असून मागील बाजूस म्हाळसाई व हेमाडीप्रधान यांच्या मुर्ती आहेत. मंदिराच्या चारही दिशांना दरवाजे असून त्यापैकी उत्तर महाद्वार खूप मोठे आहे व ते शके १६६८ मध्ये बांधले आहे.

**सावरगाव क्षेत्र:-**

धाराशिव सोलापूर रस्त्यावर तुळजापूर पासून साधारणतः 25 किलोमीटर अंतरावर जैन धर्मियांचे सावरगाव हे अतिशय महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. सावरगाव येथे 23 वे तीर्थंकर पार्श्वनाथाचे मंदिर असून त्यात पार्श्वनाथची सुरेख मूर्ती आहे हे मंदिर हेमाडपंती असून काळया पाषाणात कोरलेली आहे. येथे मार्गशीर्ष महिन्यात वैद्य एकादशीला मोठी यात्रा भरते.

**हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाझी यांचा दर्गा:-**

**हजरत ख्वाजा** शमशुद्दीन गाझी यांचा दर्गा हे उस्मानाबाद शहराचे आकर्षण आहे या दर्ग्याला सर्व धर्मीय पर्यटक येतात. दर्ग्याच्या बाजूला दोन झाडे कशाची असल्याने सतत सुगंधी वातावरण निर्माण होते त्यामुळे तेथे येणाऱ्या पर्यटकांना आनंद व समाधान मिळते.

**रामलिंग देवस्थान ( येडशी ):-**

धाराशिव बीड या राष्ट्रीय महामार्गावर धाराशिव पासून 22 किलोमीटर अंतरावर येडशी हे बस स्थानक आहे. येडशीला मराठवाड्याचे प्रवेशद्वार म्हणतात. येडशी पासून तीन ते चार किलोमीटर अंतरावर रामलिंग देवस्थान आहे. प्रदूषणमुक्त निसर्गरम्य असून मानवी मनाला साद घालणारे

आहे. पर्यटकांच्या आकर्षण म्हणजे येथील रोरावणारा धबधबा, याला 'राम' असे म्हणतात. धबधब्याच्या दुसऱ्या बाजूने वाहणारा एक जलप्रवाह यांचे नाव 'हरिणी' आहे. पावसाळयात येथे पर्यटकांची गर्दी असते.

रामलिंग मंदिर हेमाडपंथी असून रामदेवराय यादव या राजाने मंदिराची दुरुस्ती केल्याचा उल्लेख आढळतो. छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे मुलुखगिरीत असताना त्यांचा मुक्काम या मंदिरात झाला होता ते एक शिवभक्त होते त्यावेळी या मंदिराचा जुन्नरधार मालोजीराजांनी केल्याचे परिसरातील लोक सांगतात.

प्रभू श्री रामाने या धबधब्यात स्नान करून वरच्या बाजूस शिवलिंगाची पूजा केली म्हणून भगवान शंकर येथे रामलिंग या नावाने विख्यात आहेत सीता हरणाच्या प्रसंगा नंतर राम लक्ष्मणाचा संचार झाला त्यातील हे एक स्थान आहे.

**माणकेश्वर:-**

माणकेश्वर हे गाव बार्शीहून भूमला जाताना 17 किलोमीटर अंतरावर आहे या गावापासून दोन फरलांगावर एकाकी हे देवालय चार फूट उंचीच्या चौथ्यावर असून समोरच मोठा मंडप आहे. हे एक शिवमंदिर असून गाभाऱ्यात शिवलिंग आहे. गाभाऱ्याच्या चौकटीवर सुंदर मूर्ती कोरलेली आहे देवळाच्या बाहेरच्या बाजूस नर्तकीच्या वेगवेगळया मूर्ती कोरलेल्या आहेत आज सुस्थितीत काही मुर्त्या आहेत. सर्व बाजूने हत्तीचे कोरे काम केलेले असल्याने या देवालयाला वेगळी शोभा आहे.

**निष्कर्ष:-**

धाराशिव हा महाराष्ट्रातील एक आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या जिल्हा असून धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी आवश्यक साधनसंपत्तीचा अभाव आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व दुर्लक्षित पर्यटन स्थळांचा विकास कार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहे. धाराशिव जिल्ह्यात अनेक धार्मिक, ऐतिहासिक, नैसर्गिक पर्यटन स्थळे आहेत. या ठिकाणी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी भविष्यकाळात वेगवेगळया सेवासुविधा निर्माण कराव्या लागतील. जसे की, निवासी सुविधा, वाहतूक व्यवस्था, उत्तम भोजन व्यवस्था, मनोरंजन इत्यादी अनेक गोष्टींचा व्यावस्था करावी व ही ठिकाणे राज्याच्या, देशाच्या व आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर ठळकपणे उल्लेख करावा लागेल त्यानंतरच खऱ्या अर्थाने धाराशिव जिल्ह्यात पर्यटन विकास होणार आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

1. प्रा डॉ गायकवाड एस.एम. - उस्मानाबाद जिल्ह्यातील पर्यटन विकास.
2. Google विकीपीडी.
3. महाराष्ट्र शासन (२०२०) धाराशिव जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन.
4. डॉ. जयकुमार मगर - (२०००) महाराष्ट्राचा भूगोल
5. के सागर - महाराष्ट्र (२०२३)

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# तुळजापूर: एक धार्मिक पर्यटन स्थळ

**डॉ कु. वैष्णवी खानापुरे [1] प्रा. डॉ. शिवाजी मस्के [2]**
[1]एम ए. 1 भूगोल विभाग, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर
[2]प्राध्यापक भूगोल विभाग, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर. वैष्णवी खानापुरे
**Corresponding Author: डॉ कु. वैष्णवी खानापुरे**

**प्रस्तावना (introduction) -**

श्री तुळजाभवानी अंबाबाई मंदिर हे महाराष्ट्रातील तुळजापूर येथील एक हिंदू मंदिर आहे. तुळजा भवानी ही महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून ओळखली जाते. छत्रपती शिवाजी महाराज या मंदिरात नेहमी येत असत. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर क्षेत्र हे एक पूर्ण शक्तिपीठ आहे. ही देवी भवानी म्हणून प्रसिद्ध आहे.

**उद्दिष्टे (Objective) -**

सदर शोध निबंधाचा मुख्य उद्देश हा तुळजापूर या धार्मिक पर्यटन स्थळाचा अभ्यास करणे

**माहिती स्रोत आणि अभ्यास पद्धती (Data Source and Research Methodology) -**

सदरील संशोधन लेख हा प्राथमिक व व्दितीयक माहिती स्रोतावर अवलंबून आहे. प्राथमिक माहिती स्रोतामध्ये प्रत्यक्ष ठिकाणी भेट देऊन निरीक्षण करून माहिती संकलित केली आहे. व्दितीयक माहिती स्रोतामध्ये विविध मासिके, पुस्तके, संशोधन पत्रिका, इंटरनेट आणि संदर्भ ग्रंथ इ. आधार घेतला आहे.

**अभ्यास क्षेत्र (Study Area) -**

तुळजापूर हे धार्मिक ठिकाण धाराशिव जिल्ह्यात आहे. हे शहर बालाघाटच्या डोंगर रांगेत वसले आहे. तुळजापूर हे औरंगाबाद- सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावर वसलेले आहे. हे ठिकाण सोलापूर शहरापासून 42 कि. मी. आणि धाराशिव पासून 22 कि. मी. इतक्या अंतरावर आहे. तुळजापूरचा अक्षवृत्तीय विस्तार 18'00" उत्तर अक्षवृत्त ते 18'02" उत्तर अक्षवृत्त असा आहे. तर पूर्व रेखावृत्तीय विस्तार 76'06'' पूर्व रेखावृत्त ते 76' 08'' पूर्व रेखावृत्त असा आहे. तुळजापूर शहराचे क्षेत्रफळ 15 चौ. कि.मी. इतके आहे. सन 2011 नुसार तुळजापूर शहराची एकूण लोकसंख्या 34011 इतकी आहे.


**विश्लेषण (Analysis) -**

तुळजापूर हे महाराष्ट्रातील एक महत्वाचे धार्मिक पर्यटन स्थळ आहे. तुळजापूर येथे खालील 6 ठिकाणे पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाची आहेत.

**तुळजा भवानी मंदिर –**

माहूर येथील रेणुका, कोल्हापूर येथील महालक्ष्मी आणि वणी येथील सप्तशृंगी मंदिरांसह तुळजापूर येथील भवानी मंदिर ही महाराष्ट्रातील साडेतीन महान शक्तीपीठे आहेत. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराला सरदार निंबाळकर यांचे नाव आहे. इतर दोन प्रवेशद्वारांना छत्रपती शिवाजी, शहाजी आणि जिजाबाई यांच्या पालकांची नावे आहेत. सरदार निंबाळकर प्रवेशद्वारातून आत गेल्यावर उजवीकडे मार्कंडेय ऋषींचे मंदिर आहे. पायऱ्या उतरल्यावर मुख्य तुळजा मंदिर दिसते. या मंदिरासमोर यज्ञकुंड आहे. दोन मुख्य दरवाजांजवळच्या मजल्यावर (राजा शहाजी महाद्वार आणि राजमाता जिजाऊ मुख्य दरवाजा) श्रीसंत ज्ञानेश्वर धार्मिक वाचनालय आणि श्री तुकाराम धार्मिक वाचनालय अशी दोन ग्रंथालये आहेत. पायऱ्यांवरून उतरल्यावर उजव्या बाजूला 'गोमुख तीर्थ' आणि डाव्या बाजूला 'कलख', ज्याला 'कल्लोल तीर्थ' असेही म्हणतात. देवीच्या गर्भगृहात प्रवेश करण्यापूर्वी , भक्त येथे या तीर्थांमध्ये स्नान करतात. या परिसरात अमृत कुंड आणि दत्त मंदिर देखील आहे . मुख्य दरवाजाच्या डाव्या बाजूला सिद्धी विनायक मंदिर आहे, तर उजवीकडे आदिशक्ती, आदिमाता मातंगदेवीचे मंदिर आहे. मुख्य संकुलात अन्नपूर्णा देवीचे मंदिर देखील आहे.

देवी तुळजा भवानीची मूर्ती ही आहे असे तिच्या भक्तांचे मत आहे. उच्च ग्रॅनाईट मूर्ती तीन फूट उंच आहे, आठ हातांनी शस्त्रे धारण केली आहेत आणि वधलेल्या राक्षस महिषासुराचे डोके धारण केले आहे. देवीला तुळजा, तुराजा, त्वरिता आणि अंबा असेही म्हणतात.




**शारदीय नवरात्र महोत्सव –**

तुळजाभवानी देवीच्या उपासनेत शारदीय नवरात्राला अनन्यसाधारण महत्व असून या प्रसंगी देवीच्या मंदिरात मोठ्या उत्सवाचे आयोजन केले जाते आणि हा उत्सव मोठ्या भक्तिभावाने व पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. अश्विन प्रतिपदे पासून (सप्टेंबर-ऑक्टोबर) या शारदीय उत्सवास सुरुवात होते. त्यामागील पौराणिक कथेनुसार महिषासुर दैत्याबरोबर नऊ दिवस चाललेल्या घनघोर युद्धानंतर दमल्याने देवी निद्रा घेण्यासाठी मंचकी जाते. नवरात्र संपताच दहाव्या दिवशी विजयादशमीला भारतीय संस्कृतीतला मोठा सण दसरा असतो.

**शाकंभरी नवरात्री महोत्सव –**

प्रत्येक वर्षी पौष महिन्यात (डिसेंबर / जानेवारी महिन्यात) शाकंभरी देवीचा हा उत्सव मोठ्या भक्तिभावाने व पारंपरिक पद्धतीने उत्साहाने साजरा केला जातो. शारदीय नवरात्राप्रमाणेच याही उत्सवाला भाविकांची गर्दी असते. शारदीय नवरात्रामध्ये जे पारंपरिक कार्यक्रम होतात त्यांचीच पुनरावृत्ती शाकंभरी नवरात्र महोत्सवात होते. शारदीय नवरात्रांच्या सोहळयाचे वैभव पाहण्याचा योग ज्यांना येत नाही, असे भाविक शाकंभरी नवरात्राच्या सोहळयास सहभागी होण्याकरिता व देवीच्या दर्शनाकरिता आवर्जून तुळजापूरला येतात.

**विजयादशमी दसरा –**

उषःकाली देवीचे सीमोल्लंघन केले जाते. या दिवशी बहर्हाणपूर येथून पालखी व भिंगार येथूनपलंग यांचे आगमन होते. तसेच पालखीतून मिरवणूक पार पडून देवी पलंगावर विश्रांती (श्रमनिद्रा) घेते. दसरा ह्या सणांचं मोठ्या उत्साहाने स्वागत होते. हा साडेतीन मुहूर्तातला एक मुहूर्त म्हणूनच दसऱ्याच्या मुहूर्तावर नवी खरेदी, नवे करार, नव्या योजनांच्या प्रारंभ इ. चांगल्या गोष्टी केल्या जातात. घर, गाडी, बंगला, खरेदी केला जातो. सोन्या चांदीचे दागिने केले जातात. नवे व्यवसाय चाल केले जातात.




**चिंतामणी गणपती मंदिर –**

भक्तांना यश आणि समृद्धीचे आशीर्वाद देण्यासाठी ओळखले जाणारे भगवान गणेशाला समर्पित असलेले शांत मंदिर, हे तुळजापूरमधील सर्वात लोकप्रिय ठिकाणांपैकी एक आहे. मंदिरात आकर्षक सजावट असलेले एक अद्वितीय वास्तुकला आहे जी वर्षभर पर्यटकांना आकर्षित करते. महत्त्वाचे प्रयत्न सुरू करण्यापूर्वी अनेक स्थानिक लोक आशीर्वाद घेण्यासाठी मंदिराला भेट देतात. गणेश चतुर्थीच्या वेळी वातावरण विशेषत: उत्सवमय असते जेव्हा भक्त उत्साही उत्सवात गुंतलेले असतात. तुमच्या भेटीनंतर, पारंपारिक मिठाई आणि अर्पणांसाठी जवळच्या बाजारपेठेचे अन्वेषण करा.

**धाकटे तुळजापूर मंदिर -**

तुळजा भवानी मंदिराजवळ असलेले एक लहान, शांत मंदिर, शांततापूर्ण प्रार्थना आणि उपासनेसाठी आदरणीय. तुळजापूरमधील सर्वात लोकप्रिय पर्यटन स्थळांपैकी नसतानाही, मंदिरातील साधेपणा मुख्य मंदिराच्या व्यस्ततेतून बाहेर पडू पाहणाऱ्यांसाठी एक उत्तम माघार प्रदान करते. त्यात हिरवाईने सजलेला सुंदर परिसर, प्रसन्न वातावरण निर्माण करतो. अभ्यागत अनेकदा येथे त्यांच्या वेळेत शांतता आणि कनेक्शनची गहन भावना नोंदवतात. हे मंदिर ध्यान आणि चिंतनासाठी आदर्श आहे, जे आध्यात्मिक साधकांसाठी आवश्यक आहे.




**घाटशील मंदिर -**

एका टेकडीवर स्थित, हे मंदिर तुळजापूर आणि त्याच्या सभोवतालचे शांत वातावरण आणि निसर्गरम्य दृश्ये प्रदान करते. मंदिराची चढण उत्साहवर्धक आहे आणि अनेकदा चित्तथरारक दृश्यांसह पुरस्कृत होते, ज्यामुळे ते निसर्गप्रेमींमध्ये आवडते बनते. हे मंदिर एका स्थानिक देवतेला समर्पित आहे आणि अभ्यागत सकाळच्या आरतीमध्ये सहभागी होऊ शकतात, जो एक उत्थान करणारा आध्यात्मिक अनुभव आहे. परिसरात अनेकदा कमी गर्दी असते, ज्यामुळे शांत चिंतन आणि प्रार्थना करता येते.




**भारती बुवांचा मठ –**

एक शांत अध्यात्मिक केंद्र जे संत भारती बुवांच्या शिकवणीचे प्रतिबिंबित करते, जे आंतरिक शांतीच्या साधकांना आकर्षित करते. मठ हे शिकण्याचे आणि चिंतन करण्याचे ठिकाण आहे, जेथे भक्त ध्यान करण्यासाठी आणि आध्यात्मिक प्रवचन ऐकण्यासाठी जमतात. निसर्गाने वेढलेले शांत वातावरण, शांतता आणि शांततेचा एकंदर अनुभव वाढवते. संतांच्या शिकवणुकीबद्दल आणि दैनंदिन जीवनात त्यांचा उपयोग जाणून घेण्यासाठी पर्यटक स्थानिक अनुयायांशी संपर्क साधू शकतात. गर्दीच्या गर्दीपासून दूर खोल आध्यात्मिक संबंध शोधणाऱ्यांसाठी हे एक आदर्श ठिकाण आहे.




**कल्लोल तीर्थ -**

तुळजा भवानी मंदिराजवळचा पवित्र स्नान घाट जो भक्तांचा आत्मा आणि शरीर शुद्ध करतो असे मानले जाते. आध्यात्मिक शुद्धी आणि आशीर्वाद मिळविण्यासाठी अनेक अभ्यागत धार्मिक स्नान करण्यासाठी येथे येतात. घाटावर अनेकदा कमी गर्दी असते, त्यामुळे बसून एखाद्याच्या आध्यात्मिक प्रवासावर चिंतन करण्यासाठी ते एक शांत ठिकाण बनते. विशेषत: सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी फोटोग्राफीसाठी हे एक आदर्श स्थान आहे. पवित्र पाण्यात डुबकी मारल्यानंतर, बरेच भक्त जवळच्या मंदिरांना भेट देतात आणि त्यांचा आध्यात्मिक अनुभव वाढवतात.



**समस्या (Problem) –**

1. परिसरातील दाटवस्तीमुळे अरुंद गल्लीमधून भाविकांचा वावर अपरिहार्य ठरतो. यामुळे दहा लाखांवर जमणा-या गर्दीचे नियोजन करणे जिकिरीचे होते.
2. अस्तित्त्वात असलेले अरुंद रस्ते आणि मर्यादित पार्किंग प्रवेशामुळे समस्या निर्माण होतात.
3. जागेच्या अभावामुळे वाहतुकीस अडचणी येतात. मर्यादित जागेमुळे वाहनतळास अडचणी येतात.
4. मोठ्या संख्येने भाविक येतात त्यामुळे नियोजनात अडथळे येतात.
5. येथे सार्वजनिक आरोग्य सेवा व स्वच्छता सुविधांचा अभाव आहे.
6. पर्यटनपूरक पायाभूत सुविधांचा अभाव आहे.
7. पावलो पावली आडवे येणारे भिकारी आणि मागे लागणारे पुजाऱ्याचे लोंढे आडवे येतात त्यामुळे पर्यटकांना नाहक त्रास होतो.

**शिफारशी (Suggestion) -**

1. पर्यटनाच्या दृष्टिकोनातून या स्थळाचा विचार केला तर तेथील सुविधा या अपुऱ्या आहेत. जर या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या तर साहजिकच येथे पर्यटकांची संख्या वाढेल आणि स्थानिक रोजगार ही उपलब्ध होईल.
2. तुळजापूर येथे रस्ते, वीज, पाणी यासारख्या मूलभूत सुविधा अपुऱ्या आहेत. त्या सुविधा पुरवाव्यात आदीची उत्तम सोय करावी.
3. तुळजापूर येथे निवासस्थाने, धर्मशाळा, भक्तनिवास, हॉटेल्स सार्वजिक सौचालय इ. व्यवस्था करावी.
4. तुळजापूर या स्थळाची पत्रिका,फोल्डर्स, दुमडलेली पत्रिका, आकाशवाणी, दूरदर्शन इ. साधनांच्या सहायाने जाहिरात करावी. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने याकडे लक्ष देऊन विकास करावा.
5. प्रादेशिक स्तरावर तुळजापूर शहराचा विकास करणे
6. पर्यटन पायाभूत सुविधा विकसित करणे.
7. सार्वजनिक आरोग्य सेवा व स्वच्छता सुविधा सुधारणे.

**सारांश (Conclusion) -**

तुळजापूर हे धार्मिक ठिकाण धाराशिव जिल्ह्यात आहे. हे बालाघाटच्या डोंगर रांगेत वसलेले आहे. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर क्षेत्र हे एक पूर्ण शक्तिपीठ आहे. तुळजापूर येथे तुळजाभवानी मंदिर, कल्लोळ, गायमुख, चितामणी, घाटशिळ मंदिर, भारती बुवा मठ, धाकटे तुळजापूर मंदिर इत्यादी महत्वाची पर्यटन ठिकाणे आहेत. तुळजापूर येथे मंदिर परिसरातील दाटवस्ती, अरुंद रस्ते, मर्यादित पार्किंग, जागेच्या अभावामुळे वाहतुकीच्या कोंडी, सार्वजनिक आरोग्य सेवा व स्वच्छता सुविधांचा अभाव, पर्यटनपूरक पायाभूत सुविधांचा अभाव, पावलो पावली आडवे येणारे भिकारी आणि मागे लागणारे पुजाऱ्याचे लोंढे या महत्वाच्या समस्या आहेत. तुळजापूरमध्ये धार्मिक पर्यटनाला खूप वाव आहे. यासाठी येथील पर्यटकांच्या समस्या सोडविल्या आणि योग्य पर्यटन विकास आराखडा राबविला तर भविष्यात निश्चित तुळजापूर या पर्यटन केंद्राचा विकास होऊन स्थानिक लोकांना रोजगार मिळेल.

**संदर्भ ग्रंथ (References) -**


1. विवेक सुतडेकर: आपला उस्मानाबाद जिल्हा, विद्याभारती प्रकाशन लातूर.
2. दत्तात्रय माधवराव कुलकर्णी: महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजा भवानी, जगद्वीतेछु प्रेस पुणे.
3. प्रा. के. ए. खतीब (2012): पर्यटन भूगोल, संजोग प्रकाशन कोल्हापूर
4. प्रा प्रकाश सावंत (2011): पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन कोल्हापूर
5. महाराष्ट्र शासन (2022): धाराशिव जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन
6. https://dharashiv.maharashtra.gov.in/mr/tourist

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील नरखेड येथील श्री.सिध्देश्वर मंदिराचा दुर्लक्षित धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून अभ्यास

**श्री महेंद्र कसबे[1] डॉ. अंकुश शंकर शिंदे,[2]**
[1] संशोधक विद्यार्थी, भूगोल संशोधन केंद्र - द. भै. फ. दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स अंड सायन्स, सोलापूर
[2]प्राध्यापक, सी. बी. खेडगीज् बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स आणि राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट. जिल्हा- सोलापूर
**Corresponding Author: श्री महेंद्र कसबे**
**Email:** mahendrakasabe13@gmail.com

**गोषवारा:**

प्राचीन काळी भारतीय समाजात पर्यटन अस्तित्वात होते. भारतात सिंधु संस्कृतीपासुन व्यापार, धर्म, संस्कृती, तत्वज्ञान इ. अनेक कारणांनी पर्यटन झाले आहे. मौर्य कालखंडात मॅगेस्थेनिस हा प्रवासी भारतात आला. सम्राट अशोकाने बौध्द भिक्खुंना भारतातील विविध भागात आणि भारताच्या शेजारील देशात बौध्द धर्माच्या प्रसारासाठी पाठविले होते. भारतीय धर्म, संस्कृती, शिक्षण, कला, यांच्या अभ्यासासाठी अनेक परकिय पर्यटकांनी भारतात प्रवास केला त्यामध्ये हुएन त्संग, इत्सिंग अल्बेरुनी इ. ची नावे सांगता येतील. भारतीय पर्यटनात प्राचीन काळापासुन धार्मिक पर्यटनाला अनन्यसाधरण महत्त्व आहे. कारण धार्मिक स्थळांना भेटी दिल्याने आत्मिकशांती प्राप्त होते. अशी भारतीयांची भावना आहे. धार्मिक स्थळांच्या ठिकाणी गेल्याने मोक्ष प्राप्ती होते. जिवनाचे साफल्य हाते. त्यामुळे मोठया प्रमाणात भारतात धार्मिक पर्यटन केले जाते. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये सोलापूर जिल्यातील मोहोळ तालुक्यातील नरखेड येथील श्री सिद्धेश्वर मंदिराचा अभ्यास दुर्लक्षित धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून करण्यात आला आहे.

**नमुना शब्द** :- धार्मिक पर्यटन, पर्यटक, मंदिर

## प्रस्तावना (Introduction)

आज २१ व्या शतकात पर्यटन व्यवसायास महत्व प्राप्त झालेले आहे. व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांच्या दृष्टीकानातून पर्यटन महत्वाचे मानले गेले. परंतू काळाच्या ओघात पर्यटनाची व्याप्ती वरील घटकांपुरतीच मर्यादित न राहता आज ती वाढलेली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यटन व्यवसायाचे महत्व ओळखुन अनेक देशांनी पर्यटन व्यवसायाच्या विकसाला प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे आज पर्यटन व्यवसाय विकसित होत आहे. महाराष्ट्रात पर्यटनाच्या दृष्टीकोनातून सोलापुर जिल्हयाला महत्वाचे स्थान आहे. सोलापूर जिल्हास सातवाहन कालखंडापासूनची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. जिल्हाच्या भूप्रदेशाचा सातवाहन, चालुकय, राष्ट्रकुट, यादव, बहामणी, निजामशाही, आदिलशाही, मोगलशाही, मराठे- पेशवे या सत्तांशी संबंध आलेला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्याचे ऐतिहासिकता समृध्द झालेला आहे. यातुन तेथे धार्मिक संक्रमण मोठया प्रमाणत झालेले. याचा परिणाम म्हणून या भूप्रदेशावर हिंदू, जैन, ख्रिश्चन, इस्लाम इत्यादी धार्मिक स्थळे आहेत. यामूळे आज ही सोलापूर जिल्हातील धार्मिक स्थळावर वारकरी संप्रदाय, भक्ती चळवळ, शैव संप्रदाय, वैष्णव संप्रदाय इत्यादीच्या तत्वज्ञानाचे गुण वैशिष्ट्याचा प्रभाव टिकून आहे. सोलापूर जिल्हातील धार्मिक स्थळे पर्यटनास महत्वाचे असल्याने भारतातून आणि महाराष्ट्रातून लाखोंच्या संख्येने पर्यटक येत आहेत. सोलापूर जिल्हातील मोहोळ तालुक्यातील नरखेड मधील श्री सिध्देश्वर मंदिर हे एक प्रसिद्ध धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून उदयास आले आहे. या धार्मिक स्थळामुळे तालुक्यातील पर्यटनात वाढ होऊन याचा परिणाम पर्यटन स्थळाच्या सभोवतालच्या परिसरातून आर्थिक क होत आहे. सोबतच भारतीय संस्कृती, स्थापत्य, कला, शिल्पकला,

तत्वज्ञान, मुर्तीकरता यांच्या सर्वचनासाठी धार्मिक स्थळे कारणीभूत ठरत आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टये**: -

1. मोहोळ तालुक्यातील नरखेड येथील श्री.सिध्देश्वर मंदिराच्या धार्मिक पर्यटन स्थळाचा अभ्यास करणे.
2. नरखेड येथील सिध्देश्वर मंदिराच्या धार्मिक पर्यटन स्थळाचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करणे.
3. नरखेड येथील श्री.सिध्देश्वर मंदिराच्या परिसरातील मूलभूत सेवा आणि सुविधांचा अभ्यास करणे.

**व्याप्ती व महत्व (Scope and Significance)**

सदरचे संशोधन अभ्यास हे मोहोळ तालुकयातील नरखेड येथील श्री.सिध्देश्वर मंदिराशी संबंधीत आहे. श्री.सिध्देश्वर मंदिर या धार्मिक स्थळाचा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून अभ्यास केलेला आहे. मोहोळ तालुकयातील स्थळाचे धार्मिक व सामाजिक जीवनातील महत्व आधोरेखीत केलेले आहे. त्याच बरोबर या स्थळांच्या परिसरातील धार्मिक परस्थितीवर झालेला परिणाम व तसेच वाहतुकीच्या सोयी-सुविधांचा अभ्यास केलेला आहे.

**मर्यादा :(Limitations)**

सदरचे संशोधन अभ्यास हे मोहोळ तालुकयातील नरखेड येथील श्री.सिध्देश्वर मंदिर एवढेच व्यापक असून नरखेड येथील श्री.सिध्देश्वर मंदिराचा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून अभ्यास केलेला आहे. तसेच या स्थळाच्या परिसरातील अर्थी परस्थिती तसेच व्यावसायिक दृष्ट्या सामाजिक जीवनावर झालेला परिणाम, वाहतूक सुविधा यांचा अभ्यास केलेला आहे.

**संशोधन पद्धती**:

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर केलेला आहे. लिखित व अलिखित साधनांच्या आधारे माहिती मिळवली तसेच संशोधन क्षेत्रास प्रत्यक्ष भेट देऊन येणाऱ्या भाविक पर्यटकाची मुलाखतीच्या माध्यमाने प्रश्नावली भरून घेऊन त्यातून निष्कर्ष काढलेले आहेत. तसेच परिसरातील प्रत्येक घटकाचे प्रत्यक्ष निरिक्षण (सर्वेक्षण) करून त्यासंबंधी उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासक्षेत्र**: **- (Study Area)**

सोलापूर जिल्ह्यात मध्यवर्ती उंचवट्याच्या भू-भागात सिना आणि बोरी नद्या दरम्यान मोहोळ तालुका वसलेला आहे. नरखेड हे भारतातील महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात एक गाव आहे. नरखेड गावाचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ २६८७.९६ हेक्टर आहे. या गावाचा अक्षवृत्तीय विस्तार १७°५४'१४"ते १७°९०'३८" उत्तर तर रेखावृत्तीय विस्तार ७५°४०'२७" ते ७५°६७'"२८ पूर्व इतका आहे. ते देश किंवा पश्चिम महाराष्ट्र प्रदेशात येते. ते पुणे विभागातील आहे. सीना आणि भोगावती या नद्यांच्या मध्यभागी असलेल्या परिसरात नरखेड हे गाव आहे. मोहोळ-बार्शी रस्त्यावरील मोहोळपासून बारा किलोमीटर अंतरावर वसलेले नरखेड हे सात-आठ हजार लोकवस्तीचे गाव सिद्धेश्वर हे त्या नगरीचे ग्रामदैवत. तेथील शिवलिंग म्हणजे 'श्री सिद्धेश्वर' होत. ते जिल्हा मुख्यालय सोलापूरपासून उत्तरेस ४३ किमी अंतरावर आहे. मोहोळपासून १२ किमी अंतरावर आहे. राज्याची राजधानी मुंबईपासून ३७६ किमी अंतरावर. भोईरे (३ किमी), देगाव (६ किमी), येल्लमवाडी (६ किमी), बुद्रुकवाडी (८ किमी), मसलेचौधरी (बी किमी) ही नरखेडच्या जवळची गावे आहेत. नरखेड पश्चिमेला माढा तालुका, उत्तरेला बार्शी तालुका, दक्षिणेला सोलापूर उत्तर तालुका, पश्चिमेला पंढरपूर तालुका यांनी वेढलेले आहे. सोलापूर, पंढरपूर, तुळजापूर, मंगळवेढे ही नरखेडच्या जवळची शहरे आहेत.

**विश्लेषण**:

**वाहतूक सुगमता: रेल्वेमार्ग आणि रस्तामार्ग**

**रेल्वेमार्ग**:- मलिकपेठ रेल्वे स्टेशन, अनगर रेल्वे स्टेशन ही नरखेडच्या अगदी जवळची रेल्वे स्टेशन आहेत. सोलापूर रेल्वे स्टेशन (सोलापूर जवळ), बार्शी टाउन रेल्वे स्टेशन (बार्शी जवळ), बाळे रेल्वे स्टेशन (सोलापूर जवळ), कुर्डुवाडी जंक्शन रेल्वे स्टेशन (कुर्डुवाडी जवळ), पंढरपूर रेल्वे स्टेशन (पंढरपूर जवळ), लौल रेल्वे स्टेशन (कुर्डुवाडी जवळ), उपळाई रेल्वे स्टेशन (बार्शी जवळ) ही जवळच्या शहरांमधून पोहोचता येणारी रेल्वे स्टेशने आहेत.

**रस्तामार्ग**:- सोलापूर, पंढरपूर, मंगळवेढा , कुर्डुवाडी, बार्शी, वैराग,तु ळजापूर ही नरखेडपासून जवळची शहरे आहेत जी नरखेडला रस्त्याने जोडली आहेत.

**श्री सिद्धेश्वर (महादेव ) मंदिराचा इतिहास**

नरखेड येथील श्री सिद्धेश्वर (महादेव )मंदिर हे फार पुरातन असून त्यास ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा आहे. सदर मंदिर हे मध्ययुगीन कालखंडातील असून ते बदामी सम्राज्यातील यादवकुलीन राजा कृष्णदेवराय याच्या

कारकिर्दीत या मंदिराची निर्मिती झालेली आहे. हे मंदिर हेमाडपंथी स्थापत्य शैलीतील असून त्याचे गर्भगृह व सभामंडप असे विभाजन दिसून येते. सभामंडपामध्ये चार बाजूस चार कोष्टक असून त्यामध्ये विविध देवी देवतांच्या मूर्ती आहेत. सभामंडप मध्ये दगडावर कोरीव असे नक्षीकाम असून त्या काळातील स्थापत्य कलेचे वैभव प्रतिबिंबित होते. या मंदिरास चार बाजूस मोठे दरवाजे असून त्यातील पूर्वेकडील दरवाज्यातून चैत्र शुद्ध प्रतिपदेला पहिले सूर्यकिरण महादेवाच्या पिंडीवर पडते. तसेच चैत्र शुद्ध नवमीला यात्रा भरते. या मंदिराचे व्यवस्थापन, देखभाल, दुरुस्ती, व धार्मिक कार्यक्रमांचे व्यवस्थापन गावातीलच गुरव कुटुंबाकडे साधारणपणे ५०० वर्षांपासून त्यांच्याकडेच आहे असे त्यांच्याकडे असलेल्या कागद पत्रावरून दिसून येते. त्या मध्ये पेशवाई काळात मंदिर व्यवस्थापनाचे काम पेशवाई दरबारातून चालत होते व पुढे सन १८१८ साली पेशवाईचा अंमल दूर झाल्यानंतर कंपनी सरकारच्या (ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी) ताब्यात मुलुख गेल्यानंतर सदर मंदिराच्या व्यवस्थापनासाठी कंपनी सरकारकडून वार्षिक वीस रुपये खर्च गुरव कुटुंबाकडे देण्यात येत होता. परंतु कालांतराने कंपनी सरकार बरखास्त झाले सबंध भारतावर इंग्लंडची राणी विक्टोरिया हिची सत्ता प्रस्थापित झाली. त्या सुमारास ब्रिटिश सरकारने इनाम कमिशन नियुक्त करून ३१ डिसेंबर १८६१ साली मंदिराचे संपूर्ण व्यस्थापन व खर्चाची जबाबदारी गुरव कुटुंबाकडे दिली व त्या संबंधीची सनद गुरव यांना ब्रिटिशांनी बहाल केली. तेंव्हा पासून ते आजमितीपर्यंत सदरचे मंदिर गुरव परिवाराकडे यांच्याकडेच वंशपरंपरेने आहे. त्यामुळे आजमितीस देखील गुरव कुटुंब यांचा इंग्लंड सरकार व तेथील राज घराणे (बर्किंगहॅम पॅलेस) यांच्याशी पत्र व्यवहार चालू आहे. त्यामुळे सातासमुद्रा पलीकडे असलेल्या इंगजां बरोबर त्यांची नैतिक नाळ आजही कायम आहे.

**श्री. सिध्देश्वर शिवलिंग स्थापनेची आख्यायिका: -**

मंदिराबाबत ग्रामस्थामध्ये समज असा आहे, की हे गाव प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पुनीत झाले. एवढेच नव्हे; तर साक्षात प्रभू रामचंद्रांनी ते लिंग तेथे स्थापन केले. त्याची पार्श्वभूमी अशी आहे कि रावण हा महान शिवभक्त होता. त्या शिवभक्ताचा अंत रामाकडून झाला आणि रामाचा विजय झाला. रामाने स्वतःकडून पातक घडले आहे असे समजून त्यातून मुक्तता मिळवण्यासाठी अयोध्येला पोहचेपर्यंत ज्या ज्या ठिकाणी ते विश्रांतीसाठी थांबले त्या त्या ठिकाणी त्यांनी शिवलिंगाची स्थापना केली. त्या अनेक शिवलिंगांपैकी एक शिवलिंग नरखेड येथे आहे.

**ग्रामस्थांची विशिष्ट श्रद्धा**

नरखेडचे गावकरी सिद्धेश्वराच्या मंदिराचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न करतात. गावकरी मंदिर व परिसरात अभक्ष्य किंवा मांसाहार करून जात नाहीत. तसे केल्यास सिद्धेश्वराचा कोप होतो असे मानले जाते. नरखेड गावात दुमजली इमारत आढळत नाही. त्याचे कारण, गावात सिद्धेश्वराच्या मंदिराच्या कळसापेक्षा जास्त उंचीचे बांधकाम करू नये असा अलिखित नियम आहे. त्या प्रकारचे बांधकाम केल्यास ती वास्तू धन्यास लाभदायक ठरत नाही असे मानले जाते. गावात चोरी होत नसल्याचे गावकरी सांगतात.

**श्री.सिध्देश्वर वार्षिक यात्रा :-**

श्री सिद्धेश्वर गावाच्या उत्तरेकडे उंचवट्यावर, ग्रामपंचयतीच्या जवळ आहे. चैत्र शुद्ध नवमीला श्री.सिद्धेश्वराची यात्रा तीन दिवस भरवली जाते. यात्रेनिमित विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यात्रेनिमित्त मागील १७ वर्षांपासून तीन कोटी हरिनामाचा नाम जप केला जातो. त्यासाठी सप्ताह बसवला जातो तसेच ग्रामस्ताकडून भक्तांना अन्नदान केले जाते.पहिल्या दिवशी सायंकाळी ६.०० वाजता ग्रामस्थ बैलगाडीतून धान्यकोठीची मिरवणूक काढतात. दुसऱ्या दिवशी पहाटे श्री सिध्देश्वरास अभिषेक मंदिरातील पुजाऱ्याकडून घातला जातो. सायंकाळी ५.०० वा.दलित वस्ती मधून श्रीच्या काठीची मिरवणूक सुरु होऊन मंदिरापर्यंत येते.रात्री श्री सिध्देश्वर पालखी मिरवणूक व शोभेचे दारूकाम तसेच मनोरंजन आधारित कार्यक्रम होतात. तिसऱ्या दिवशी यात्रेकरुसाठी झुणका भाकर दिली जाते.दिवसभर धनगरी ओव्या व भेदी गाण्याचा कार्यक्रम,दुपारी कुस्तयांचे मोठे मैदान घेतले जाते.सायंकाळी बैल-रेड्याच्या टक्करी यांचा कार्यक्रम घेतला जातो.शेवटी मनोरंजनचा कार्यक्रम होतो. त्याव दिवशी गावात खिरीच्या प्रसादाचे वाटप केले जाते. दूरदूरचे भक्तगण सिद्धेश्वपराच्या यात्रेला येतात. बाहेरगावी नोकरीनिमित्त गेलेली सर्व मुले, लग्न झालेल्या मुली यात्रेला न चुकता हजेरी लावतात. यात्रेचा व्याप साभाळण्यासाठी सिद्धेश्वर मंदिराचे पुजारी गुरव, देवस्थान पंच मंडळी,

नरखेड ग्रामस्थ मंडळी, विविध तऱ्हेचे संयोजन करत असतात.





**मंदिराच्या परिसरातील पूजापाठ साहित्य विक्रेते :-**

श्री.सिध्देश्वर मंदिर परिसरात श्री श्री.सिध्देश्वर महाराजांची पूजा अर्चा करण्यासाठी आवश्यक असणारे श्रीफळ, कुंकू, हळद, फुलांचे हार, बेल, पेढे, फोटो, पिंड, श्री.सिध्देश्वर मूती यांची विक्री तेथे स्थापन झालेले दुकानदार विक्रेते करतात. तेथे एकूण परिसरात १२ दुकाने असून उपहारगृहे, हॉटेल सेवाही उपलब्ध आहे. दररोज येणाऱ्या भाविकामुळे पूजेच्या साहित्य विक्रीतून त्यांना रोजगार प्राप्त झाला आहे. या शिवाय तेथे खाजगी टम-टम रिक्षा-स्टाफ देखील आहे. त्यामुळे त्यानाही रोजगार उपलब्ध झाला आहे. तेथून मोहोळ बस स्थानक सुमारे १२ किमी अंतरावर आहे.

**भाविक पर्यटकाचे प्रश्नावली व मुलाखतीच्या साह्याने करण्यात आलेले अवलोकन : (एकूण** ८५ अवलोकनार्थ**)**

| . क्र. | **धर्मानुसार वर्गीकरण** | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | १४७ | ७९.४५ |
| | बिगर हिंदू धर्मीय | ३८ | २०.५४ |
| | | | |
| २ | **लिंग गुणोत्तारानुसार वर्गीकरण** | | |
| | पुरुष | १०४ | ५६.२१ |
| | स्त्रिया | ८१ | ४३.७८ |
| | | | |
| २ | **शैक्षणिक स्तर** | एकूण संख्या | टक्केवारी |
| | उच्च पदवीत्तर | ४० | २१.६२ |
| | १० वि व १२ वी पास | ५३ | २८.६४ |
| | माध्यमिक शाळा | ३६ | १९.४५ |
| | न शिकलेले | ५६ | ३०.२७ |
| | | | |
| ३. | **व्यवसाय** | एकूण संख्या | टक्केवारी |
| | शेती , पशुपालन , शेतकरी | ५७ | ३०.८१ |
| | कुशल कारागीर | ०५ | ०२.७० |
| | कामगार, शिक्षक | ५३ | २८.६४ |
| | व्यापारी, दुकानदार | २० | १०.८१ |
| | न व्यवसाय करणारे | ४० | २१.६२ |

(प्रत्यक्ष सर्वेक्षण)

दररोज या मंदिराला येणाऱ्या भाविकांपैकी ७५ %पेक्षा जास्त भाविक हिंदुधर्मीय असून १५% पेक्षा जास्त इतर धर्मीय भाविक मंदिराला भेट देतात. दररोज येणाऱ्या भाविकांमध्ये पुरुषांचे प्रमाण ५६.२१% असून स्त्रियांचे प्रमाण ४३.७८% आहे. शैक्षणिक स्तरानुसार उच्च पदवीधर, पदवीधर लोकांचे प्रमाण २१.६२ %, दहावी व बारावी पास असलेल्या लोकांचे प्रमाण २८% माध्यमिक शाळांत लोकांचे प्रमाण १९.४५ % आणि न शिकलेले लोकांचे प्रमाण ३०.२७ % इतके आहे. तसेच शेतकरी पशुपालन करणाऱ्या लोकांचे प्रमाण ३०.८१ %, गवंडी, सुतार, कुंभार, बिगारी सारख्या व्यवसाय करणाऱ्या लोकांचे प्रमाण २.७० %, व्यापारी, अडत, छोटे मोते दुकानदार, भाजीविक्रेते यासारख्या लोकांचे प्रमाण १०.८१% व कोणताच व्यवसाय न करणारे बेरोजगार लोकांचे प्रमाण २१.६२ % इतके आहे.

**शिफारसी (Recommendations)**

1. सिद्धेश्वर मंदिर आणि त्याभोवतीलच संवर्धन Development Control Regulation प्रमाणे करावे.
2. मंदिराचा इतिहास सांगणाऱ्या पाट्या मंदिरात लावाव्यात.
3. मंदिराच्या समोरील मोकळया मैदानात हिरवळ बाग-बगीचा तयार करावा.
4. मंदिरामध्ये होणाऱ्या लग्न समारंभामध्ये वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिक पत्रावळी व प्लास्टिक ग्लास याच्यावर बंदी घालावी.
5. भक्त निवास आणि राहण्याची व्यवस्था मुबलक प्रमाणात करण्यात यावी.
6. भक्तासाठी भरपुर आणि स्वच्छ सार्वजनिक सोयी-सुविधा निर्माण कराव्यात.
7. खाण्या-पिण्याच्या सोयी उत्तम व स्वस्त दरात उपलब्ध करण्यात यावी.
8. अमावस्या, सण, यात्रांच्या निमित्ताने होणारी गर्दीचे नियमन करण्यासाठी पोलिसांची संख्या वाढवणे.
9. पुरुष व महिलांसाठी सार्वजनिक शौचालय बांधणे.
10. यात्रा काळात पर्यटकांना / भाविकांना ने-आण करण्यासाठी बस संख्या वाढवणे.
11. पादत्राणे 'सुखरुप काढुन ठेवण्याची व्यवस्था मंदिराबाहेर करावी.
12. स्थानिक खादयविक्रीची आणि पुजा साहित्याची अधिकृत केंद्र उभारावे.
13. श्री. सिध्देश्वर मंदिर या नावाने संकेतस्थळ मंदिर प्रशासनाने सुरु करावे.

**संदर्भसुची (References)**

1. शर्मा देवेश: 'धार्मिक पर्यटन' मोहित बुक्स इन्टरनेशन, प्रकाशन प्रथमावृत्ती २०१०
2. कुलकर्णी दत्त: 'महाराष्ट्रातील धार्मिक स्थळे
3. लक्ष्मण खंडागळे: सोलापूर जिल्हातील धार्मिक पर्यटन स्थळे: एक अभ्यास
4. मुलाखत श्री.सिद्धेश्वर मंदिर पुजारी श्री.गणेश बजरंग गुरव.
5. Dr Ankush Shinde and Sau Sumitrabai Rathod "उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील उमरगा शहरातील हेमाडपंथीय श्री महादेव मंदिर या धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून अभ्यास" International Journal of Advance and Applied Research (IJAAR) Impact Factor – 7.328 ISSN – 2347-7075. Vol.4, Issue 8 March-April 2023
6. Dr. Ankush Shinde, Shri Mahendra kasabe, Shri Sudhakar Kamble "सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील वडवळ येथील नागनाथ मंदिराचा एक धार्मिक पर्यटन स्थल म्हणून अभ्यास" Journal of Advance and Applied Research (IJAAR) Impact Factor – 7.328 ISSN – 2347-7075. Vol.4, Issue 8 March-April 2023
7. Dr. Arjun Wagh & Dr. Ankush Shinde Geo-Historic Study of Fort Tourism in District Satara of Maharashtra; An Overview Journal of Advance and Applied Research (IJAAR) Impact Factor – 7.328 ISSN – 2347-7075. Vol.4, Issue 8 March-April 2023

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# जागतिकीकरणाचा भारतीय कृषीवर झालेला परिणाम

**डॉ. गायकवाड डी.एस,**
भूगोल विभाग प्रमुख, श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा, जि.सोलापूर
**Corresponding Author: डॉ. गायकवाड डी.एस,**

**प्रास्ताविक :**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण असे महत्व आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणुन शेती क्षेत्राची ओळख आहे. आज ही एकुण लोकसंख्येच्या जवळपास ६०% लोकसंख्या ही कृषी व कृषी संबंधित व्यवसायात गुंतलेली आहे. राष्ट्रीय उत्पन्न, आंतरराष्ट्रीय व्यापार, रोजगार, औद्योगिक आणि इतर क्षेत्राचा विकास तसेच उपभोगाचे मुख्य साधन इत्यादी बाबतीत कृषी क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेत सिंहाचा वाटा आहे. राष्ट्रीय उत्पादनात कृषी क्षेत्राचा वाटा १९५० -५१ मध्ये ५६.४६% इतका होता. यावरुन भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषीं क्षेत्राचे असणारे महत्व लक्षात येते. परंतू कालांतराने भारताने उद्योग आणि सेवा या दोन क्षेत्रात केलेल्या वृध्दीने हा हिस्सा कमी कमी होत गेला.

२०११-१२ मध्ये अनुक्रमे राष्ट्रीय उत्पादनात कृषी, औद्योगिक व सेवा क्षेत्राचा वाटा अनुक्रमे १८.९%, ३२.९% आणि ४८.२% इतका आहे. तर सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय उत्पादनात कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्र यांचा वाटा अनुक्रमे १७.६%, २९.७% आणि ५२.७% इतका आहे. यावरुन असे दिसून येते की, अलीकडच्या काळात शेती क्षेत्राचा वाटा घटत आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विशेषतः हरित क्रांतीच्या उदयाने भारतातील अन्नाच्या उत्पादनात व उत्पादकतेत वाढ झाली. खरेतर हा भारतीय शेतीला सुवर्ण काळ होता. याच दरम्यानच्या काळामध्ये उत्पादनामध्ये विविधता निर्माण झाली होती. भारतीय शेतीचा हा प्रवास चालु असतांना सन १९९१ मध्ये प्रक्रिया जगामध्ये सुरु झाली आणि आपणही स्वत:हुन हे नविन आर्थिक धोरण स्विकारले.

**जागतिकीकरण म्हणजे काय :**

भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिकीकरणाची सुरुवात १९९१ च्या औद्योगिक धोरणानुसार करण्यात आली. अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास साध्य करण्याकरिता भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या बाबीला चालना देण्यात आली.

**रुसी मोदी :**

जागतिकीकरण म्हणजे खुली स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता आणि उत्पादन वाढविणे संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करुन वस्तू व सेवांची विक्री करणे म्हणजेच जागतिकीकरण होय.

**संशोधनाचे उद्देश :**

1. जागतिकीकरणाचे कृषी क्षेत्रावरील प्रभाव.
2. जागतिकोकरणाचे शेतकऱ्यांवरील प्रभाव.
3. जागतिकीकरणाचा आयातीवर प्रभाव,
4. जागतिकीकरणाचा निर्मीतीवर प्रमाव.

**गृहिते :**

1. जागतिकीकरणाचा कृषी क्षेत्रावर प्रतिकुल परिणाम झाला.
2. जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यामध्ये वाढ झाली.
3. जागतिकीकरणामुळे कृषी आयातीच्या प्रमाणात वाढ. .
4. जागतिकीकरणामुळे कृषी निर्मीतीत घट झाली.

**संशोधन मर्यादा :**

जागतिकीकरणाचा प्रभाव वेगवेगळया क्षेत्रावर वेगवेगळया स्वरुपात झालेला आहे. परंतू हा शोध निबंध फक्त कृषी क्षेत्राच्या अभ्यासापुरता मर्यादित आहे.

**जागतिकीकरणाचा कृषी क्षेत्रावरील प्रभाव :**

जागतिकीकरणामुळे कृषी क्षेत्राचा आमुलाग्र असा बदल होऊन कृषी क्षेत्राचा समतोल विकास साध्य होईल. शेतीमालास योग्य भाव मिळेल. त्यातूनच शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल. शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावेल. कृषी क्षेत्रातून ग्रामीण भागात बारमाही रोजगार

उपलब्ध होऊन साधनसामुग्रीचा सुयोग्य वापर होईल. पुरक उद्योग, लघुउद्योगांचा विकास होऊन खऱ्या अर्थाने बळीराजा जीवन जगू शकेल असा विश्वास देशातील कांही अर्थतज्ञ, कृषीतज्ञ व राज्यकर्ते इत्यादींनी व्यक्त केला होता. परंतू ते अंदाज आज दुर्देवाने निव्वळ खोटे ठरतांना दिसून येत आहेत.

भारताने जागतिकीकरणाचा स्विकार केला तेंव्हा जागतिकीकरणामध्ये कृषी क्षेत्राचा अंतर्भाव नव्हता. परंतू एप्रिल १९९४ मध्ये गॅट करारानुसार कृषीला त्यामध्ये समाविष्ट करण्यात आले. आणि येथूनच भारतीय कृषी क्षेत्रावर प्रतिकुल परिणाम व्हावयास सुरुवात झाली. कारण की, WTO च्या AOA (Agreement on Agricultural) करारानुसार कृषी क्षेत्रात खुल्या व्यापार धोरणाचा स्विकार करण्यात आला. तेंव्हा पासुन भारतीय कृषी क्षेत्र आंतरराष्ट्रीय व्यापाराकरीता खुले करण्यात आले.

**१. ग्रामीण भागावर परिणाम :**

जागतिकीकरणाचा प्रतिकुल परिणाम हा ग्रामीण भागातील लहान, अल्पभूधारक, मध्यम तसेच अज्ञानी आणि अशिक्षी शेतकऱ्यांवर फार मोठ्या प्रमाणावर झालेला आहे, जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या उद्योग म्हणुन पहात आहेत. ते गरिब कर्जबाजारी लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना किंमतीचे अमीष दाखवून त्या ठिकाणी भांडवलदारामार्फत शेती खरेदी करुन व्यवसायिक 'पध्दती शेती करण्याचा प्रयत्न करत आहेत.

**२. बहुराष्ट्रीय कंपन्या :**

जागतिकीकरणानंतर भारतामध्ये विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भांडवलाच्या आधारावर अद्यावत संशोधन करुन आंतरराष्ट्रीय मागणी प्रमाणे नवनविन प्रकारचे उत्पादन करुन बाजारपेठ हस्तगत करत आहेत. यामध्ये प्रामुख्याने कारगिल सिडस्, बेजोशितल सिडस् शॅनडोज, पायोनियर, ओव्हर साईज कार्पोरेशन, आयटीसी, अँग्रोटेक, हिन्दुस्थान लिव्हर इ. यांसारख्या बहुराष्ट्रीय कंपन्या कृषीस लागणाऱ्या बी-बियाणांच्या बाजारात उतरल्या आहेत. इतकेच नाहीतर अमेरिकेतील कारगिल कॉन्टीनेटल ग्रेन आणि युरोपमधील तीन मोठ्या कंपन्या अशा पाच कंपन्यांच्या हाती जगातील ८०% धान्य बाजार आहे. शेतमालाचा व्यापार करणारा जगातील सर्वात मोठा देश म्हणुन अमेरिकेकडे पाहिले जाते. भारतातील गुजरात व पंजाब सरकार बरोबर या वरील कंपन्यांनी करार केलेले आहेत. या वरील कराराप्रमाणे ते आता शेतकऱ्याच्या बरोबरीने कंत्राटी शेती करु शकतात.

**३. आयातीवरील निर्बंध उठवण्यात आले :**

जागतिकीकरणामुळे आयातीवरील सर्व निर्बंध उठवण्यात आले. भारताने 1996 पासून आयातीवरील संख्यात्मक निर्बंध उठवण्यास सुरुवात केली. सन १९९५-९६ या वर्षी ६१६१ इतक्या वस्तुंचे आयातीवरील निर्बंध काढले. त्यानंतर सन १९९८-९९ या वर्षी १७६३ वस्तूंची आयात पूर्णपणे खुली केली. याच कराराचा एक भाग म्हणुन १४२९ वस्तुंवरील संख्यात्मक निर्बंध उठविण्यात आले. सन २००१ मध्ये 715 वस्तुवरील निर्बंध कमी करण्यात आले.

**४. शेती अनुदानातील कपात धोरण :**

एप्रिल १९९४ मध्ये डंकेल प्रस्ताव पारित झाल्यानंतर डंकेल प्रस्तावानुसार मुकत आयाती बरोबर शेती उत्पादनावरील अनुदान कपात केली पाहिजे असे बंधनकारक असल्याकारणाने भारतीय शेतकरी आर्थिक संकटात सापडला. कारण की, कृषी हे भारतातील

जवळपास ६०% लोकसंख्येच्या उपजिवीकेचे प्रमुख साधन आहे. म्हणुन कृषीक्षेत्राच्या विकासाकरिता सरकारकडुन अनुदान मिळणे अपेक्षित आहे. परंतू डंकेल प्रस्तावानुसार विकसीत देशाने २०% तर विकसनशील देशाने १३.३३% अनुदान कपात करणे बंधनकारक आहे. या धोरणास बांधील राहून भारत सरकाने अनुदान कपात करण्यास सुरुवात केली आहे. परंतू विकसीत देशाने अगोदरच आपल्या देशात कृषि क्षेत्राकरिता प्रचंड अनुदान दिलेले आहे. उदा.सन १९८६ ते १९८८ या दरम्यानच्या कालावधीत २४७०० कोटी डॉलर्सचे अनुदान दिल्याचे नोंद आहे. सन १९९९ या वर्षामध्ये विकासीत देशाकडुन रक्कम कमी होण्याऐवजी त्यामध्ये वाढ करुन ती ३२६०० कोटी डॉलर्स केलेली आहे. FAQ च्या वतीने प्रसिध्द झालेल्या आकडेवारीवरुन दिसुन येते.

**तक्ता क्रं.१.१: विकसित देशातर्फे देण्यात येणारी अनुदाने (सबसिडी)**

| अ.क्र. | देश | एकूण कृषि उत्पन्नाच्या प्रमाणात टक्के |
|---|---|---|
| 1. | जपान | 72.5% |
| 2. | कोलंबिया | 54.0% |
| 3. | दक्षिण कोरिया | 61.0% |
| 4. | युरोप | 37.0% |
| 5. | चीन | 34.0% |
| 6. | अमेरिका | 29.0% |
| 7. | भारत | 03.0% |

संदर्भ : डॉ.ढवळे अशोक (२००३) जागतिकीकरणाचा भारतीय शेतीला गळफास, विद्यार्थी विशेषांक (51) महाराष्ट्र राज्य समिती, पुणे जानेवारी, पाने ५१ ते ५७.

वरिल तक्ता क्रं, १.१ वरुन असे दिसुन येते की, विकसित देशाकडुन अगोदरच मोठ्या प्रमाणात कृषी क्षेत्रास प्रचंड अनुदान दिले गेले आहेत. भारताने मात्र ०३.०% इतके कमी कृषी अनुदान दिले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत १३.३३% एवढे अनुदान कमी केल्याने भारतीय कृषीवर त्याचा अत्यंत प्रतिकुल परिणाम झालेला दिसुन येतो,

**विकसित देशांची दुटप्पी भूमिका**

जागतिक व्यापर संघटनेचे कार्यवाहक मायकेल सुर यांनी विकसीत देश त्यांच्या देशातील कृषी क्षेत्राला ग्रीन बॉक्स, ब्ल्यू बॉक्स व अंबर बॉक्स या नावाने दर दिवशी किमान १०० कोटी डॉलर्सचे अनुदान देतात. भारतात मात्र सन १९९१ नंतर केंद्र सरकारने पाणी, खते आणि विज इत्यादी करिता शेतकऱ्यांना दिली जाणारी अनुदाने कमी केलेली आहेत. तर या उलट विकसित देश हे जागतिक व्यापार संघटनेच्या कराराना डावलून फक्त स्वार्थ साध्य करण्याच्या हेतूने जागतिकीकरणाचा वापर करीत आहेत.

भारतातील कृषी क्षेत्राला दिले जाणारे अनुदान विकसीत देशाच्या मानाने अत्यंत नगन्य आहे. आणि त्यामध्येच कपातीचे धोरण स्विकारले असल्याने कृषी क्षेत्राची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे

**. तक्ता क्र.१.२: भारतीय कृषी उत्पादनाची आयात-निर्यात (कोटी रुपयात)**

| वर्ष | आयात | निर्यात |
|---|---|---|
| 1990-91 | 1205.86 | 6092.05 |
| 1991-92 | 1478.27 | 7838.04 |
| 1992-93 | 2876.25 | 9040.30 |
| 1993-94 | 2327.33 | 12586.55 |
| 1994-95 | 5937.21 | 13222.76 |
| 1995-96 | 5890.10 | 20397.74 |
| 1998-99 | 14566.48 | 25510.64 |
| 2001-02 | 16256.61 | 29728.61 |
| 2004-05 | 22811.84 | 41602.62 |
| 2006-07 | 29637.85 | 62411.42 |
| 2008-09 | 37183.04 | 85551.67 |
| 2009-10 | 59528.37 | 89341.50 |
| 2010-11 | 57334.32 | 117483.61 |
| 2011-12 | 82819.15 | 187609.33 |
| 2012-13 | 109610.68 | 232041.11 |
| 2013-14 | 105149.00 | 268469.05 |

Source: Directorate General of Commercial Intelligence & Statistics Ministry of Commerce, Kolkata. Note : P Provisional.

**सारांश :**

जागतिकीकरणाच्या विषम धोरणांमुळे भारतीय कृषी क्षेत्रावर अत्यंत प्रतिकुल विपरित परिणाम झालेला दिसुन येतो. कारण की, भारतामध्ये सिमांत शेतकरी ५९% असुन, अल्प शेतकऱ्याची संख्या २३% इतकी आहे. मध्यम शेतकरी १७% तर मोठे शेतकरी यांची संख्या फक्त १% इतकी आहे. जागतिकीकरणाच्या वरिल सर्व परिणामांचा परिणाम म्हणुन कौ काय भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. जागतिकीकरणामध्ये सामान्य व अल्पभूधारक शेतकऱ्यांचा या चक्रव्यूहात अडकून आत्महत्याच्या माध्यमातून बळी जात आहे. भारतात विविध राज्यांमध्ये सन १९९५ ते २०११ या काळामध्ये २७०९४० इतक्या शतेकऱ्यानी आत्महत्या केल्या आहेत. तर महाराष्ट्रामध्ये सन १९९५ ते २०११ मध्ये ५३८१८, सन २०१२ मध्ये ३७८६, सन २०१३ मध्ये ३१४६, सन २०१४ मध्ये ४००४ आणि सन २०१५ मध्ये ४२९१ इतक्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

वरिल आकडेवारीवरुन असे दिसुन येते की, भारतात सर्वात जास्त आत्महत्या ह्या महाराष्ट्रात झाल्यात. व महाराष्ट्रात मराठवाडा व विदर्भ या दोन विभागात मोठ्या प्रमाणात आत्महत्या झालेल्या आहेत. याचे कारण भारताला विदेशातुन मिळणाऱ्या आयात वस्तु ह्या स्वस्तात मिळतात. परंतु भारतात उत्पादित होणाऱ्या कृषी मालाला उत्पादन खर्चा एवढीही किंमत मिळत नाही. म्हणुन जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवर प्रतिकुल परिणाम झालेला आहे.

**संदर्भ :**

1. रुद्रदत्त, केपीएम, सुंदरम - भारतीय अर्थव्यवस्था २०११-१२
2. झामरे जी.एम. - भारतीय अर्थव्यवस्था
3. भारतातील शेती व उद्योग - यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक.
4. प्रतियोगिता दर्पण सन २०१३-१४.
5. दैनिक लोकमत दि.६ फेब्रुवारी, २०१७.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# पुणे जिल्ह्यातील किल्ले पर्यटनाचे योगदान व महत्व

**सौ. स्नेहल विजय अब्रोल[1] डॉ. सतीश गुलाबराव जाधव[2]**
[1]श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, कर्वे रोड पुणे.
[2]संशोधक मार्गदर्शक, उपप्राचार्य, अरुणोदय ज्ञान प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व गृह विज्ञान महिला महाविद्यालय जळगाव.
**Corresponding Author: सौ. स्नेहल विजय अब्रोल**
**Email:** snehalpkhatri@gmail.com

**सारांश:**

पुणे जिल्ह्यातील पर्यटनाच्या दृष्टीने किल्ले पर्यटन महत्वाचे असून तेथील पायाभूत सोयी सुविधांमुळे अनेक पर्यटक अधिक प्रमाणात भेट देतात. यामुळे स्थानिक लोकांना रोजगार निर्मिती होऊन रोजगारात वाढ होत असल्यामुळे पुणे जिल्ह्यातील पर्यटनात किल्ले पर्यटनाचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

**मुख्य शब्द :**किल्ले पर्यटन, पर्यटनाचे महत्व, पुणे जिल्हा

**प्रस्तावना :**

पुणे जिल्हा हा महाराष्ट्रातील एक महत्वाचा जिल्हा आहे. पुणे शहराला महाराष्ट्राची सांस्कृतिक व ऐतिहासिक राजधानी म्हणून ओळखले जाते. आधूनिक जगात पर्यटन व्यवसायाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. महाराष्ट्र राज्याला देशातील सगळयात जास्त गड-किल्ले असणारे राज्य म्हणावे लागेल. पाणदुर्ग, डोंगरी गढ्या आणि डोंगरी किल्ले मिळून महाराष्ट्रातील एकूण गड किल्ल्यांची संख्या सातशेच्या घरात जाते. पुणे जिल्ह्यातील एकूण पर्यटन स्थळांचा विचार केला तर काही पर्यटन स्थळे धार्मिक आणि ऐतिहासिक तर काही थंड हवेचे पर्यटन स्थळे आहेत.

**संशोधनाचे उद्दिष्टे**

1. पुणे जिह्यातील किल्ल्यांचा भौगोलिक अभ्यास करणे.
2. पुणे जिल्ह्यातील किल्ल्यांचा पर्यटनाच्या हेतूने अभ्यास करणे.
3. पुणे जिल्यातील किल्ल्यांचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे.
4. पर्यटकांच्या हेतूने किल्ले संवर्धनाच्या उपाययोजनांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

पुणे जिल्ह्यातील किल्ल्यांच्या अभ्यासविषयासाठी दुय्यम माहिती गोळा केली आहे. यामध्ये इंटरनेट वेबसाईट, विकिपीडिया MTDC व संदर्भ ग्रंथ यांचा समावेश केला गेला आहे. प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्रामुख्याने दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आलेला असून यामध्ये संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, इंटरनेट, शोधनिबंधाचा तसेच काही लिखित साहित्य इत्यादींचा वापर करण्यात आलेला आहे.

**अभ्यास क्षेत्र**

पुणे जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १७ अंश ५४' ते १० अंश २४' उत्तर अक्षवृत्ताच्या दरम्यान आहे आणि रेखावृत्तीय विस्तार ७३ अंश १९' ते ७५ अंश १०' पूर्व रेखावृत्तापर्यंत आहे. पुणे जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १५,६४२ चौ.किमी. आहे. क्षेत्रफळानुसार पुणे जिल्ह्याचा महाराष्ट्रात दुसरा क्रमांक लागतो. पुणे जिल्ह्याच्या सीमेस उत्तरेस व पुर्वेस अहमदनगर जिल्हा, आग्नेय सोलापूर जिल्हा, दक्षिणेला सातारा जिल्हा, पश्चिमेस रायगड जिल्हा व वायव्येला ठाणे जिल्हा आहे. म्हणजेच पुणे जिल्ह्यास अहमदनगर, सोलापूर, सातारा, रायगड व ठाणे या पाच जिल्ह्यांच्या सीमा लागलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्याचे ५.१० क्षेत्र पुणे जिल्ह्याने व्यापलेले आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्ह्याची लोकसंख्या ९४ लाख २६ हजार ९५९ इतकी आहे. पुणे जिल्ह्यामध्ये एकूण १४

**तालुके** आहेत. यामध्ये हवेली, खेड, आंबेगाव, जुन्नर, शिरुर, दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर, वेल्हे, मुळशी, मावळ, पुणे शहर यांचा समावेश होतो.

**पुणे जिल्ह्यातील किल्ल्यांचा अभ्यास**









**सिंहगड किल्ला :** सिंहगड किल्ला हा पुणे शहरापासून ४९ किलोमीटर **हवेली** तालुक्यामध्ये आहे. पूर्वी हा किल्ला कोंढाणा या नावाने ओळखला जायचा. या किल्ल्याची उंची ४४५० फूट इतकी आहे. या किल्ल्यावरून असे दिसून येते कि सिंहगड किल्ला २ हजार वर्षापूर्वीचा आहे. यावरील कोंढाणेश्वर मंदिरातील लेणी आणि तेथील कोरीव काम याचा पुरावा देतात.

**पुरंदर किल्ला :** पुरंदर किल्ला पुणे जिल्ह्यातील सासवड जवळ वसलेला किल्ला आहे. पुरंदर किल्ला विस्ताराने खूप मोठा आहे. पुरंदर किल्ल्याची **उंची** ४४७२ फूट आहे. हा किल्ला विस्ताराने खूप मोठा आहे. पुरंदर किल्ल्यावर छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म झाला आहे, हे या किल्ल्याचे सर्वात मोठे ऐतिहासिक महत्त्व आहे.

**मल्हारगड किल्ला** : पुणे जिल्ह्यातील सासवड पासून मल्हारगड किल्ला सोनेरी गाव याठिकाणी ६ किलोमीटर अंतरावर आहे. हा किल्ला **३१६६ फूट** आहे. सोनेरी गावातून समोरच मल्हारगड किल्ला दिसतो. सर्व किल्ल्यांमध्ये सर्वात शेवटी बांधला गेलेला म्हणून 'मल्हारगड' प्रसिद्ध आहे.

**राजगड किल्ला :** राजगड हा पुणे जिल्ह्यातील एक किल्ला आहे. राजगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मराठी राज्याची पहिली राजधानी होती. पुणे शहराच्या नैऋत्येला ४८ कि.मी. अंतरावर आणि पुणे जिल्ह्यातील भोर गावाच्या २४ कि.मी. अंतरांवर नीरा आणि गुंजवणी या नद्यांच्या खोऱ्यात मुरुंबदेवाचा डोंगर आहे.

**तोरणा किल्ला :** तोरणा अथवा प्रचंडगड म्हणजे पुणे जिल्ह्यातला दुर्गकोटातील अतिदुर्गम व अतिविशाल म्हणून हा गड प्रसिद्ध आहे. , तोरणा किल्ल्याची उंची **४६०३ फूट** आहे. पुण्यापासून ६० किलोमीटर अंतरावर वेल्हे तालुकामधे हा किल्ला दिसून येतो. तोरणा किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी पहिला किल्ला जिंकून घेतला होता.

**कोरीगड किल्ला :** हा किल्ला पुणे जिल्ह्यातील लोणावळयाच्या डोंगर रांगावर आहे. कोरीगड हा किल्ला

कोराईगड, शहागड या नावाने देखील ओळखल्या जातो. समुद्रसपाटीपासूनची उंची ३०५० फुट आहे.

**शिवनेरी किल्ला** : महाराष्ट्राचे दैवत असलेले श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० मध्ये शिवनेरी किल्ल्यावर झाला. पुण्यापासून १०५ किलोमीटर अंतरावर जुन्नर ह्या शहरात हा किल्ल्याला आहे.

**पुणे जिल्हातील तालुकानिहाय किल्ले**

**जीवधन किल्ला :** जीवधन हा एक डोंगरी किल्ला आहे . पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील घाटघर या गावाजवळ १ किमी अंतरावर हा किल्ला आहे. हा किल्ला ३७५७ फूट उंच आहे. घाटघरच्या परिसरात असलेला हा पूर्वमुखी किल्ला प्राचीन नाणेघाटाच्या व्यापारी मार्गाच्या संरक्षणासाठी उभारण्यात आला होता.

| **किल्ला** | **तालुका** |
|---|---|
| सिंहगड | हवेली |
| पुरंदर | पुरंदर |
| मल्हारगड | वेल्हे |
| राजगड | वेल्हे |
| तोरणा | वेल्हे |
| तिकोना | मावळ |
| तुंग | मावळ |
| लोहगड | मावळ |
| कोरीगड | मुळशी |
| कैलासगड | मुळशी |
| शिवनेरी | जुन्नर |
| नारायणगड | जुन्नर |
| जीवधन | जुन्नर |
| हडसर | जुन्नर |
| चावंड किल्ला | जुन्नर |




**पुणेजिल्हा**तालुके

**निष्कर्ष**

1. पुणे जिल्ह्यातील किल्ल्यांचा अभ्यास करत असताना असे लक्षात आले कि इतर जिल्ह्याच्या तुलनेत येथील किल्ले अधिक आहेत.
2. पर्यटनाच्या दृष्टीने काही किल्ल्यांवर अनेक सोयी - सुविधा विकसित होताना दिसून येतात.
3. पुणे जिल्ह्यातील किल्ल्यांमुळे येथील पर्यटन विकसित झाल्याचे समजते.
4. किल्ले पर्यटनामुळे स्थानिक लोकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होताना दिसून येते.
5. किल्ले पर्यटनासाठी सर्व जिल्ह्यातून तसेच इतर राज्यातून पर्यटन येताना दिसून येतात.

**उपाययोजना**

1. सर्व किल्ल्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे.
2. ऐतिहासिक वारशाचे जतन करणे आवश्यक आहे.
3. पर्यटनाच्या दृष्टीने सर्व किल्ल्यांवर सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे.

**संदर्भसूची:**


1. श्रीपाद नीलकंठ दाण्डेकर(१९९०) मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई : किल्ले.
2. प्र.के. घाणेकर(२०११) स्नेहल प्रकाशन : गडांचा राजा राजगड.
3. प्राचार्या शैलजा अ. सांगळे (पुनमुद्रण २०२१), डायमंड पब्लिकेशन : पर्यटन भूगोल.
4. डॉ.शां.ग. महाजन (२००४) : पुणे शहराचा ज्ञानकोश.
5. पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २०२२
6. डॉ. द. ग. देशपांडे , महाराष्ट्रातील किल्ले (डायमंड पब्लिकेशन्स) पुनमुद्रण : २०२०
7. https://laxmikantkhabiya.wordpress.com/
8. https://marathime.com/pune-district-information-in-marathi/
9. https://mr.wikipedia.org/wiki/पुणे जिल्हा

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# पर्यटन व्यवसायाची ग्रामीण विकासातील भूमिका

**श्री शेषणारायण किसन देशमुख**
(सहाय्यक प्राध्यापक)माऊली महाविद्यालय,वडाळा
ता.उत्तर सोलापुर,जिल्हा-सोलापूर
**Corresponding Author:** **श्री शेषणारायण किसन देशमुख**
**Email:**dsheshnarayan@gmail.com

**प्रस्तावना:**

गांधीजींच्या मतानुसार ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय शहरी भागाचा विकास शक्य नाही म्हणून त्यांचे खेड्याकडे चला हे घोषवाक्य सर्वांना ज्ञात आहे. उद्योगाचे शहरी भागाकडील कल पाहता तसेच ग्रामीण भागातील शेतीचे दुरावस्था पाहता ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होणे अत्यंत आवश्यक आहे, ग्रामीण भागात रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे त्यासाठी ग्रामीण भागामध्ये कृषी उद्योग, लघुउद्योग तसेच रोजगार निर्मितीच्या दृष्टीने व समतोल विकासाच्या दृष्टीने आवश्यक पर्यटन व्यवसायाच्या वृद्धी आणि विकासासाठी सरकार व बिगर सरकारी संस्था यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. येथे पर्यटन आणि ग्रामीण विकास यांचा जवळचा संबंध आहे हे आधोरेकीत करावे लागेल प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ग्रामीण भागात खूप मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करण्यामध्ये पर्यटन व्यवसायाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**अभ्यासाचा उद्देश :**

1. पर्यटन विकासाचे महत्त्व तपासणे.
2. पर्यटन व्यवसायातून होणारी रोजगार निर्मिती अभ्यासणे.
3. पर्यटन व्यवसायाचे ग्रामीण विकासातील महत्त्व तपासणे.

**संशोधन पद्धती**:

प्रस्तुत अभ्यासासाठी दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. यामध्ये वर्तमानपत्रातील विविध लेख, इंटरनेटवरील साहित्य, विविध सप्ताहिके यांचा वापर केलेला आहे. तसेच संदर्भ साहित्याचा वापर केलेला आहे. भारतासारख्या खंडप्राय देशांमध्ये सुमारे 70 टक्के लोक आजही ग्रामीण भागात राहतात, त्यांच्या उपजीविकेसाठी शेतीबरोबर पशुपालन व्यवसाय केला जातो. परंतु ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात दैन्य दारिद्र्य असल्याचे दिसून येते, त्यामुळे गांधीजींच्या मतानुसार खेड्यांचा विकास झाल्याशिवाय भारताचे विकासाला गती येणार नाही. सन 2004 मध्ये डॉक्टर कलाम यांनी ग्रामीण विकासाचे पुरा मॉडेल याच तत्त्वानुसार मांडलेले आपणाला दिसून येते. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्याशिवाय ग्रामीण भागाचा व भारत देशाचा समतोल विकास होणार नाही. म्हणून ग्रामीण भागात लघु उद्योगांचा, कृषी उद्योगांचा त्याचबरोबर पर्यटनाचा विकास होणे, हस्तकला उद्योगाचा विकास होणे आवश्यक आहे. यातूनच ग्रामीण भागाचा आपणाला विकास करता येणार आहे.

**ग्रामीण विकासातील पर्यटनाचे महत्त्व**

ग्रामीण भागात छुपी तसेच हंगामी बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते. त्यामुळे यावर उपाय म्हणून पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात विकास होऊ शकतो. यासाठी सरकार जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहे. पर्यटन विकास हे महत्त्वपूर्ण साधन ग्रामीण विकासाचे असल्याचे सिद्ध होईल. ग्रामीण भागाच्या पर्यटना साठी वेगवेगळया प्रकारच्या जाहिरातीच्या माध्यमातून व वेगवेगळ्या प्रकारच्या व्यासपीठाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पर्यटन वृद्धिंगत करणे गरजेचे व महत्त्वाचे आहे.

**पर्यटनातील जाहिरातीचे महत्त्व:**

जाहिरातीच्या माध्यमातून पर्यटन विकासाचा वेग नक्की वाढेल यासाठी पर्यटन वृद्धीसाठी सरकारने निमसरकारी संस्थांनी तसेच खाजगी व इतर माध्यमातून विविध उपक्रमाच्या माध्यमातून पर्यटन विकासाच्या

वृद्धीला गती देणे आवश्यक आहे. कमी भांडवलावर आणि जलद उत्पन्न मिळवण्यासाठी पर्यटन व्यवसाय ग्रामीण भागामध्ये विकसित व वृद्धिंगत होणे अत्यंत गरजेचे आहे यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार संयुक्त प्रयत्नातून तसेच ग्रामीण पर्यटन केंद्राचे विकासातून ग्रामीण भागाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात मदत होते.

**पर्यटनाचे प्रकार**

1. शेती भेट योजना
2. शेततळे पर्यटन पोहणे मच्छर पालन
3. हुरडा पार्टीचे आयोजन
4. जिम नैसर्गिक फेरफटका
5. ऑक्सीजन पार्क
6. पक्षी प्राणी निरीक्षण
7. घोड्यावरील रपेट तसेच बैलगाडीत फिरणे
8. ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन

वरील अनेक प्रकारच्या पर्यटनाचे आयोजन करून ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती तसेच मूलभूत संरचना विकासामध्ये या पर्यटन व्यवसायाची मदत महत्वपूर्ण ठरवून ग्रामीण भागाच्या विकासाला अत्यंत मोलाची साथ पर्यटन व्यवसायाचे मिळून रोजगार निर्मिती होणार आहे.

**पर्यटनव्यवसायातील तोटे**

पर्यटनाच्या अतिरेकामुळे नैसर्गिक संसाधनांचा गैरवापर होऊ शकतो, त्याचबरोबर पर्यावरणाचे काही अंशी हानी होऊ शकते व नैसर्गिक विविधतेमध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो किंवा नैसर्गिक जैवविविधतेची साखळी तुटू शकते, त्याचबरोबर नैसर्गिक व कृत्रिम यामध्ये वाद निर्माण होऊन ग्रामीण भागातील वातावरण दूषित होऊ शकते, किंवा अलीकडील काळात पर्यटनाच्या नावावर ग्रामीण भागातील साधन संपत्तीवर भांडवली अतिक्रमण झालेले चे आपल्याला दिसून येते हे तोटे जर टाळले तर ग्रामीण भागात पर्यटन व्यवसाय विकासाचा मैलाचा दगड ठरल्याशिवाय राहणार नाही, म्हणून उपरोक्त तोटे टाळून पर्यटन व्यवसायाला गती देणे गरजेचे आहे.

**ग्रामीण विकासातील पर्यटनाची भूमिका किंवा महत्त्व**

1. **रोजगार निर्मिती** :ग्रामीण भागामध्ये शेतीमध्ये छुपी व अर्धबेरोजगारी आपणाला दिसते, त्याचबरोबर हंगामी बेरोजगारीचे ही स्वरूप खूप मोठ्या प्रमाणात आहे हे जर टाळायचे असेल तर बिगर हंगामाच्या काळात पर्यटनसारखा व्यवसाय ग्रामीण भागामध्ये वृद्धिंगत करून ग्रामीण भागातील बेरोजगारीवर मोठ्या प्रमाणात आपणाला मात करता येऊ शकते म्हणून रोजगार निर्मितीसाठी पर्यटनाचा विकास आवश्यक आहे.
2. **उत्पन्नाचे साधन:** ग्रामीण भागामध्ये शेती व्यवसायाला जोड व्यवसायाची अत्यंत आवश्यकता आहे शेतीवर उपजीविका किंवा उदरनिर्वाह पर जीवन जगणे नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा निसर्गाच्या लहरीपणामुळे सध्या अवघड होत चाललेले आहे म्हणून शेतीला जोड व्यवसाय असेल तर शेतकऱ्याचे जीवन सुसाई होऊ शकते म्हणून ग्रामीण भागात पर्यटन विकासाला चालना देऊन ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न वाढवणे अत्यंत आवश्यक आहे म्हणून पर्यटकांना म्हणून पर्यटनाचा विकास गरजेचा आहे.
3. **जोड व्यवसाय** :शेतीला पशुपालना बरोबर पर्यटनासारख्या जोड व्यवसायाची अत्यंत आवश्यकता आहे याच्यातून उत्पन्न रोजगार दोन्ही वाढू शकते
4. **ग्रामीण गुंतवणुकीत वाढ:** ग्रामीण भागातील मूलभूत संरचना विकासामध्ये सरकार तसेच बिगर सरकारी संस्थांच्या माध्यमातून मूलभूत संरचना विकास जसे रस्ते पाणीपुरवठा वनीकरण इत्यादींमध्ये वाढ झाल्यास बँकिंग क्षेत्रामध्ये वाढ झाल्यास दळणवळण यांचा साधनांमध्ये वाढ झाल्यास ग्रामीण भागाच्या विकासाला गती येईल म्हणजेच ग्रामीण भागामध्ये गुंतवणुकीत पर्यटनाच्या माध्यमातून वाढ झाल्यानंतर ग्रामीण भागाच्या विकासाला मदत होईल
5. **सोयी सुविधांचे जाळे निर्माण होईल:** ग्रामीण भागामध्ये रस्ते पाणीपुरवठा वीज पोस्ट बँका माहिती तंत्रज्ञानाची जाळे अशा सर्व गोष्टींचा ग्रामीण भागामध्ये पर्यटनाच्या माध्यमातून विकास होऊ शकतो म्हणून पर्यटनावर भर दिल्यास या मूलभूत संरचना विकास होण्यामध्ये मदत होईल यातून ग्रामीण भागाचा समतोल विकास झाल्याशिवाय राहणार नाही.
6. **सांस्कृतिक वारसा जपणे:** ग्रामीण भागामध्ये नैसर्गिकरित्या जुन्या रूढी परंपरा जपण्यासाठी म्हणजेच सांस्कृतिक वारसा टिकवण्यासाठी पर्यटनाच्या माध्यमातून या गोष्टी वृद्धिंगत होऊ शकतात यासाठी सरकारने जाणीवपूर्वक आर्थिक सहकार्याच्या

माध्यमातून तसेच शास्त्रोक्त पद्धतीने संस्कृतीचे जतन करणे पर्यटनाच्या माध्यमातून शक्य आहे.

7. **पर्यावरण संरक्षण:** पर्यटनाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण करता येईल. यासाठी वेगवेगळया कायद्यांची जनजागृती करून ग्रामीण भागातील पर्यावरण संरक्षणासह सांस्कृतिक जतनासह पर्यटन व्यवसायाची वृद्धी आपण करू शकतो, म्हणजेच याच उत्पन्नातून आपण वेगवेगळया प्रकारचे संस्कृती किल्ले, गड किंवा वेगवेगळया पुरातन वास्तूचे जतन आपल्याला पर्यटन व्यवसायाच्या उत्पन्नातून मिळू शकतो. तसेच त्याबद्दल समाजामध्ये जनजागृती होऊ शकते. की आपल्याकडे किती मोठा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. या संरक्षणाबरोबरच आपण पर्यावरणाचे ही अनाहूतपणे काळजी घेण्यास शिकतो व यातूनच पर्यावरण संरक्षण होते

8. **ग्रामीण जीवनमान सुधारेल** :ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न अत्यंत कमी आहे, म्हणून शेतीला जर पर्यटन व्यवसायाची जोड मिळाली तर ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळेल व यातून ग्रामीण भागातील जीवनमान सुधारण्यास मदत होईल.

9. **स्थलांतर थांबेल:** रोजगाराच्या शोधासाठी ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होणारी सध्याचे स्थलांतर ग्रामीण भागातील बेरोजगारीमुळे वाढत आहे, यावर उपाययोजना म्हणून ग्रामीण भागामध्ये पर्यटन व्यवसायात सुधारणा केल्यास किंवा वाढ केल्यास किंवा शासनाने जाणीवपूर्वक पर्यटन विकासाला मदत केल्यास ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होणारे लोकांची स्थलांतर नक्कीच थांबेल, म्हणून पर्यटन विकास गरजेचा आहे.

10. **शेतीवरील भार कमी करणे**: ग्रामीण भागात 70 टक्के पेक्षा जास्त लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. त्यामुळे सरासरी उत्पादन आणि उत्पादकता शेतीची अत्यंत कमी आहे जर शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण पर्यटन व्यवसायाचे विकासातून रोजगार निर्माण करून कमी केले तर शेतीची सुद्धा उत्पादन आणि उत्पादकता वाढेल व शेतीवरचा भार कमी होऊन ग्रामीण भागात सुबत्ता आल्याशिवाय राहणार नाही. म्हणून पर्यटन विकासाची गरज आहे.

11. **ग्रामीण विकासात सातत्य** : ग्रामीण विकासात मुख्य भूमिका शेतीची आहे. आणि शेती व्यवसाय हा पावसावर अवलंबून आहे, म्हणून ग्रामीण विकासामध्ये सातत्य असल्याचे आपणाला दिसून येत नाही परंतु शेतीला ग्रामीण भागामध्ये पर्यटन व्यवसायासाठी जर जोड मिळाली, तर नक्कीच नैसर्गिक लहरीपणावर आपल्याला मात करून ग्रामीण भागातील लोकांच्या उत्पन्नामध्ये सातत्य ठेवता येईल व त्यामुळे ग्रामीण भागाचे विकासात सुद्धा सातत्य राहील म्हणून पर्यटन विकास अत्यंत गरजेचे आहे .

12. **शेतीचे महत्व कायम ठेवणे** सुमारे दीडशे कोटी लोकसंख्येला लागणारे अन्नधान्य पुरवठा करण्याचे काम शेतीच्या माध्यमातून केले जातं परंतु अलीकडील शेतीच्या पावसावरील अवलंबित्वामुळे व उत्पन्नातील लहरीपणामुळे शेतीचे उत्पन्न अनिश्चित झाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांचे स्थलांतर शहरी भागाकडे मोठ्या प्रमाणात होते हे स्थलांतर जर टाळायचे असेल तर आपल्याला शेतीला पर्यटन व्यवसायासारख्या व्यवसायाची जोड देणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून ग्रामीण भागातील लोकसंख्या शेती सारखा व्यवसाय सोडून शहरी भागाकडे येणार नाही. व त्याचा विपरीत परिणाम अन्नधान्याच्या उत्पादनावर होणार नाही. म्हणून ग्रामीण भागामध्ये पर्यटन व्यवसायाचा विकास करून शेती आणि पर्यटन या दोन्हीच्या माध्यमातून येणाऱ्या उत्पन्नातून ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्नाचा स्तर कायम ठेवून ग्रामीण भागातील लोकांना स्थलांतरापासून लांब ठेवून ग्रामीण भागातील शेतीच्या विकासाच्या माध्यमातून सातत्यरत वाढणाऱ्या लोकसंख्येला अन्नपुरवठा करण्यासाठी क्षमता कायम ठेवता येईल त्यासाठी पर्यटन विकासाची गरज आहे.

**सारांश** :

अलीकडील काळात शरीरातील लोकांच्या वाढलेल्या उत्पन्नामुळे त्याचबरोबर आरोग्याच्या समस्यांमुळे ग्रामीण भाग निसर्ग वेगवेगळया गोष्टी किंवा जाणून घेणे रुढीपरंपरा जपणं यासाठी शहरी भागातील लोक ग्रामीण भागाकडे पर्यटनच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आकर्षित झालेले आपणाला दिसून येतात. वेगवेगळया पर्यटनाच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या कृती

जर पर्यटन व्यवसायासाठी सरकारने केल्या अनेक प्रकारचे अनुदान किंवा ग्रामीण वस्तूंचं पुनर्जीवन वारसा संस्कृतीचा प्रचार प्रसार पर्यटन विकासासाठी आवश्यक असणारे वेगवेगळे मिळावे. प्रदर्शन या माध्यमातून ग्रामीण भागातील सर्व समृद्ध असा वारसा आपण देशासमोर आणून ग्रामीण पर्यटनालावाढवू शकतो. व या माध्यमातून ग्रामीण भाग आणि शहरी भाग यांचा समतोल विकास करता येईल. जेणेकरून विकासाची दोन चाके ग्रामीण व शहरी भारतीय अर्थव्यवस्थेला गतिमान करतील म्हणून पर्यटन व्यवसाय अत्यंत महत्त्वाचा आहे. यासाठी सरकार बिगर सरकारी संस्था व सर्व सुज्ञ लोकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करून पर्यटन व्यवसाय वृद्धिंगत करणे गरजेचे आहे

**संदर्भसूची:**

1. www.researchgate.net
2. http://www.intechopen.com
3. http://www.greeksforgreeks.org
4. http://www.drishtiias.com
5. http://www.longdom.org

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# चाकूर येथील सत्यसाई पर्यटनस्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास

**प्रा.डॉ.आप्पाराव अण्णाराव काळगापुरे[1] दयानंद शिवाजीराव धावणे[2] डॉ.बी.एन. नागलगावे[3]**
[1] भूगोल विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक, श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर
[2]भूगोल विभाग, श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर
[3]भूगोल विभागप्रमुख, पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी जि.लातूर
**Corresponding Author: प्रा.डॉ.आप्पाराव अण्णाराव काळगापुरे**

**प्रस्तावना:**

'पर्यटन भूगोल' ही मानवी भूगोलाची अलीकडच्या काळात निर्माण झालेली शाखा आहे. 'पर्यटन' हा केवळ मनोरंजनाचा भाग नसून तो सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. पर्यटन भूगोलामध्ये स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटन कसे विकसित झाले आहे व त्यासाठी कोणते घटक कारणीभूत ठरतात. तसेच त्या पर्यटनाचा तेथील सामाजिक, आर्थिक स्थितीवर होणारा परिणाम पर्यटन भूगोलाच्या माध्यमातून अभ्यास केला जातो.


महाराष्ट्राला समृद्ध असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. यात विविध देवदेवतांची मंदिरे, ऐतिहासिक स्थळे यांचा समावेश होतो. मराठवाडा विभागही यास अपवाद नाही. या विभागातही विविध ऐतिहासिक वारसास्थळे, प्राचीन मंदिरे आहेत. ज्यास पर्यटक मोठ्या संख्येने भेटी देतात.

मराठवाडा विभागाच्या लातूर जिल्ह्यातील चाकूर येथील सत्यसाई पर्यटनस्थळाला सामाजिक आणि धार्मिक असे महत्त्व आहे. वेगवेगळया प्रकारची सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी असलेले पर्यटक बहुसंख्येने येथे येतात. नंदनवन परिसरात तलाव, बोटिंग, कारंज्या, संत बगीचा, मुलांना खेळण्यासाठी खेळणी, हनुमान टेकडी ही आकर्षणे बनविली आहेत. तसेच पर्यटनस्थळी होत असलेली गर्दी यामुळे व्यावसायिकांची संख्या सुद्धा खूप आहे. त्यामुळे सत्यसाई पर्यटनस्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासक्षेत्र:**

चाकूर तालुक्याचे स्थान हे दक्षिण पूर्व महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात आहे. या तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार हा $18^0 20'$ ते $18^0 40'$ उत्तर अक्षवृत्त असून रेखावृत्तीय विस्तार हा $76^0 42'$ ते $77^0 03'$ पूर्व रेखावृत्त असा आहे. तालुक्याचे क्षेत्र 925 चौ.कि. आहे. तसेच हा तालुका जिल्ह्याच्या ठिकाणापासून 37 कि.मी. अंतरावर आहे.

लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्याचे स्थान




**उद्दिष्टे:**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

1. चाकूर पर्यटनस्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांची सामाजिक स्थिती अभ्यासणे.
2. चाकूर पर्यटनस्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांची आर्थिक स्थिती अभ्यासणे.

**अभ्यासपद्धती व माहिती संकलन:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक व द्वितीय स्वरूपाची आकडेवारी वापरण्यात आली आहे. चाकूर पर्यटनस्थळाला भेट देऊन मुलाखत, प्रश्नावली इत्यादींचा वापर करून माहिती संकलित केलेली आहे. पर्यटनस्थळाला भेट दिलेल्या एकूण पर्यटकांपैकी 10 टक्के पर्यटकांचे सर्वेक्षण करण्यात आले. यासाठी प्रत्यक्ष निरीक्षण पद्धत वापरण्यात आली आहे. आकडेवारी संकलनाकरिता विविध संदर्भ ग्रंथ, लातूर जिल्हा गॅझेटिअर, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, भारतीय जनगणना अहवाल व संकेतस्थळांचा वापर करण्यात आलेला आहे.

**चाकूर सत्यसाई पर्यटनस्थळ :**

कोणत्याही पर्यटनस्थळाचा विकास तेथील सामाजिक व आर्थिक स्थितीवर परिणाम करीत असतो. चाकूर येथील सत्यसाई पर्यटनस्थळही याला अपवाद नाही. हे पर्यटनस्थळ वेगाने विकसित होऊन नावलौकिक मिळविलेले आहे. येथे येण्याचा पर्यटकांचा ओढा सतत वाढत गेलेला दिसून येतो. निसर्गरम्य परिसर आणि भव्य शिवलिंग, ॲम्युझमेंट पार्क हे आकर्षणाचे केंद्र आहेत. लातूर जिल्हा हा सीमावर्ती जिल्हा असून या पर्यटनस्थळाला राज्यातून व परराज्यातून पर्यटक भेटी देतात. त्यामुळे येथील सामाजिक व आर्थिक विकासाला चालना मिळत असलेली दिसून येते.

चाकूर पर्यटनस्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांमध्ये विविध प्रकारची सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी लाभलेल्या पर्यटकांचा समावेश असून नमुना निवडून निवडलेल्या पर्यटकांचा अभ्यास खालीलप्रमाणे

**पर्यटकांची सामाजिक स्थिती :**

सामाजिक स्थितीमध्ये शिक्षण, धर्म आणि भाषा या घटकांचा अभ्यास करण्यात आलेला असून तो खालीलप्रमाणे

**तक्ता क्र.1पर्यटकांची शैक्षणिक स्थिती**

| अ.क्र. | शिक्षण | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 10 वी पेक्षा कमी/दहावी पर्यंत | 07 | 07.00 |
| 2 | 12 वी पर्यंत | 33 | 33.00 |
| 3 | पदवी | 42 | 42.00 |
| 4 | पदव्युत्तर | 18 | 18.00 |
| | **एकूण** | **100** | **100** |

**स्रोत:** संशोधकाने संकलित केलेल्या माहितीवर आधारित

पर्यटकांची शैक्षणिक माहिती अभ्यासली असता सर्वात जास्त संख्या पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या पर्यटकांची टक्केवारी 42 एवढी दिसून आली. तर सर्वाधिक कमी 10 वी पेक्षा कमी किंवा 10 पर्यंत शिक्षण घेतलल्या पर्यटकांची टक्केवारी 07 आहे.

**पर्यटकांची शैक्षणिक स्थिती :**

सामाजिक स्थितीमध्ये शिक्षण, धर्म आणि भाषा आर्थिक स्थितीमध्ये व्यावसायिक स्थिती व उत्पन्न गट यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**पर्यटकांची भाषिक स्थिती :**

चाकूर पर्यटनस्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांची भाषिक स्थिती खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र.2पर्यटकांची भाषिक स्थिती**

| अ.क्र. | भाषा | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | मराठी | 90 | 90.00 |
| 2 | हिंदी | 04 | 04.00 |
| 3 | इंग्रजी | 01 | 01.00 |
| 4 | इतर | 05 | 05.00 |
| | **एकूण** | **100** | **100** |

**स्रोत:** संशोधकाने संकलित केलेल्या माहितीवर आधारित

पर्यटकांची भाषिक स्थिती अभ्यासली असता असे दिसून येते की, भेट दिलेल्या पर्यटकांपैकी सर्वाधिक संख्या ही मराठी भाषा बोलणाऱ्यांची 90 टक्के दिसून येते. तर इतर भाषा बोलणाऱ्यांची संख्या सर्वात कमी म्हणजे 10 टक्के इतकी दिसून येते.

**पर्यटकांची धार्मिक स्थिती :**

चाकूर पर्यटनस्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांची धार्मिक स्थिती खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र.३पर्यटकांची धार्मिक स्थिती**

| अ.क्र. | धर्म | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | हिंदू | 96 | 96.00 |
| 2 | मुस्लीम | 01 | 01.00 |
| 3 | शीख | 01 | 01.00 |
| 4 | इतर | 02 | 02.00 |
| | **एकूण** | **100** | **100** |

**स्रोत:** संशोधकाने संकलित केलेल्या माहितीवर आधारित

पर्यटकांची धार्मिक स्थिती अभ्यासली असता सर्वाधिक 96 टक्के पर्यटक हिंदू धर्मीय दिसून आले. कारण हे हिंदू धर्मियांचे पवित्र ठिकाण आहे. तर इतर धर्मिय पर्यटक 04 टक्के इतके आहेत.

**पर्यटकांची व्यावसायिक स्थिती :**

चाकूर पर्यटनस्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांची व्यावसायिक स्थिती खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र.४पर्यटकांची व्यावसायिक स्थिती**

| अ.क्र. | **व्यावसायिक स्थिती** | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | नोकरी | 72 | 72.00 |
| 2 | मजुरी | 08 | 08.00 |
| 3 | उद्योजक | 17 | 17.00 |
| 4 | शेती | 03 | 03.00 |
| | **एकूण** | **100** | **100** |

**स्रोत** : संशोधकाने संकलित केलेल्या माहितीवर आधारित

पर्यटकांची व्यावसायिक स्थिती अभ्यासली असता असे दिसून येते की, नोकरी करणाऱ्या पर्यटकांची सर्वाधिक टक्केवारी 72 एवढी आहे. तर मजुरी, उद्योजक व शेतकऱ्यांची टक्केवारी 28 ही सर्वात कमी असलेली दिसून येते.

**पर्यटकांचे उत्पन्न :**

चाकूर पर्यटनस्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांचे उत्पन्न खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.

**निष्कर्ष:**

1. पर्यटकांची शैक्षणिक माहिती अभ्यासली असता सर्वात जास्त संख्या पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या पर्यटकांची टक्केवारी 42 एवढी दिसून आली. तर सर्वाधिक कमी 10 वी पेक्षा कमी किंवा 10 पर्यंत शिक्षण घेतलल्या पर्यटकांची टक्केवारी 07 आहे.
2. पर्यटकांची भाषिक स्थिती अभ्यासली असता असे दिसून येते की, भेट दिलेल्या पर्यटकांपैकी सर्वाधिक संख्या ही मराठी भाषा बोलणाऱ्यांची 90 टक्के दिसून येते. तर इतर भाषा बोलणाऱ्यांची संख्या सर्वात कमी म्हणजे 10 टक्के इतकी दिसून येते.
3. पर्यटकांची धार्मिक स्थिती अभ्यासली असता सर्वाधिक 96 टक्के पर्यटक हिंदू धर्मीय दिसून आले. कारण हे हिंदू धर्मियांचे पवित्र ठिकाण आहे. तर इतर धर्मिय पर्यटक 04 टक्के इतके आहेत.
4. पर्यटकांची आर्थिक स्थिती अभ्यासली असता असे दिसून येते की, नोकरी करणाऱ्या पर्यटकांची सर्वाधिक टक्केवारी 72 एवढी आहे. तर मजुरी, उद्योजक व शेतकऱ्यांची टक्केवारी 28 ही सर्वात कमी असलेली दिसून येते.

**संदर्भ सूची:**


1. डॉ.घारपुरे विठ्ठल (2001), 'पर्यटन भूगोल', पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर
2. प्रा.कवठाळे अमित (2012), 'लातूर जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायाच्या संधी आणि रोजगार निर्मिती', रिसर्च लिंक-94, Vol.X
3. करडीले यादव मलप्पा (मार्च 2009), 'चाकूर तालुक्यातील लोकसंख्येचा अभ्यास', अप्रकाशित लघूशोध प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
4. पाण्डेय अनुपम (2007) 'पर्यटन का स्वरूप', डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, पृ.113-114
5. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2020
6. भारतीय जनगणना अहवाल 2020

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# मराठवाड्यातील दुर्लक्षित ऐतिहासिक पर्यटन उद्योगाचा विकास एक अभ्यास

**सहा. प्रा. रमेश बापूराव जोगदंड**
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, तिथपुरी ता. घनसावंगी जि. जालना
**Corresponding Author: सहा. प्रा. रमेश बापूराव जोगदंड**

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्याच्या चार विभागापैकी मराठवाडा एक प्रादेशिक विभाग असून मराठवाड्याला प्राचीन सांस्कृतिचा ऐतिहासिक वारसा लाभलेला असून जनपद आणि महाजनपदापैकी अश्मक हे जनपद मराठवाड्यात होते. अनेक प्राचीन राजघराण्यांनी मराठवाड्यावर राज्य प्रस्थापित केल्याचे आपणास दिसून येते. सातवाहन राष्ट्रकुट, वाकाटक, यादव या राज्यकर्त्याची मराठवाडा ही कर्मभूती होती. त्या काळात मराठवाड्याने देशाचे नेतृत्व केले होते. सातवाहन काळात मराठवाड्याचा व्यापार हा ग्रिक आणि रोमशी होता. येथील रेशमीवस्त्र, कला कुसरीच्या वस्तुंनी पाश्चात्य देशांना आकर्षित केले होते. प्रतिष्ठान, भोगवर्धन, तगर, लतनपुर, नंदगिरी अशा प्रकारची समृध्द व्यापारी पेठा येथे अस्तित्वात होत्या. राज्यकर्त्यांनी त्याच्या संपत्तीचा उपयोग लेणी, मंदिरे आणि किल्ले बांधण्यासाठी केला तसेच या काळात मराठवाड्याची सांस्कृतीक, आर्थिक, सामाजिक, राजकीय भराभराट झालेली दिसून येते. त्यातुनच राज्यकर्त्यांनी मराठवाड्याच्या परिसरात अनेक ऐतिहासिक वास्तु उभारल्या. अजिंठा, वेरुळ यांना जागतीक पर्यटन स्थळांचा दर्जा युनिस्कोने बहाल केला आहे. या दोन्ही पर्यटन स्थळांना दरवर्षी देश–विदेशातील लाखो पर्यटक भेट देत असतात. परंतु या सर्व पर्यटकांना मराठवाड्यात इतर ही असंख्य ऐतिहासीक स्मारके आहेत याची प्रसिध्दीच्या अभावी माहिती नसते, प्रसिध्दी आणि सोयी सुविधाच्या अभावी पर्यटकांकडून ही स्मारके वंचीत आहेत. अशा या ऐतिहासीक स्मारकांना पर्यटनाचा दर्जा देऊन त्या ठिकणी पर्यटन उदयोगासाठी कशा सुविधा निर्माण करता येतील या हेतूने हा शोध निबंध संशोधनासाठी घेतलेला आहे.

स्थानिक युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी त्यामधून निर्माण होऊ शकतील. सदर शोध निबंधाचा उद्देश आहे. मराठवाड्याची ऐतिहासिक आणि भौगोलिक पार्श्वभूमी ही पर्यटन उद्योगासाठी पोषक आहे. या पर्यटन उद्योगातून अनेक तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण होऊन मराठवाड्याच्या आर्थिक विकासात महत्वाची भूमिका या पर्यटन उद्योगाची होऊ शकते.

**शोध निबंधाची उद्दिष्टे**

1) मराठवाड्यातील दुर्लक्षित स्मारकांचा शोध घेणे,
2) मराठवाड्याच्या पर्यटन उद्योगातून रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे.
3) मराठवाड्याच्या ऐतिहासीक स्थळांना पर्यटनाचा दर्जा मिळवून देणे.
4) मराठवाड्याच्या ऐतिहासीक स्मारकांचे जतन आणि संवर्धन करणे.

**शोध निबंधाची गृहितके**

- मराठवाड्याच्या दुर्लक्षित ऐतिहासीक वारसामधून पर्यटन उद्योग निर्माण होऊ शकतो.
- मराठवाड्यातील दुर्लक्षित ऐतिहासीक स्मारके पर्यटन उद्योगासाठी सक्षम आहेत.
- मराठवाड्यातील दुर्लक्षित ऐतिहासीक पर्यटनातुन आर्थिक परिवर्तन होऊ शकते
- पर्यटन उद्योगातुन मराठवाड्याच्या ऐतिहासीक स्मारकांचे जतन आणि संवर्धन होऊ शकते.

**संशोधन पध्दती:**

मराठवाड्याच्या दुर्लक्षित ऐतिहासीक शोध निबंधासाठी प्रत्यक्ष स्थळभेटी सर्वे आणि दुय्यम संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये संदर्भग्रंथ लिखित साहित्य, वर्तमानपत्रे, मासिके, इ. उपयोग करण्यात आला आहे.

**दुर्लक्षित पर्यटनाची व्याख्या-**

पर्यटन उद्योगासाठी सक्षम असणारे ऐतिहासीक स्थळे परंतु पर्यटकांपासून वंचित असणाऱ्या ऐतिहासीक स्थळांना दुर्लक्षित पर्यटन स्थळे म्हणतात.

**पर्यटन उद्योगात ऐतिहासीक पर्यटन स्थळांचे महत्व**

पर्यटकांना इतिहासाबद्दल प्रचंड आकर्षण असते, लहानपणापासून इतिहासात वाचलेल्या घटना प्रत्यक्ष बघण्याचे आणि इतिहास जाणून घेण्याकरीता पर्यटक ऐतिहासीक स्थळांना भेट देत असतो. मराठवाड्याच्या परिसरात असंख्य दुर्लक्षित ऐतिहासीक स्मारके विखुरलेली आहेत. त्या स्मारकांपर्यंत पर्यटकांना घेवून जाण्याची आपली जबाबदारी आहे. ही सर्व दुर्लक्षित स्मारके पर्यटकांच्या प्रतिक्षेत उभी आहेत. या दुर्लक्षित स्मारकांमध्ये लेणी, मंदिरे, किल्ले, थोर संतांची जन्मस्थाने, त्याच्या समाधी, याचा अंतर्भाव करता येईल. संपूर्ण मराठवाड्याच्या परिसरात अशा प्रकारची ऐतिहासीक दुर्लक्षित वास्तु विखुरलेल्या आहेत. त्या सर्व ऐतिहासीक स्मारकांच्या पर्यटन उद्योगात समावेश केला तर मराठवाड्याच्या आर्थिक संपन्नतेत निश्चित भर पडेल आणि स्थानिक तरुणांना रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होऊ शकतील म्हणून पर्यटन उद्योगात दुर्लक्षित ऐतिहासीक स्मारकांचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे.

**दुर्लक्षित पर्यटन उद्योगासाठी सोयी सुविधा**

आधुनिक जगातील प्रचंड आर्थिक उलाढाल आपणास उद्योग म्हणून पर्यटनाकडे बघितले जाते एवढेच नाही तर अनेक देशाच्या अर्थव्यवस्थेचा पर्यटनावर आधारीत आहेत व्यक्ती, समाज आणि देश याच्या आर्थिक परिवर्तनासाठी या पर्यटन उद्योगाने आपला महत्वाचा सहभाग नोंदवला आहे. आज इतर देशात जे पर्यटनाद्वारे आर्थिक बदल होत आहेत त्याच्या श्रीमंतीत प्रचंड वाढ होत आहे. त्याचा पाया हा पर्यटन उद्योसाठी निर्माण केलेल्या सोयी सुविधा आहे. आपण ही मराठवाड्याच्या आर्थिक उभारणीसाठी स्थानिक लोकांच्या परिस्थितीत अमुलाग्र बदल करण्यासाठी आपल्या परिसरात असणाऱ्या ऐतिहासीक स्मारकांचे जतन आणि संवर्धन करुन या स्थळांपर्यंत पर्यटक कसा आकर्षित होईल त्यासाठी सर्व प्रकारच्या सेयी सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता आहे जसे रस्ते, लाईट, मुबलक पाणी, दळण वळणाची साधने, हॉटेल्स लॉज, सुरक्षितता, शुध्द हवा, निसर्गरम्य वातावरण, एकुण पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी ज्या काही मुलभूत सोयी सुविधा असतात त्या निर्माण केल्या तर निश्चितपणे पर्यटनाचा विकास होऊ शकतो.

**ऐतिहासीक पर्यटन उद्योगातुन आर्थिक विकास**

इतिहास आणि पर्यटन एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पाश्चात्य देशांनी आपल्या इतिहासाची मार्केटिंग करुन पर्यटकांना आकर्षित केले आणि त्यामधुन प्रचंड आर्थिक विकास करुन घेतला. त्याप्रमाणेच आपण देखील इतिहासापासून पैसा निर्माण करु शकतो. ऐतिहासीक स्मारकांबद्दल प्रचंड जिव्हाळा पर्यटकांना असतो ऐतिहासीक घटना या देशाच्या जडण घडणीत महत्वाच्या असतात आणि सर्वांचे प्रचंड आकर्षण पर्यटकांना असते. त्याचा फायदा पर्यटन उद्योग उभारणीसाठी पाश्चात्य देशांनी केला आपणही आपल्या इतिहासाचा उपयोग पर्यटन उद्योगासाठी करु शकतो. पर्यटन उद्योगासाठी आवश्यक असणाऱ्या ऐतिहासीक साईड मराठवाड्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणात आहेत त्यातुन आपला भुतकाळ हा भविष्याच्या पर्यटन उद्योगासाठी सक्षम असून त्यासाठी योग्य नियोजनाची आवश्यकता आहे.

**दुर्लक्षित ऐतिहासीक स्थळांची मार्केटिंग करणे**

मराठवाड्याला समृध्द ऐतिहासीक वारसा लाभला असून पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. मराठवाड्यातील ही काही मोजकी पर्यटन स्थळे सोडली तर इतर ठिकाणीही दर्जेदार ऐतिहासीक स्मारके आहेत याची प्रसिध्दीच्या अभावी पर्यटकांना माहिती नसते किंवा त्या स्मारकापर्यंत जाण्यासाठी सोयी सुविधा नसतात. त्यासाठी दुर्लक्षित ऐतिहासीक स्थळांची पर्यटन उद्योगाच्या दृष्टीने प्रसिध्दी करणे अतिशय महत्वाचे आहे. आपला समृध्द वारसा पर्यटकांपर्यंत पोहोचला पाहिजे. त्यासाठी पाश्चात्य देशांनी पर्यटन उद्योगासाठी कशा प्रकारे नियोजन केले त्याचा अभ्यास करुन आपली ऐतिहासीक स्मारके पैसा निर्माण करु शकतात आणि हजारो तरुणांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या अनेक संधी त्यामधुन मिळू शकतात.

**पर्यटन संस्कृती निर्माण करणे**

दुर्लक्षित पर्यटन उद्योगाचा विकास करण्यासाठी पर्यटन संस्कृती रुजविण्याची आवश्यकता आहे. शालेय, महाविद्यालयीन अभ्यासक्रमात पर्यटनाचे महत्व, पर्यटनाचा आर्थिक फायदा आणि आपल्या परिसरातील लोकांच्या

हाताला रोजगार कसा मिळेल याचे महत्व सांगणारा अभ्यासक्रम विद्यार्थ्यासाठी असला पाहिजे. भारतीय संस्कृतीत, **"अतिथी देवो भव"** अतिशय महत्व आहे. तोच विचार पर्यटन उद्योगाचा पाया आहे. व्याख्यान, प्रवचन, संम्मेलने या सर्व ठिकाणी पर्यटन उद्योगाच्या संबंधी मार्गदर्शन झाले पाहिजे एकुण असे म्हणता येईल की, दुर्लक्षित पर्यटनासाठी जेवढे काही करता येईल तेवढे प्रयत्ना आपण केले पाहिजेत.

**सारांश:**

पर्यटन उद्योग हा आर्थिक परिवर्तन करणारा आणि असंख्या तरुणांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणारा उद्योग आहे. या उद्योगामुळे अनेकांच्या हाताला काम लागु शकते त्यासाठी सर्वकष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. सध्या अनेक देशाच्या अर्थव्यवस्था पर्यटनावर आधारीत आहे. आपण ही या क्षेत्रात खुप चांगली कामगिरी करु शकतो, प्रसिध्द असणारे पर्यंतस्थळा सोबच दुर्लक्षित पर्यटन स्थळांचाही आपण विकास केला पाहिजे. पर्यटन हा एकमेव रोजगार आहे जो सर्वांना समजावून घेवून आपले आर्थिक मागासलेपण दुर करु शकतो या उद्देशाने सदर विषय शोध निबंधासाठी घेतलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

1. सामाजिक संशोधन पध्दती श्री प्रदीप आगलावे
2. पर्यटन भूगोल- डॉ. नागतोडे
3. पर्यटन भूगोल – डॉ. विठ्ठल घारपुरे
4. पर्यटन भूगोल – शैलजा अ. सांगळे

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.15(A) Jan-Feb 2025

# पर्यटन काळाची गरज एक भौगोलिक अवलोकन

**प्रा. डॉ. जनार्धन केशवराव वाघमारे**
भूगोल विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय चाकूर जि लातूर
**Corresponding Author: प्रा .डॉ. जनार्धन केशवराव वाघमारे**

**सारांश:-**

पर्यटन म्हणजे मनोरंजन, विश्रांती आणि ज्ञान मिळवण्यासाठी केलेला प्रवास. पर्यटनामध्ये लोक नवीन ठिकाणे, संस्कृती, प्रथा आणि निसर्गाचा अनुभव घेतात. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात पर्यटनाला विशेष महत्त्व आहे.
पर्यटनाचे विविध प्रकार आहेत, जसे की ऐतिहासिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, साहसी पर्यटन, निसर्ग पर्यटन आणि वैद्यकीय पर्यटन. ऐतिहासिक पर्यटनामध्ये प्राचीन वास्तू, किल्ले आणि स्मारकांना भेट देणे समाविष्ट आहे, तर धार्मिक पर्यटनामध्ये तीर्थक्षेत्रे आणि धार्मिक स्थळांना भेट दिली जाते. निसर्ग पर्यटनामध्ये पर्वत, नद्या, समुद्रकिनारे आणि जंगलांचा आनंद घेतला जातो.

पर्यटनामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते. स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. पर्यटकांच्या आगमनामुळे स्थानिक संस्कृती, खाद्यपदार्थ आणि हस्तकलेला प्रोत्साहन मिळते. मात्र, अनियंत्रित पर्यटनामुळे पर्यावरणाचे नुकसान होऊ शकते, म्हणून शाश्वत आणि जबाबदार पर्यटनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.
एकंदरीत, पर्यटन हे शारीरिक आणि मानसिक ताजेतवानेपणाचा उत्तम मार्ग आहे. त्यातून ज्ञान वाढते, अनुभव समृद्ध होतो आणि नव्या ठिकाणांबद्दल आदर निर्माण होतो.

**बिज संज्ञा:-** पर्यटन काळाची गरज एक भौगोलिक अवलोकन

**प्रस्तावना:-**

पर्यटन म्हणजे निसर्गसौंदर्य, सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक स्थळे आणि विविधतेने नटलेल्या प्रदेशांचा शोध घेण्याचा एक आनंददायी अनुभव. मानवी जीवनात पर्यटनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. रोजच्या धावपळीच्या जीवनातून काही काळासाठी बाहेर पडून मन:शांती मिळवण्यासाठी आणि नव्या ऊर्जेने जीवनाला सामोरे जाण्यासाठी पर्यटन आवश्यक ठरते.
पर्यटनामुळे केवळ मन:शांतीच मिळते असे नाही, तर भौगोलिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ज्ञानातही वाढ होते. नवीन ठिकाणे, लोकांचे जीवन, परंपरा आणि रीतिरिवाज यांचा अनुभव घेता येतो. याशिवाय पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतात. पर्यावरणाचा सन्मान राखत आणि शाश्वत पर्यटनाला प्रोत्साहन देत, आपण आपल्या अनुभवांमध्ये अधिक समृद्धी जोडू शकतो. सर्वसामान्य लोकांपासून ते प्रवासप्रेमींपर्यंत, पर्यटन प्रत्येकाच्या जीवनात आनंदाची नवी ज्योत प्रज्वलित करते. म्हणूनच, पर्यटन हे केवळ एक अनुभव नसून जीवनातील महत्त्वाचा अध्याय आहे.

**उद्दिष्टे:-**पर्यटन ही संकल्पना जाणून घेऊन पर्यटनाचे महत्त्व व समस्या व त्यावरील उपायाचा अभ्यास करणे.

**विषय विवेचन:-**

पर्यटन म्हणजे लोकांच्या मनोरंजनासाठी, ज्ञानासाठी, सांस्कृतिक आदानप्रदानासाठी, किंवा विश्रांतीसाठी केलेली प्रवास व त्यासंबंधित क्रियाकलाप. पर्यटन ही एक वैश्विक संकल्पना आहे जी व्यक्तीच्या मनोरंजनासोबतच सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून महत्त्वाची भूमिका बजावते.
पर्यटनाची साधारण व्याख्या अशी करता येईल:

"मनोरंजन, विश्रांती, व्यवसाय, शिक्षण, सांस्कृतिक किंवा धार्मिक कारणांमुळे व्यक्तीने घरापासून दूर

जाऊन काही कालावधीसाठी राहण्याची प्रक्रिया म्हणजे पर्यटन होय."

"पर्यटन म्हणजे कायमस्वरूपी वस्ती न करण्याच्या हेतूने अनिवासी व्यक्तीच्या सहवासातून आर्थिक उत्पन्नाशिवाय असलेली भ्रमंती होय."

"एखाद्या देशात किंवा शहरात परदेशी व्यक्तीचे आगमन होऊन भ्रमंती करणे व परत स्वग्रही जाणे म्हणजे पर्यटन होय."

पर्यटन म्हणजे व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनातील नियमित कामातून किंवा दिनचर्येतून बाहेर पडून विशिष्ट उद्देशाने (मनोरंजन, विश्रांती, ज्ञानप्राप्ती, निसर्गसौंदर्य अनुभवणे, धार्मिक कारणे इत्यादीसाठी) एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे व तेथे काही काळ राहणे.

पर्यटन ही व्यक्तीच्या मानसिक व शारीरिक विश्रांतीसाठी महत्त्वाची क्रिया असून, ती निसर्गाशी जोडणारी आणि नव्या अनुभवांनी समृद्ध करणारी असते.

पर्यटनाची गरज समाज, व्यक्ती आणि राष्ट्रासाठी महत्त्वाची आहे.

**पर्यटनाची गरज/ महत्त्व:**

1. **शारीरिक आणि मानसिक ताजेतवानेपणा:**
   दैनंदिन आयुष्यातील ताणतणाव आणि कामाच्या ओझ्यापासून मुक्त होण्यासाठी पर्यटन आवश्यक आहे. नवीन ठिकाणी गेल्याने मनाला आनंद मिळतो आणि ताजेतवाने वाटते.
2. **ज्ञानवृद्धी:**
   पर्यटनामुळे विविध संस्कृती, परंपरा, इतिहास, आणि भूगोलाची माहिती होते. जगाचे आकलन अधिक चांगल्या प्रकारे होते.

   बाजारपेठिची निर्मिती: पर्यटन केंद्राच्या ठिकाणी पर्यटनाला आलेल्या हौशी पर्यटकांना स्थानिक बाजारपेठेचा मोह असतो. जर या बाजारपेठा विकसित आणि सोयीसुविधांनी समृद्ध असतील तर व्यापार विकसित होण्यास मदत होते.
3. **आर्थिक विकास:**
   पर्यटनामुळे स्थानिक व राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला चालना मिळते. हॉटेल, रेस्टॉरंट्स, गाइड सेवा आणि स्थानिक उत्पादने यांना बाजारपेठ मिळते.
4. **परकीय चलन:**
   पर्यटन व्यवसायाला अदृश्य निर्यात असे म्हटले जाते. पर्यटनामुळे परदेशी चलन मोठ्या प्रमाणात मिळते विदेशी एक पर्यटकांना वेगवेगळया सेवा सुविधा पुरविल्यामुळे या सेवांच्या मोबदल्यात परकीय चलन उपलब्ध होते.
5. **देशाच्या आर्थिक विकासास सहाय्यता:** पर्यटन हा असा उद्योग आहे, की ज्यामुळे अविकसित देशात जलद आर्थिक विकास होण्यास मदत होते आणि त्यामुळे उद्योगाच्या विकासाकडे अधिकाधिक लक्ष दिले जाते.
6. **राष्ट्रीय उत्पन्नात वाढ:** पर्यटन व्यवसायाच्या वाढीतून एकूणच उत्पन्नामध्ये जर वाढ होत असेल तर हे पर्यटना बरोबरच राष्ट्राच्या दृष्टीने देखील सोयीचे असते. पर्यटन हा तृतीय श्रेणीतील सेवाभावी व्यवसाय असल्याने या व्यवसायास उच्च दर्जाचा व्यवसाय समजला जातो.

**निसर्ग आणि पर्यावरणाचे महत्त्व:**

निसर्गरम्य ठिकाणी भेट दिल्यामुळे पर्यावरणाचे महत्त्व लक्षात येते. पर्यावरण संवर्धनासाठी लोक जागरूक होतात.

1. **प्रादेशिक असमतोल कमी होतो:** पर्यटनाचा विकास हा प्रदेशा प्रदेशांमधील प्रादेशिक समतोल कमी करण्यास मदत करतो. भारतातील काश्मीर व गोवा या साधन संपत्तीचे मर्यादित असणाऱ्या राज्यांचा विकास हा पर्यटनामध्ये सहज शक्य झालेला आहे.
2. **सास्कृतिक आदानप्रदान:** विविध ठिकाणांना भेट दिल्यामुळे लोकांना वेगवेगळया संस्कृतींची ओळख होते. त्यातून माणसांमध्ये एकमेकांप्रती समजूतदारपणा आणि स्नेह वाढतो.
3. **व्यवसाय आणि रोजगार निर्मिती:** पर्यटन क्षेत्रात काम करण्यासाठी अनेक संधी निर्माण होतात. हे क्षेत्र रोजगाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.
4. **आरोग्यासाठी फायदेशीर:** ट्रेकिंग, समुद्रकिनाऱ्यावर चालणे किंवा डोंगराळ भागात फिरणे यामुळे शारीरिक व्यायाम होतो, ज्यामुळे आरोग्य सुधारते.
5. **राष्ट्राच्या ओळखीचे साधन:** पर्यटनामुळे राष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि सौंदर्य जगासमोर येते. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर राष्ट्राची ओळख निर्माण होते.

6. **निसर्गाबद्दल आवड निर्माण होते/भौगोलिक घटकांची माहिती होते:** पर्यटनामुळे पर्यटक वेगवेगळ्या भागात भ्रमंती करतो त्यानिमित्ताने त्याला निसर्ग पाहता येतो. त्यामुळे निसर्गाबद्दल आवड निर्माण होतील. त्यातूनच पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने त्याच्याकडून प्रयत्न होऊ शकतात.
7. **राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते:** पर्यटन व्यवसायामुळे राष्ट्रीय एकात्मतेत वाढ होते.

पर्यटनाचे वेगवेगळे प्रकार पहावयास मिळतात. त्यात आंतरराष्ट्रीय पर्यटन: देशाच्या बाहेर प्रवास करणे. स्थानिक पर्यटन: आपल्या देशातच विविध भागांना भेट देणे. सांस्कृतिक पर्यटन: विविध प्राचीन वास्तू, उत्सव, आणि कला यांचा अभ्यास व अनुभव घेणे. निसर्गपर्यटन (इको-टूरिझम): पर्यावरण संवर्धनासाठी जबाबदारीने प्रवास करणे. धार्मिक पर्यटन: तीर्थस्थळांना भेट देणे. साहसी पर्यटन: ट्रेकिंग, राफ्टिंग, बाईक सफारी, स्काय डायव्हिंग यांसारख्या साहसी उपक्रमांचा अनुभव घेणे. वैद्यकीय पर्यटन: आरोग्यसेवा किंवा उपचारासाठी प्रवास करणे.

**पर्यटन व्यवसायातील समस्या:**

पर्यटन व्यवसाय हा अनेक देशांमध्ये आणि प्रदेशांमध्ये अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहे, परंतु यामध्ये काही समस्या आणि आव्हाने देखील असतात. या समस्या वेगवेगळ्या स्तरांवर भासत असतात. पर्यटन व्यवसायातील मुख्य समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

**हंगामी स्वरूप:** अनेक पर्यटन स्थळांवर हंगामानुसार प्रवाशांची संख्या बदलते. त्यामुळे पर्यटन व्यवसाय हा सातत्याने उत्पन्न देणारा व्यवसाय नसतो.ऑफ-सीझन दरम्यान व्यवसायिकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते.

**पर्यावरणीय परिणाम:** अति-पर्यटनामुळे नैसर्गिक संसाधनांचे नुकसान होते.

**कचरा समस्या निर्माण होतात:** प्लास्टिक व अन्य कचऱ्याची समस्या, प्रदूषण, आणि जैवविविधतेला धोका हे प्रमुख मुद्दे आहेत.

**अपुरे पायाभूत सुविधा:** अनेक ठिकाणी रस्ते, सार्वजनिक वाहतूक, शौचालये, आणि स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असतो.अपुरे हॉटेल्स, पार्किंग व्यवस्था, आणि अन्य पर्यटकांसाठीच्या सुविधांमुळे प्रवाशांचा अनुभव बिघडतो.

**स्थनिक संस्कृती आणि परंपरांवर परिणाम:**मोठ्या प्रमाणावर बाहेरून येणाऱ्या पर्यटकांमुळे स्थानिक संस्कृती, परंपरा, आणि जीवनशैलीवर परिणाम होतो.व्यावसायिकीकरणामुळे स्थानिक चालीरीती गमावल्या जातात.

**राजकीय अस्थिरता आणि सुरक्षा:** राजकीय अस्थिरता, युद्ध, दहशतवाद यामुळे पर्यटन व्यवसायाला मोठा फटका बसतो. प्रवाशांना सुरक्षा हवी असते, ती जर कमी वाटली तर पर्यटक कमी येतात.

**स्थानिक लोकांचा विरोध:** अनेकदा स्थानिक लोक पर्यटनामुळे होणाऱ्या गर्दीला, संसाधनांच्या कमीला, आणि वाढत्या किंमतींना विरोध करतात.

त्यामुळे स्थानिक आणि पर्यटन व्यवसाय यांच्यात संघर्ष निर्माण होतो.

**मार्केटिंग आणि प्रचाराचा अभाव:** अनेक चांगली ठिकाणे योग्य प्रचार आणि जाहिरातीअभावी ओळखली जात नाहीत.

डिजिटल प्लॅटफॉर्मचा अपुरा वापर देखील समस्या ठरतो.

**स्पर्धा:** स्थानिक, राष्ट्रीय, आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी स्पर्धा असते.इतर देश किंवा प्रदेश आकर्षक पॅकेजेस देऊन प्रवाशांना आकर्षित करतात.

**अधिक खर्च आणि महागाई:** वाढत्या हॉटेल, वाहतूक, आणि इतर सेवांच्या किमतींमुळे सामान्य प्रवाशांसाठी पर्यटन खर्चिक ठरते.यामुळे कमी बजेट असलेल्या प्रवाशांची संख्या घटते.

**कोविडसारख्या साथीच्यारोगांचा प्रभाव** :महामारीमुळे पर्यटन व्यवसाय पूर्णपणे ठप्प होतो.

**प्रवाशांमध्ये प्रवासाविषयी असुरक्षिततेची भावना निर्माण होते.याशिवाय पर्यटनस्थळांची वेगवेगळी आव्हाने आहेत:**

1. अतिपर्यटनामुळे पर्यावरणाचे नुकसान होणे.
2. ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांचे रक्षण न होणे.
3. स्थानिक समुदायांवर ताण.
4. पर्यटन क्षेत्रातील अस्थिरता (राजकीय आणि नैसर्गिक आपत्तींमुळे).सतत विकसित होत असलेल्या या क्षेत्रासाठी पर्यावरणपूरक आणि जबाबदार पर्यटनाला प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे.

**पर्यटन व्यवसायातील समस्येवर उपाय:**

1. टिकाऊ पर्यटनाचा स्वीकार करून पर्यावरण रक्षणाला प्राधान्य द्यावे.
2. स्थानिक लोकांच्या सहभागाने पर्यटन विकास करावे.
3. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करावी.
4. पर्यटनासाठी हंगामाव्यतिरिक्त पर्याय तयार करावेत.
5. डिजिटल मार्केटिंगला चालना द्यावी आणि विशेष पॅकेजेस ऑफर करावेत.
6. पर्यटना विषयी असलेल्या कायद्यांचे काटेकोर पालन करावे.
7. पर्यटन व्यवसायाकडे शासनाने सहकार्याच्या भावनेने पहावे.
8. लोकांनीही आपल्या सुरक्षिततेकडे अधिक लक्ष द्यावे व आपल्यामुळे पर्यटन स्थळेवर कोणत्याही समस्या निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्यावी.
9. एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंत प्रमाणे पर्यटकांनी व स्थानिकांनी वागण्याचा प्रयत्न करावा.

**निष्कर्ष:**

पर्यटन ही केवळ मनोरंजनाची बाब नसून ती व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रत्येकाने योगदान दिले पाहिजे.

**संदर्भ सुची:-**


1. unishivajihttps://www.unishivaji.ac.in PDF B. A. Par-II Tourism GeographyTitle.pmd
2. unishivajihttps://www.unishivaji.ac.in PDF भारतातील प्रवास आणि पर्यटनाचा इतिहास
3. Kisan Veer Mahavidyalaya, Wai https://kvmwai.edu.in PDF सत्र ४ : घटक क्र. १ - Nature of Tourism in History
4. sbmrajgurunagar.ac.inhttps://sbmrajgurunagar.ac.in PDF व्याख्या व स्वरूप
5. vivekanandcollege.ac.in https://www.vivekanandcollege.ac.in PDF ऐतिहासिक पर्यटन - Vivekanand College

**Chief Editor**

**P. R. Talekar**

Secretary,

Young Researcher Association, Kolhapur(M.S), India

**Editorial & Advisory Board**

| | | |
|---|---|---|
| Dr. S. D. Shinde | Dr. M. B. Potdar | Dr. P. K. Pandey |
| Dr. L. R. Rathod | Mr. V. P. Dhulap | Dr. A. G. Koppad |
| Dr. S. B. Abhang | Dr. S. P. Mali | Dr. G. B. Kalyanshetti |
| Dr. M. H. Lohgaonkar | Dr. R. D. Bodare | Dr. D. T. Bornare |